विवेक-मण्डन

म. ग्रं. सं. ठाणे
विषय जीवनी
सं. क्र. 3993

REFBK-0008858

प्रा. श्री. म. माटे

मराठा ग्रंथ संग्रहालय, पुणे. ग्रंथक्रमांक.
अनुक्रमांक 2211e दिनांक
क्रमांक 9993 नोंदविले

विवेक मण्डन

श्री. म. माटे, एम्. ए.



मूल्य रु. ३-४-०

व्हीनस प्रकाशन : पुणें

आवृत्ति पहिली १९५६

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन



प्रकाशक :
स. कृ. पाध्ये
व्हीनस प्रकाशन
४१० शनवार : पुणें २

मुद्रक :
ह. म. गद्रे
जनवाणी प्रिंटिंग प्रेस
४५ बुधवार : पुणें २

22CC वि. निबंध
9993 नं. दि. 22.2.

प्रस्तावना

या निबंधसंग्रहांतील विषयांची निवड मीं नेहमींप्रमाणेंच केली आहे. एकंदर निबंध पंधरा असून, त्यांचीं तीन पंचकें केलीं आहेत; व प्रत्येक पंचकांत पहिला निबंध एखाद्या व्यक्तीसंबंधींचा, दुसरा उपस्थित झालेल्या सामाजिक प्रश्नाचा, तिसरा वाङ्मयविषयक, चौथा तात्त्विक विवेचनाचा व पांचवा परकी समाजाच्या ओळखीचा. दुसऱ्या पंचकांत हा अनुक्रम चुकून बदललेला आहे. त्यांतील पांचवा निबंध दुसऱ्या क्रमांकाचा समजावा. दोन, तीन आणि चार हे अनुक्रमें तीन, चार व पांच या क्रमाचे समजावे.

पहिल्या पंचकांतील "मार्गे पडलेला बैरागी" हा निबंध विष्णुबुवा ब्रह्मचारी गोखले यांच्या संबंधींचा आहे. विष्णुबुवा ब्रह्मचारी हा एक, अव्वल इंग्रजींत फार मोठा सुधारक होऊन गेला. त्याचा मुख्य भर व्याख्यानांवर असल्यामुळें तीं व्याख्यानें हवेंत विरून गेलीं; आणि इ. स. १८५८ सालीं प्रसिद्ध झालेला त्याचा वेदोक्त धर्मावरील ग्रंथ पावावें तितकें चलन पावला नाहीं. लोकहितवादी, म. फुले यांच्या जोडीलाच या ब्रह्मचाऱ्याचें नांव बसावयास हवें. प्रस्तुतच्या निबंधांत त्यांच्या आत्मचरित्रांतील कांहीं भाग दिला असून धर्मकारण, समाजकारण आणि राजकारण यांविषयींचीं त्यांचीं मतें कांहींशा तपशिलानें दिलीं आहेत. खिस्ती धर्माच्या प्रचाराची जी मोठी मोहीम त्या काळीं मुंबईहून सुरू झाली होती व तिची पुण्याकडील प्रगति तेव्हांच्या गव्हर्नरनें शहाणपणानें थोपवून धरली, त्या मोहिमेवर उलट चाल करून जाणारा व तिला काबूंत ठेवणारा विष्णुबुवा ब्रह्मचारी हा पहिला लढाऊ वक्ता होय. शिक्षणाचा कांहींच संस्कार त्याला झालेला नव्हता. तथापि त्याची उपजत बुद्धि अतिशय तीव्र असल्यानें व चिंतनशीलतेचा गुण त्याच्या ठिकाणीं लहानपणींच प्रगल्भ झाल्यानें, वरील विषयांवर त्यांनीं प्रकट केलेलीं मतें अत्यंत समर्पक व आजच्या घटकेलाहि स्वीकार्य वाटतात; आणि विशेष हें कीं, हीं मतें प्रकट करतांना त्यानें अतिशय सोज्वळ वाङ्मय लिहिलेलें आहे. दुसऱ्या निबंधांत, धंदा गमावून बसलेल्या जाती व जमाती कशा भांबावलेल्या आहेत, याचें दिग्दर्शन केलेलें आहे. डिस्पझेशन याला वृत्तिच्छेद हें नांव चांगलें शोभेल. हा वृत्तिच्छेद, आज विशेषतः सर्व मागासलेल्या

समाजांत जिकडे तिकडे चालू आहे. चरितार्थाचीं नवीं साधनें उपलब्ध होत आहेत हें खरें; पण हीं नवीं साधनें हातीं कशीं घ्यावींत, हें शास्त्रीय शिक्षणानें ध्यानांत येण्याच्या आधींच जुनीं साधनें त्या त्या समाजाच्या हातून गळत आहेत. नव्या साधनांच्या उपयोगाचें शिक्षण मिळणारे लोक निराळे, आणि जुनीं साधनें गमावून बसवणारे लोक निराळे, हें प्रस्तुतच्या सामाजिक गलबलीचें मुख्य लक्षण आहे. या विसंगतीकडे शासनसंस्थेचें लक्ष केव्हां व कसें जाईल, हें आज सांगतां येत नाहीं. या प्रकारचें विवेचन अनेक उदाहरणांनीं या निबंधांत केलें आहे. तिसऱ्या निबंधांत ऊनोक्ति आणि अत्युक्ति अथवा अतिशयोक्ति या आपल्या दोन वैरिणी आहेत, असें म्हटलें आहे. जितकें बोलावयास हवें तितकें आपण पुष्कळदां बोलत नाहीं किंवा जेवढें बोलावयास हवें त्यापेक्षां आपण जास्त तरी बोलतों; आणि या दोन्ही प्रकारांमुळें आपलें नुकसानच होतें आणि म्हणून यांना मीं वैरिणी असें म्हटलें आहे. यांच्या वैराची खुलावट अनेक उदाहरणांनीं या निबंधांत केली आहे. चौथ्या निबंधांतलें प्रतिपादन असें आहे कीं, भूतदयेची आवश्यकताच समाजांत उरूं नये. भूतदया हा मोठा सद्गुण आहे हें खरें; पण ती आपण ज्यांना दाखवितों त्यांना त्यांच्या त्या दयेस पात्र अशा परिस्थितींतून सोडविणें व त्यांचें त्यांना समर्थ बनविणें, हीच खरोखरी सामाजिक सुधारणा आहे असें सांगून जगांत पसरत चाललेला नवा अर्थवाद, जर तारतम्यानें अंमलांत आणला तर, भूतदयेचें ठाणच तो मोडील, हें त्या निबंधांत दाखवून दिलें आहे. पांचव्या निबंधांत भारताच्या बाहेरील समाजांत सुद्धां इतिहासकालापासून, धर्माच्या पोटीं बायकांचा दुस्वास कसा होत आला आहे, हें दाखविलें आहे. भारतांतहि हाच दुस्वास कित्येक शतकें चालू आहे. इतर देशांचीं व धर्मांचीं उदाहरणें अशासाठीं दिलीं आहेत कीं, जगांत स्त्रीच्या जीवनाचा कोंडमारा सर्वत्रच कसा होत होता व या नव्या युगांत स्त्रीचें जीवन कसें मुक्त होत आहे, हें दाखवावें.

दुसऱ्या पंचकांतील पहिला निबंध कै. तात्यासाहेब केळकर यांच्यासंबंधींचा आहे महाराष्ट्रांतील सुसंस्कृतांचे व कुलीन श्रेष्ठतेचे ते प्रतिनिधि होते, असें मीं म्हटलें आहे. राजकारणाच्या धबडग्यांत पडूनहि सारासारविवेक, वैचारिक सचोटी आणि संयम यांचा पोष व उत्कर्ष तात्यासाहेब यांनीं उत्तमच करून घेतलेला होता. महाराष्ट्रांतील प्रत्येक माणसांत हे गुण आहेत, असें म्हणतां

येणार नाहीं; पण ज्यांच्या ठिकाणीं ते आहेत, त्यांचें प्रतिनिधिपण करण्याइतपत या गुणांची वाढ तात्यासाहेब यांच्या ठिकाणीं खचित झाली होती. तसेंच, या त्यांच्या गुणांचा उपयोग टिळकांच्या आक्रमक आणि मोहीमशीर राजकारणाला कसा झाला, हेंहि या लेखांत दाखविलें आहे. गिरिजन व परिजन हा पांचव्या क्रमांकाचा निबंध दुसऱ्या क्रमांकांत असावयास हवा, हें वर सांगितलेंच आहे. 'हरिजन' म्हणजे कोण, हें आतां सर्वांना कळून चुकलें आहे; पण याच्या पुढचा जो सामाजिक प्रश्न आहे, तो गिरिजनांचा आणि परिजनांचा होय. गिरिजन म्हणजे गिरिगव्हरांत राहणाऱ्या जाती व परिजन म्हणजे सुप्रतिष्ठित समाजाच्या भोंवतीं भोंवतीं घिरट्या घालणाऱ्या फटिंग जाती. या दोन प्रकारच्या जातींना आधुनिक संस्कृतीच्या पाशांत ओढणें, हें सध्यांचें फार मोठें काम आहे. शासनसंस्था या कामाला ईर्ष्येनें लागली आहे, हें तिला भूषणास्पदच आहे. परंतु ही संस्था या जातींच्या पोटापाण्याची व्यवस्था, फार झालें, तर करील, त्यांच्या मनाची मशागत करावयास हिंदु समाजांतील धर्मसुधारकांनीं पुढें व्हावयास हवें. ही मशागत न होतांच जर नवजीवनाचें आक्रमक वारें या जातींत खेळूं लागलें, तर त्या जातींचें व सुप्रतिष्ठित समाजाचें अपेक्षित कल्याण होणार नाहीं, असें दिग्दर्शन या निबंधांत केलेलें आहे. तिसऱ्या निबंधांत पाठान्तराची पैदास कशी होते, हें दाखविलें आहे. पाठान्तराचा मोठाच बाऊ केलेला असतो. पाठ करणारे लोक, दुसऱ्या स्त्रीकडून गाण्याचा "शब्द" घेणाऱ्या स्त्रिया, पाठ केलेलें गाऊन दाखविणारे लोक, जाणून बुजून नवा मजकूर घुसडणारे लोक, छापखान्यांतील खिळे जुळविणारे लोक, कर्चीं मुद्रितें तपासणारे छापखान्यांतील लोक, यतिभंगाचें पातक न ओळखणारे लोक, आपली किमया लोकांच्या वाङ्मयांत शिरकविणारे भोळे भक्त, कीर्तनाच्या सोयीसाठीं निरानिराळीं वचनें एकत्र करणारे हरदास, मोडी लिपि न जाणणारे लोक हे सारे पाठान्तराचे जनक होत. अज्ञानानें, अभिमानानें हीं पाठान्तरें नेहमींच टिकून राहतात. अशा पाठान्तरांचीं अनेक उदाहरणें या निबंधांत दिलेलीं आहेत. "एक जुनी पुराणी मास्तरीण" म्हणजे प्रत्यक्ष सृष्टीच होय; मानवप्राणी हा सृष्टीचा शिष्य आहे; तिनें त्याच्या अंगीं संस्कारक्षमता आणि अनुकरणशीलता अशा दोन शक्ति ठेवल्या आहेत; आणि या शक्तींच्या

द्वारांच सृष्टि आपलें शिक्षणाचें काम उरकतें. वाणी, संगीत, संवयी, नीति, सौम्यपणा, मनाचें उड्डाण, संघटन, आवेश असे किती तरी प्रकार माणसानें सृष्टीपासूनच उचललेले आहेत. शास्त्रज्ञ सांगतात कीं, माणूस जन्माला येऊन लाखों वर्षें झालीं आहेत. पण त्याच्या संस्कृतीचा इतिहास पहावा, तर पांच-सात सहस्र वर्षांच्या मागें जातां येत नाहीं. मग त्याच्या आधींचीं इतकीं वर्षें माणूस करीत तरी काय होता ? अत्यंत गंभीर असें मन आणि अत्यंत चपळ अशी बुद्धि त्याच्या ठिकाणीं पूर्णपणें विकसित होण्यास हें अंतर, हा एवढा दीर्घ काल खर्ची पडला असावा. ही प्रगति कणा-कणानें आणि अंशा-अंशानें होत राहिली होती. कारण संस्कारक्षमता आणि अनुकरणशक्ति या त्याच्या शक्तीसुद्धां आरंभापासूनच सध्यांसारख्या तल्लख बनलेल्या नव्हत्या. मानव-प्राणी ही जर सृष्टीची सर्वोत्तम निर्मिति असेल, तर त्याच्या बनावाला इतका काळ लागणारच लागणार. एखादें बालूक बनायला दोन-चार महिने पुरत असतील; पण माणसाचा सेन्द्रिय पिंड बनवायला सृष्टीला फार युगें लागलीं असतील. त्याचा देह नऊ महिन्यांत तयार होतो; पण त्याचें मूळ बीज तयार होण्याला लक्षावधि वर्षें लागलीं असलीं पाहिजेत. माणसाच्या बीजांतून एक सुंदर आणि सावयव देह तयार होतो; पण त्याबरोबरच त्याच्या देहांतलें मन तयार होतें, आणि त्याच्या मस्तकांतली बुद्धि तयार होते. हें मन व ही बुद्धि तयार व्हायला या पुराण्या मास्तरणीनें कित्येक युगें खाल्लीं असलीं पाहिजेत. यांतूनच ज्ञान आणि कला यांचा आरंभ फार वर्षांपूर्वी झालेला असला पाहिजे. " गंडे-दोऱ्यांचें चेटूक " सर्व धर्मांत आणि सर्व देशांत जुन्या काळीं प्रचलित होतें; व सध्यांसुद्धां त्याचे अवशेष ठिकठिकाणीं शिल्लक राहिले आहेत. प्रस्तुतच्या निबंधांत बुद्धाचा धर्म आणि खिस्ताचा धर्म यांत मंत्र-तंत्र, गंडे-दोरे, चेटकें यांचा अंमल खुद्द धर्माधिकाऱ्यांच्या गोटांतच कसा चालू राहिला होता, हें विस्तारानें दाखविलें आहे. भारतांत तर यांचा सुकाळ अजूनहि आहेच आहे.

" भारत-स्वातंत्र्याचा पहिला उद्गाता " अशा शब्दांनीं तिसऱ्या पंचकाच्या पहिल्या निबंधांत कै. शिवरामपंत परांजपे यांचा गौरव केला आहे व तो अगदीं यथार्थ आहे. शिवरामपंतांचें लिखाण जर इंग्रजींत झालें असतें, तर हा त्यांचा गौरव इतर प्रांतांनींहि केला असता. दैनंदिन राजकारणांत

शिवरामपंतांनीं मन कधीं घातलेंच नाहीं. त्यांची तंद्री शुद्ध स्वातंत्र्याकडे लागलेली होती; आणि ही तंद्री त्यांनीं आपल्या काव्यमय वाणीनें व्यक्त केली. शिवरामपंत हे एक मोठे जबरदस्त वक्ते होते. आणि वक्त्याला लागणारे सारे गुण सृष्टीनें त्यांना बहाल केले होते. या गुणांच व त्यांच्या स्वातंत्र्यप्रीतीचें वर्णन या निबंधांत केलें आहे. बाराव्या निबंधांत आजच्या संतांचें माझ्या मतें खरें कार्य कोणतें, तें सांगितलें आहे. कोट्यवधि लोकांनीं भरलेला हा साराच्या सारा हिंदु समाज धर्मदृष्ट्या सुशिक्षित करण्याचें काम एकट्या ब्राह्मणांच्या हातून होण्यासारखें नाहीं, हें प्राचीनांनीं ओळखलें होतें; आणि म्हणून महाराष्ट्रांतील पारमार्थिक लोकशाहींतील अनेक जातींच्या संतांनीं हें धर्मशिक्षणाचें काम हातीं घेतलें होतें. आज तेंच काम या आधुनिक संतांनीं गिरिजन आणि परिजन यांच्यापर्यंत नेऊन पोंचविलें पाहिजे पुष्कळदां असें दिसतें कीं, सुशिक्षित समाजांतील संत हे सुशिक्षितांपुढेंच जुन्या संत-वाङ्मयाची खुलावट करतात; आणि मागासलेल्या समाजांतील संत पुष्कळदा राजकारणाकडे वळतात. पण या निबंधांत असें म्हटलें आहे कीं, या दोघांनींहि आपलें सुकाणू गिरिजन आणि परिजन यांच्याकडे वळविलें पाहिजे. यांना जर कोरडें राजकीय शिक्षण मिळालें, तर ते योग्य तऱ्हेचे नागरिक बनतील, असें मला वाटत नाहीं. सध्यां या दिशेनें सुरू असलेल्या प्रयत्नांच्या आधीं हा निबंध लिहिलेला आहे. या पंचकांतील तिसऱ्या निबंधांत अनुवाद अथवा भाषान्तर या विषयाचा ऊहापोह केला आहे. अनुवाद आणि भाषान्तर हे दोन शब्द अलिकडे समानार्थक म्हणून वापरण्यांत येऊं लागलेले आहेत. कांहीं वर्षांपूर्वीं या दोहोंत थोडासा फरक करीत असत. भाषान्तर हें मूळ शब्दाला धरून असावें; इतकेंच नव्हे तर मूळच्या भाषेची ढब, अवघडपणा किंवा सोपेपणा, मूळची वाक्यरचना आणि तिचे अंगभूत ढंग–हे भाषान्तरांत उमटलेले दिसावे. पण अनुवादांत मात्र मूळ लेखकाचा अभिप्राय व्यक्त झाला म्हणजे पुरे, बाकीची सारी किमया आपली असावी, असा एक स्थूल समज असे.

या भाषान्तराच्या कामांतील विविध प्रकारच्या सोयी व गैरसोयी या निबंधांत उदाहरणांनीं दाखवून दिल्या आहेत. चौदाव्या निबंधांत आपल्याला घोषणांचा जांच कसा होतो, हें दाखविलें आहे. प्रतापी माणसें जशीं, तशीं आकर्षक तत्त्वें सुद्धां आपला अतोनात छळ करतात; आणि तत्त्वांचा हा छळ

इतका सूक्ष्म असतो कीं, तो लवकर दूर करतां येत नाहीं. प्रत्येक क्रांतीला कांहीं एक सूत्र असतें; पण या सूत्राचा प्रभाव कोठपर्यंत पोंचूं द्यावा, याचा विवेक क्रान्तिकारकांना राहतोच असें नाहीं. हा धरबंद एकदां सुटला, म्हणजे या सूत्राच्या तावडींत सांपडलेले लोक अगदीं जिकिरीला येतात. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव, सर्वत्र शांतिच नांदली पाहिजे, अशासारख्या घोषणांचा जाच चतुर बुद्धिमंतांना प्रथम होऊं लागतो; व एकंदर समाजाला, गोष्टी अंगलट येऊं लागल्या म्हणजे होऊं लागतो. निरनिराळ्या खंडांतील अनेक उदाहरणें घेऊन या विषयाचें विवरण प्रस्तुत निबंधांत केलें आहे. शेवटच्या म्हणजे पंधराव्या निबंधांत नीतीच्या बदलत्या प्रकृतीचे नमुने दिले आहेत. समाजरचनेच्या नियमपालनाला नीति हेंच नांव मिळतें आणि आचार-विचाराच्या साध्या प्रघातांनासुद्धां नीति असेंच म्हणतात. सरसकट माणसें असें समजतात कीं, आपल्या समाजाच्या नीतिकल्पना पुरातन कालापासून जशाच्या तशा म्हणजे अबाधित राहिल्या आहेत पण हें खरें नाहीं. आपल्या नित्याच्या राहणींतील किती तरी प्रघात भराभर बदलत आलेले आहेत. इतकेंच नव्हे तर, आपल्या समाजाच्या बांधणीचे नियमसुद्धां, केवढीं तरी रूपान्तरें पावले आहेत. पण माणसाला या निशेंत सुख आहे. असें वाटतें कीं, आपण कित्येक सहस्र वर्षें जसेच्या तसे राहिलों आहोंत. या त्याच्या समजांतील व्यर्थता प्रस्तुतच्या निबंधांत अनेक उदाहरणांनीं दाखवून दिली आहे.

या पंधरा निबंधांतील प्रत्येक निबंध जर मला तारीखवार देतां आला असता, तर बरें झालें असतें, पण सध्यांच्या माझ्या प्रकृतीच्या अवस्थेंत मला तें करण्यासारखें नाहीं. एवढें मात्र सांगतों कीं, गेल्या कांहीं वर्षांत मासिकादिकांतून लिहिलेल्या निबंधांतून हे मीं उचलले आहेत. सारासार-विवेकाचें मंडन व्हावें, असें मला नेहमींच वाटतें. तसेंच योग्य असूनहि ज्यांच्या गुणांची समाजाला नीट ओळख झाली नाहीं किंवा कदाचित् राहणार नाहीं, त्यांच्याहि गुणांचें मंडन होणें इष्ट आहे आणि या कामीं विवेकाची आवश्यकता फारच असते. तो विवेक प्रत्येक निबंधांत थोडा तरी दिसतो, असा माझा समज आहे; म्हणूनच या निबंधसंग्रहाला 'विवेकमंडन' हें नांव दिलेलें आहे.

— श्रीपाद महादेव माटे



माझे विद्वान् मित्र

डॉ. शंकर दामोदर पेंडसे,

एम्. ए., पीएच्. डी.

यांच्या मित्रभावाला हा संग्रह

अर्पण करीत आहें.

—श्री. म. माटे

विवेक मण्डन

अनुक्रमणिका

प्रस्तावना

१	मार्गे पडलेला बैरागी	...	१
२	भांबावलेला समाज	...	१४
३	प्रपंचांतील आपल्या दोन वैरिणी	...	२४
४	भूतदयेची आवश्यकताच उरूं नये	...	३५
५	बायकांचा दुःस्वास	...	४२
६	सुसंस्कृतांचे प्रतिनिधि	...	५१
७	पाठांतराची पैदास	...	६४
८	एक जुनी-पुराणी मास्तरीण	...	७३
९	गंडेदोऱ्यांचें चेटूक	...	८२
१०	गिरिजन आणि परिजन	...	९३
११	भारत-स्वातंत्र्याचा पहिला उद्‌गाता	...	१०७
१२	आजच्या संतांचें खरें कार्य	...	१२१
१३	अनुवाद अथवा भाषांतर	...	१३४
१४	घोषणांचा जाच	...	१४४
१५	नीतीची बदलती प्रकृति	...	१५३

संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
वि: निबंध
नों: दि:

१ : मागें पडलेला बैरागी

या इव्यासी सुधारकाचा जन्म शके १७४७ म्हणजे इ. स. १८२५ सालीं झाला. ठाणें जिल्ह्यांतील राजापुरी तालुक्यांत निजामपूर नांवाचा पेटा होता. त्यांतील शिरवली गांव ही याची जन्मभूमि होय. गोखले हें घराणें माणसांनीं चांगलें समृद्ध आहे. आणि त्यांत चांगलीं चांगलीं माणसेंहि पुष्कळ निघालेलीं आहेत. गेल्या दीडदोनशें वर्षांचा महाराष्ट्राचा सामाजिक इतिहास स्थूलदृष्ट्या तपासून पाहिला, तरी या गोखले कुलानें महाराष्ट्राला पुष्कळ चांगलीं चांगलीं माणसें पुरविलीं आहेत, असें दिसून येईल.

बापू गोखले हें इतिहासप्रसिद्ध नांव सर्वांच्या परिचयाचें आहे. अव्वल इंग्रजींत दोन मोठे गोखले उत्पन्न झाले. एक कृष्णंभट गोखले आणि दुसरा विष्णुबोवा ब्रह्मचारी गोखले. कृष्णंभट गोखले यानें फार मोठी सामाजिक कामगिरी बजावली. त्याच्या काळांत मुख्यतः पुणें शहरांत शाक्त पंथाचें प्राबल्य फार झालें होतें आणि धर्माच्या नांवाखालीं अनाचार माजलेला होता. या कृष्णंभट गोखल्यानें या पंथाला फार जोराचा टोला दिला; आणि समाजावर पडत चाललेली त्याची छाप त्यानें उद्ध्वस्त करून टाकली. अर्थात् या कृष्णंभटाची गणना पूर्वीच्या काळच्या सुधारकांत करावयास हवी.

अव्वल इंग्रजींतला दुसरा मोठा गोखले म्हणजे ज्याच्या संबंधानें आपण लिहीत आहों तोच होय. त्याचाच जन्मकाल आणि जन्मभूमि हीं आरंभीं दिलीं आहेत. विष्णुपंत गोखले आणि उमाबाई गोखले यांच्या अकरा मुलांपैकीं हा विष्णुबोवा दहावें अपत्य होय. तो जन्मभर अविवाहितच राहिला आणि त्याची वर्तणूकहि शुद्ध ब्रह्मचाऱ्याला शोभण्यासारखी असे. म्हणून लोक त्याला विष्णुबोवा ब्रह्मचारी म्हणूं लागले. या माणसाला विद्येचा संस्कार फार थोडा झाला. केवळ नवव्या वर्षीं जमीन-वसुलाच्या कचेरींत तो उमेदवारी करूं लागला. दीड वर्षानें आईनें त्याला घरीं परत नेलें आणि शेती करणें, गुरें चारणें, लांकूडफांटा फोडणें इत्यादि कामांत त्याला घातलें. या कामांत दोन वर्षें गेल्यावर, हा मुलगा महाडला आला आणि वाण्याच्या दुकानावर नोकर राहून तागडीतराजू चालवूं लागला. कापड विकणें, खुर्दा

विकणें, जमाखर्च लिहिणें, हींहि कामें त्याला करावीं लागत. पुन्हा दोन वर्षांनीं तो संगमेश्वराला गेला आणि सरकारच्या 'कष्टम' खात्यांत, थोडीशी नोकरी करून तो एका लहानशा परीक्षेला बसला. पास होतांच, पंधरा-सोळाव्या वयास त्याच खात्यांत त्याला नोकरी मिळाली. ही नोकरी त्यानें बरी, हुषारीनें आणि अब्रूनें केली.

दत्तात्रयाचा वर

परंतु लहानपणापासून त्याचें मन विचारप्रवण होतें. तो वेदोक्त धर्माची पुस्तकें वाची आणि त्यांचीं विवरणें ऐकी. विसाव्या वर्षीं त्याला 'ईश्वरा-कडून साक्षात्कारद्वारां सूचना झाली' आणि तेविसाव्या वर्षीं कौपिन धारण करून एकांतवासांत विचार करण्यासाठीं तो सप्तशृंगीच्या अरण्यांत जाऊन बसला. हळूहळू त्याला वाटूं लागलें कीं, आपल्याला आत्मज्ञान झालें आहे आणि परमेश्वर हाच आपला गुरु आहे. यापूर्वीं त्यानें अनेक गुरु केले होते. परंतु, ते लबाड आणि ढोंगी आहेत असा अनुभव त्याला आला होता. सप्तशृंगीच्या अरण्यांत केवळ कंदमुळें भक्षण करून व झऱ्याचें पाणी पिऊन निर्मनुष्य स्थळीं, शुद्ध नग्न स्थितींत, त्यानें आपला काल ध्यानधारणेंत घालवला. मग त्याला वाटूं लागलें कीं, "परमेश्वरानें उपदेश करण्याची आज्ञा आपल्याला केलेली आहे."

तो उघड सांगूं लागला कीं, मला दत्तात्रयाचा वर आहे आणि कसलीहि शंका काढली तरी मी तिचें समाधान करूं शकतों. महाप्रसंग पडला तरी मला कसलीहि भीति वाटत नाहीं. आणि माझें बोलणें अनुभवाचें, युक्तीचें व प्रमाणसिद्ध असें असतें. त्यामुळें कोणाचा इलाज चालत नाहीं व चालणार नाहीं. मीं कोणाची घरगुती चाकरी केलेली नाहीं; म्हणून मला खुशामतीची सवयच नाहीं. मला निंदणारांना आणि वंदणारांना मी समानच उपदेश करतों."

मिशनऱ्यांना विरोध

एवढ्या आत्मविश्वासानें समाजांत शिरलेल्या माणसानें त्या काळांत एक प्रचंड कार्य केलें. ख्रिस्ती मिशनऱ्यांची मोहीम मुंबईच्या टापूंत जोरानें चालू

झालेली होती. समुद्रतीरानें ती दक्षिणेकडे उतरत होती; आणि त्यांनीं ठिक-ठिकाणीं काढलेल्या शाळा तर धर्मोपदेशाचे मठच बनल्या होत्या. समुद्रतीर हस्तगत करून, पेशवाईचा अंत झाल्यानंतर, या मिशनऱ्यांची झांप पुण्याकडे येऊं लागली. राज्यकारभाराची जबाबदारी एल्फिन्स्टन् याच्या शिरावर होती. आणि राज्य गेलेलें असलें तरी, हे पुण्याकडचे लोक धर्मांत होणारी ढवळाढवळ सहन करणार नाहींत, असा त्याचा कयास होता. म्हणून, या मिशनऱ्यांना त्यानें थोडें थोपवून धरलें. विष्णुबोवा ब्रह्मचाऱ्यानें मुंबईच्या टापूंतच खिस्ती धर्मप्रसाराला जोराचा विरोध सुरू केला आणि हळूहळू त्याच्या कामाचें क्षेत्र मुंबईच्या चौपाटीपासून पुण्याच्या नारायण पेठेपर्यंत पसरत गेलें!

हा विरागी माणूस अतिशय कडकडीत वक्ता होता. त्याच्या बोलण्यांत हुबर फार असे. हिंदु धर्मांतील नरम जागा हुडकून काढून त्यांच्यावर हल्ला करण्याची पद्धति खिस्ती मिशनऱ्यांनीं घातलेली होती. विष्णुबोवानें याच पद्धतीचा अवलंब केला. त्यानें खिस्ती धर्मांतील वैगुण्यें हुडकून काढलीं आणि उत्तरें देण्याच्या निमित्तानें प्रतिहल्ले चढविले. प्रत्येक स्मृतिग्रंथांत, अवतारी पुरुषांच्या चरित्रांत आणि पुराणकथांत बोटचेप्या जागा पुष्कळच असतात असें दिसून येईल व त्या त्या धर्माचे अनुयायी फक्त चांगल्या गोष्टींकडे लक्ष देतात आणि या जागांकडे कानाडोळा करतात. पण त्यांचे प्रतिस्पर्धी त्यांच्या धर्मांतील वैगुण्यांवरच भर देतात. खिस्ती मिशनऱ्यांनीं या पद्धतीचा अतिरेक केला; आणि हिंदु लोकांचा धर्म, त्यांच्या चालीरीती, त्यांच्या पुराणकथा, इत्यादिकांची त्यांनीं केवळ रेवडी उडवून दिली; इतकी कीं, आपण खरोखरीच वाईट आहों, असा समज रूढ होत चालला. आणि कांहीं कांहीं बडया इंग्रज अधिकाऱ्यांनीं असें मत व्यक्त केलें कीं, पांचपन्नास वर्षांत हा सर्वच्या सर्व खंडतुल्य देश आपण खिस्ती बनवून टाकूं. त्यांच्याच पद्धतीनें लढून विष्णु-बोवानें मिशनरी प्रचाराची ही प्रचंड लाट केवळ थोपवूनच धरली असें नव्हे तर परत वळविली.

परंतु केवळ 'जशास तसें' केल्यानें भागण्यासारखें नसतें. प्रतिपक्षाचीं वैगुण्यें दाखवून जरी त्याला फजित करतां आलें, तरी त्यानें दाखवलेलीं आपलीं वैगुण्यें शिल्लकच रहातात; आणि मग विचारवंत अंतर्मुख बनतो.

विष्णुबोवाच्या चरित्रांत हीच गोष्ट प्रामुख्यानें दिसते. त्याचें धर्मप्रवण मन आपल्या जीविताच्या चिकित्सेकडे वळलें; आणि हें जीवित नीटनेटकें करावयाचें तर कोणच्या सुधारणा करणें अवश्य आहे, हें त्यानें बारकाईनें पाहिलें. नवलाची गोष्ट ही कीं, शिक्षणाचा संस्कार अत्यंत अल्प झालेला असतांनासुद्धां, त्याची तर्कशक्ति अत्यंत प्रखर बनली; आणि तर्कानें प्राप्त होणाऱ्या निर्णयाला ता भिईनासा झाला. त्याच्या स्वयंभू मोठेपणाच्या लक्षणांत हें लक्षण विशेष ठळक होतें.

मार्गे पडलेला वैरागी

अव्वल इंग्रजींत झालेल्या सुधारकांत, विष्णुबोवा ब्रह्मचाऱ्याची योग्यता खरोखरच फार मोठी आहे. इतर सुधारकांचीं नांवें आधुनिक लोकांच्या पुष्कळच परिचयाचीं झालीं आहेत. दुर्दैवानें या बैराग्याचें नांव मार्गे पडलेलें आहे. स्वतःच्या काळांत त्याला वर्तमानपत्राचा आश्रय न मिळाल्यामुळें, त्याची कीर्ति कुचंबूनच राहिली. वादविवादानें आणि भाषणानें त्या प्रसंगीं व त्या स्थळीं वाहवा मिळते. पण ती टिकूं शकत नाहीं. पण जर का हाच वाद आणि हींच भाषणें वर्तमानपत्राच्या द्वारां प्रसार पावलीं तर त्या माणसाच्या ज्ञानालाहि शाश्वती येते आणि कीर्तीला सार्वत्रिक चलन लाभतें. विष्णुबोवांनीं आपल्या सर्व मतांचा संग्रह करून, 'वेदोक्त धर्मप्रकाश' या नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें. पण याचाहि प्रसार तितक्या जुन्या काळीं व्हावा तसा झाला नाहीं; आणि आतां तर हें पुस्तक जवळ जवळ दुर्मिळच आहे.

पण हें वाचलें तर दिसून येईल कीं, विष्णुबोवा हा एक सूक्ष्म आणि निर्भय विचार करणारा माणूस होता. याच्या विचारांत सचोटी आहे. हा आत्मविश्वासानें बोलतो. आपल्याला कांहीं जीवितहेतु आहे, अशी याची श्रद्धा आहे आणि याचें बोलणें व लिहिणें अत्यंत संभावित असतें.

पारमार्थिक हुंकार

त्याच्या आत्मविश्वाला कोठें कोठें जवळ जवळ शेखीचें रूप आलेलें आहे. आपल्याला झालेला साक्षात्कार, परमेश्वराचा अनुग्रह आणि प्रतिपादनाला त्यानें दिलेली अनुज्ञा यासंबंधींच्या त्याच्या कल्पना आज कोणाला खऱ्या वाटणार नाहींत. पण त्याला स्वतःला मात्र असें खास वाटत होतें कीं,

आपल्याला साक्षात्कार झालेला आहे, अनुग्रह झाला आहे व अनुज्ञाहि मिळाली आहे; आणि हें त्यानें निर्भयपणें सांगितलेलें आहे. एक गोष्ट ध्यानांत हवी कीं, तो ख्रिस्ती मिशनऱ्यांविरुद्ध उठलेला होता. आणि त्यांना जर स्वधर्मप्रसाराची अनुज्ञा होती, तर प्रतिकाराची अनुज्ञा विष्णुबोवालाहि असावी, यांत नवल तें काय ! पण त्याचा हा पारमार्थिक हुकार याहून खोल होता. मिशनऱ्यांची आणि त्याची गांठ मागाहून पडली. हा हुंकार मात्र त्याला आधींच आलेला होता. त्यामुळें तो म्हणूं लागला कीं, "मी निर्भय आहें; माझ्या मनस्तलावांत पाणल्गें फिरतात; मी अशास्त्र कांहींच बोलणार नाहीं. माझ्या मनावर ज्ञानाचें पीक आलेलें आहे, तें लोकांनीं लुटावें, मी अनेक दुर्मतें लयाला नेलीं आहेत, आणि संशयविच्छेद केले आहेत, हजारों लोकांच्या समेंत मला सर्व कांहीं सुचतें, उत्तरें करण्यांत मी पटाईत आहें; मी वस्ताद आहें. जेथें भ्रष्टाकार असेल, तेथें माझें आगमन व्हावयाचें, निर्भयत्वाला माझ्या वर्णश्रेष्ठत्वाचाहि आधार आहें, मीं शिव्या जरी दिल्या तरी त्या तुम्हांला महावाक्यासारख्या वाटतील." आतां हे उद्गार बढाईचे वाटतात, हें खरें आहे. आणि तेवढ्यापुरता दोष विष्णुबोवाला कोणीहि देणारच. तथापि, त्याच्या अंगानें एवढेंच म्हणतां येण्यासारखें आहे कीं, वादाची हमरीतुमरी चालू असतां, आणि आक्रमक आवेश शिगेला पोहोंचला असतां प्रत्युत्तरादाखल हीं वचनें तो बोलला आहे. पण यांत फुशारकी दिसली तरी चढाईच्या आवेशांत सुद्धां, विष्णुबोवांच्या मुखांतून अभद्र शब्द आला नाहीं. लोकहितवादी आणि ज्योतिराव फुले यांचें लिखाण मूळ स्वरूपांत वाचून पाहावें, म्हणजे असें दिसून येईल कीं, सदभिरुचीच्या दृष्टीनें आणि त्यांनीं प्रतिपादलेलीं उच्च तत्त्वें लक्षांत घेतां त्यांनीं योजलेली भाषा पुष्कळ ठिकाणीं कमी दर्जाची वाटते. आणि यांच्या लेखणींतून असे शब्द गेले नसते, तर बरें झालें असतें, असे उद्गार वाचक आपल्या मनाशीं काढील. त्या दोघांनाहि आपल्या ज्ञानाचा आवेश विष्णुबोवाइतकाच चढलेला होता यांत कांहीं शंका नाहीं. आणि तो आवेश मनोज्ञहि आहे. पण तो प्रकट करण्याच्या कामीं त्यांनीं आपली उच्च वैचारिक भूमिका प्रकटीकरणाच्या वेळीं पुष्कळ वेळां सोडून दिलेली आहे, असें दिसेल. विष्णुबोवा ब्रह्मचारी याच्या हातून हा दोष कोठें घडला आहे, असें वाटत नाहीं.

पुरोगामी विचार

कसलेंहि शिक्षण विशेषसें मिळालेलें नसतांना आणि कोणत्याहि उच्च संगतीचा लाभ झाला नव्हता तरी, निरानेराळ्या विषयांवर या माणसाला इतके सुंदर विचार सुचले याचें कारण इतकेंच कीं, सृष्टीनें त्याला प्रतिभा दिलेली होती, त्याच्या मनाची गति तर्कशुद्ध रीतीनें चाले; आणि आपल्याला कांहीं एक उच्च प्रकारचा जीवितहेतु आहे, याची जाणीव त्याला होती. त्याचे सर्वच्या सर्व विचार सर्वांनाच पसंत पडण्यासारखे आहेत, असा दावा सांगतां येणार नाहीं. परंतु आधुनिक काळांत, ज्या सामाजिक विचारांनीं आपलीं मनें भरलेलीं आहेत व भारलेलीं आहेत त्यांसंबंधीं विष्णुबोवा काय म्हणतो, हें मात्र खरोखर पाहण्यासारखें आहे. धर्म, समाज, राजकारण, न्यायान्याय, आहार, पूजा असा कोणचाहि विषय निघो, विष्णुबोवानें प्रगट केलेले विचार त्याचें प्रतिगामित्व तर दाखवीत नाहींतच; पण उलट, त्यांतले कित्येक विचार आपल्या राष्ट्राला अजून पन्नास वर्षें पुरतील, अशा योग्यतेचे आहेत. म्हणून आतां जास्त प्रस्ताव न करतां त्याच्या विचारांतील कांहीं वेंचे पुढें देतों. प्रत्येक वेंचा मननपूर्वक वाचण्यासारखा आहे, असेंच वाचकाला वाटेल. हें वाचूनहि, जर विष्णुबोवा प्रतिगामीच होते असें कोणाचें मत झालें तर, विष्णुबोबाचें दुर्दैव होय. उद्धृत केलेल्या विचारांचा अनुक्रम मीं मुद्दामच विषयवारीनें लावलेला नाहीं. एकापुढें एक अनपेक्षितपणें येणाऱ्या विचारांनीं मनाला मिळणारें आंदोलन, अनुक्रमानें मिळणाऱ्या सुखापेक्षां वाचकाला जास्तच मौजेचें वाटेल असा विश्वास आहे.

(१) कोणाच्या अंगांत देवाचें वारें येतें हें मानूं नको. देवाला नवस केला म्हणजे आपलें काम होतें ही गोष्ट मानूं नको. मनुष्यें मनुष्याच्या मंत्रानें वांचतात किंवा मरतात ही गोष्ट मानूं नको, परंतु ईश्वरभजनाच्या मंत्रानें अनुष्ठान करीत जा. कोणी शिंकलें कीं त्या शिंकेंत बरेवाईट होण्याचा शकुन असतो असें काणीं सांगितलें तर मानूं नको. पाल चुकचुकली, अंगावर पडली, पिंगळा पक्षी किलबिलून गेला, डोळा लवला, भाळू भुंकली, कुत्रें रडलें, मांजरें भांडलीं, विधवा स्त्री घरांतून बाहेर जातांना पुढें आली, प्रेत पुढें आलें, चंद्राआड खळें दिसलें, बाहेर जातेवेळीं कोठें जातोस म्हणून

कोणीं हटकलें, सून अथवा मेहुणा यांचा पायगुण वाईट चांगला, इत्यादि गोष्टी मूर्ख व निरुद्योगी लोक कल्पितात. त्यांना शास्त्रप्रमाण नाहीं. यास्तव त्या मानूं नको. कोणा एका स्त्रीला किंवा पुरुषाला भूत, दैवत प्रसन्न आहे यास्तव तीं स्त्री-पुरुषें भुतें, दैवतें पाठवून मला मारवतील असें कल्पून मानूं नको व भिऊं नको. पतीच्या प्रेताबरोबर जळून मरणें ह्यांत पुण्य आहे असें मानूं नको व जळून मरणारी स्त्री सती आहे असें समजूं नको. जी स्त्री कामाचें व अज्ञानाचें दहन स्वविचारानें करील, तीच सती समजावी. पुरुषावर परलोकप्राप्ति अवलंबून नाहीं. महाराची सावली अंगावर पडली असतां, त्यापासून दोष लागतो असा भ्रम धरूं नको. कारण सावली पदार्थ नाहीं. जर त्यानें वाईट खाणें टाकलें तर त्याच्या सावलीला चिंता नाहीं. कारण वाईट कर्म करणाऱ्याच्या सावलीसहि उभें राहूं नये, असें लोक बोलतात. बेलाशक जलप्रवास करीत जा. भुतें दृष्टीस पडतात हें मानूं नको. ग्रहांच्या शुभाशुभ फलांकडे पहा पण पाहून तूं भय धरूं नकोस. तूं चांगलें कर्म करीत जा. त्यांत जें ग्रहादिकांच्या योगानें फल येईल, त्याच्या भोगाला कंटाळूं नकोस. प्राणान्त संकट पडलें तरीहि तूं आपल्या देहाचा घात करूं नको. ..... शास्त्राप्रमाणें चालण्याकरितां, वाहिमी व अशास्त्र गोष्टी टाकाव्याच टाकाव्या; कारण वाईट गोष्टींची रूढि शास्त्राहून बलाढ्य नाहीं.

(२) देवाच्या प्राप्तीकरितां धंदे टाकावयाची गरज नाहीं. व संसार-धंदे टाकल्यानेंच देवाची प्राप्ति होते असें नाहीं. पहा:—जनक राजा पूर्ण-पणानें संसारी असतां, शुकयोगींद्र जो त्यागी, त्यालाहि तारक विचार देण्यांत उपयोगी पडला...सारांश, ज्या स्थितींत देवाच्या प्राप्तीचे विचार करण्यास हरकत पडणार नाहीं, अशी देहस्थिति राखावी...आणि सत्शास्त्राचें श्रवण-मनन करून अहंपण धरणाऱ्या ज्ञानापूर्वीच्या आपापल्या निराकार अशा निजरूपाचा ध्यास, म्हणजे निजध्यास धरावा, म्हणजे देवाची प्राप्ति होते...

(३) जो कोण मुलांना व मुलींना लेखन, वाचन, ज्ञान नीतिमानांकडून किंवा स्वतः देणार नाहीं किंवा लेखन, वाचन, ज्ञान देणाऱ्या नीतिमानास प्रतिबंध करील, तर तसल्या कर्माच्या कर्त्यास राजानें बांधून फटके मारावे.

(४) सर्व देशांतील राजांनीं असें करावें कीं, ज्या ज्या म्लेंच्छ लोकांनीं जुलमानें देशांतून फारसी लिपींत कागदपत्र चालावें, अशी चाल घातली,

तशीच त्यांनीं आपले सन घालण्याची चाल घातली, ती चाल एकदम मोडून टाकावी. आणि देवनागरी लिपींत किंवा तिच्याच अंगभूत जी मोडी लिपी ह्या उभय लिपींतून राजकीय कागदपत्र चालवावे, आणि युधिष्ठिर, विक्रम, शालिवाहन यांचे शक कागदपत्रांत लावीत जावे. म्हणजे राजकीय कामें सर्वच लोक चालवण्यास शक्तिमान् होतील. असो. ह्या नियमांनीं राजांनीं वागावें; आणि वेदोक्त धर्माचें रक्षण करावें; व सर्व द्वीपांतील कलाकौशल्यें सर्व द्वीपांतील सर्व देशांत चालू करावीं; आणि सर्व द्वीपांतील लोकांशीं मैत्री राखून वेदोक्त धर्माचें रक्षण करावें, व जबरदस्तीनेंहि वेदोक्त धर्माचें रक्षण करावें.

(५) साहजिक मनुष्य एक आहे, परंतु गुणकर्माप्रमाणें ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र ह्या चार वर्णांची गणना आहे, हें सशास्त्र आहे. हे चार आश्रमांच्या दृष्टांतानें समजावें आणि तसें चालावें. तो सशस्त्र मार्ग सोडून हल्लींचे लोक बापाच्या वर्णांत, गुणकर्मविचार न करतां, मुलांना गणतात ही त्यांची चूक नव्हे काय? होय. ही मोठीच भयंकर चूक कीं, जी वेदोक्त धर्माचा सुधारणा पंथ बुडविणारी आहे, परंतु हल्लींचे लोक मोठे दुरभिमानी आहेत; ते ही गोष्ट सशास्त्र ऐकून चटकन् त्याप्रमाणें वर्तत नाहींत. यामुळें शहाण्यानें केलेला उपदेश व्यर्थ होतो व मतें माजतात.

शिपायाच्या पोटीं जन्मला तो शिपाई काय? व साधूच्या पोटीं जन्मला तो साधू काय? नाहीं नाहीं. गुणकर्में पाहून त्याप्रमाणें तो गणावा. शिपायाच्या पोटीं उत्पन्न झाला पण भ्याड आहे तर त्याला शिपाई म्हणूं नये. तसाच साधूचे पोटीं उत्पन्न झाला, पण गुणकर्में विपरीत आहेत, तर त्याला साधू म्हणूं नये; व साधूपणाचा मानहि देऊं नये. त्याचप्रमाणें चार वर्ण व चार आश्रम समजावे.

(६) ब्राह्मणाच्या पोटीं जन्माला आलेल्या मुलास ब्राह्मण म्हणणें, क्षत्रियाच्या मुलास क्षत्रिय व वैश्याच्या मुलास वैश्य म्हणणें व मानणें हें दुष्टाला गुरु मानणें व गुरूला दुष्ट मानण्यासारखें आहे.

(७) स्त्रियांचाहि गुणकर्में पाहून स्वेच्छेच्या व परेच्छेच्या अशा उभय इच्छांच्या संयोगानें तिचा विवाह, ही गुणकर्मावरून ब्राह्मणी ठरेल तर ब्राह्मणाशीं करावा, अथवा क्षात्रिय, वैश्य व शूद्री ठरेल तर क्षत्रियादिकांशीं

करावा, हें जाणूनच शुक्राचार्यांनें त्याची कन्या देवयानी ही गुणकर्मावरून क्षत्रिय ठरली म्हणून ययाति या क्षत्रिय राजास दिली.

(८) जोंपर्यंत गुणकर्मावरून वर्णव्यवस्था कळत नाहीं, तोंपर्यंत आपण आपल्या जातीच्या म्हणजे जमातीच्या ज्या वेदोक्त नियमांतील शुद्ध क्रिया त्याच कराव्या.

(९) प्रत्येक मनुष्यापासून राजानें एक रुपया कर घ्यावा व त्या मनुष्याच्या मालमिळकतीचें, व्यापाराचें, प्राणाचें, शेताचें, इत्यादिकाचें संरक्षण करावें. आणि जमिनीवरील कर व दुसरे कर काढून टाकावे. समुद्रांतील चोरांचे बंदोबस्ताकरितां समुद्रांतून होणाऱ्या व्यापारावर पृथकच कर घ्यावा.

(१०) शंभर चोर एकत्र झाले तर एक दरोडा होतो; असे शंभर दरोडे एक झाले कीं एक बंड होतें; आणि शंभर बंडें एकत्र झालीं तर एक मोठें राष्ट्र म्हणजे राज्य होतें. अशीं दहा राष्ट्रें एकाच्या स्वाधीन झालीं तर त्याला सार्वभौमत्व येतें. असो, मला सांप्रतची जी स्थिति दिसली तशी मीं लिहिली.

(११) नीच कर्माच्या योगानें जे गांवाबाहेर राहून अधिकाधिक नीच कर्में करतात, असल्या त्या नीच अवस्थेंतील मनुष्यांस म्हणजे अतिशूद्रांस वगैरे असें बोलूं नये कीं, तुम्ही नीच आहां, तुम्ही नीच आहां; असें त्यांना नित्य बोलूं लागले म्हणजे ते अधिकच नीच होतात. यास्तव भूदेव जे श्रेष्ठ ब्राह्मण त्यांनीं नीच अवस्थेंतील मनुष्यास उत्तम स्वभाव अभ्यासवून त्यांना नीच स्वभावापासून मुक्त करून, उत्तम पदवीस आणावें. कारण नरदेह हा उत्तम पदवी मिळवण्यास योग्य आहे. आणि ब्राह्मणांनीं हेंच आपलें मुख्य कृतकर्म आहे, असें स्मरावें. आतां हें त्यांना मातेस बालकाच्या सूचना देण्याप्रमाणें स्मरण दिलें आहे. कारण माझी मातापिता चित्तपावन ब्राह्मण. माझ्या देहाची उत्पत्तीपासून गणना ब्राह्मण वर्गांत श्रेष्ठपणानें आहे. म्हणून सर्व ब्राह्मण माझे आईबाप आहेत, म्हणूनच मीहि निर्भयपणानें बोललों.

(१२) हरएक मुलांना व मुलींना शेत करण्याची, पाण्यांत पोहण्याची विद्या, झाडावर चढण्याची, नाव चालवण्याची विद्या, लेखन, वाचन, चित्रकला काढण्याची विद्या, लांकूड, तोडून साफ करणें, लोखंडादिक तापवून ठोकून, घडण्याची विद्या, शिवण्याची विद्या, घोड्यावर, उंटावर, हत्तीवर इत्यादिकांवर बसून त्यांस स्वतः चालवून, जीवसंरक्षणार्थ शस्त्रांनीं लढाई

करण्याची विद्या, विहिरी, तलाव, किल्ले इत्यादि बांधणें, वस्त्रें करणें, अनेक जिनशी शस्त्रें, पात्रें करण्याची विद्या, प्राणिमात्रांवर दया करणें, दुष्काळांत दुष्काळ पडला तरी दुष्काळांत सुकाळ व्हावा अशीं धान्यें उत्पन्न करण्याची व संग्रह करण्याची कला, ज्योतिष, गणित, ईश्वरी गायन, श्रम करण्याची संवय करणें, तरणोपायार्थ इंद्रियें व मन स्थिर राखण्याचीं कर्में व उपासना, कोड प्रकरणी विद्या, व आपआपणांस देहांतील व प्राणवायूंतील अहंपण धरणाऱ्या ज्ञानापूर्वी आपण निराकार आहों, हें विचारानें जाणून निश्चयानें राहण्याची, व वेदान्त शास्त्राप्रमाणें आत्मज्ञानी होऊन तरून जाण्याची सर्व विद्यांतील मुख्य श्रेष्ठ राजविद्या म्हणजे अध्यात्मविद्या इत्यादि सर्व विद्या मनुष्यमात्रास अवश्य शिकवाव्या. व जर या सर्व विद्या पूर्ण न येतील तर थोडा थोडा वर सांगितलेल्या सर्व विद्यांचा अभ्यास करवावा, म्हणजे या विद्यांमुळें मनुष्यजन्म जितक्या उपयोगांकरितां जीवात्म्यानें धरला आहे, तितके उपयोग जीवात्म्याच्या अनुभवास येतात, यामुळें त्याचें मनुष्यदेह धरल्याप्रमाणें सार्थक होतें. यास्तव या सर्व विद्या अवश्य शिकवाव्या.

(१३) जो गीर्वाण भाषा म्हणजे संस्कृत भाषा शिकतो आणि बोलतो, तोच विद्वान् अशी हिंदुस्थान देशांतील बहुतेक लोकांची बोलण्याची चाल पडून तशीच समजूत दृढ झाली आहे; परतु ही समजूत अगदींच मूर्खपणाची आहे. कां कीं, ज्या ज्ञानाच्या अनुभवानें वेदशास्त्रादिक ग्रंथ रचले तें ज्ञान व अनुभव नाहीं, आणि नुसते ग्रंथ पाठ केले आणि बोलला त्याला विद्वान् म्हणणें हें केवढें मूर्खपण आहे ! असो, अशा या दुराभिमानानें हिंदुस्थानांत जी पांच हजार वर्षांवरील अत्युत्तम व्यवहारसुधारणा, व नीति व धर्मस्थिति होती, इत्यादि त्यांची धुळधाणी जाहली, आणि आपल्या वेदोक्त धर्मासहित आपलीं शरीरें म्लेंच्छांच्या स्वाधीन झालीं.

(१४) राजानें सर्व मनुष्यांस मजुरी व अन्नवस्त्र मिळावें, अशासाठीं देशोदेशीं जगाला सुखोपयोगी असे नवीन नवीन कारखाने सुधारावे, मंडळ्या नेमून त्या कारखान्यांचा बंदोबस्त राखीत जावा. व हरएक मजुराला किंवा कामगाराला दररोज किंवा दरमहिन्याच्या महिन्यास ठरवलेला मजुरीचा पैका देत जावा. मजुरीचा पैका जास्त दिवस ठेवूं नये. कारण तहान लागल्यावर जसें आपणांस होतें, त्याहून मजुराचा पैका जास्त दिवस

अनुक्रमांक 2222 वि: निबंध
क्रमांक 9993 नों: दि: 3-21-1948

ठेवला, तर मजुराला अधिक दुःख होतें. यास्तव मजुराचा व कामगाराचा पैका वर लिहिलेल्या मुदतीबरोबर द्यावा. कोणीहि मजुराचा मंजुरीचा पैका अपहार करणार नाहीं असा पक्का बंदोबस्त ठेवावा. ज्याप्रमाणें कीं, रोगानें आपल्या शरीराचा नाश होऊं नये म्हणून जसें आपण शरीरास जपतों त्याहून मजुराचा पैका कोणीं बुडवूं नये म्हणून अधिक जपत जावें.

(१५) देवळांत किंवा तीर्थक्षेत्रांत पुजारी, किंवा कारभारी इत्यादि वतनदार करून ठेवूं नयेत. कारण तसें केल्यास द्रव्यलोभानें भक्तीचा नाश होतो. याप्रमाणेंच वेदोक्त क्रियाकर्में चालवणारा वंशपरंपरेचा नसावा. कारण वंशपरंपरा असला तर तो आडाणी असला, अथवा वाईट असला तरीहि त्याच्याच हातून कर्में करून घ्यावीं लागतात; यामुळें वेदोक्त क्रियाकर्में चांगल्या रीतीनें चालत नाहींत, व सर्व वैदिक ब्राह्मणांना दान हा जो धर्माचा अंश तो पोहोंचत नाहीं. यास्तव तसें नसावें.

(१६) हिंदुस्थान देशांतील राजकीय लेखन, किंवा व्यावहारिक लेखन, बालबोध जी देवनागरी पूर्ण लिपी तिच्यांत असावें, अथवा बालबोध लिपीच्याच आधारानें जी मोडी लिपी तिच्यांत असावें आणि युधिष्ठिर, शालिवाहन, विक्रम हे शक; चैत्र, वैशाख इत्यादि महिने; प्रतिपदा, द्वितीया इत्यादि तिथि व रविवारादिक वासर, प्रभवादिक संवत्सर याप्रमाणें पुस्तकांत लावीत जावें अन्य देशांतील अपूर्ण लिपीचा अभ्यास करण्याचे व म्लेंच्छांच्या गोष्टी शिकवण्याचे बालकांस श्रम देऊं नयेत. अन्यदेशीय वेदोक्त धर्मविरुद्ध मतवादी मनुष्यांचे शक व महिने यांचा कागदपत्रांत मुख्यत्वेंकरून उपयोग करूं नये. याप्रमाणें हरकोणी हिंदुस्थानांत राजे असतील त्यांनीं वागावें.

(१७) न्यायाधिशानें अन्यायी ब्राह्मण आणि अन्यायी महार या दोघांना सारख्या मानानें उभें करून, अथवा बसवून न्याय करावा; परंतु महार दरवाजाबाहेर आणि ब्राह्मण आंत असा पक्षपात करूं नये. मग तो न्यायाधीश ब्राह्मणक्षात्रियादिक कोणीहि असो, अथवा महारमांग असो. सर्व न्यायाधिशांनीं ह्या नियमानें चालावें; आणि पक्षपात सोडून न्याय करावातरच प्रजा कैदी होईल. नाहीं तर प्रजा स्वतंत्रता पाहील.

(१८) राजाच्या पोटीं उत्पन्न झाला तोच राजा आहे असें नाहीं. जो

लहान हुद्द्यापासून मोठ्या हुद्द्यापर्यंत कामें करून योग्यतेला चढला, तोच राजा मानावा; मग तो प्रजेंतला कोणी का मनुष्य असेना.

(१९) युद्ध करणारी सेना, अथवा लेखनकामादिक अनेक कामें असणारी सेना, इत्यादि सैन्य राजानें बाळगावें. त्यांतील मनुष्यें अमुकच वर्णाचीं अथवा अमूक वर्णापैकीं अमुकच जमातीचीं म्हणजे जातीचीं असावीं असें नाहीं. मनुष्यमात्रांस त्यांच्या अकलेची, बलाची व शौर्याची परीक्षा घेऊन ठेवावें; त्यांत वर्णभेद किंवा वर्णभेदांतील जातिभेद इत्यादि अटकाव नसावा, तरच सर्व जातींच्या प्रजेला 'आमचें राज्य, आमचें राज्य' असा अभिमान राहतो; आणि शत्रूचें अगदीं चालत नाहीं. मनुष्यमात्रांचे अन्याय दृष्टोत्पत्तीस येतात. यामुळें नीतीनें शासन होतें.

(२०) स्त्रीचें व्यसन पुरुषास व पुरुषाचें व्यसन स्त्रीस आहेच आहे. यास्तव स्त्री-पुरुषांचे जोडे असावे. बहुधा कोणी एकाकी नसावा आणि मेहनत करून निर्वाह करावा. कोणीं कोणावर निर्वाहाचा भार घालूं नये, व स्वसंतोषानें अनाथांचें पोषण करावें. व वेदोक्तधर्मद्योतकांस आश्रय द्यावा.

(२१) श्रीकृष्णानें गोपिकांबरोबर बालपणीं संग केलाच नाहीं, म्हणजे जारकर्म केलेंच नाहीं, असा जो व्यासाच्या लिहिण्यांत सिद्धान्त आहे, तो लोक समजत नाहींत ही लोकांची मोठीच चूक आहे.

(२२)... साधूला अगर धर्मशाळेंत श्रमून आलेल्या हरएक मुशाफराला उतरण्यासाठीं काढलेल्या जागांत जो कोणी विनाकारण अडथळा करील, त्याला शासन करावें...

(२३) राजकीय नियमांतील चाकर मनुष्यें म्हणजे शिपायापासून राजापर्यंत, दासीपासून राणीपर्यंत, वल्हीं मारणारांपासून नांव चालवणारांपर्यंत, व घोडा धुणाऱ्यापासून कचरा झाडणारांपर्यंत, इत्यादि राजकीय नियमांतील चाकर मनुष्यांतून ह्याला म्हणजे लेखन वाचन ज्ञान नाहीं, असें तर कोणीच नसावें.

(२४) शंकराचार्य काचेचा रस प्याले हें खोटें पण ते वेदान्तवर्गांत प्रवीण असून पूर्ण साधू होते... इतर उदाहरण गोपीचंद जालंधर... नाटक करणारे भलत्याच गोष्टी रचतात. त्यांत अज्ञानांचें मनोरंजन होतें. त्यांत हंशील नाहीं. विद्यारण्यांनीं सोन्याचा पाऊस पाडला हें खोटें, पण ते ज्ञानी

होते; त्यांनीं वेदांचीं भाष्यें केलीं हाच सुवर्णवर्णाचा म्हणजे वेदांतील उत्तम वर्णोच्चारांचा अर्थरूप पाऊस पडला. वेताळ पंचविशी, लटकचाळीशी या साऱ्या गोष्टी खोट्या आहेत. परंतु कालिदास हा कवि... ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी लिहिली हें खरें. रेड्याच्या तोंडून वेद वदवले हें खोटें...कमालाच्या धडानें मुळापासून साधूस नमस्कार केला हें खोटें. पण कमाल रामभक्त होता हें खरें...नानकानें करामती केल्या नाहींत, सुमार्ग दाखवला...तुकारामानें वह्या तरवल्या हें खोटें. पण तुकाराम हा मोठा सत्त्वधीर व वैराग्यशील साधू होता, हें खरें.

(२५) चिमटीनें दिलेलें बचक पसरून घेऊं लागल्यास खालीं पडेल व बचकनें दिलेलें दोन बोटांच्या चिमटीनें घेऊं लागल्यास खालीं पडेल. यास्तव चिमटीनें देईल तें घेण्यास दोन बोटांची चिमटीच पुढें करावी, बचक पसरूं नये. त्याप्रमाणें विचारयुक्त उपदेशाचीं सूक्ष्म भाषणें विचारयुक्त सूक्ष्म वृत्तीनें ब्यावीं तरच कळतील, नाहींतर फजिती होईल; व असें लक्षण जर शिष्याचें असेल तर शिक्षकाला वेदोक्त धर्म शिकविण्याची उमेद राहते. असो. एकूण तरी समजा.

---

२ : : भांबावलेला समाज

आपल्या सुधारकांचें एक भाकीत अगदीं खरें होत चाललें आहे. ते म्हणत कीं, "जों जों शिक्षणाचा प्रचार होईल तों तों आपला समाज युरोपियन वळणावर जाईल." युरोपियन समाजाला सध्यां प्राप्त झालेलें वळण भौतिकशास्त्रशोधांनीं लावून दिलेलें आहे. या शोधांनीं त्याच्या जीवितांत क्रांतीच करून टाकली. हें येण्याच्या आधीं आपल्या आणि युरोपियन समाजाच्या जीवितांत फारसें अंतर नव्हतें. आतां, जर शास्त्रशोध आपल्याहि जीवितांत शिरत आहेत तर जुनी पठडी टाकून देऊन आपणहि त्याच वळणावर जाणार हें उघड आहे. परंतु हें होतांना समाजाला होत असलेल्या वेदना कोणत्या, आणि त्या कमी करण्याचे कांहीं इलाज आहेत काय, याकडे इंग्रज राज्यकर्त्यांनींहि लक्ष दिलें नाहीं, आणि आपले राज्यकर्तेहि देतील असें दिसत नाहीं. आम्ही एक नवा मांड मांडीत आहोंत, नवी रचना करीत आहोंत, नवीं कोष्टकें बनवीत आहोंत, यांत समाजानें आपसुखेंच येऊन पडावें आणि ज्यानें त्यानें आपापली व्यवस्था लावून घ्यावी, अशी राज्यकर्त्यांची इच्छा दिसते. प्रजा अज्ञ आहे, तिला परिस्थितीचें आकलन झालेलें नाहीं, ती कांहींशी भांबावलेली आहे. तर तिला बदलत्या स्थितीचा बोध करून दिला पाहिजे; पण तुमच्या जीविताचे निखळत असलेले पाये बदलत्या परिस्थितीला अनुसरून आम्ही पुन्हा नीट बसवून देतों, अशी जाणिवेची आणि जबाबदारीची भाषा राज्यकर्त्यांच्या मुखांतून येतच नाहीं. हिंदु समाजाच्या आर्थिक पैलूंकडे राज्यकर्त्यांचें लक्ष गेलेलेंच नाहीं. हे पैलू विसकटत आहेत, आणि आतां आपण दुसरीकडे कोठें जावें याची चिंता समाजांतील सहस्रावधि लोकांना लागलेली आहे, तर त्या चिंतेचें निवारण कसें होईल, याकडे सरकारचें लक्ष जाणिवेनें गेलें आहे असें म्हणतां येत नाहीं.

'डिस्पझेशन' हा शब्द आधुनिक अर्थवादांत आपण पुष्कळदां वाचतों. डिस्पझेशन म्हणजे एखाद्याचा परिग्रह हिसकावून घेणें, त्याला त्याच्या

सांपत्तिक आश्रयांतून उठविणें, त्याचा वृत्तिच्छेद करणें, म्हणजे त्याचीं चरितार्थाचीं साधनें नाहींशीं करणें, हें सारें डिस्प्झेशनमध्यें येतें. जिंदगी हिरावून घेणें हें तर आहेच, पण त्याचें पोटाचें साधन नाहींसें करणें हेंसुद्धां डिस्प्झेशनमध्यें येतें. हा वृत्तिच्छेद आज सर्व समाजभर जिकडेतिकडे चालू आहे. चरितार्थाचीं नवीं साधनें उपलब्ध होत आहेत हें खरें, परंतु जुनीं साधनें माणसांच्या हातांतून गळून पडत आहेत, हें त्याहून जास्त खरें आहे. विशेष म्हणजे हें कीं, नवीं साधनें हातीं कशीं घ्यावीं हें शिक्षणानें ध्यानांत येण्याच्या आधींच त्या त्या समाजाच्या हातून जुनीं साधनें गळत आहेत. नव्या साधनांच्या उपयोगाचें शिक्षण मिळणारे लोक निराळे आणि जुनीं साधनें गमावून बसणारे लोक निराळे, हें प्रस्तुतच्या सामाजिक गलबलीचें मुख्य लक्षण आहे. या विसंगतीकडे सरकारचें लक्ष केव्हां व कसें जाईल हें निश्चयानें सांगतां येत नाहीं; पण या विसंगतीचे म्हणजे समाजांत नेहमीं तरतूद उत्पन्न करून दिली पाहिजे ही जाणीव नसल्याचे, दुष्परिणाम समाजाला आणि सरकारला सारखेच बाधल्याशिवाय राहणार नाहींत, असें वाटतें. आपण व्यवस्था किती लावतों आणि घोटाळा किती माजवितों याचें कांहींएक प्रमाण लक्षांत आणलें पाहिजे; परंतु सरकारचें लक्ष जें कांहीं थोडेंबहुत आहे तें व्यवस्था कशी लावतों याकडेच आहे; घोटाळा किती माजत आहे याकडे नाहीं. कदाचित् हेंहि खरें असेल कीं, असल्याच परिस्थितीच्या प्रवाहांतून आपल्याला कांहीं काळपर्यंत वहावत जाणें प्राप्त असेल; आणि अमुक एका अंतरावर गेल्यानंतर सर्व घोटाळा नष्ट होऊन समाजाच्या जीविताची सुसंबद्ध घडण पुन्हा बसणार असेल.

दरम्यानच्या काळांतील घोटाळ्याची आणि गोंधळाची स्थिति लक्षांत घेणें आवश्यक आहे. जें युरोपांत झालें तेंच येथें होणार, हें सांगण्यांत कांहींच पुरुषार्थ नाहीं. आम्हांला कांहींच करतां येत नाहीं. आम्ही केवळ ढकलले जात आहोंत. शास्त्रशोधानें बदलत चाललेली परिस्थिति आम्हांला पुढें खेचीत आहे, अशी हताशपणाची आणि अगतिकत्वाची भाषा जर राज्याची धुरा वाहणारे बोलूं लागले तर हे आपले मित्र नव्हत, हे नुसते सत्ताधारी लोक आहेत, आणि यांचा आणि आपला संबंध ममत्वाचा नसून, सत्ता चालविणारे आणि सत्तेखालीं सांपडलेले अशा तऱ्हेचा आहे, अशा तुसडेपणाची

किंवा कदाचित् वैराची भाषासुद्धां समाजाच्या मनांत बळावत जाण्याचा संभव आहे. या भावनेचा उपयोग करून घेणारे चांगले सावध आहेत हेंहि सरकारनें ध्यानांत ठेवलें पाहिजे. घोटाळ्याची, विमनस्कतेची आणि दिङ्मूढ झाल्याची भावना कशी पसरत आहे तें पहा.

आपण कामकरी आणि शेतकरी यांच्याविषयीं बोलतों. आपल्या अर्थवादी मित्रांनीं त्यांची व आपली चांगली ओळख करून दिलेली आहे. त्यांच्या आकांक्षा आपल्याला कळून चुकल्या आहेत. आणि थोड्याशा दिवसांत त्यांचे आक्रम आपल्याला थोडेबहुत बाधूंहि लागतील. परंतु या शेतकऱ्यांना करावयाची म्हटली तर शेती आहे आणि कामकऱ्यांना करावयाचें म्हटलें तर काम आहे. त्यांचा दावा एवढाच आहे कीं, आम्ही शेतीवर राबतों आणि भलतेच कोणी तरी केवळ मालकी हक्काच्या कल्पनेमुळें आमच्या श्रमाचें फळ खातात; आम्ही कारखान्यांतून खपत असतों आणि भलतेंच कोणी तरी भांडवलदारीच्या मुद्द्यांवर आमच्या कामाचें फळ हिरावून नेतात. सध्यां या दोघांचा जो वाद चालू आहे तो अशा स्वरूपाचा आहे. पण एवढें मान्य करावयास हवें कीं, त्यांना राबावयास शेत आहे आणि खपावयास कारखाना आहे. पण समाजांत असे लक्षावधि लोक आहेत कीं, जे मिळाल्यास शेती करतील आणि कारखान्यांतील कामेंहि करतील. ते अनाश्रित बनलेले आहेत आणि पोटासाठीं कोठें व कसें मिळवावें हें त्यांच्या ध्यानांत येत नाहीं. आपली दृष्टि जर समाजाच्या सीमान्तापर्यंत गेली तरच मी काय म्हणतों तें ध्यानांत येईल.

पूर्वी कोणतीं माणसें कोणते धंदे करीत होतीं, आपली उपजीविका कशी करीत होतीं आणि सध्यां तीं वृत्तिच्छेदामुळें कशीं भांबावलेलीं आहेत याचा तलास मनानें तरी सर्वच अर्थसुधारकांनीं लावीत असलें पाहिजे. कोळी, भिल्ल, वारली, भंडारी, फासेपारधी, मांग, कातकरी—किती नांवें सांगावीं? हे सारे लोक आमच्या आर्थिक श्रेणीच्या कोणत्याहि पायरीवर आजपर्यंत उभे राहिलेले असोत, पण ते तेथें जगत आले आहेत ही गोष्ट खोटी नाहीं. सध्यां सरकार, भांडवलवाले आणि आधुनिक कालामधील शास्त्रशोध यांचा ससेमिरा त्यांच्यामागें इतका लागलेला असतो कीं, उपजीविकेची जीं अगदीं भरड, करड आणि तत्त्वहीन साधनें त्यांच्या हातीं असत आलीं

आहेत तींहि नाहींशीं होत आहेत. आणि दुसरीं कोणतीं घ्यावीं तर तीं हाताळण्याचें शिक्षण त्यांना मिळालेलें नाहीं. आणि आर्थिक पीठिकेंत अंतर पडलेलें आहे याचा बोधहि त्यांना होत नाहीं. थोड्या तपाशिलानें हा वृत्तिच्छेद पहावयास हवा.

पूर्वी कोल्हाट्यांची एक जात असे; अजूनहि ते तुरळक तुरळक आहेतच. कोणत्याहि गांवांत यावें, एखादा तिठा नाहीं तर श्रीमंताचा वाडा पहावा, आपला कळक उभा करावा, चार वर्षांचें पोर कळकाच्या टोकापर्यंत बेलाशक फेकावें, उघड्यानागड्या अंगानें दण्ड ठोकावा, कोलांट्या उड्या माराव्या, जो काय दमडा-अधेला मिळेल तो खिशांत टाकून पुढल्या चौकाकडे जावें, हा त्यांचा क्रम किती वर्षें चालला होता, हें सांगवत नाहीं. पण सर्कस निघाल्यानंतर या कोल्हाट्यांच्या उड्यांचें कौतुक कोण करणार? लोकांचीं करमणूक करावयास आधुनिक तऱ्हेच्या सर्व संभारासह छत्रे आणि देवल उभे राहिल्यावर बापडे कोल्हाटी धंदा गमावून बसावे हें किती स्वाभाविक आहे!

पूर्वी पंगतीच्या वेळीं म्हणजे लग्नाकार्यांत घडशांना पंगत वाजवावयास मिळत असे; परंतु फोनोग्राफच्या तबकड्या वाजवावयास मिळाल्यानंतर घडशांना कोण बोलविणार, हें दिसतेंच आहे. म्हणजे कोल्हाटी आणि घडशी हे उपजीविकेला मुकले हें उघड झालें. टर्निंग आणि फिटिंग हें नवीन तऱ्हेनें येऊं लागल्यानंतर जुन्या घिसाड्यांना धंदा गमावून बसणें प्राप्तच आहे. मॅजिक लँटर्नची किमया माहीत झाल्यावर जुन्या चित्रकथ्याची मातब्बरी कितीशी राहणार? लष्करांतल्या घोड्यांवर कातड्याचें खोगीर आल्यावर जेनाचीं खोगिरें करणारे जुने जिनगर आपले धंदे गमावून बसले असतील, हें सांगावयास हवें काय? आतां अशासारखे लोक आपापले धंदे गमावतात म्हणून नव्या पद्धतीचे धंदे काढूंच नयेत कीं काय, असा प्रश्न कोणी करील. त्यांनीं काढूं नयेत असें माझें म्हणणें नाहीं; अवश्य काढावे; नव्या नव्या शास्त्रज्ञानाचा उपयोग जरूर करून घ्यावा. येथें एवढेंच सांगावयाचें आहे कीं, हे जुने धंदेवाले बेकार होत आहेत, आणि बेकारांची वाढती संख्या ही समाजाला आणि राज्याला नेहमींच घातक ठरते.

परदेशी गवंड्यांच्या आक्रमणानें देशी गवंडी जलदीनें मागें पडत आहेत, हें निदान कंत्राटदारांच्या तरी ध्यानांत आलें असलें पाहिजे. डेअरीचा धंदा प्रतिष्ठितांनीं उचलल्यामुळें आणि तो नवीन पद्धतीनें होत असल्यामुळें गवळी लोक हवालदील झाले आहेत. आणि पोवाडे म्हणण्याची सुस्वर आणि साभिनय पद्धति सुशिक्षितांनीं घेतल्यामुळें गोंधळ्यांचा रोजगार अगदीं बुडत चालला आहे. तेलाच्या गिरण्या निघाल्या आणि तेलांचे घाणे ठार मेले हें कांहीं खोटें नाहीं. गिरण्या काढूं नयेत असें कुणीच म्हणणार नाहीं, तथापि धंदा गमावलेल्या तेल्यांची व्यवस्था काय, हा प्रश्न शिल्लकच उरतो. आपापली दाढी करण्याची पद्धति जारी झाल्यामुळें न्हाव्यांची संख्या घटत चालली आहे हें कोणीहि सांगेल. हे तेली आणि हे न्हावी सध्यां काय करतात याची नोंद कोणाकडे असेल असें वाटत नाहीं. शहरांतील लॉंड्रीवाल्यांनीं परटांचा तर कोंडमाराच चालविला आहे. आणि धुलाईचीं नवीं अमेरिकन यंत्रें स्वस्त मिळूं लागलीं म्हणजे उरलेसुरले परीटहि बेकार होऊन बसतील हें उघड आहे. असें हें डिस्‌प्लेशन चालू आहे. हें अपरिहार्य असेल, पण ज्यांचा वृत्तिच्छेद होतो त्यांची व्यवस्था काय, हा खरा प्रश्न आहे. राजकीय पुढारी सांगतात कीं, सर्वांनीं काम केलें पाहिजे, काम केलें पाहिजे, कोणीहि ऐदी रहातां उपयोगाचें नाहीं. पण इकडे चौकाचौकांतून बघावें तों कोणी काम देईल का म्हणून वाट बघत बसलेले शेंकडो बेकार लोक दिसत असतात. त्यांना काम हवें आहे, पण तें मिळत नाहीं. तुमच्यापाशीं नवीं कामें नाहींत, जीं आहेत तीं नव्या शास्त्रीय पद्धतीनें करावीं लागतात, आणि आमच्या या बेकारांना हीं कामें करतांहि येत नाहींत आणि पुरेशीं मिळतहि नाहींत. मग 'कष्ट करा', 'कष्ट करा' या आदेशाचा आणि संदेशाचा उपयोग काय? कोण कोणत्या धंद्यांतून उठून जातो आणि तो इतर कोणत्या धंद्याला पात्र आहे, तसेंच त्याला त्या धंद्याची वर्दी तरी आहे काय?--या प्रश्नाचा कांहीं-एक मेळ घातलेला असल्याशिवाय हें बोलणें नेहमींच वायां जात राहील.

पंपांची आणि नळांची व्यवस्था झाल्यानंतर जुन्या भिस्त्यांना काम राहूं नये हें ओघानेंच आलें; आणि पालखीची पद्धति मोडल्यानंतर भोई लोकांच्या जातीची दाणादाण उडून गेलेली असावी, हेंहि तितकेंच स्वाभाविक आहे. पाणलोटाच्या संडासानें भंगी निकामी बनत आहेत, हें मानवतेच्या दृष्टीनें

बरेंच आहे असें म्हटलें पाहिजे; पण जुनीं आरमारें इंग्रजांनीं मारून टाकल्यानंतर भंडारी लोकांच्यावर केवळ चांचेपणाच करण्याचा प्रसंग यावा, हें राजकीय गैरहिशेबीपणाचें लक्षण आहे. मागें एकदां सेवानिवृत्त मामलेदार श्री. अत्रे यांनीं आपल्या 'गांवगाडा' या पुस्तकांत अनेक जातींचा आणि जमातींचा भार शेतकऱ्यांवर कसा पडतो याचें विवेचन केलेलें होतें. डिस्पझेशनची किंवा वृत्तिच्छेदाची ही पद्धति पुढें चालूच राहिल्यानें शेतकऱ्यांवरचा हा भार अधिकच वाढला असला पाहिजे हें उघड आहे. आगगाडी नांवाची किमया निघाल्याबरोबर आणि हजारों खंडी माल पाठीवर घेऊन नेमक्या वेळीं ठरल्या ठिकाणीं शेंकडों मैल गतीनें धांवत जाणारी ही भुताटकी देशांत नाचूं लागल्याबरोबर लमाणांचा धंदा आजिबात बसला! परंतु त्यांचें पुढें काय झालें आणि इतर कोणाच्या जीवितांत हे तुरमुंडी देऊन शिरले याची नोंद आपण केव्हां केली आहे काय? या घडामोडींकडे हिशेबाच्या दृष्टीनें उंचावरून पहाणारी जबाबदार संस्था गेल्या दीडशें वर्षांत तरी उभी राहिलेली नाहीं. त्याच्या आधींचा इतिहास अगदीं थोडक्यांत सांगतां येतो; कारण घडामोडच फारशी नव्हती. जुने धंदे मोडत नव्हते आणि नवे घडत नव्हते. आपल्या वैद्यराजांना वनस्पति पुरविणें हा वैदू लोकांचा मूळ धंदा होता आणि कंपाउंडर जसा पुष्कळदां डॉक्टर बनतो तसे हे वैदू लोक स्वतःच कांखेला झोळी लावून 'वाईचा दवा—थंडीचा दवा' देऊं लागत. परंतु देशांत इंग्रजी वैद्यक आलें, देशी वैद्यक जवळजवळ बुडालें, आणि वैदू लोक खरोखर हैराण झाले. नवे धंदे पत्करावे असें आपण म्हणतों; पण ते कुठेंसे आहेत, ते करतां येतात का, आणि त्यासाठीं करावीं लागणारीं सामाजिक स्थित्यंतरें व्यक्तींना किंवा समूहांना परवडतात काय? — याचा विचार शासनसंस्थेच्या द्वारांच व्हावयास हवा.

वासुदेव ही कलावंतांची एक मोठी उपयुक्त संस्था होती. मूळ वासुदेवाचा मुलगा वासुदेव हा गाईंच्या मागें रानांत गेलेला असतांना डोक्यावर मयूरपिच्छांची टोपी घाली, ओठांनीं मंजुळ मुरली वाजवी, अंगावर शेला घेई आणि नृत्यासाठीं पायांत घुंगुर बांधी. त्यानें सांगितलेलें अद्वैत सिद्धान्ताचें आणि भक्तीचें तत्त्वज्ञान शेतकऱ्यांच्या झोंपडीपर्यंत पसरविणारी ही वासुदेवाची संस्था एक मोठी उपयुक्त कामगिरी करी. परंतु कलावंतांनीं भरलेलीं नाटक-

गृहें आणि सिनेमागृहें उभीं राहिल्यानंतर या वासुदेवाला कोण विचारतो ? न विचारीनात का ? पण उपजीविकेच्या दृष्टीनें दाणादाण होत असलेले हे लोक कोठें जाऊन बसत असतील, ही सामाजिक चिंता आपल्याला पडावयास हवी. राजकीय शासनसंस्थेच्या ठिकाणीं वात्सल्याची बुद्धि असावी. ' भरत इति लोकस्य भरणात् ' ही भरत राजाच्या नांवाची व्याख्या करणाऱ्या कवीनें आपल्यापुढें केवढें तरी उच्च ध्येय ठेवलेलें होतें. देशांतील सगळ्या लोकांना पोसणें हें भरताचें म्हणजे राजाचें काम असावें. पण आपली सध्यांची प्रौढी नव्हे, पण उगाळणारी तक्रार ही आहे कीं, देशांतील अमुक कोटी लोक अर्धपोटीं रहातात !

हीं थोडींशींच उदाहरणें मीं दिलेलीं आहेत. सामाजिक पडापडीच्या इतिहासांतून याच्या तिप्पट आणखी देतां येतील. नवे नवे धंदे निघत आहेत, त्यांत या बेकारांनीं शिरावें, हें उत्तर गोळाबेरजी स्वरूपाचें आहे. यानें गरजू लोकांची गरज हिशेबशीर पद्धतीनें भागत नाहीं. एक तर धंदा कोणता आणि कोठें गांठावा हें कळत नाहीं; आणि एका सामाजिक गटांतून उठून दुसऱ्या गटांत सामरस्यानें प्रविष्ट होणें माणसांना कठिण जातें. गिरणींत काम मिळतें म्हणून कांहीं भोई जरी मुंबईला गेले तरी त्यांचा सामाजिक समावेश इतर जातींत होऊं शकत नाहीं, इतर जाती तो होऊं देत नाहींत आणि यांचा स्वतःचाहि आपल्या जातीकडचा ओढा सुटलेला नसतो. अशा पेंचांत हे लोक सांपडलेले असतात. नव्या आर्थिक व्यवसायाच्या रसायनांत सर्व लोकांच्या मनावरचीं जुनीं पुटें दग्ध होऊन जातील व नव्या नियमनांत त्यांना सुख वाटूं लागेल, एवढें एकच आशीर्वादपर व आशावादी उत्तर या प्रश्नाला देतां येण्यासारखें आहे. परंतु या टप्प्याला पोंचेतोंपर्यंतचीं मनाचीं व जीविताचीं जीं कष्टप्रद आंदोलनें समाजांत चालू आहेत तीं आणखी किती वर्षें खातील हें सांगतां येत नाहीं.

एखाद्या वेळीं असें वाटतें कीं, वनस्पतींची माहिती वैदू लोकांना आहे तर, आणि वनस्पतींची लागवड करणें हें जर आतां वैद्यकाच्या दृष्टीनें आवश्यक बनत चाललें आहे तर, हा लागवडीचा धंदा नवीन पद्धतीचें थोडेंसें शिक्षण देऊन वैदूंच्यांच हवालीं करावा. शास्त्रीय पद्धत हताळतां येऊं लागली म्हणजे नवजीवनाची रोषणाई त्यांच्या ठिकाणीं आपोआपच उत्पन्न होईल, आणि

आपल्या अंगावर चढलेला मागासलेपणाचा वाण गेला आहे, असें त्यांचें त्यांना दिसूं लागेल. वेरळेसारख्या एखाद्या नदीच्या सर्व कांठभर जिकडेतिकडे केकताडाची म्हणजे घायपाताची लागवड योजनेंच्या योजनें केली आणि त्याच्या तंतूंचें सूत किंवा रेशीम शास्त्रीय पद्धतीनें कसें बनवावें याचें शिक्षण जर मांग लोकांना देण्यांत आलें तर जुन्या चम्हाटांच्या धंद्यांतील गांवढेपणा नष्ट होऊन नवा शास्त्रीय झुळझुळीतपणा या धंद्याला येईल, आणि किफायत किती तरी पटीनें वाढल्यामुळें मांगांच्या सामाजिक जीवनाची ढबच अजीबात बदलेल. शिक्षण-कला ही सांपत्तिक सुस्थितीच्या मागें आपोआपच येईल आणि उपजीविकेचा प्रश्न स्थलांतरें न करतां जबाबदारीनें सुटून हे सर्व लोक एका तजेलदार जीवनांत प्रविष्ट होतील. कोळशाचा धंदा सर्वच्या सर्व नवीन पद्धतीनें कसा करावा, याचें शिक्षण वारली लोकांना देण्यांत आलें, आणि भांडवलवाल्यांच्या तावडींतून त्यांना सोडवून घेऊन त्याची किफायत त्यांनाच मिळूं लागली तर नवीन जीवनाचा शास्त्रीय तजेला, सामाजिक एकीची बैठक न बदलतां वारल्यांनासुद्धां प्राप्त होईल. याच पद्धतीनें खाणींचीं कामें भिल्लांच्या हवालीं करणें, कातकऱ्यांना कागद देणें आणि उंच दर्जाची पॉटरीसुद्धां कुंभारांच्या हवालीं करणें हें सामाजिक स्वास्थ्याच्या दृष्टीनें योग्य ठरेल, असें कित्येकदां वाटतें. माणसाची व्यक्तिगत लायकी, दळणवळणाच्या साधनांची सुलभता, त्याबरोबरच पसरणारी स्थलांतराची आवड ही लक्षांत घेऊन आतां सुचविलेला विचार उपहास्य बनवितां येणें अगदीं शक्य आहे; पण मला वाटतें कीं, तें केवळ तार्किक किंवा वाङ्मयीन कौतुक होईल. सामाजिक किंवा आर्थिक गलबल शमविण्याचा मात्र तो इलाज नव्हे. आर्थिक स्वास्थ्यासाठीं ही कल्पना मनांत येते. हिला कांहीं एक हिशेब आहे, आणि ही अमलांत आणावयास कांहींएक राखीव क्षेत्र आहे, त्याचाच फायदा घ्यावा कीं काय, असा प्रश्न आहे. योजना आणि नियोजन हीं अगदीं आधुनिक जीवनांतील मुख्य कलमें झालेलीं दिसतात. त्यांचा अर्थ तरी हाच आहे कीं, कांहीं हिशेबानें वागावें. त्या हिशेबालाच आतां सांगितलेली कल्पना मदतनीस बनेल असें वाटतें.

परंतु हें व्हावयास त्या त्या धंदेवाल्या लोकांना शास्त्रीय शिक्षणाची आवश्यकता आहे. आणि हें शिक्षण देण्याची व्यवस्था ठिकठिकाणीं करणें

कितपत शक्य आहे, याचा अंदाज करतां येत नाहीं. या शिक्षणालासुद्धां प्राथमिक शिक्षणाची आवश्यकता आहेच आहे आणि आपलें गाडें फार झालें तर थोड्याशा वर्षांत त्या प्राथमिक शिक्षणापर्यंत येऊन पोंचेल. शास्त्रीय शिक्षणाची वाट त्याच्या पुढची आहे. ती चालूं लागावयास अर्थातच आणखी कांहीं वर्षें लागतील. सध्यां काय होत आहे तें पहा. ज्या लोकांना हीं दोन्ही शिक्षणें मिळालीं आहेत, ते या सर्व धंद्यांत पडत आहेत, आणि तेच यांचा पुरता कब्जा घेत आहेत. अर्थात् आपल्या हातचा धंदा चालला हें मूळ धंदेवाल्यांना मुकाट्यानें बघावें लागत आहे. ते आज मुकाट्यानें पहात असतील. पण भाकरीच्या विवंचनेनें ते उद्यां जालीम भाषा बोलूं लागतील आणि शासनसंस्थेला नवा धोका निर्माण होईल.

शिक्षण द्यावयाचें तर तें मुलांना आणि मुलींना दोघांनाहि द्यावयास हवें. शास्त्रीय शिक्षणाला पात्र बनविण्यास पहिल्यानें या निरनिराळ्या जातींतील मुलगेच हातीं घ्यावेत असें कोणी म्हणेल, तर त्या योगानें प्रत्येक जातींत एक नवें संकट उभें होईल. शिक्षण मिळालेले मागासलेल्या जातींतील तरुण लोक अगदीं अशिक्षित राहिलेल्या आपल्याच जातींतील मुलींशीं लग्नें करावयास सर्वथा नाखूष असतात, हें सध्यांच निरीक्षकांच्या ध्यानांत येऊन चुकलें आहे. अर्थात् हें सामाजिक अस्वास्थ्य मागासलेल्या प्रत्येक जातींत जर उत्पन्न होऊं द्यायचें नसलें तर त्यांच्या मुलांना आणि मुलींना दोघांनाहि बरोबरच शिकविलें पाहिजे.

धंदाबदल व शिक्षण यांमुळें जात्यंतर करावेंसें वाटतें व सुधारक या गोष्टीला प्रोत्साहनहि देतात. पण जात सोडतां येत नाहीं, असा त्या त्या जातींतील शिक्षितांचासुद्धां अनुभव आहे. कारण इतर जाती, पूर्णपणें तुल्यबलत्व नसलें तर यांना जवळ करावयास मनानें नाखूष असतात. शिवाय, पूर्वीच्या काळीं धंद्यासाठीं असली तरी, सध्यांच्या उत्पाताच्या अस्थिरतेच्या काळांत स्वसंरक्षणासाठींच जात सोडतां कामा नये, असें माणसांना वाटत असतें. हिंदु समाजांत माणसांचें रक्षण होण्याचीं दोन साधनें आहेत : एक शासनसंस्था व दुसरी जातिसंस्था. शासनसंस्था ही खास टिकाऊ आणि समर्थ आहे असें अनुभवानें पुन्हा पुन्हा प्रत्ययाला आलें तरच जातिसंस्था मोडूं द्यावयास माणसें तयार होतील. जर का शासनसंस्था ही अस्थिर, डळमळीत किंवा

पक्षपाती असेल तर जातीचा आश्रय सहसा कोणी सोडणार नाहीं. विशेष संकट आल्यावरोबर आपल्याला कोण आश्रय देईल हा विचार मनात येतांच, माझ्या जातीचे लोक मला सांभाळतील, हें उत्तर प्रत्येकाच्या मनांत चटकन् उभें राहील आणि जों जों नागर संस्कृतींतील संरक्षणाच्या साधनापासून एखादी जात दूर असेल तों तों तिला हा अनुभव जास्तच येतो. सुधारकांचा आग्रह हा सामान्यतः खरा असतो, पण व्यवहारांत तो उपयोगी पडत नाहीं. भारतांतील शासनसंस्था कोणतें रूप धारण करणार आहे हें अजूनहि कोणाच्या ध्यानांत आलेलें नाहीं. तिनें लोकशाही हें नांव धारण केलें आहे खरें, पण आपली शाही चालवावयास जें बौद्धिक व मानसिक सामर्थ्य हवें तें या लोकांच्या अंगीं सध्यां तर नाहींच; आणि तें आणावयास हे लोक बराच काळ घेतील असें आज तरी वाटतें.

आमचा देश खंडतुल्य आहे, या प्रौढीच्या पोटांत कितीतरी बारीकबारीक किल्मिषें वावरत असतात. जर तो देश एवढा मोठा आहे, तर इतिहास-कालांत उत्पन्न झालेल्या अनेक संस्कृति व जमा झालेले वंशखंड हे येथें असणार. या सगळ्यांचा एकरूप रांधा व्हावयास बरींच वर्षें लागतील. तात्पर्य, सांपत्तिक अस्वास्थ्य, डिस्पझेशन म्हणजे वृत्तिच्छेद, योग्य त्या शिक्षणाची दिरंगाई, संरक्षणाचा डळमळीतपणा, शिक्षणाचा तुटपुंजेपणा हीं सर्व कारणें खचीं पडून एखादी सुसंबद्ध नव्हे, तर भलतीच्या सलती क्रांति या देशांत होईल कीं काय असा धाक वाटतो. असें हें भावी क्रांतीचें विश्वरूप दर्शन आहे व समाजाच्या मनाची भांबावलेली स्थिति आहे.

---

३ : : प्रपंचांतील आपल्या दोन वैरिणी

ऊनोक्ति आणि अत्युक्ति अथवा अतिशयोक्ति या आपल्या वैरिणी आहेत. ऊनोक्ति म्हणजे जेवढें बोलावयास हवें तेवढें सुद्धां न बोलणें आणि अत्युक्ति म्हणजे जेवढें बोलावयास हवें त्यापेक्षां जास्त बोलणें अथवा अतिशयोक्ति करणें. या दोन्ही दोषांनीं आपल्या प्रपंचांत आणि सार्वजनिक जीवनांत फार नुकसानें होतात व याकडे माणसाचें लक्ष जितकें जावयास हवें तितकें जात नाहीं. भयानें, भिडेनें किंवा साधत नाहीं म्हणून योग्य प्रसंगीं जितकें बोलावयास हवें तितकें आपण बोलत नाहीं आणि मग मसलत अंगावर येते. 'मला वाटलें आपल्यापुढें हें कसें बोलावें', 'मला वाटलें तुमच्या ध्यानांत आलें असेल', 'मला वाटलें तुम्ही रागवाल म्हणून मी बोललों नाहीं' असलीं वाक्यें आपल्या संभाषणांत कितीदा तरी ऐकूं येतात, आणि तीं ऐकूं येणें जवळ जवळ अटळ असतें. हा मनुष्य आपल्यापेक्षां श्रेष्ठ आहे, आपल्यापेक्षां बुद्धिमान् आहे, हा आपला अधिकारी आहे, हें मनांत येऊन प्रसंगाला योग्य तेवढेंहि आपण बोलत नाहीं. या ऊनोक्तीनें ऐकणाराला आपल्या मनांतील सर्व भाव नीट कळत नाहींत, आणि म्हणून तो रागावतो किंवा केवळ अंदाजानें आपलें मनोगत समजावून घेतो आणि यामुळें कार्याची हानि होते उलटपक्षीं पुष्कळदा धनी हा सेवकास जी आज्ञा करतो ती सुद्धां ऊनोक्तीच्या दोषानें व्याप्त असल्यामुळें नोकराला नीट बोध होत नाहीं, तो चाचपडल्यासारखें करतो आणि अंदाजानें आपलें काम करून टाकतो. यानेंहि कार्यनाशच होतो. खरें म्हटलें म्हणजे नोकरानें काय किंवा धन्यानें काय आपलें म्हणणें स्वच्छ शब्दांनीं पुरतें सांगितलें पाहिजे. पण आपण नोकर आहों या हीन जाणिवेनें नोकराच्या बोलण्यांत, आणि आपण कोणीतरी श्रेष्ठ आहोंत या मस्त जाणिवेने धन्याच्या बोलण्यांत, ऊनोक्तीचा दोष उत्पन्न होतो. बारकाईनें पाहिलें तर दिसून येईल कीं, धन्याची तोंडी आज्ञा करावी तितकी खुलाशानें केलेली नसते. पुष्कळ शब्दांनीं बोलायचें तें बरोबरीच्या माणसाशीं बोलणें बरोबर आहे,

लहानाशीं किंवा नोकराशीं त्रोटकच बोललें पाहिजे, असा अनेकांचा समज असतो आणि यामुळें काम बिनसतें. 'अमक्याकडे जाऊन तूं अमुक सांग' असें नोकराला किंवा लहानाला सांगतांना सांगणारा बोलावें तितकें पूर्ण बोलत नाहीं. माणूस, स्थळ, काळ, मतलब इत्यादिकांचा पूर्ण बोध निरोप्याला करून देणें फारच महत्त्वाचें असतें. पण या कामीं त्रोटकपणा ठेवण्यांत कांहीं अधिकाराचें भूषण आहे, असा वरिष्ठांचा समज असतो. मात्र, या ऊनोक्तीनें त्यांचेंच नुकसान होतें.

कांहीं महत्त्वाचे निरोप कागदावर लिहून पाठविणें धोक्याचें असतें. कागद एखाद्या वेळीं गळबटतो किंवा लिहिणारा लेखनानें गुंतून पडतो. या दोन्ही आपत्तींतून सुटण्यासाठीं तोंडी निरोप धाडण्याची पद्धति मुत्सद्दी लोकांत सध्यांसुद्धां चालू असते. उत्तम स्मरणशक्ति असलेले व जलद पाठ करणारे असे निरोप्ये त्यांच्यापाशीं असतात आणि ते त्यांच्याशीं आपला निरोप परिपूर्ण शब्दांनीं सांगतात. एकदां, दोनदां, तीनदां सांगितल्यावर निरोप्याकडून तो निरोप हे मुत्सद्दी पाठ म्हणून घेतात आणि मगच त्याला जिकडे पाठवायचें तिकडे पाठवितात. या पद्धतीचें इतर कांहीं मर्म असलें तरी निरोप सुस्पष्ट आणि पूर्ण असावा, हें मुत्सद्द्यांना पटलेलें असतें एवढें आपल्याला दिसून येतें.

ऊनोक्तीनें पुष्कळदा नुकसान होतें; नुकसान करावयाचें मनांत नसलें तरीहि तें होतें आणि नुकसान करावयाचें मनांत असलें तर तें अर्थात् होतेंच होतें. एखाद्यानें आपलें लिखाण तुम्हांला आणून दाखवलें आणि अभिप्राय देतांना दुर्लक्षानें अथवा आळसानें जर तुम्ही केवळ 'बरें आहे' असें म्हणालात तर त्या माणसाचें तुम्ही नुकसान करतां. वस्तु आवडलेली असूनसुद्धां दुर्लक्ष आणि आळस यांमुळें बोलावयाचें तितकें तुम्ही बोलत नाहीं आणि म्हणून त्या माणसाचें अहित होतें. तसेंच नुकसान करण्यासाठीं सुद्धां ऊनोक्तीचा अवलंब माणसें करतात. वस्तु आवडलेली असूनसुद्धां तिला चांगलें म्हणावयाचें मनांत नसलें तर थोडासा चोरटा अभिप्राय प्रकट करून लोक मोकळे होतात. 'पहिलाच प्रयत्न आहे' असें अभिप्राय देणारानें म्हटलें म्हणजे याला पुस्तकाला नांवें ठेवावयाचीं आहेत, हें आपोआपच दिसून येतें. 'Damning a man by faint phrase' म्हणजे पुसट स्तुति

करून एखाद्याची नालस्ती करणें हाहि प्रकार सर्वांच्या परिचयाचा आहे आणि हें काम कुत्सित लेखकांना ऊनोक्तीनें सहज करून घेतां येतें.

ज्यांचा शिकविण्याचा धंदा आहे, त्यांच्या ठिकाणीं तर हा ऊनोक्तीचा दोष केवळ अक्षम्य आहे. सूत्ररूपानें बोललें म्हणजे आपण मोठें पांडित्य प्रकट करतों असा अनेक वक्त्यांच्या आणि प्राध्यापकांचा समज असतो, पण यानें सभेतील श्रोते आणि वर्गांतील विद्यार्थी मनांत चांचपडत राहतात. त्यांना विवेचन हवें असतें. विचारांच्या ग्रंथि फोडून मोकळ्या केल्या तरच त्यांना समाधान लाभतें. त्यांच्या स्वतःच्या बुद्धीचा थोडासा वापर झाल्यानें त्यांना सुद्धां सुख होतें आणि म्हणून प्रमेयांतील कठीणपणाचा थोडासा अंश वक्त्यांनीं शिल्लक ठेवावा हें बरोबर आहे; पण सारेंच प्रमेय विवेचनाची खुलावट न करतां, ऐकणारापुढें मांडणें म्हणजे दुर्बोधतेला आवाहनच होय. हा ऊनोक्तीचा दोष आतांच सांगितलेल्या प्रसंगीं किंवा ठिकाणीं शेवटीं औदासीन्य किंवा अप्रियता उत्पन्न करतो. आपल्या मनाचीं कवाडें खुलीं करण्याची शक्ति वक्त्याच्या ठिकाणीं असली पाहिजे; आपल्या मनाचे निरानिराळे कप्पे त्यानें पुरते बाहेर ओढून दाखविले पाहिजेत. त्यानें आपल्या मनाच्या बारीकसारीक पेशीसुद्धां श्रोत्यांपुढें रिकाम्या केल्या पाहिजेत. अर्थात् हें करतांना कांहींसें डोकावून पाहिल्याची, थोडीशी वैचारिक हुज्जत केल्याची, थोडेंसें शोधून घेतल्याची जाणीव वक्त्यांनीं श्रोत्यांच्या ठिकाणीं शिल्लक ठेवावी. पण पुष्कळदा वक्त्यांच्या ठिकाणीं हें सामर्थ्य नसतें आणि मग ते समजतात कीं, सूत्ररूपाचें बोलणें श्रोत्यांना कळतच असलें पाहिजे आणि तें न कळलें तर श्रोते अप्रबुद्ध आहेत. हा सारा ऊनोक्तीचा दोष आहे.

तथापि, ऊनोक्तीच्या दोषापेक्षां अत्युक्तीचा किंवा अतिशयोक्तीचा दोष हा फारच हानिकारक असतो. कांहीं माणसें तोंडाळ असतात; गुर्मीनें बोलण्यांत कांहींना भूषण वाटतें, शब्दांचे फटाकडे वाजले म्हणजे आपण कांहीं तरी बोललों असें समाधान त्यांना लाभतें. बोलण्यांत कांहीं अफाटपणा असला म्हणजे आपण वक्तृत्व केलें किंवा भाषण गाजविलें असें त्यांना वाटतें. क्षुद्र बाबसुद्धां मोठी मोहीमशीर बनवून सांगणें आपल्या उत्कट भावनेचें आणि वक्तृत्वाचें निदर्शक बनवावें असा त्यांचा हेतु असतो. वास्तविक

पाहतां मूळ वस्तु आणि तिचा आविष्कार यांच्यांत समतोलपणा पाहिजे. ज्या मानाची वस्तु त्या मानाचा आविष्कार हेंच बरोबर असतें. पण पुष्कळ माणसांना आविष्कारांतील अमर्यादपणा प्रिय वाटतो व यानेंसुद्धां नुकसानच होतें. तसेंच एखादी वस्तु सजवून देण्यासाठीं श्रोत्यांचा मगदूर लक्षांत घेतां किती खुलावट करावयास हवी याचा सुद्धां अंदाज वक्त्याला करतां आला पाहिजे. पण पुष्कळदां असें होतें कीं, विषय पिंजत बसण्याची प्रवृत्ति इतकी प्रबळ होते कीं, शेवटीं त्या वस्तूचा भुगा होऊन जातो आणि हा वक्ता आम्हांला मूर्ख समजतो, असा रोष श्रोत्यांच्या मनांत उत्पन्न होतो. म्हणजे शब्दांतला अफाटपणा जसा, तसाच विवेचनांतला अतीव बारकावा हा अत्युक्तीचाच दोष होय, आणि यानेंहि आतांच सांगितल्याप्रकारचें नुकसान होतें.

पण जर बोलणारा कवि असला तर श्रोताहि त्याच्याशीं जमवून घेतो. हा बोलून चालून कवि आहे आणि म्हणून अतिशयोक्तीची त्याला परवानगी असते हें श्रोते जाणूनच असतात. किंबहुना हा कवि कसल्या गमतीदार अतिशयोक्ति करतो हें पाहण्याला श्रोता उन्मुखच असतो. कवि जर कां एवढेंच म्हणत राहिला कीं, 'नायिकेचें मुख फार सुंदर होतें', 'नायिकेचें मुख फार सुंदर होतें', तर हा कवि दरिद्री आहे असा श्रोत्यांचा समज होतो. पण तो जर का म्हणाला, 'नायिकेचें मुख चंद्रासारखें होतें', 'तिच्या मुखावरील यौवनाची कळा तांबडें फुटलेल्या प्राचीसारखी दिसत होती', तर श्रोत्याला आनंद उत्पन्न होतो. त्याला हें माहीतच असतें कीं, संबंधित स्त्री कधींहि इतकी सुंदर असूं शकणार नाहीं. पण ती फार सुंदर होती हा मुद्दा पटवून देण्याला कवीपाशीं अतिशयोक्तीशिवाय दुसरें कोणतें साधन असणार? हाहि विचार त्याला माहीत झालेला असतो. शिवाय चांदण्याचे झोत पृथ्वीवर सोडणारा चंद्र आणि रंगीबेरंगी तेजानें सुशोभित झालेली प्राचीदिशा यांच्या मधुर स्मरणानें त्याच्या मनांत आनंदाचे हेलकावे उत्पन्न होतात आणि कवीनें हे हेलकावे सुंदरीच्या मुखश्रीशीं आणून लावल्यानें तिच्यासंबंधानेंहि श्रोत्याला फार प्रीति वाटूं लागते. पण हा सारा प्रकार उभयपक्षीं जाणूनबुजून होतो. कवीनें असें करावेंच असें श्रोत्याला वाटतें आणि आपण असें केलें नाहीं तर आपण पुरेसें बोललों नाहीं, असें कवीला वाटतें.

या अतिशयोक्तीसंबंधानें इमर्सन यानें एक मोठा बोधप्रद विचार सांगितला आहे. तो म्हणतो : " A poet never thinks that he has said enough unless he exaggerates." कांहीं बेताल झाल्याशिवाय, थोडेंसें मर्यादेच्या पलीकडे गेल्याशिवाय, कांहीं अफाटपणा आणल्याशिवाय पुरतें बोलून झालें आहे, असें कवीला वाटतच नाहीं. आतां पुरतें बोलण्याचें काम विवेचनानें होण्यासारखें असतें. सूक्ष्म तपशिलानें तें साधण्यासारखें असतें. पण कवि असें करूं लागला तर तो केवळ वक्ता होईल. आनंदाचा झोका रसिकाच्या मनाला देण्याचा गुण त्याच्या ठिकाणीं दिसणार नाहीं. रसिकहि वेडाच असतो. कवीकडून त्याला विवेचन नको असतें. सुंदरीच्या मुखावर चौकटी पाडून एका एका चौकटींत कोणकोणतें सौंदर्य आहे असा हिशेबाचा तक्ता जर का कवि मांडूं लागला तर श्रोते उठून जातील आणि रसिक पुस्तक खालीं ठेवील. असला हिशेब विचाराच्या आणि ज्ञानाच्या बाबतींत बरोबर असतो; पण जिथें आनंदाची अपेक्षा असते, सौंदर्याचा लोभ उत्कट बनलेला असतो तेथें हिशेबाचें काम नसतें; तेथें थोडा उद्दामपणाच पाहिजे, थोडा मस्तपणाच पाहिजे, म्हणजे अतिशयोक्ति हवी. एखाद्या निराळ्याच चांगल्या गोष्टीचें स्मरण करून देऊन मूळ वस्तु अधिक प्रिय बनविण्याची कला कवीला किंवा कविसम वक्त्याला साध्य झालेली असावी लागते. राजवाड्यांतील राणीकडे पाहतां. " उद्यानांतील गुलाबाचा कळा जसा दिसावा तशी राणी दिसत आहे " असें त्यानें म्हटलें पाहिजे आणि उद्यानांत हिंडतांना जर त्यानें असा टवटवीत आणि डौलदार कळा पाहिला तर, " हा कळा राजाच्या अंतःपुरांतील राणीसारखा उद्यानांत शोभतो आहे " असें त्यानें म्हटलें पाहिजे. असें झालें म्हणजे श्रोत्याला खरा आनंद होतो आणि आपण पुरेसें बोललों असें कवीला वाटूं लागतें.

हा सारा भावनांचा खेळ आहे. ज्या ज्या मानानें उत्कटता जास्त त्या त्या मानानें अतिशयोक्तीचा वापर जास्त असेंच प्रमाण दिसून येतें. हिशेबीपणा ठेवला असतां आपल्या भावनेंत कोतेपणा आणि तिच्या आविष्कारांत कृपणपणा दिसून येईल कीं काय असें माणसाला वाटतें. आपण एखादें नाटक पाहत असावें; नायक-नायिकांच्या बोलण्यानें वाहत न जातां त्यांच्या संभाषणाचें पृथक्करण करून पाहिलें तर त्यांतलें हिशेबाचें किती आणि गैर-

हिशेबी किती हें आपल्या सहज ध्यानांत येतें. अर्थात् आपली ही परीक्षकाची बैठक आपण नेहमींच कायम ठेवली तर नाटकाला न गेल्यासारखेंच होईल! पण प्रसंगविशेषीं मानवी मनाच्या खेळाचें परीक्षण करण्याचा हेतु ठेवला तर आतांच सांगितलेला चमत्कार स्वच्छ दिसून येईल. धैर्यधर आणि भामिनी यांचीं प्रेमातिरेकाचीं भाषणें, खऱ्या धैर्यधराने आणि भामिनीनें केलींच असतील असें म्हणवत नाहीं आणि तीं त्यांनीं न केल्याचें कारण इतकेंच कीं, त्यांना पुष्कळ आणि नानातऱ्हेचें बोलतां येत नसलें पाहिजे. त्यांनीं तेव्हां नुसतेच सुस्कारे टाकले असतील किंवा अन्य चेष्टा केल्या असतील; पण या सुस्काऱ्यांना आणि चेष्टा, हालचाल, आविर्भाव यांना शब्दाचें रूप कसें द्यावें आणि त्यासाठीं अतिशयोक्ति कशी करावी, हें खाडिलकरांना माहीत असल्यामुळें या नायक-नायिकांचीं भाषणें त्यांनीं अतिशय मनोरम बनाविलीं आहेत. प्रेक्षकहि सहृदय असला तर एवढें ओळखतो कीं, मनाचा सारा कोठा मोकळा करावयास यांनीं असें बोललेंच आहे. मातृप्रेमाचें सुद्धां असेंच आहे. त्या प्रेमाचें वर्णन करतांना लाकभाषा कशी भरारत जाते ती पाहा : 'मुलाच्या पायाला काटा मोडला तर आईच्या पायाला रक्त येतें' असा वाक्प्रचार रूढ आहे. पण ती अतिशयोक्ति आहे, आणि ती मातृप्रेमाची परिसीमा करण्यासाठीं केलेली आहे, हें बोलणारा व ऐकणारा या दोघांनाहि कळतें.

भक्तांनासुद्धां आपलें प्रेमळपणाचें मनोगत व्यक्त करण्याला अतिशयोक्तीचा आश्रय करावा लागतो. मांडी घालून आणि हात जोडून एके ठिकाणीं ध्यानस्थ बसलें असतां परमेश्वराच्या सगुण मूर्तीचें प्रेमळ चिंतन होत नाहीं असें नाहीं. पण तो प्रेमळपणा भक्तांच्या मनांत इतका दाटतो कीं, भक्त जागचा उठतो आणि टाळ्या पिटून व गिरक्या मारून नाचूं लागतो. भावनेचें आतिशय्य व्यक्त करण्याचा हा शारीरिक इलाज आहे. हाच प्रकार भक्त आपल्या वाङ्मयांत सुद्धां करतात. पंढरीचा महिमा वर्णन करतांना नामदेव अगदीं रंगून गेला आणि मग भावनेच्या आविष्काराचें त्याचें नेहमींचें तारतम्य अगदीं सुटलें. पंढरीपुढें वैकुंठाचीसुद्धां मातब्बरी नाहीं, येथपर्यंत भरारत जाऊन तो म्हणाला, "आधीं वसविली पंढरी। मग वैकुंठ नगरी॥" फार काय सांगावें, नामदेवाच्या मतें "जेव्हां नव्हतें चराचर। तेव्हां होतें पंढरपूर॥"

चराचराची जर ही स्थिति तर चंद्रभागेपुढें बाकीच्या नद्यांची काय मातब्बरी? म्हणून नामदेव म्हणाला, " जेव्हां नव्हती गोदा, गंगा। तेव्हां होती चंद्रभागा!॥ " एरवींच्या वेळीं आपल्या या बोलण्याचें नामदेवाचें नामदेवालांसुद्धां हसूं आलें असेल. शृंगार इत्यादिकांचा जसा कढ माणसाच्या मनाला येतो तसा भक्तीचा सुद्धां येतो, आणि तो कढ व्यक्त करण्याला अशा अतिशयोक्तीची आवश्यकताच असते. बेताल झालेल्या भावनेचें हें तालबद्ध नर्तनच असतें. तात्पर्य इतकेंच कीं, " A poet never thinks he has said enough, unless he exaggerates." आणि या गोष्टीची जाणीव ठेवूनच रसिक लोक कवींची गय करतात.

तथापि कवीला अर्पण केलेला हा अतिशयोक्तीचा अधिकार पुष्कळदा साधे लोक सुद्धां राबवून घेतात आणि त्यामुळें त्यांची व लोकांची हानि होते. वक्ते, वृत्तपत्रकर्ते यांनीं तर नेहमींच सावध असावयास हवें असतें. त्यांनीं लोकशिक्षणाचें काम पत्करलेलें असतें. आणि शिक्षण म्हटलें म्हणजे त्यांत बुद्धीचा सुनिश्चित व्यापार व्हावयास हवा. तेथें नेमकेपणाच पाहिजे. तारतम्य आणि हिशेब यांना सोडचिठ्ठी देतां उपयोगाची नाहीं. शिक्षक, वक्ता किंवा लेखक हा जर बहकून बोलूं किंवा लिहूं लागला तर तो विद्यार्थ्यांना फसवितो, तो श्रोत्यांची करमणूक करतो आणि वाचकांची केवळ करमणूकच नव्हे तर तो त्यांचें नुकसानहि करतो. या कामीं पुष्कळदा समाजच जास्त शहाणा असतो. कांहीं लोक जरी वाहवत जाणारे असले तरी दुसरे कांहीं निश्चित ओळखतात कीं, यांनीं ताळ सोडलेला आहे आणि मग ऐकतांना किंवा वाचतांना ते टीकाकाराची भूमिका घेतात. याचा अर्थ असा होतो कीं, वक्त्याचें किंवा लेखकाचें महत्त्वमापन चालू होतें आणि ज्ञान देणारा ही त्याची पदवी हिरावून घेण्यांत येतें. म्हणून शिक्षक, वक्ते आणि लेखक यांनीं सावधच असलें पाहिजे. वक्ते व लेखक हे जर का भडकत राहिले, तर त्यांच्या बौद्धिक अधिकाराविषयीं भलतीच कल्पना करून बसलेले श्रोते किंवा वाचक अधिकच भडकून जातात आणि ते अत्याचारालासुद्धां प्रवृत्त होतात. वक्ता किंवा लेखक शब्दांतल्या अतिशयोक्तीपुरता खचीं पडतो, पण गैरसावध श्रोते प्रत्यक्ष आचारांत खचीं पडतात. म्हणून दोघांनींहि थोडासा सावधपणा ठेवलाच पाहिजे.

सार्वजनिक जीवितांत अतिशयोक्तीचा अवलंब झाल्यानें लोकांच्या ज्ञानाच्या पातळीला विनाकारण हेलकावे बसत राहतात, या टोकापासून त्या टोकापर्यंत लोक झोके खात राहतात, तारतम्याच्या मध्यावर त्यांना कधीं थांबतांच येत नाहीं. शेवटीं जेव्हां कोणी एखादा सावधपणानें बोलतो आणि अतिशयोक्तीचीं बिंगें म्हणजे व्यंगें उकलून दाखवितो, तेव्हां समाज भानावर येतो; पण तोंपर्यंत त्या हेलकाव्यांत किंवा झोक्यांत त्याला कित्येक वर्षें गमवावीं लागतात. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनीं असें एक विचित्र विधान केलें कीं, 'मोरोपंत हा कवीच नाहीं.' त्यांच्या मतें मुक्तेश्वर हा मोठा कवि. आतां मुक्तेश्वर हा फार मोठा कवि असेलहि; पण मोरोपंत हा मुळांत कवीच नव्हे, हें म्हणणें अर्थातच टिकण्यासारखें नव्हतें. पुढें विष्णुशास्त्री मोरोपंतांविषयीं लिहूं लागले. ज्यांना अन्याय झाला असेल त्यांची कड घेऊन उठणें हा विष्णुशास्त्र्यांच्या मनाचा मुख्य धर्म होता. मोरोपंतांची बाजू सजवून मांडतां मांडतां त्याला त्यांनीं महाकवीचें लेणें अर्पण केलें. हीहि अर्थात् अतिशयोक्तीच होती. कांहीं वर्षें या मताचा अंमल चालू राहिला आणि प्राध्यापकवर्गांत आतां पुन्हा तें पहिलें एकारलेलें मत चालू झालें आहे कीं, 'मोरोपंत हा कवीच नव्हे!' फार फार झालें तर मोरोपंत हा वाईट कवि होता, असें त्यांनीं म्हणावयास हरकत नाहीं! पण तो कवीच, नव्हता हें म्हणणें अत्यंत ऐकांतिक स्वरूपाचें आहे. या हेलकाव्यामुळें आणि युक्त मर्यादेवर न थांबल्यामुळें लोकांचें फार नुकसान होतें आणि निश्चित मतावर समाज कायम होण्याला कित्येक वर्षांची किंमत द्यावी लागते. संस्कृत विद्येचा अधिक्षेप करतांना लोकहितवादींनीं अशीच अतिशयोक्ति केली. ते म्हणाले, "संस्कृत विद्या म्हणजे भटाभिक्षुकांनीं केलेली वायफळ बडबड होय." याची प्रतिक्रिया विष्णुशास्त्र्यांच्या लेखनांत आणि समाजाच्या भावनेंत इतकी कडक झाली कीं, लोकहितवादींची केवळ अवहेलना झाली आणि त्यांचें चांगलें लिखाणसुद्धां मागें पडलें. शेवटीं तारतम्याचा वापर होऊन संस्कृत विद्येचा महिमा भांडारकरांच्या मुखांतून सिमला येथें कायम झाला. पण इतकें होईपर्यंत कित्येक वर्षें लोटलीं म्हणजे एकंदरीनें समाजाचें नुकसानच झालें. या पिढीला लोकहितवादींच्या लिहिण्यांतील सत्त्वांश तेवढा पत्करण्याची बुद्धि झालेली आहे, हें स्वच्छ दिसून येतें. जोतिबा फुले यांनीं शूद्र समाजाच्या झालेल्या

अवमानाच्या भरांत सरसकट हिंदुधर्माची फार वाईट नालस्ती केली. वास्तविक पाहतां जोतिबांच्या मनाचें उत्थान फार गंभीर होतें आणि कृतिशीलता हें तर त्यांचें मुख्य बळ होतें; पण हें सारें भांडवल वाङ्मयाची मर्यादा सुटल्यानें केवळ वायां गेलें. त्यांचें वाङ्मय युक्त स्वरूपानें अवतरलें असतें तर सुक्षिक्षित समाजाच्या मनावरसुद्धां त्याचा विलक्षण परिणाम झाला असता. युरोपांतील मिल, स्पेन्सर इत्यादिकांचे ग्रंथ अतिशय कडक विचारांनीं भरलेले आहेत. तें कडक तत्त्वज्ञान इकडील सुशिक्षित समाज आपलेंसें मानूं लागला. ज्ञानशील लोक विचाराच्या कडकपणाला भीत नाहींत, पण वाङ्मयाच्या ओंगळपणापासून मात्र खचित दूर राहतात. या दृष्टीनें पाहतां वाङ्मयांत भडकत गेल्यानें जोतिबांचें औदार्य आणि कृतिशीलता यांचा पुरता प्रत्यय येण्याला पाऊणशें वर्षें तरी लोटलीं. न्यायमूर्ति रानडे हे आधुनिक महाराष्ट्रांतील विचारवंतांचे अग्रणी होते व अजून राहिले आहेत. मराठी भाषेचा प्रवेश विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत व्हावा यासाठीं त्यांनीं बरीच खटपट केली; पण प्रार्थनासमाजांत झालेल्या त्यांच्या व्याख्यानाशिवाय त्यांनीं मराठींत फारसें कोठें कांहीं लिहिल्याचें दिसत नाहीं. त्यांचें चिंतन आणि त्यांचा अभ्यास यांचा आविष्कार इंग्रजींतूनच झाला. इकडे इतिहासकार राजवाडे जे निघाले त्यांनीं प्रतिज्ञा केली कीं, 'इंग्रजींतून एक टाकहि ओढणार नाहीं; प्रत्येक अक्षर मराठींतून लिहीन.' त्यांच्या कोणी हितचिंतकांनीं त्यांना म्हटलें कीं, "तुमचे हे उदात्त विचार आणि संशोधनांतून हातीं लागलेलीं हीं प्रमेयें यांचा आविष्कार इंग्रजींतून झाला तर ते आपल्या समाजाच्या हिताचेंच होईल." यावर त्यांनीं उत्तर केलें कीं, "जर या इतर लोकांना माझें म्हणणें समजावून घेण्याची इच्छा असेल तर त्यांनीं मराठी शिकावें." आतां यासाठीं केवळ एकहि इंग्रज माणूस मराठी शिकला असेल असें मला वाटत नाहीं! या कामीं रियासतकार सरदेसाई हे तारतम्यानें वागले असें म्हटलें पाहिजे. त्यांचें बहुतेक लिखाण मराठींत आहे हें खरें; पण अवश्य तेवढें त्यांनीं इंग्रजींतहि लिहिलें आहे. हेंच तारतम्य लोकमान्यांनींहि आपल्या ग्रंथरचनेंत दाखविलें. वेद-वाङ्मयाचें प्राचीनत्व मान्य करावयास पाश्चात्य पंडित भारीच खळखळ करीत. ग्रीक संस्कृतीच्या

सूचना क्रमांक 2226 दि: 1-10-... 9993 नों: दि: ३३-... 2219

उदयाच्या आधीं इतर कोणतेंहि वाङ्मय जन्मास आलेलें नसलें पाहिजे असें ते सिद्ध करूं पाहत. 'ओरायन' पुस्तक लिहून टिळकांनीं त्यांना दाखवून दिलें कीं, वेदवाङ्मयाची रचना इ. स. च्या पूर्वी पांच हजार वर्षांच्या अलीकडची नाहीं. तसेंच आर्य लोक हे मूळचे उत्तर ध्रुवावर राहत असत, हाहि सिद्धान्त त्यांनीं 'आर्क्टिक् होम इन् दि वेदाज्' या ग्रंथांत प्रस्थापित करून दाखविला. हें जर त्यांनीं मराठींत केलें असतें तर त्यांचें पांडित्य साफ वायां गेलें असतें. म्हणून तें त्यांनीं इंग्रजींत लिहिलें. पण कर्मयोगाचा सिद्धान्त महाराष्ट्र जनतेला शिकवावयाचा होता, म्हणून त्यांनीं आपलें 'गीतारहस्य' मराठींत लिहिलें. हीं उदाहरणें देण्याचा हेतु असा कीं, विचारांतसुद्धां ऐकांतिकपणा पत्करला तर शेवटीं नुकसानच होतें. तारतम्यानें मध्यमक्रमावर आलें तर ऊनोक्ति आणि अत्युक्ति या दोनहि दोषांतून मुक्त होतां येतें.

या मध्यमक्रमाचा विचार कै. तात्यासाहेब केळकर यांच्या एका निबंधांत फार चांगल्या रीतीनें झालेला आहे. आत्यंतिक क्रम आणि मध्यमक्रम यांचें नातें कसें असतें, हें त्यांनीं कोष्टक मांडूनच दाखवलें आहे. पण थोडे थोडे फरक करून आपल्याला त्याचा परिच्छेद बनवितां येतो. माणसानें पोचट असणें हें खरोखरीच फार वाईट आहे; पण तिखट किंवा जाज्वल्य असणें हें सुद्धां तितकेंच वाईट आहे. मध्यमक्रम पत्करून माणसानें कांहींसें 'कडक' बनावें हें मात्र व्यवहारांत हिताचें होतें. भित्रेपणा हा फारच मोठा दोष होय, पण जेथें तेथें उडी घेण्यास धावावें हाहि दुसऱ्या टोकाचा दोषच होय. म्हणून हीं दोनहि टोकें चुकवावीं व माणसानें 'धैर्यवान्' बनावें हें मात्र योग्य होईल. चिक्कू किंवा कद्दू बनून राहणें फार वाईट आहे; उलट उधळेपणानें सुद्धां मोठेंच नुकसान होतें. म्हणून यांपैकीं कोणत्याच टोकाला न जातां माणसानें 'उदार' बनावें हें मात्र बरोबर आहे. केवळ हातपाय पांघरून घरांत बसावें हें लाजिरवाणेंच होय; तसेंच उठल्या-सुटल्या प्रत्येक चळवळींत जाऊन धडका देणें हेंहि तितकेंच दोषास्पद आहे, पण माणसानें 'महत्त्वाकांक्षी' बनावें हें मात्र त्याला शोभून दिसतें. दर वेळेला आंत पाय घेणें आणि 'मी कसला' 'मी कसला' म्हणून मागें मागें राहणें हा फार मोठा दोष आहे; पण आपण मोठेच कोणीतरी कर्तबगार गृहस्थ आहोंत अशा

ताळ्यानें वागणें हेंहि तितकेंच वाईट आहे. आणि हाच माणूस जर 'विनयशील' बनला म्हणजे कर्तृत्ववान् असूनहि त्याचा अभिमान बाळगणारा किंवा डांगोरा करणारा नसला तर तें त्याला भूषणास्पद आहे. घुम्या माणूस आणि बडबड्या माणूस हे दोघेहि निंद्यच होत; पण 'मितभाषी' माणूस मात्र लोकांच्या स्तुतीला पात्र होतो. सदा दुर्मुखलेलें असणें हें वाईट आहे; पण तसेंच नेहमीं फिदीफिदी करीत राहणें, साध्या बोलण्यांतसुद्धां हंसत सुटणें किंवा विदुषकी थाट ठेवणें हें सर्वथा उपहास्य असतें; याच्याऐवजीं माणसानें 'विनोदी' असावें हें मात्र चांगलें. हांजी-हांजीखोरपणाचा दोष टाळण्यासाठीं कोणी दर वेळीं भांडतच सुटला किंवा भांडखोरपणाचा दोष टाळण्यासाठीं कोणी हांजी हांजी करूं लागला तर दोनहि वेळां त्याचें हंसेंच होईल; तो जर प्रसंगावधान ठेवून 'यथान्याय' वागला तर कोणीहि त्याची वाहवाच करील. माणसानें चंचल किंवा थिल्लर असणें हें फार वाईट आहे; पण दर वेळीं आपल्याच मताचा आग्रह धरून हेकट बनणें तितकेंच वाईट आहे; पण तर्कपूत निष्ठा बाळगणें हें मात्र खरोखर अवश्य आहे. उपवासी जसा वाईट तसा खादाडहि वाईट; 'मितहारी' मात्र निःसंशयच चांगला.

या सर्वांचा अर्थ असा कीं, ऐकांतिक बनून, या नाहीं तर त्या टोकाकडे जाणें आणि ऊनोक्तीचा किंवा अत्युक्तीचा आश्रय करणें हें सर्वथा अहितकारक बनतें. अर्थात् ऊनोक्ति आणि अत्युक्ति सोडली असतां योग्य प्रमाणाची उक्ति कोणती ठरते, हें ठरविण्याचेंहि तारतम्य माणसाच्या अंगीं हवें, हें मात्र खरें! तेंहि ज्याच्या अंगीं नसेल त्याला वरील लिहिण्याचा कसलाहि उपयोग होणार नाही!

---

४ : : भूतदयेची आवश्यकताच उरूं नये

मुख्यतः रशियांत घडलेल्या आणि एकंदरीनें साऱ्या जगांत घडून येत असलेल्या क्रान्तीचें एक मर्म आपण नीटपणें लक्षांत घेतलें पाहिजे. ही क्रान्ति म्हणजे एक संकट आहे, हा एक भाजाकार आहे, ही एक नसती उलथापालथ आहे, असें अनेक लोकांना वाटतें. आणि याचें कारण तरी एवढेंच कीं, या क्रान्तीचे जे कारक आणि उपासक आहेत, त्यांनीं त्या क्रान्तीसाठीं योजलेलीं साधनें आणि तिच्या प्रसारासाठीं उपयोगांत आणलेलीं उपकरणें हीं पुष्कळ अंशीं घातक स्वरूपाचीं होतीं व असतात. शिवाय हें क्रान्तीचें वैभव शाश्वत राहावें म्हणून तिच्या पुरस्कर्त्यांनीं कांहीं माणसांचा एक कट केल्यासारखा दिसतो आणि ते दुसऱ्याच्या स्वातंत्र्याचा अपहार करतात. या पार्टीतील लोक म्हणतील तेंच बरोबर असा त्यांचा दावा असतो आणि जमेल तेथें तशी त्यांची सक्तीहि असते. त्यांच्या अंमलांत मतस्वातंत्र्याला जागा नसते आणि समत्वाचा महिमा त्यांच्या अंमलाच्या आंचेनें पुष्कळदा होरपळूं लागतो. तसेंच ज्या बाबतींत इतरांच्यापेक्षां जास्त कळण्याची कसलीहि शक्यता यांच्या ठिकाणीं नसते तेथेंहि आपलेंच ज्ञान लोकांनीं पत्करलें पाहिजे, अशी त्यांची सक्ती असते. धर्मानें आर्थिक जीवनावर जर आक्रमण केलें आणि सांपत्तिक विषमतेला साहाय्य केलें, तर तेवढ्यापुरतें त्यांनीं धर्माला डावलावें हें बरोबर आहे; पण धर्माच्या इंद्रियातीत अधिकारासंबंधानें ते ज्या अवहेलनेनें बोलतात ती त्यांच्या मुखांत शोभण्यासारखी नसते. अध्यात्म हा एक स्वतंत्र विषय आहे. या विषयांत मार्क्स, लेनिन किंवा स्टालिन यांची विशेष गति झालेली होती, असें क्रांतीच्या अभिमान्यांनासुद्धां म्हणतां येणार नाहीं आणि तरीहि धर्माच्या आध्यात्मिक बाजूची अवहेलना ते करतातच. या विविध कारणांमुळें या नव्या क्रांतीचें सोज्ज्वळ स्वरूप पुष्कळदा मलिन आणि म्हणून अप्रिय बनतें.

क्रांतीचें खरें सोज्ज्वळ स्वरूप

ही क्रांति जर खरी खरी यशस्वी व्हावयाची असली तर तिचा स्वीकार केलेल्यांनीं तिच्यांतील हे दोष काढून टाकले पाहिजेत. 'वचनात् प्रवृत्तिः,

वचनात् निवृत्तिः ' हा सनातनी धार्मिकांचा न्याय, क्रांतिवाद्यांच्या मुखांतहि स्थिर व्हावा यांचें नवल वाटतें. त्यांनीं आपल्या गुरूला सुद्धां छेडलेंच पाहिजे. त्याच्या प्रतिपादनांत शिरलेले दोष झाडून टाकण्याची उमेद यांनीं दाखविली पाहिजे. असें झालें म्हणजे या क्रांतीसंबंधानें लोकांच्या मनांत जी एक अढी बसलेली दिसते ती नाहींशी होईल आणि ही क्रांति म्हणजे एक मोडें गंडांतर किंवा कचाट आपल्या अंगावर चालून येत आहे या भयांतून लोकांचीं मनें मुक्त होतील. हें घडून येईपर्यंत या क्रांतीचें जें खरें सोज्ज्वळ स्वरूप आहे, तें आपण नीट समजून घेतलें पाहिजे.

गुणांची सामाजिक प्रगति झाली नाहीं

किती युगें झालीं हें सांगतां येत नाहीं पण भूतदया आणि परोपकारबुद्धि याचा महिमा सर्वच धर्मांनीं अखंड गायिलेला आहे. किंबहुना धर्मांचें जें लौकिक आसन आहे, तें याच पायावर स्थिर झालेलें आहे. इतकेंच नव्हे तर या आसनावर ज्या लोकांची बैठक चांगली बसलेली आहे त्यांची पारलौकिक प्रगतीसुद्धां फार त्वरेनें होते असें सर्व धर्म सांगतात. ' पुण्य उपकार । पाप परपीडा ' हें सूत्र ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. पुण्य, पुण्य म्हणजे काय ? तर उपकार करणें हेंच पुण्य, असें धर्मग्रंथांतील वचनांना अनुसरून संतांनीं सुद्धां म्हटलें आहे. भूतदयेचें असेंच आहे. या दयेचा महिमा आपल्या काय किंवा इतरांच्या काय, धर्मग्रंथांत सारखा दुमदूमून राहिलेला असतो आणि या भूतदयेच्या पोटींच परोपकारबुद्धि जन्माला येते. पण घडून आलें आहे तें हें कीं युगानुयुगें या गुणांचा महिमा लोकांच्या कानाशीं झडत असतांनासुद्धां या गुणांची सामाजिक प्रगति व्हावी तितकी झाली आहे, असें बिलकुल म्हणतां येत नाहीं. भूतदया असावी ही शिफारस आहे, परोपकारबुद्धि असावी ही विनंती आहे आणि ही जर असली तर अंगीं साधुत्व येण्यास आणि मग परमेश्वराची प्राप्ति होण्यास उशीर लागत नाहीं, असें गंभीर आश्वासन अथवा लालूच सुद्धां आहे. या गुणांचा सामाजिक प्रसार अगदीं बेताचा झालेला दिसतो.

हाल आणि विपत्ति कायमच

खरें म्हटलें म्हणजे भूतदया वाटण्याचा प्रसंगच येऊं नये आणि परोपकार-बुद्धीच्या वापराला जागाच असूं नये. पण माणसांच्या मनाचा बनाव आणि

समाजाची रचना अशी झालेली असते कीं, भूतदया आणि परोपकारबुद्धि यांच्या आविष्काराला जागा आपोआपच उत्पन्न होते. जर एखाद्याला संकटच उत्पन्न झालें, एखादा रोगी असला, मनानें कमकुवत असला, तर दुसऱ्या एखाद्याला आपोआप वाईट वाटतें; ही त्या दुसऱ्याची भूतदया होय. कोणी विशेष ठिकाणीं जन्माला आलेला असला, क्षुद्र धंदा केल्यानें जर कोणाचा प्रपंच चालत नसला, किंवा कदाचित् त्याचें पोटहि भरत नसलें तर आपल्यापाशीं असलेलें जास्त-सगळेंच्या सगळें नव्हे, पण त्यांतलें थोडेंसें का होईना-त्याला द्यावें असें दुसऱ्या एखाद्याला वाटतें आणि ही त्या दुसऱ्याची परोपकारबुद्धि होय.

पण ही भूतदया आणि परोपकारबुद्धि दरठिकाणीं आणि प्रत्येक प्रसंगीं उत्पन्न होईलच असें निश्चयानें म्हणवत नाहीं. ही गोष्ट सहजासहजीं होणारी नव्हे. ती उत्पन्न होईल किंवा न होईल. जेव्हां या दोन्ही गुणांचा आविष्कार होतो, त्यांचा महिमा सर्वत्र गाजतो, तेव्हां उपकारानें भारावलेलीं माणसें त्यांचें टाळ्या पिटून स्तवन करतात. पण ज्या ज्या वेळीं आणि ठिकाणीं या गुणांच्या प्रसराची आवश्यकता असते, त्या वेळीं आणि ठिकाणीं त्यांचा आविष्कार होतोच होतो असें मुळींच म्हणतां यावयाचें नाहीं. हा अविष्कार केवळ प्रसंगविशेषीं होतो, तो थोडा वेळ टिकतो आणि त्याचा फायदा फार थोड्या लोकांना मिळतो, असेंच म्हटलें पाहिजे. कारण सृष्टीच्या योजनेप्रमाणें भूतदया दाखविणारीं आणि परोपकार करणारीं अमुक इतकीं माणसें जन्माला आलींच पाहिजेत आणि त्यांच्याद्वारा दुःखितांचे पांग फिटलेच पाहिजेत, असें ठरल्यासारखें दिसत नाहीं. सृष्टीच्या लहरींत या गुणांनीं मंडित असलेलीं माणसें जन्माला येतील किंवा न येतील आणि त्यांच्या अंगचे ते गुण टिकून राहतील किंवा न राहतील; यामुळें जगांतील हाल आणि विपत्ति यांचें ठाण मोडतच नाहीं.

जीवनाची घडणच बदलली पाहिजे

याचा अर्थ असा कीं, भूतदया आणि परोपकारबुद्धि हा कांहीं सामाजिक आपत्ति निवारणाचा व्यापक आणि टिकाऊ उपाय नव्हे. या निवारणाला दुसरा कांहीं इलाज शोधला पाहिजे. आणि हें शोधण्याचें काम या क्रांतीच्या

तत्त्वज्ञानानें केलेलें आहे. हें ज्ञान जर योग्य त्या पद्धतीनें समाजाच्या प्रकृतींत भिनलें तर भूतदया आणि परोपकारबुद्धि यांची फारशी मातब्बरीच राहणार नाहीं आणि ती न राहावी हेंच बरोबर आहे. आपण कोणाच्या तरी दयेला पात्र व्हावें, लोकांनीं आपली कींव करावी किंवा आपण लोकांपुढें पदर पसरावा आणि उपकाराचें म्हणून त्यांनीं त्यांत कांहीं टाकलें तर आपण त्याला दुवा देत उभें राहावें ही भूमिका खरोखर अवमानाचीच होय. यानें माणूस भिंधें बनतें आणि त्याच्या मनाची स्वतंत्र उभारी मोडावते. या केवळ कुबड्या होत. हे बसविलेले लांकडी पाय आहेत. यांची आवश्यकताच उरतां कामा नये. नव्या क्रान्तीचा नैतिक दावा आहे तो हा कीं, मानवी जीवनाची घडण अशी व्हावी कीं, भूतदया आणि परोपकारबुद्धि यांची आवश्यकताच उरूं नये.

या ज्ञानानें असा इलाज सुचवला आहे कीं, जर प्रत्येकाला खायला हवें, ल्यायला हवें म्हणजे जर प्रत्येकाला अन्नवस्त्र हवें आणि त्याच्या डोईवर अढेंहि हवें तर प्रत्येकानें काम केलें पाहिजे. कांहीं माणसें सारखें काम करीत असतात आणि कांहीं माणसें नुसतींच बसून खातात. यामुळें पुरेसें अन्नवस्त्र उत्पन्न होत नाहीं; जर सर्वांनीं म्हणजे पुरुषांनीं आणि स्त्रियांनीं काम करावयाचें ठरविलें व धनाची वांटणी यथाप्रमाणें केली तर अन्नवस्त्राची पैदास बाटेल तेवढी होईल आणि मग भीक मागण्याची आणि भीक घालण्याची आवश्यकताच उरणार नाहीं, असें हें नांव ज्ञान सांगतें. ज्यानें त्यानें आपआपल्या मगदुराप्रमाणें सक्त मेहनत केली पाहिजे; असें झालें म्हणजे त्याला दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहण्याची जरूरच उरणार नाहीं. म्हणजे, सगळ्यांच्या श्रमाचें फळ सारखेंच असेल असें नव्हे, पण कोणाच्याहि श्रमाचें किमान फळ इतकें असेल कीं, त्याला अन्नवस्त्राला तोटा पडूं नये. आणि एवढें झालें तरी मानवी जीवन बहुंशीं सुखी झालें असें म्हणतां येईल.

सर्वांनीं कष्ट करण्याचा इलाज

रशियानें हा प्रयोग करून पाहिलेला आहे, चीन देश हा प्रयोग करीत आहे आणि तत्त्वज्ञानाची एवढीच बाजू पाहिली तर खऱ्या खऱ्या लोकशाही राष्ट्रांतहि हें तत्त्वज्ञान व्यवहारांत उतराविण्याची तरतूद सर्वत्र होत आहे.

खरीं खरीं लोकशाही राष्ट्रेंसुद्धां, आपल्या देशांत अमुक इतके लोक बेकार आहेत आणि ते बेकार आहेत तर शिधा देऊन सरकारनें त्यांना पोसलें पाहिजे, हा न्याय उघडपणानें पत्करून बसलेलीं आहेत. याचाहि अर्थ हाच होतो कीं, सर्वांनीं काम केलें पाहिजे आणि राष्ट्राच्या सामुदायिक संपत्तींत आपापली भर घातली पाहिजे, हा न्याय त्यांनीं परोक्ष रीत्या मान्य केला आहे. याच न्यायाचा प्रसार जों जों सर्व देशांत होत जाईल तों तों भूतदया आणि परोपकारबुद्धि यांच्या अविष्काराला सध्यां मिळत असलेलें क्षेत्र आकुंचन पावूं लागेल; आणि एकंदरीनें जग एका टिकाऊ उपायापर्यंत येऊन पोंचलें असें ठरेल. मागें सांगितलेंच आहे कीं, भूतदया आणि परोपकारबुद्धि हीं आवश्यक त्या त्या ठिकाणीं आणि अवश्य त्या त्या वेळीं अवतरतीलच असें नाहीं. या गुणांनीं मंडित असलेले लोक सृष्टि अवश्य जन्माला घालते, असें मुळींच म्हणतां यावयाचें नाहीं. म्हणून या गुणांचा प्रसर हा कांहीं व्यापक आणि टिकाऊ उपाय नव्हे; पण आतां सांगितलेला सर्वांनींच कष्ट करण्याचा इलाज हा मात्र टिकाऊ स्वरूपाचा आहे. भिंधेपणा व लाचारी नाहींशी करून लोकांना स्वाभिमानी बनवील, अशाहि कुवतीचा तो आहे.

कम्युनिस्टांची जबरदस्त कैची

मात्र या नव्या इलाजाचा पुरस्कार जीं कम्युनिस्ट राष्ट्रें करीत आहेत, त्यांच्या कारभारांत एक मोठेंच वैगुण्य राहून जात आहे. या तत्त्वज्ञानाची अंमलबजावणी करणारे आमच्या देशांत आम्ही अमुक इतके लोक आहोंत, अमुक इतक्या लोकांचा आमचा हा एक स्वतंत्र पक्ष आहे, तमाम लोकांना सुखी करण्याचा पत्कर या पक्षानें घेतला आहे आणि म्हणून या पक्षाच्या विरुद्ध आम्ही कोणाला ब्रहि बोलूं देणार नाहीं, कोणी बोलला तर आम्ही त्याचा निःपात करूं, अशी कार्याची पद्धति या पक्षानें घातलेली असते. आणि गेल्या कांहीं वर्षांच्या इतिहासावरून असें चक्र दिसून येतें कीं, त्या त्या कम्युनिस्ट देशांतील हा पक्ष उदात्त हेतूनें प्रेरित झाला असला तरी त्यानें उभी केलेली कैची माणसाचें मतस्वातंत्र्य आणि विचारस्वातंत्र्य हिरावूनच घेते. सुखोत्पत्ति करून दिल्याचा हा मोबदला लोकांना जास्त तापदायक वाटतो. शिवाय या पक्षांतील एकूण एक लोक सारखेच स्वार्थत्यागी आणि

सच्चे असतात असें गृहीत धरून चालणेंसुद्धां चूकच आहे. देशांतील आणि राज्यकारभारांतील सगळीं नाक्याचीं ठिकाणें याच लोकांच्या हातीं राहतात आणि हे लोक सत्याचे आणि न्यायाचे मोठेच उपासक आहेत असें गृहीत धरण्यांत येतें. रशियांत अलीकडे श्रेष्ठपदस्थ लोकांच्या भराभर होणाऱ्या पदच्युतीकडे लक्ष दिलें म्हणजे ही गोष्ट आपल्या ध्यानांत येते कीं, ही गृहीत धरलेली गोष्ट अगदीं चूक आहे.

छापापद्धति व पक्षपद्धति

आधुनिक काळाचा एक श्रेष्ठ संदेश हा आहे कीं, देशांतील सर्वच माणसांच्या गुणोत्कर्षाला संधि असावी आणि विकसित झालेल्या गुणांच्या वापरालाहि संधि असावी. पण कम्युनिस्ट राष्ट्रांच्या कार्यपद्धतीवरून असें दिसतें कीं, हा नव्या काळाचा संदेश, राज्यकारभार लक्षांत घेतां त्यांच्या पक्षांतील लोकांच्याच उपयोगी पडतो. याचाहि अर्थ हाच होतो कीं, गुण आणि शक्ति यांचें क्षेत्र हीं राष्ट्रें आपणहून आकुंचित करून घेतात. हा पक्ष आपली संघटना बनवून समाजावर छापा घालतो; तो त्याच्या बऱ्यासाठीं हें करतो हें मान्यच केलें पाहिजे; पण ही छाप्याची पद्धति तो अवलंबितो हें खोटें नाहीं. यानें समाजांत गैरविश्वास उत्पन्न होतो, अखिल समाजाची कारभाराच्या रूपानें सेवा करण्याची शक्ति वापरावांचून वायां जाते आणि भाषणस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य हें गेल्यामुळें पुन्हा तेथें नव्या गुलामगिरीचा अवतार होतो. उलटपक्षीं सर्वांनीं काम केलें पाहिजे, आणि राष्ट्राचें सामुदायिक धन वाटेल तितकें वाढवून त्याची वांटणी अशी करावी कीं, देशांत कोणीहि गरीब राहूं नये, कोणीहि भुकिस्त उरूं नये, कोणाला कोणच्याहि गुणाची वाढ व वापर मोकळेपणानें करतां यावा व अवघा देश हा सर्वांचा मिळून आहे, ही वासना लोकांच्या मनांत दृढ व्हावी, असें प्रतिपादन अखंड करीत राहिलें तर लोकांना खरें शिक्षण मिळेल आणि तेथें छापापद्धति व पक्षपद्धति यांची आवश्यकता उरणार नाहीं. छापा-पद्धति व पक्ष-पद्धति यांनीं सुद्धां शेवटीं भूतदयेची आणि परोपकाराचीच कल्पना प्रस्थापित होते. कारण ती मनांत धरूनच छापा आणि पक्ष हे उत्पन्न झालेले असतात आणि भूतदया आणि परोपकार हीं नाहींशीं करावींत म्हणून तर या तत्त्वज्ञानाचा अवतार

आहे. यासाठीं असें वाटतें कीं, हा विचार देशांतील सर्व लोकांच्या प्रकृतींतच भिनविला पाहिजे. म्हणजे प्रत्येक राष्ट्र-व्यक्ति-व्यक्तीच्या प्रकृतीसह खरें खरें समर्थ व सुखी होईल, भिंधेपणा व लाचारी हीं नष्ट होतील, कोणी लोकांच्या भूतदयेचा विषय होणार नाहींत आणि कोणीहि लोकांपुढें पदर पसरणार नाहींत.

देशांच्या संकुचित चतुःसीमा

पण याहि ठिकाणीं एक गोष्ट ध्यानांत ठेवली पाहिजे कीं, हें ध्येय जरी व्यवहारांत उतरलें, सर्वांना सारखी संधि मिळाली, सर्वांनी कष्ट केले आणि धनाची वांटणी न्याय्य पद्धतीनें केली, तरी कोणत्याहि देशाला आपल्या चतुःसीमा बदलतां येत नाहींत. लोक कष्ट करतीलहि पण ते त्यांना चतुः-सीमांच्या आंतच करावे लागतील. त्या सीमा ठरलेल्या आहेत आणि प्रजा तर वाढतच असतात. तेव्हां प्रजा तरी खची करावयास हव्यात नाहीं तर सीमा तरी वाढवावयास हव्यात, असें त्रांगडें उत्पन्न होतें. कारण सर्वांनीं कष्ट करा-वयाचें म्हटलें तरी ते करण्याला संकुचित चतुःसीमांमुळें जागाच उरत नाहीं. या नवीन तत्त्वज्ञानाच्या प्रसारांत ही एक मोठीच आडकाठी आहे. रशियाचा आकारच एवढा अवाढव्य आहे कीं, कष्टाला जागा अपुरी पडत आहे असें आणखी दोनशें वर्षें तरी त्याला वाटूं लागणार नाहीं-हें विस्ताराचें देणें ज्या देशांच्या वांट्याला आलेलें नाहीं त्यांना कष्टाचें तत्त्वज्ञान पत्करून सुद्धां सर्वांना सुखी करतां येईलच असें म्हणवत नाहीं. पण तो या निबंधाचा विषय नव्हे.

---

५ : : बायकांचा दुःस्वास

धर्मसंस्थेनें बायकांशीं एवढें वैर कां धरलेलें असावें, कांहीं कळत नाहीं. तडीतापसी, संन्यासी, मोक्षमार्गी, धर्मोपदेशक, संतमहंत, मठपति व कांहीं कांहीं धर्मसंस्थापक या सर्वांचें बायकांशीं मोठें वैर दिसतें! 'वैर' शब्द कांहींशा मोजक्या अर्थानेंच पत्करावयास हवा. हे सारे लोक मनांतून बायकांचा दुःस्वासच करतांना दिसतात. आणि जेव्हां ते त्यांचा अव्हेर करीत नाहींत, तेव्हां त्यांचा नाइलाज झालेला असतो असें दिसतें. त्यांच्यापैकीं अनेकांचा असा दावा असतो कीं, स्त्री ही मोक्षमार्गाच्या आड येते; व दुसरे कोणी समजतात कीं, स्त्रियांच्या संगतींत सद्विचारांची एकाग्रता ढळते. या लोकांच्या मनाची ही ठेवण अमुकच देशांत दिसून येते असें नाहीं. बहुधा सर्व धर्मांत, सर्व पंथांत आणि देशांत याच कल्पनेचा प्रादुर्भाव झालेला दिसतो कीं, धर्माच्या बाबतींत स्त्रियांपासून अलिप्त असावें. समाजांत स्त्रियांची योग्यता अजूनहि कमीच राहिलेली आहे यांचीं जीं कोणतीं मूळ कारणें असतील त्यांत धार्मिकांनीं केलेला स्त्रियांचा दुःस्वास हें मोठें प्रबल कारण म्हटलें पाहिजे. स्त्रियांवांचून सत, ना गत हें सर्वांनाच कळून चुकलेलें होतें; पण त्यांचें साहचर्य ही एक नाइलाजानें पत्करलेली गोष्ट, असें ते मानीत. बायकांवांचून चाललें असतें तर त्यांना आनंदच झाला असता; पण कोणत्याहि देशांत आणि कोणत्याहि धर्मांत हें वरदान या धार्मिकांना मिळालें नाहीं. आणि म्हणून अंग चोरीत, चडफडत, नाखुषीनें हे स्त्रियांचें साहचर्य खपवून घेतांना दिसतांत! लग्न करूनहि प्रपंचाचा धबडगा चालविणें, पोराबाळांचे कष्ट उपसणें, एवढ्याच कामांत त्यांनीं स्त्रियांचा उपयोग करून घेतलेला दिसतो. जमलें असतें तर ते ब्रह्मचारीहि राहिले असते; पण यत्न करकरून वर सांगितलेल्या मंडळींना शेवटीं दिसून आलें कीं, आपण आरंभिलेलें हें स्त्रियांचें वैर सोडलें पाहिजे.

या मानसिक झगड्याचा इतिहास खरोखरच पाहण्यासारखा आहे. एक मानवप्राणी म्हणून, प्रपंचांत स्त्रीला प्राप्त होणारें सामाजिक वैभव मनांत भरलें म्हणून, तसेंच आधुनिक कालांत तिच्या बुद्धिमत्तेची साक्ष पटली म्हणून, स्त्री आपल्या बरोबरीचीच आहे हें पुरुषवर्गानें मान्य केलेलेंच आहे; तरी धार्मिकांच्या मनांतील गूढ दुःस्वास अजूनहि कायमच आहे ! या कल्पनेचा जुन्या काळांतील इतिहास वाचकांना मनोरंजक वाटेल असें वाटतें. त्यांना हिंदुधर्माची आणि समाजाची माहिती आहेच आहे. आणि मुसलमानी धर्म व समाज यासंबंधानें बोलणें सध्यां इष्ट नाहीं. म्हणून बाकीच्या कांहीं समाजांतील धार्मिकांच्या मनांतील स्त्रीविषयक अढीचा झगडा येथें थोडक्यांत देतों.

अगदीं रानटी जातींतसुद्धां धार्मिकांनीं ब्रह्मचारी राहिलें पाहिजे, ही कल्पना सार्वत्रिकच होती. नवलाची गोष्ट ही कीं, धार्मिक हे स्वतःच तसें मानीत होते असें नव्हे, तर प्रापंचिकहि असें समजत कीं, धार्मिकांच्या ठिकाणीं ब्रह्मचर्यपालन हें आवश्यक आहे. या दोहोंचा काय संबंध आहे, हें कोणींहि तात्त्विक दृष्ट्या समजावून दिलेलें नाहीं आणि या कामीं फसगत होत आहे, हेंहि समाज कित्येक वर्षें पहात होता. शेवटीं होतां होतां आतां ब्रह्मचर्याचा महिमा आणि स्त्रियांचा दुःस्वास या दोहोंनाहि ओहोटी लागलेली दिसते.

कोलंबसानें अमेरिकेचा शोध लावला आणि मग तेथील लोकांना धर्माची कल्पना आली असें पुष्कळ लोक समजतात; पण हें खरें नाहीं. अगदीं रानटी लोकांतसुद्धां धर्माची कल्पना उद्भवलेली असते. अमेरिकेंतील तेव्हांचे रानटी लोक असें समजत कीं, आपल्यांतील जे धार्मिक आहेत व मांत्रिक आहेत त्यांनीं ब्रह्मचारीच राहिलें पाहिजे, ते ब्रह्मचारी राहिले तरच त्यांच्या अंगीं सामर्थ्य येतें. अजूनहि यांतील कित्येक जमाती असें समजतांत कीं, रोग जर बरा व्हावयास हवा असला तर त्यावर औषध देणारा वैद्य हासुद्धां ब्रह्मचारीच असला पाहिजे. जुने इतिहासकार सांगतात कीं, ॲझेटेक लोकांतील कांहीं उपाध्याय, ब्रह्मचर्यपालन नीट जमेना म्हणून आपलीं लिंगें छाटून टाकीत असत. स्त्रियांनीं जर धर्माचें व्रत घेतलें तर

त्यांनाहि कुमारिका रहावें लागत असे. पेरू देशांत सूर्यपूजक कुमारिकांचा एक मठ होता. या कुमारिकांवर समाजाची सक्त नजर असे. जर का एखादी कुमारिका आपल्या ब्रह्मचर्याच्या व्रतापासून ढळली तर आतां धर्माची हानि होईल म्हणून भयग्रस्त झालेले लोक त्या कुमारिकेला जमिनींत गाडून टाकीत ! उत्तर-अमेरिकेंत हडसन नांवाची एक नदी आहे. या नदीच्या कांठीं अल्गोन्विन या नांवाची एक जमात रहात असे. या जमातींतील वैद्यांचा ब्रह्मचर्यावरचा कटाक्ष केवळ दारुणच होता ! ते स्वतः तर लग्न करीत नसतच, पण विवाहित स्त्रीच्या हातचें अन्नदेखील त्यांना चालत नसे. रिओनिग्रो या नदीवरील जमात आपल्यांतील मांत्रिकहि ब्रह्मचर्यव्रताचें पालन कसोशीनें करतात ना, यावर करडी नजर ठेवीत असे आणि यांतील जे कोणी औषधें देत, त्यांच्या औषधाचा जर गुण आला नाहीं तर त्या वैद्यांनीं आपलें व्रत मोडलेलें असलें पाहिजे, असा आरोप त्याच्यावर जमातींतील लोक करीत.

पातिमोख्ख या बौद्ध मठ-संघटनेचे कांहीं नियम होते. या नियमांचा भंग करणारांना पंथांतून हांकून देत असत. या नियमांना 'पाराणिक' हें नांव दिलेलें होतें. पाराणिक नियम म्हणजे ज्या कृत्यांमुळें धर्मबुद्धीचा पराजय होतो, त्या कृत्यांविषयींचे नियम. यांतील एक नियम असा होता कीं, 'जो भिख्खु आत्मोन्नतीसाठीं संघांत प्रविष्ट झाला, पण शिक्षण संपविण्याच्या आधींच, किंवा संघ-नियमांच्या पालनाला आपण अपात्र आहोंत असें प्रांजलपणें न सांगतां, माणसांपासून जनावरांपर्यंत कोणत्याहि लिंगाचें ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न करतो, तो बहिष्कृत ठरेल.'

बौद्ध संघांत ब्रह्मचर्याचें पालन नीट व्हावें व कोणाच्याहि हातून अपवित्र वर्तन होऊं नये म्हणून संघचालकांनीं केलेली तरतूदहि पाहण्यासारखी आहे. कोणाहि भिख्खूनें आसपास कोठें स्त्री उपस्थित असेल तेथें निजतां कामा नये. कोणीतरी वडीलधारें माणूस जवळ असल्याशिवाय, कोणाहि स्त्रीला भिख्खूनें धर्मतत्त्वाचें प्रतिपादन पांच किंवा त्यांहून अधिक शब्दांनीं करतां कामा नये. श्रेष्ठ चालकांकडून अनुज्ञा झाल्याशिवाय कोणाहि संघ-भगिनीला भिख्खूनें उपदेश करतां कामा नये. स्त्रीच्या

संगतींत त्यानें एकट्यानें प्रवास करणें अप्रशस्त मानलें पाहिजे. भिक्षा मागतांना भिख्खूनें योग्य वस्त्रें परिधान केलीं पाहिजेत व मान खालीं घालूनच त्यानें भिक्षा मागितली पाहिजे. कोणाहि संघ-भागिनीकडून किंवा इतर स्त्रीकडून विशेषच कारण असल्याशिवाय त्यानें वस्त्रप्रावरण स्वीकारूं नये. 'एकांतीं लोकांतीं स्त्रियांशीं भाषण, करूं नये जाण,' हें व्रतहि भिख्खूनें नीट पाळावें. हे नियम अतिशय कडक होते. बरें, संघांत कोणी स्त्रियाच नसत्या तर मग या नियमांचा कडकपणा जेथल्या तेथें गुदमरून राहिला असता. पण संघांत स्त्रियाहि असत. अर्थातच या नियमांचें पालन भिख्खू मंडळींना किती अवघड बनत असेल, याची कल्पना सहज करतां येण्यासारखी आहे. मात्र या नियमांचा काच होऊं लागला तर संघांतून बाहेर पडून झळझळीत प्रापंचिक बनावें, या मार्गाचा अवलंबहि कांहीं भिख्खू करीत.

तिबेटांत धर्माच्या बाबतींत सुधारणेचें गाडें कोठपर्यंत आलें आहे हें कळावयास तेथील बर्फाचा पडदा वितळणें आवश्यक आहे; पण त्यांच्या पंथांतील इतिहासाची माहिती लक्षांत घेण्यासारखी आहे. जेलुग या नांवाचा लामांचा एक बौद्ध पंथ आहे. ही लामा मंडळी डोक्यावर पिवळ्या टोप्या घालतात आणि ब्रह्मचर्यपालन अत्यंत आवश्यक मानतात. मठपति, मग ते मोठ्या मठाचे पति असोत किंवा चिमुकल्या मठाचे पति असोत; त्यांना ब्रह्मचर्य हें आवश्यक असतें. तथापि या कामीं नियमांचा काच अनेक पंथवाल्यांनीं कांहींसा ढिला करून ठेवलेला आहे. लामांमध्यें शाक्य पंथाचे जे उच्च म्हणविणारे महंत असतात, त्यांचें ब्रह्मचर्यपालन बहुधा अगदींच ढिलें असतें. मंगोलियाचा लामा तर मोठाच जनाना संभाळून असतो. भिख्खूंनीं ब्रह्मचर्य पाळावें, या नियमांचा बोज कागदोपत्रीं सर्वच ठेवतात; परंतु या लामा मंडळींना ब्रह्मचर्याचा जाच असह्य होऊन त्यांच्यापैकीं कित्येक दार्जिलिंग येथें निघून आले आणि त्यांची तेथें एक वसाहतच झाली असें सांगतात. त्यांनीं आपण होऊन लामापण सोडून दिलें आणि आपल्या प्रियकर स्त्रियांना घेऊन अथवा तें न साधल्यास एकटेच ते दार्जिलिंगकडे आले व मोलमजुरी करून राहूं लागले. तथापि चुकार लोकांनीं जरी असें केलें असलें तरी धर्ममठांत ब्रह्मचर्याचा महिमा अजूनहि

कांयमच आहे. तिबेटी लोकांतील कर्मकांड चालविणारा भिख्खू हा ब्रह्मचारीच असावा लागतो. तिबेटांत भिख्खुणी असतात, पण कुंवारपणा-पासूनच भिख्खुणी बनलेल्या स्त्रिया फार थोड्या. वैधव्य प्राप्त झालें म्हणजे पुष्कळ स्त्रिया मठवासिनी होतात. एक इतिहासकार तर असें सांगतो कीं, तिबेटांतील वयांत आलेल्या पुरुषांपैकीं जवळजवळ एकतृतीयांश पुरुष ब्रह्मचारी राहतात व त्यामुळें तिबेटी लोकांची संख्या घटत आहे व समाजाची वाढ खुंटत आहे. या इतिहासकाराची ही माहिती कितपत बरोबर आहे, हें तपासून पहावयास लागणारी मोकळीक संशोधकांना आतां खास मिळण्यासारखी आहे असें वाटतें.

चीनमध्यें पितृपूजा मूळ धरून राहिलेली होती. अर्थात् वंशसातत्य टिकवून धरणें प्राप्तच होतें व म्हणून ब्रह्मचर्याचा महिमा मूळ समाजांत फारसा राहिला नाहीं. पण बुद्ध धर्म आणि तावो धर्म यांतून ब्रह्मचर्याचा शिरकाव याहि समाजांत झाला. बुद्ध धर्माचा प्रसार होऊं लागतांच कित्येक चिनी गृहस्थांनींसुद्धां संन्यासवृत्ति पत्करली. असो. विधुरांच्या पुनर्विवाहाला आडकाठी नव्हती, तरी पुनर्विवाह न करणारांकडे लोक आदरानेंच पहात. पुनर्विवाह न करणारी विधवा तर मोठाच मान पावत असे. आणि वाङ्-निश्चय झाल्यावर पण प्रत्यक्ष विवाह होण्याच्या आधीं एखाद्या वधूचा वर वारला आणि जर ती वाग्दत्त वधू त्या वराच्या घरीं त्याची पत्नी म्हणून जन्मभर अविवाहित राहिली, तर तिला केवळ देवतात्वच अर्पण करण्यांत येई.

खिस्ती धर्मांतहि प्राचीन काळीं ब्रह्मचर्याचें बंड फार होतें. येशूच्या अनुयायांच्या 'सन्स ऑफ रिसरेक्शन' आणि 'सन्स ऑफ दि वर्ल्ड' अशा दोन जाती कल्पिल्या होत्या. यांपैकीं पहिल्या गटांतील खिस्तानुयायी लग्नें करीत नाहींत. सेंट पॉल हा तर व्यभिचार टाळण्याचें एक साधन म्हणूनच विवाहसंस्थेला मान्यता देतांना दिसतो. त्याच्या मताप्रमाणें वैवाहिक संभोगांत अपवित्र किंवा माणुसकीला न शोभणारें असें कांहीं आहे असें नव्हे; तर विवाह केला म्हणजे माणसाच्या मागें जें प्रापंचिक टुमणें लागतें, तें मुक्तीच्या आड येतें आणि मोक्ष-साधनाच्या बाबतींत

असला विवाहित मनुष्य ब्रह्मचाऱ्यापेक्षां हीन ठरतो. पुष्कळ खिस्ती लोक स्त्रीचें कौमार्य म्हणजे उन्नत आध्यात्मिकतेचें चिन्ह समजतात.

खिती लोकांमधील एक गूढवादी पंथ सर्व वस्तुजात हें जड आणि वाईट आहे आणि आपल्या आत्म्याला या बंधनांतून सोडविणें म्हणजेच मोक्ष, असें मानूं लागला. शिवाय इसवी सनाच्या पहिल्या व दुसऱ्या शतकांत रोमन साम्राज्यामध्यें खूपच फैलावलेल्या आयसिस देवीच्या व मिश्र देवाच्या पूजेचा कॅथॉलिक धर्मावर मोठाच परिणाम झाला. या पंथांतील स्त्री-पुरुष शुभ्रवस्त्रें परिधान करीत आणि मस्तकाचें साफ मुंडन करीत. मिश्र देवाच्या पंथांत तर संन्याशांचे आणि कुमारिकांचे संघच असत.

खिस्ती धर्माच्या इतिहासकारांचें म्हणणें असें आहे कीं, धर्मगुरूंनी ब्रह्मचर्य पाळावें, या कल्पनेची वाढ होण्याला दोन गोष्टी कारणीभूत झाल्या. भोंवतालच्या समाजांत नैतिक अनाचार अतिशय माजलेला होता आणि खिस्तीतर धर्मांत संन्यासकल्पना रूढ झालेली होती. या दोन विशेषांमुळें खिस्ती धर्मांतहि ब्रह्मचर्याची कल्पना वाढत गेली. ती इतकी कीं, कॅथॉलिक खिस्ती व तदितर खिस्ती यांच्यामध्यें वैराग्याच्या बाबतींत चढाओढच लागून राहिली ! अत्युच्च प्रकारचा खिस्ती ब्रह्मचारीच राहिला पाहिजे, तसेंच विवाह करणें ही गोष्ट कमी प्रतीची असून ज्यांना ब्रह्मचर्य पेलत नसेल त्यांनींच तो मार्ग स्वीकारावा, असें कॅथॉलिक खिस्ती म्हणूं लागले. आजन्म कौमार्याची शपथ घेणें हें श्रेष्ठपणाचें लक्षण बनलें; पण यामुळें दुराचार माजूं लागला. शेवटीं इसवी सन ३०६ च्या सुमारास एल्व्हिरा येथें खिस्ती धर्मपंडितांची परिषद् भरली आणि त्यांनीं कुमारिका-संबंधानें कांहीं नियम घालून दिले. परंतु मठांचा उदय झाला आणि शेंकडों कुमारिका मठवासिनी बनल्या. पाद्री मंडळींनीं तर पूर्वीपासूनच पुनर्विवाह निषिद्ध मानलेला होता. ही कल्पना दिवसेंदिवस वाढत गेली आणि बिशप, पाद्री व डिकन्स् यांनीं फक्त एकदां विवाह करावा आणि वैधुर्य आलें तर ब्रह्मचर्य पाळावें, असा नियम करण्यांत आला. कुमारिकांनीं लैंगिक वासनांपासून अलिप्त रहाण्याची शपथ घेण्याच्या प्रथेचे इतके दुष्परिणाम होऊं लागले कीं, पाद्री मंडळींच्या घरीं होणाऱ्या

'प्रीतिभोजना'च्या प्रसंगीं सावळागोंधळ सुरू झाला. पुनः पुन्हा धर्मपरिषदा भरल्या आणि हा स्वैराचार थांबविण्याचे महान् प्रयत्न झाले. तथाकथित कुमारिका आपल्या पुरुषमित्रांबरोबर उघडपणें हिंडूंफिरूं लागल्या. शेवटीं हा भ्रष्टाकार थांबविण्यासाठीं जस्टिनियन् बादशहाला निर्बंध घालावे लागले. इतकें झालें तरी, आध्यात्मिक उन्नति साधूं इच्छिणारानें ब्रह्मचर्य पाळावें, ही कल्पना बळावतच चालली. अमेरियांत ऑयस्टेथिअस् यानें असें प्रतिपादन सुरू केलें कीं, पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि विवाहच असूं नयेत. एकेक कल्पना कुणीकडे भरकटत जाते, याचें हें एक उत्तम उदाहरण होय. शेवटीं पुन्हा एकदां धर्मपरिषद् भरून या तत्त्ववेत्त्याचा जोरानें निषेध करण्यांत आला. वरच्या दर्जाच्या उपदेशकानें पहिली बायको वारल्यावर लग्न करूं नये, ही कल्पना रूढ झाली. वेश्या, चाकर, विधवा किंवा काडीमोड घेतलेली स्त्री यांच्याशीं कोणाहि पाद्र्यानें विवाह करूं नये असें ठरलें. चवथ्या शतकाच्या शेवटीं शेवटीं पोपच्या मनानें उलट खाल्ली, आणि वरच्या दर्जाच्या धर्मोपदेशकांनीं कडकडीत ब्रह्मचर्य पाळलें पाहिजे, असा निर्बंध त्यानें घातला. पाद्री व मठवासिनी कुमारिका यांच्यांतील नैतिक शैथिल्य पाहूनच पोपला हा वैराग्याचा झटका आलेला होता. कार्थेजिअन कौन्सिलनें असा नियम केला कीं, एखाद्या विवाहित माणसानें जर पाद्रीपणा पत्करला, तर त्यानें बायकोपासून दूर राहिलें पाहिजे आणि या नियमाला त्या देशच्या सम्राटानें आपला पाठिंबा दिला. पोप पहिला इनोसंट यानें याच्याहिपुढें एक ढांग टाकली आणि जाहीर केलें कीं, पाद्र्यांचीं लग्नें झालीं असलीं तर असोत, पण त्यांनीं आतां आपल्या बायकांशीं संबंध ठेवतां कामा नये. जस्टिनिअननें नियम केला कीं, दीक्षा घेतलेल्या पाद्र्यांना पुन्हा प्रपंचांत पडतां येणार नाहीं, इतकेंच काय पण उच्च दर्जाच्या पाद्र्यांचीं लग्नेंसुद्धां रद्द समजावींत.

फ्रान्समध्यें धर्माधिकाऱ्यांच्या जागा राजवाड्याच्या कारभाराच्या वशिल्यानें भरल्या जात. त्यामुळें तेथें कडक शिस्त राखणें अशक्य झालें. शार्लमेनचें साम्राज्य मोडल्यावर तर धर्मांत आणि राज्यांत नैतिक आचरणांच्या बाबतींत केवळ अंदाधुंदीच माजली. स्पेन व इटली येथील स्थितीहि बहुतांशीं अशीच होती. ब्रिटनमधील लोकांनीं ख्रिस्ती धर्माचा

अंगीकार केला खरा, पण पोप ग्रेगरीनें घातलेले ब्रह्मचर्याचे निर्बंध पाळणें तेथील पाद्र्यांना भारीच कठीण वाटूं लागलें.

ख्रिस्ती धर्माचें पहिलें सहस्रक संपलें तेव्हां युरोपांत ब्रह्मचर्याचें महत्त्व केवळ तोंडदेखलें शिल्लक उरलें होतें. प्रॉटेस्टट पंथ पुढें प्रबळ झाला आणि त्यानें पाद्री लोकांच्या अनीतीवर झोड उडविण्यास सुरुवात केली. विवाह ही संस्था नैसर्गिक म्हणून पवित्र आहे, असें प्रॉटेस्टंट लोक ठासून सांगूं लागले; आणि म्हणून पाद्री लोकांना विवाहबद्ध होण्यास हरकत नसावी हें मत बळावत चाललें. जेसुइटांनीं मात्र ही सवलत नाकारली. लूथरनें पॅस्टर्सना लग्नें करण्याची मोकळीक दिली. सक्तीच्या ब्रह्मचर्याला तो केवळ सैतानी म्हणूं लागला. पाद्र्यांचें ब्रह्मचर्य ही ईश्वराच्या वचनाविरुद्ध पोपनें केलेली वायफळ बंदी होय असें तो सांगूं लागला. कॅल्व्हिन् हा उपासतापासाचा भोक्ता होता. पण पाद्र्यांचें ब्रह्मचर्य म्हणजे केवळ भोंदूपणा आहे असें तो उघड सांगूं लागला. होतां होतां सोळाव्या शतकांत अँग्लिकन् चर्चनें जाहीर केलें कीं, धर्मसाधन सुकर व्हावें म्हणून पाद्री लोकांनीं विवाह करावयास हरकत नाहीं. इ. स. १६१५ मध्यें आयरिश धर्मसंघटनेनें विवाह ही दैवी योजना आहे असें जाहीर करून अँग्लिकन् चर्चला दुजोराच दिला. पुढें नॉन-कन्फॉर्मिस्ट या पंथांतील लोकांनीं तर या बाबतींत रोमन कॅथॉलिक लोकांशीं वाद करण्यांत कांहींच मतलब नाहीं असें ठरवून टाकलें. तात्पर्य, ब्रह्मचर्याचा महिमा ख्रिस्ती पंथोपपंथांत हळूहळू रोडावत गेला. पण समाजपुरुषाला या कामीं सुमारें १६-१७ शतकें सारखी धडपड करावी लागली.

सुदैवानें ब्रह्मचर्याच्या कल्पनेचें इराणी धर्माला अगदींच वावडें आहे, असें आवेस्त्याचे वाचक सांगतात. त्यांतील एक ऋचा अशी आहे : 'हे झरतुष्ट्रा, लग्न न झालेल्या माणसापेक्षां लग्न झालेला माणूस अधिक श्रेष्ठ होय. घर नसलेल्या मुशाफिरापेक्षां गृहस्थ हा अधिक श्रेष्ठ होय; आणि निपुत्रिकापेक्षां कुटुंबवत्सल मनुष्य हा अधिक श्रेष्ठ होय.' या धर्मांत संन्यासवृत्तीला विरोध आहे. गरीब असण्यापेक्षां गबर असणें चांगलें, आणि अल्पाहारापेक्षां पोटभर आहार श्रेयस्कर होय, असें तो मानतो. अर्थात् ब्रह्मचारी राहण्याची कल्पना इराण्यांच्या मनःप्रकृतीला अगदीं भावत नाहीं.

शिवाय श्राद्धकर्मासाठीं प्रजाभिवृद्धि आवश्यक असल्यामुळें इराणी लोकांचीं मनें ब्रह्मचर्याच्या अगदीं विरुद्ध आहेत.

पितृपूजा, श्राद्धकर्म इत्यादि कल्पना हिंदु लोकांतहि पहिल्यापासून चालू आहेत. फार प्राचीन काळच्या हिंदूंच्या पूर्वजांना प्रजा वाढायला हव्या होत्या, आणि म्हणून अष्टपुत्रांचा आशीर्वाद सुवासिनींना मिळूं लागला. अर्थात् प्रजा जर वाढायला हव्यात तर लग्न करणें प्राप्तच होतें. पण हें सरसकट समाजाचें झालें. धार्मिकांच्या बुद्धींत ब्रह्मचर्याचा आणि वैराग्याचा महिमा बलिष्ठ बनलेला होता; इतकेंच काय, पण परमार्थ-साधनाच्या कामीं स्त्रिया ही एक धोंड आहे, हें आपल्या अलीकडच्या संतांपर्यंतसुद्धां सर्व लोक मानीत आले आहेत. पण आतां स्त्रीची खरी योग्यता पुरुषाला कळूं लागली आहे. परमार्थाचा वारसा पुरुषनिरपेक्षपणानें स्त्रियांच्या वांट्यालाहि जाऊं शकतो, हेंहि पुरुषांना व स्त्रियांना दोघांनाहि कळूं लागलें आहे; आणि जीविताच्या एकंदर बौद्धिक व्यवहारांत बरोबरीची बनत चाललेली स्त्री परमार्थांतच आडकाठी आणील, हें मतहि कमकुवत बनत चाललें आहे.



६ : सुसंस्कृतांचे प्रतिनिधि

गुणी आणि सभ्य माणसांचें प्रतिनिधिपण ज्यांनीं चालवावें, त्या माणसांचें वर्णन करण्याची शेक्सपियरला मोठीच हौस दिसते ! ज्यूलियस सीझर नाटकाच्या शेवटीं त्यानें केलेलें ब्रूटसचें वर्णन पहा—

His life was gentle and the elements so mix'd in him that nature might stand up and say to all the world, " This was a man ! "

इतिहासांतला मूळ ब्रूटस कसा होता कोणास ठाऊक, पण शेक्सपियरनें रंगवलेला ब्रूटस् एका अघोरी हत्येला प्रवृत्त झाला तरी अत्यंत उदारमनस्क आणि सुसंस्कृत पुरुष होता. सीझरच्या खुनांत इतर लोक सामील झाले ते मत्सरी म्हणून, लोभी म्हणून, किंवा हाडाचेच दुष्ट म्हणून. पण ब्रूटस् मात्र या कटांत केवळ लोकशाहीच्या रक्षणासाठीं सामील झाला होता. शेक्सपियरनें हॅम्लेट नाटकांत लार्टिसचें असेंच वर्णन केलेलें आहे. एक दुय्यम दर्जाचें पात्र लार्टिसविषयीं बोलतांना म्हणतें, " Indeed, to speak feelingly of him, he is the card or calender of gentry, for you shall find in him the continent of what part a gentleman would see." बोलणारें पात्र जसें दुय्यम दर्जाचें आहे, तसा लार्टिससुद्धां दुय्यम दर्जाचाच आहे. पण शेक्सपियरनें पहिल्या श्रेणींतील माणसाला लागू पडाव्या अशा शब्दसंहति त्याच्यासंबंधानें योजलेल्या आहेत. कदाचित् ही जाणीव शेक्सपियरलाहि असावी; आणि म्हणून त्या बोलणाऱ्या पात्राच्या तोंडीं To speak feelingly of him— असे शब्द त्यानें घातले आहेत. हें पात्र भावनावश होऊन बोलत आहे; आणि म्हणून लार्टिसचें त्यानें केलेलें वर्णन अतिशयोक्तीचें आहे, असें शेक्सपियरला कदाचित् सुचवावयाचें असेल. पण त्यानें योजलेल्या शब्दसंहति मात्र, युक्त ठिकाणीं योजल्या तर फारच समर्पक ठरतील. Henry the Fourth, Part II या नाटकांतहि

कवीनें आपली शब्दसंपत्ति जवळ जवळ उधळल्यासारखी दिसते. हॉट्स्पर मेलेला आहे, आणि त्याची तरुण विधवा स्त्री आपल्या सासऱ्याला ठपका ठेवून बोलत आहे. तिनें केलेलें नवऱ्याचें वर्णन पहा : " He was indeed the glass wherein the noble youth did dress themselves.....He was the mark and glass, copy and book, that fashion'd others." वास्तविक पाहतां हॉट्स्पर एवढ्या वर्णनाला पात्र नव्हता. तो उदार, शूर आणि चलाख होता खरा, परंतु उतावळा आणि अविवेकी असून कांहींसा अहंमन्यहि होता. परंतु शेक्सपियरनें सुचविलें असावें कीं, विधवा स्त्री आपल्या पतीसंबंधानें बोलत आहे, व म्हणून ही अतिशयोक्ति क्षम्य मानावी. या वर्णनांत शेक्सपियरनें योजलेल्या शब्दसंहति, युक्त ठिकाणीं योजल्या तर, वाङ्मयाच्या दृष्टीनें अत्यंत सरस वाटतील.

" सृष्टीनें बाहू उभारून सांगावें कीं, मनुष्ययोनीचा हा खराखरा प्रतिनिधि होता." हें वर्णन ब्रूटससारख्या महानुभाव पुरुषाला खचितच शोभतें. पण " Card or calender of gentry.... " हें आपलें वर्णन लार्टिसलासुद्धां अवजड वाटलें असतें, आणि " ....mark and glass, copy and book " हें प्रियेनें केलेलें आपलें वर्णन ऐकून अवखळ हॉट्स्परसुद्धां संयमी बनून मनांत थोडा हंसलाच असता ! तथापि भावनेच्या किंवा प्रेमाच्या पोटीं माणसांना बोलत ठेवून शेक्सपियरनें याहि ठिकाणीं अतिशय मनोरंजक कल्पना सुंदर अलंकारांनीं प्रकट केल्या आहेत.

" Card or calender of gentry " म्हणजे ' कुलीन सभ्यपणा कसा असतो याचें अचूक दर्शन करवणारा ' असा अर्थ होतो. तसेंच, " Glass and mark, copy and book " म्हणजे ' ज्याच्याकडे पाहून आपण आपलीं रूपें ठाकठीक करून घ्यावीं, ज्याच्याकडे पाहून माणसांना अनुकरणाची बुद्धि व्हावी; आम्ही अमुकासारखे आहों, या दृष्टीनें नमुना म्हणून ज्याच्याकडे सभ्य माणसानें बोट दाखवावें,' असा अर्थ होतो. या वर्णनास पात्र असलेलीं माणसें समाजांत खरोखर फार थोडीं असतात; आणि त्यांनाच त्या त्या समाजाचें प्रतिनिधिपण प्राप्त होतें. तात्यासाहेब केळकर हे महाराष्ट्रांतील कुलीन सभ्य गृहस्थांचे प्रतिनिधिच होते. ज्यांच्याकडे पाहून आपण चांगले संयमी आहों ना, असें माणसांनीं ठरवून घ्यावें, असेंच

तात्यासाहेबांचें एकंदर दर्शन होतें. ब्रूटस्‌चें केलेलें वर्णन त्यांना लागू पडण्यासारखें नव्हतें. त्या वीरोचित वर्णनाला तात्यासाहेब पात्र नव्हते; पण सत्कुलीन सभ्यता कशी असावी याचा नमुना दाखवणारे मात्र खास होते, आणि याच दृष्टीनें मला आज तात्यासाहेबांकडे पहायचें आहे.

Representative या इंग्रजी शब्दाला प्रतिनिधि हा मराठी शब्द योजलेला असतो. परंतु या दोन्ही शब्दांचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे.

सर्व लोक किंवा बहुतेक लोक अमूक एक मताचे असतात; आणि त्यांचें तें मत सांगणारा जो कोणी असतो, तो त्या लोकांचा Representative किंवा प्रतिनिधि ठरतो. परंतु या अर्थानें प्रतिनिधि हा शब्द वर योजलेला नाहीं. महाराष्ट्रांतील नागर प्रजा सरसकटपणें एका दिलाची व तोलाची असते, आणि तो तोल व दिल तात्यासाहेबांच्याद्वारां व्यक्त होत होता, असें मला म्हणायचें नाहीं; तर दिल व तोल यांचा महाराष्ट्रीय जनतेंत सर्वोत्तम आविष्कार तात्यासाहेब यांच्या ठिकाणीं झालेला होता, एवढेंच सुचवावयाचें आहे. चांगला दिल असणें व चांगला तोल असणें हें महाराष्ट्रीय जनतेला खचित पसंत असेल, पण हे गुण सरसकट जनतेंत आहेत असें मात्र नव्हे. आपल्या अंगीं हे गुण असायला हवेत, असें मात्र तिला खचितच वाटतें; आणि हे गुण तात्यासाहेबांच्या अंगीं प्रगल्भ बनलेले होते. 'या गुणांचा उत्तम आविष्कार तुमच्यापैकीं कोणाच्या अंगांत झाला आहे?' असें महाराष्ट्रीय जनतेला विचारलें असतें, तर 'तो तात्यासाहेबांच्या अंगीं झाला आहे' असें उत्तर तिनें दिलें असतें. या अर्थानें तात्यासाहेब हे सत्कुलीन सभ्यतेपुरते महाराष्ट्रीय जनतेचे प्रतिनिधि होते. अंशमानानें ठिकठिकाणीं वागत असलेला एकेक गुण कोणा कोणा माणसांत कमीअधिक अंशांनीं वागतो, आणि एखाद्याच्या अंगीं त्याचा पूर्ण आविष्कार होतो. याहि अर्थानें तो त्या लोकांचा प्रतिनिधि बनतो. सर्वांच्या अंगीं तोच गुण त्याच प्रमाणानें भरलेला असतो; आणि त्यांचा कोणी तरी एक गुमास्ता हवा आहे म्हणून जर एखाद्या माणसाची निवड केलेली असली तर तोहि त्यांचा प्रतिनिधिच होय; पण या अर्थानें आपण वर हा शब्द योजलेला नाहीं. तात्यासाहेब केळकर हे महाराष्ट्रांतील

कुलीन श्रेष्ठतेचे प्रतिनिधि होते, या शब्दसंहतीचा अर्थ असा कीं, ही शिष्टता त्यांच्या ठिकाणीं पूर्णपणें आविष्कृत झालेली होती.

समंजसपणा, सारासारविवेक, सावधपणा, सहसा न बहकणारी प्रवृत्ति, कोणालाहि विशेष न दुखवण्याकडे कल, वाणीची शुचिता, आणि विशेष म्हणजे, आपण कोण आहों याचें यथार्थ ज्ञान झालेलें असल्यामुळें सार्वजनिक जीवितांत आपला उपयोग कसा होऊं द्यावा हें ठरवण्याची तत्परता, या गुणांमुळें तात्यासाहेब राजकारणांत पडूनहि बहुधा अजातशत्रु ठरले; आणि टिळकांसारख्या महातेजस्वी पुरुषाचा विश्वास त्यांना संपादितां आला.

लोकमान्य टिळक हे आक्रमक वृत्तीचे आणि सदैव युद्धोन्मुख होते. त्यांचा सारा जीवनक्रम मोहीमशीर होता असेंच म्हटलें पाहिजे... ..ते नेहमीं स्वारीवर निघालेले असत. आणि केव्हांहि पहा, त्यांच्या फौजा गारपिरावर डेरेदाखल आलेल्या असत. आणि क्वचित् एखाद्या वेळीं जर ते हुश्श करून बसलेले असले तर मनानें मरारी मारून ते भूतकालांत शिरत, आणि वसिष्ठ किंवा विश्वामित्र, व्यास किंवा वाल्मीकि, अंगिरस् किंवा जमदग्नि यांच्या भेटीला जात; किंवा उत्तर ध्रुवाकडे फेरफटका करीत. तात्यासाहेब यांच्या बुद्धीला विद्येचें, सौंदर्याचें, अलंकाराचें आणि औदार्याचें आवाहन फार जलदीनें पोंचत असे. साहसाचेंहि त्यांना साश्चर्य कौतुक वाटे. न्याय कोणता आणि अन्याय कोणता; विवेक कोठें संपला आणि अविवेकाला सुरुवात कोठें झाली; प्रज्ञा कोठें शान्त झाली आणि स्वप्नरंजन कोठें सुरू झालें; आत्मज्ञानाचा उंबरठा कोणता आणि सामर्थ्याची भ्रान्त दौड कोणती, याचें निदान करण्याची शक्ति तात्यासाहेबांच्या ठिकाणीं उत्तम पोसलेली होती. तात्यासाहेब हा एक ताजवा होता. असा ताजवा पुष्कळदां थोडासा गैरसोयीचा वाटतो, पण अंतीं तो लाभाचा ठरतो. अशाच एका प्रसंगीं टिळक हे एकदां म्हणाले, "हा असा असा विचार आहे; आतां हा आमच्या तात्यासाहेबांच्या ताजव्यांत घालून पाहिला पाहिजे." या त्यांच्या उद्गारांत सूक्ष्म टीकाहि होती; आणि अवश्य होऊन बसलेली मान्यताहि होती. टिळकांचें मोठेपण हें कीं, स्वतःची प्रकृति इतकी

अनुक्रमांक 2211e वि. निबंध
क्रमांक 9993 नों. दि. 22.9.64

उग्र असतांनासुद्धां त्यांनीं तात्यासाहेबांच्या या गुणाचें अस्तित्व आणि महत्त्व ओळखलेलें होतें.

न्यायमूर्ति रानडे हे गोखले यांच्याशीं पुष्कळ तात्त्विक चर्चा करीत; गोखले यांना ते उपस्थित झालेल्या प्रश्नांचीं अंगें, उपांगें समजावून देत; आणि आपलें सुनिश्चित मत गोखले यांना पटवून देऊन मग ते कौतुकानें म्हणत, "आतां हें तुमच्या चांगल्या इंग्रजीनें सांगा!" रानडे व गोखले यांच्या या संबंधांत वयाबरोबर ज्ञानाचेंहि वडीलपण सूचित होत असे. आणि तें बरोबरच होतें. गोखले यांच्या कर्तृत्वाला बहर आला तो रानडे यांच्या जीवितावधींत नव्हे, तर रानडे वारल्यानंतर आला. आणि रानडे यांच्या अत्यंत परिपक्व अशा प्रतिभेचा लाभ गोखले यांना फार थोडे दिवस मिळाला. गोखले यांच्या धोरणाचा आणि तारतम्याचा प्रत्यय पुरता येण्याच्या आधींच रानडे दिवंगत झाले; आणि यामुळें आपल्याजवळ बसून गोखले यांनीं विद्यार्थ्याचीच भूमिका सजवावी, पण आपल्याहिपेक्षां जास्त साध्य करून घेतलेलें भाषेचें लाघव मात्र त्यांनीं प्रकट करावें, अशी कांहीं एक वडीलकीची आणि कौतुकाची भावना रानडे यांच्या ठिकाणीं नांदत होती. टिळक व केळकर यांचें नातें याहून कांहींसें निराळें होतें.

१८९७ सालीं टिळकांच्या जीवितांतील खऱ्या समरांगणाला सुरुवात झाली. आणि पुढें चोवीस वर्षें प्रथम महाराष्ट्राचें आणि मग भारताचें समरांगण टिळकांनीं अखंड गाजविलें. हा सारा इतिहास केळकरांनीं अगदीं जवळून पाहिला. या इतिहासाचे आदि-अंतसुद्धां त्यांना न्याहाळून पाहतां आले. आणि ज्याला आपण "वार्धक्यांतील काठी" म्हणून जवळ बोलावून घेतलें, त्या तरुण माणसाचा – केळकरांचा – मनोविकास टिळकांनाहि पुरता पाहतां आला. टिळकांच्या सामर्थ्याची परिणति आणि केळकरांचा मनोविकास हीं बरोबरच चालू होतीं; आणि टिळकांनीं जेव्हां आपला देह ठेवला तेव्हां पूर्णपणें विकसित झालेल्या एका विश्वासार्ह माणसाच्या हवालीं आपण आपला वारसा करीत आहों, हें ज्ञान टिळकांना खचित झालेलें होतें. आपण कोण आहों आणि केळकर कोण आहेत; तसेंच आपण कोण आहों आणि टिळक कोण आहेत, याचा कयास या उभयतांनीं आपल्या मनांत खासच बांधलेला

असला पाहिजे. आपल्या बुद्धिसामर्थ्यांना, मनोभावनांना, आणि कर्तबगारीला पूरकतेच्या दृष्टीनें केळकरांचा उपयोग आहेच आहे, हें टिळकांना माहीत झालेलें होतें; आणि आपल्यापेक्षां सर्व तऱ्हेनें श्रेष्ठ असलेला एक सामर्थ्यसंपन्न पुरुष आपल्या साहचर्याची आवश्यकता आणि किंमत ओळखून आहे, हें केळकरांनाहि कळून चुकलें होतें. आवश्यकता आणि किंमत म्हणजेच केळकरांचा ताजवा होय. पूर्णपणें प्रगल्भ झालेल्या आणि अजून केवळ अभ्यासकाची भूमिका पत्करलेल्या माणसांची ही युति नव्हती; रानडे व गोखले यांच्यासारखें हें साहचर्य नव्हतें. रानडे हे गोखले यांच्याकडे हातातोंडाशीं आलेल्या वडील मुलाकडे पित्यानें पहावें तसे पहात असत. आपल्या प्रगल्भतेचें पुत्राकडूनच सूक्ष्म परीक्षण होत असेल अशी कल्पनाहि रानड्यांच्या मनांत आली नसेल. याच्या विचारशक्तीचा आणि सारासार-विवेकाचा आपल्या मनावर परिणाम होऊं दिला पाहिजे, ही जाणीवहि रानडे यांना कधीं शिवली नसेल. केळकरांच्या बाबतींत टिळकांची भावना हीच होती असें मात्र म्हणवत नाहीं. त्यांची स्वतःचीच अत्यंत वेगवती व उग्र अशीच का होईना,– पण परिणति नुकतीच सुरू झाली असतांना केळकरांचें व त्यांचें साहचर्य झालें. आणि केळकरांची विवेचक शक्ति आणि सारासारविवेक यांची ओळख टिळकांना त्याच काळीं झाली.

पुष्कळ लोकांना—कीं ज्यांना केळकरांच्या संबंधानें आन्तरिक उपहास वाटतो, आणि जे त्यांना मनानें कमी लेखून डावलण्याची भूमिका घेतात त्यांना—असें वाटतें कीं, टिळक यांनीं केळकरांना जवळ तरी कसें केलें ?

पण याच बीजभूत गोष्टीचें माणसांनीं नीट अवलोकन केलें पाहिजे. टिळक चाणाक्ष होते; आणि केळकरहि रसिक होते. आपापल्या प्रकृतींत स्वल्पांशानें नाहीं किंवा बहुंशानें नाहीं तें दुसऱ्याच्या अंगीं आहे, आणि त्याचा उपयोग आपल्याला आहे, इतकेंच नव्हे तर तो उपयोग करून घेतल्यानेंच आपल्या सामर्थ्यांना सार्थकता प्राप्त होते, हें या दोघांनाहि आरंभींच कळून चुकलें होतें. या एका सूत्रानें माझ्या मतें टिळक-केळकरांच्या नात्याचा पूर्ण उलगडा होतो. आणि यांतच केळकरांच्या संयमशील शिष्टतेचा विजय दिसून येतो. आपण टिळकांच्यासारखेंच बोलणारे, त्यांचा

राजकीय संदेश खाजगी संभाषणांतून आणि सभादिकांतून त्यांच्याहिपेक्षां निधडेपणानें गर्जून सांगणारे, आपण सार्वजनिक जीवनांतिल वकिली कसब जास्त जाणणारे, आपण कदाचित् टिळकांपेक्षांहि रतीभर जास्त गाढे विद्वान्–असें असूनसुद्धां टिळकांनीं आपल्योला जवळ करूं नये, किंवा आपल्या गादीवर बसवूं नये याचा विस्मय तेव्हांच्या कांहीं कांहीं लोकांना मनांतल्या मनांत वाटत असे. ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, खाडिलकर आणि परांजपे हे मात्र अशा लोकांपैकीं नव्हते; त्यांनीं सारें बरोबर ओळखलेलें होतें. परांजपे तर कोणाचेंहि शिष्यत्व पत्करणारे नव्हते; आणि स्वतंत्र प्रतिभाशालित्व हा त्यांच्या मनाचा मुख्य धर्म असल्यामुळें त्यांच्या मनांत ही कल्पनाहि कधीं आली नसेल. खाडिलकरांच्या मनाचा धर्म विभूतिपूजा, आणि विभूतीपुढें 'शिष्यस्तेऽहं' असें म्हणण्याचा होता. त्यांनाहि ही वारशाची कल्पना शिवली नसेल. पण महादेव राजाराम बोडस, डॉ. केतकर, सीतारामपंत दामले असे कांहीं लोक समाजांत होते कीं, जे केळकरांना मनांतून तुच्छ लेखीत, आणि एक भलताच माणूस टिळकांनीं आपला वारस बनविला आहे असें समजत. 'केळकर म्हणजे टिळकांचे एक निव्वळ कारकून आहेत' असेंसुद्धां दामले एकदां म्हणाले होते. पण कारकुनाशीं कोणी वाटाघाटी करीत नाहीं; वैचारिक देवघेव करीत नाहीं. आपल्या आक्रमक धोरणाचे वृत्तपत्रीय आविष्कार याच्या हस्तें बरोबर होत आहेत असें कोणी मानीत नाहीं, किंवा त्याला ताजव्याचा गौरवहि अर्पण करीत नाहीं, हें या लोकांच्या ध्यानांत आलें नाहीं. केळकर चर्चा करीत; टिळकांशीं हुज्जत घालीत; वाद करीत; आणि पटवून घेऊन अत्यंत समर्पक शब्दांनीं टिळकांचें मनोगत वृत्तपत्रांतून व्यक्त करीत. हें जर घडत नसतें तर 'दूर सर' म्हणून टिळकांनीं त्यांना केव्हांच सांगितलें असतें. पण तें अखेरपर्यंत केव्हांहि झालें नाहीं. उलट एकदां आपली टिळकांच्या मेळांतील उपयुक्तता संपत आली आहे कीं काय, असें वाटून केळकरांनींच दूर सरकण्याची वांछा दर्शविली, तेव्हां टिळकांनीं आपला वडीलकीचा अधिकार गाजविला आणि त्यांना दूर होऊं दिलें नाहीं.

हिंस्र क्रान्ति आणि लोकशाही पद्धतीची होऊं घातलेली प्रतिनिधिक राज्यपद्धति या दोहोंचा एक सूक्ष्म झगडा तेव्हां हिंदुस्थानांत चालू होता.

परांजपे हे हिंस्र क्रान्तीचे उघड उघड प्रतिपादक होते. पण प्रतिपादनाच्या पुढें त्यांना जावलें नाहीं. ही आपली भूमिका टिळकांच्याहून निराळी आहे, हें मात्र त्यांनीं निश्चित ओळखलें होतें. खाडिलकरांना याच क्रान्तीची वासना मोठी, पण टिळकांचें बुद्धिमत्त्व त्यांना डोईजड वाटे. खुद्द टिळकांच्या मनांत हिंस्र क्रान्ति आणि लोकशाहीच्या प्रातिनिधिक पद्धतीची स्थापना यांचें द्वंद्व पुष्कळ दिवस चालू होतें. राजकारणाची खरी बैठक त्यांच्या मनांत बसत चाललेली होती. मात्र या बैठकीला पुरेसें उग्र सिंहासन लाभावें, असें त्यांना वाटे. आणि तेवढ्यापुरते ते हिंस्र क्रान्तीशीं संबंध ठेवीत. पण या देशांत प्रातिनिधिक लोकशाहीची स्थापना व्हावयास हवी, हेंहि त्यांच्या मनानें पक्कें घेतलें होतें. केळकरांना हें आपलें द्वंद्व चांगलें कळलेलें आहे, आणि याच्या आविष्काराच्या कामीं केळकरांचा उपयोग फार मोठा आहे, हें ओळखण्यांत टिळकांनीं फार धूर्तपणा दाखवला असेंच म्हटलें पाहिजे. तसेंच नुसत्या लोकशाही पद्धतीच्या स्थापनेचा विचारच लोकांपुढें ठेवला तर त्याचा फार झाला तर इतिहासांत उपयोग होईल. स्वराज्याची स्थापना त्यानें जवळ येणार नाहीं. टिळकांच्या मनांतील 'उग्र सिंहासना'ची कल्पना याच्या सहाय्याला हवीच हवी, हें केळकरांनींहि ओळखलेलें होतें, आणि म्हणूनच हे दोन विचारी पुरुष पंचवीस वर्षें सामरस्यानें वागले. पूरकता ती हीच. पण हें उघड आहे कीं, या पूरकतेच्या दोन अंगांतील बळ मात्र सारखें नव्हतें.

केळकरांचें राजकारणांतील व्यक्तिमत्त्व झगझगीत नसलें तरी चतुर आणि कार्यसाधक होतें.

टिळकांचा चाणाक्षपणा ज्यांच्या अंगीं नव्हता, आणि व्यवहारी राजकारणांत चढउतार असतो हें ज्यांना कळत नव्हतें किंवा कळूनहि ज्यांना वळत नव्हतें, ते खुद्द टिळकांनासुद्धां शेवटीं मनांतून कमी लेखूं लागले. घावडावानें राजकारणाचे धागे जोडून घ्यावयास हवेत, हें पटल्यानंतर आपला स्वभावहि जिंकावा लागतो; व थोडी बौद्धिक मानहानि पत्करावी लागते. पण हें केल्याशिवाय राजकारण पुढें सरकत नाहीं. महात्मा गांधींनीं हें पुढें कितीदां तरी केलें; आणि एकंदरीनें त्यांचें राजकारण पुढेंच सरकलें. राजकारणाचा पोंच स्वभावाची अनुकूलता असली तर यशस्वी

होतो, असें दिसतें. टिळकांना शिक्षा झाल्यानंतर केळकरांनीं थोडें स्थिर-स्थावर होऊं दिलें, आणि कॉंग्रेसमध्यें पडलेली फूट कशी बुजवितां येईल हें आपल्या मित्रांच्या सहाय्यानें त्यांनीं विवंचून पाहिलें. परिस्थितिसापेक्ष असें राजकारणाचें ज्ञान आणि स्वभावाची अनुकूलता यांमुळेंच त्यांना असें करावेंसें वाटलें; आणि या कामीं त्यांना थोडेंबहुत यशहि आलें. एखाद्याच्या हातांतून जें स्वाभाविकपणें होतें, तें आपल्या स्वभावामुळें घडून आलें आहे, असें त्या त्या वेळीं त्याला माहीतच असतें असें म्हणतां येत नाहीं.

ही फूट बुजवितांना केळकरांना आपल्या सौजन्याचा फार उपयोग झाला. आतांपर्यंत मी त्यांच्या सारासारविवेकाविषयीं बोललों आहें. पण हा सारासारविवेक सौजन्याशीं संबद्ध नसता तर त्याचाहि उपयोग फारसा झाला नसता. केळकरांच्या अंगीं हें सौजन्य उपजतच होतें. पुष्कळ माणसें कार्यसिद्धीसाठीं, स्वतःच्या मनाविरुद्धच पण सौजन्यानें वागतात. आणि इतर कांहीं आपोआपच तसे वागतात. केळकरांचें सौजन्य हें योजनेनें अंगीं आणलेलें नव्हतें; तें त्यांच्या पिंडांतच होतें. कोणीशी Gentleman ची व्याख्या अशी केली आहे कीं, " A gentleman is one who does not give pain to others." आपल्या बोलण्यामुळें किंवा कृत्यामुळें दुसऱ्याला दुःख होईल कीं काय, हें पाहण्याचें सौजन्य Gentleman च्या अंगीं असतें. केळकर यांच्या अंगीं हा गुण प्रकर्षानें वसत होता. अर्थात् जो कोणी एखादें कार्य करावयास निघतो त्याला दुसऱ्याला दुखवण्याचा प्रसंग प्राप्तच होतो. तेंहि त्यानें करावयाचें नाहीं म्हटलें तर त्याच्या हातून कोणतेंहि कार्य होणार नाहीं. पण हें कार्य करीत असतांना, तो दुसऱ्याच्या ठिकाणीं एवढी जाणीव ठेवतो कीं, 'हें कार्य तुझ्याविरुद्ध आहे. त्याच्या भरीला माझा स्वभाव मात्र तुझ्याविरुद्ध नाहीं' एवढें असलें म्हणजे तो प्रतिपक्षी-सुद्धां सावधच होतो. आणि या गृहस्थाविषयीं त्याच्या मनांत आकस रहात नाहीं. केळकर यांनीं आपल्या साऱ्या कारकीर्दींत पुष्कळांच्या विरुद्ध लिहिलें, आणि अशीं अनेक कृत्यें केलीं कीं, जीं इतर कांहींना गैरसोयीचीं आणि नकोशीं वाटावीं. पण असें असूनसुद्धां त्यांच्या मनांत केळकरांविषयीं कधीं आकस उत्पन्न झाला नाहीं, किंवा त्यांना वैरभावहि वाटला नाहीं. कार्यसिद्धी-

साठीं केलेलें म्हणजे काय आणि स्वभावाच्या दोषानें केलेलें म्हणजे काय, याचाहि विवेक ज्या एखाद्या क्षुद्र प्रतिपक्ष्याला कळला नसेल त्याची गोष्ट निराळी. त्यानें केळकरांच्याशीं दावाच धरला असेल. पण इतर सर्वांच्या टिकाणीं त्यांच्याविषयीं ही वैराची भावना कधीं उत्पन्न झाली नाहीं. वर सांगितलेलें फूट बुजविण्याचें काम केळकरांना या गुणामुळेंच शक्य झालें. टिळक हे केळकरांच्यापेक्षां सर्व गोष्टी लक्षांत घेतां अनेक पटींनीं श्रेष्ठ होते. परंतु ते फार तामसी असत. फार कडाडून बोलत आणि पक्षभेदाला अत्यंत जालीम स्वरूप प्राप्त करून देत. या महापुरुषाच्या ठिकाणीं हा एक बारीकसा दोषच होता; पण त्यामुळें व्हावयाचें नुकसान त्यांच्या दुय्यमाच्या कार्य-कुशलतेमुळें आणि लेखनांतील लाघवामुळें थोडें तरी कमी होत असे. आणि टिळकांचें थोरपण हें कीं, केळकरांचा हा गुण लक्षांत घेऊन व त्यांची उपयुक्तता ओळखून त्यांनीं केळकरांचा संग्रहच केला.

पुढें महात्मा गांधींच्या कारकीर्दीतहि केळकरांचा हा गुण उत्कर्षानें दिसून आला, आणि त्यामुळें पक्षभेदाचीं अधिष्ठानें परस्पर-विरोधी असतांनासुद्धां महात्मा गांधींच्या पक्षांतील पुढाऱ्यांच्या मनांत केळकर ही एक मोठी बाधक गैरसोय आहे, ही जाणीव जरी वागत असली, तरी केळकरांच्या संबंधानें त्यांना कधीं वैरभाव वाटला नाहीं. केळकरांच्या स्वभावाचा हा गुणविशेष महाराष्ट्रांतील सार्वजनिक जीवनाला अतिशय उपकारक ठरला. आणि या कामीं त्यांना नेमस्त पक्षांतील दुसऱ्या एका भल्या माणसाचा फार उपयोग झाला. हे गृहस्थ म्हणजे ज्ञानप्रकाशचे संपादक कै. कृष्णाजीपंत लिमये हे होत. महाराष्ट्रांतील पक्षभेद मिटवावे हा हेतु मनांत धरून केळकर व लिमये यांनीं संगनमतानें तसतसें लिहिलें किंवा आचरिलें असें मात्र नव्हे. दोन सारख्या स्वभावाच्या माणसांची गांठ सार्व-जनिक जीवितांत सहजासहजीं पडली, आणि हा पक्षमिलाफाचा योग जमून आला. खरें पाहतां मूळच्या तत्त्वज्ञानांत फरक असूनसुद्धां लिमये हे केवळ धोरण म्हणून महात्मा गांधींच्या अंगानें लिहीत असत. पण प्रचारकार्यांतील हा भेद प्रकट होत असतांसुद्धां जुने जहाल व मवाळ हे दोन्ही पक्ष जवळ जवळ करण्याचें श्रेय केळकर व लिमये यांना संपादितां आलें.

आपल्या सामर्थ्याची यथार्थ जाणीव व संयम हेहि गुण केळकरांच्या ठिकाणीं चांगले पोसलेले होते.

कलकत्ता काँग्रेसच्या वेळीं बहिष्काराच्या ठरावाची सूचना करण्यासाठीं टिळक जेव्हां व्यासपीठाकडे गेले तेव्हां 'मी करीत असलेल्या या सूचनेला दुजोरा द्यावयास तुम्ही पुढें या' असें टिळक हे केळकर यांना म्हणाले. पण केळकरांनीं या गोष्टीला नकार दिला. पण या वेळेस आपल्या पुढाऱ्याला दगा द्यावा ही वासना केळकरांच्या मनांत खचितच नव्हती. 'आपल्याला हें काम झेपण्यासारखें नाहीं एवढेंच केळकरांना वाटत होतें. प्रसंग भयंकर होता; आणि केळकरांच्या अंगीं वक्तृत्वहि नव्हतें. उलट, दुसऱ्या एका प्रसंगीं आपल्या पुढाऱ्याची त्यांनीं उत्तम साथ केली. पहिल्या महायुद्धाचे नगारे वाजूं लागतांच देशांतील सर्व पक्षांचें सहाय्य संपादावें म्हणून लॉर्ड विलिंग्डन यांनीं मुंबईस मोठी सर्वपक्षीय परिषद भरवली. टिळकांनीं सहाय्य करण्याचें मान्य केलें. पण या सहाय्याला अटी घातल्या. त्यांनीं केलेल्या या अटींचें विवरण विलिंग्डनना दुःसह झालें; आणि टिळक सभात्याग करून बाहेर पडले. मागोमाग केळकर बोलावयास उठले, आणि त्यांनीं तेंच विवरण सुरू केलें; म्हणजे त्यांनीं टिळकांना पूर्ण पाठिंबा दिला. आणि विलिंग्डनना तें खपेना म्हणून केळकरांनाहि सभास्थान सोडावें लागलें. या सभेंत पुढाऱ्याला पाठिंबा देण्याचें काम आपल्याला झेपेल असें केळकरांना वाटलें असलें पाहिजे. यावरून हेंच सिद्ध होतें कीं, आपल्या सामर्थ्याची खरी जाणीव केळकर यांना झालेली होती. त्यांच्या संयमाचें एक वेंचक उदाहरण येथें देतां येण्यासारखें आहे. महात्मा गांधी हे अत्यंत थोर, संयमी, तोंडांतून कधींहि वाईट शब्द न काढणारे, आणि शत्रूशींसुद्धां मित्रभावानें बोलणारे होते, ही गोष्ट सर्वश्रुत आहे. पण असें असलें तरी, जो प्रतिपक्षी आपल्या कार्यांत आपल्याला नडलेला असेल त्याच्याविषयीं त्यांच्याहि मनांत दुजाभाव बागावा, आणि ज्या प्रसंगीं तो व्यक्त होऊं नये त्या प्रसंगींहि तो व्यक्त करावा, इतपत त्यांचें अवधान सुटावें हेंहि आश्चर्यच होय. केळकर यांनीं म. गांधी यांना 'केसरी' कचेरींत सत्कारासाठीं बोलाविलें, आणि महात्माजी आलेहि. आमंत्रण व स्वीकार हीं उभयपक्षीं सौजन्याच्या पोटींच झालेलीं होतीं. पण मोटरमधून उतरतांच स्वागतासाठीं पुढें आलेल्या केळकरांना उद्देशून हंसत हंसतच पण मनांतला दंश जणूं कांहीं व्यक्त करण्यासाठींच महात्माजी म्हणाले, 'My enemy number one.'

वास्तविक पाहतां, ज्यांनीं केलेल्या स्वागताचा स्वीकार करण्यासाठीं आपण त्यांच्या घरीं आलों, त्यांना अशा प्रसंगीं हे शब्द बोलणें अप्रशस्तच होतें. पण महात्माजी बोलून गेले. तथापि त्यांचें अवधान सुटलें तरी केळकरांचें सुटलें नाहीं, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे. पाहुण्याच्या हातून, अनवधानतः कां होईना, पण त्यांचा अपमानच झाला होता. तरीहि केळकरांनीं आपल्याकडे यजमानाची भूमिका आहे हें ध्यानांत ठेवून तो प्रसंग हंसतमुखानें निभावून नेला. ते एवढेंच म्हणाले, " I am not your enemy; I am your opponent."

अभिजात सभ्यता म्हणजे काय याचा नमुनाच केळकरांनीं या प्रसंगीं दाखविला. वृत्तपत्रांतून वगैरे त्यांच्यावर पुष्कळ टीका होत असत. पण तात्यासाहेब बहुधा बरीचशी गम खात. हा संयमाचा गुण सभ्यतेच्या पोटांतच येतो. त्यांच्या राजकारणाची थट्टा करण्याच्या हेतूनें खाडिलकर यांनीं आपल्या एका नाटकांत स्त्रीपात्राच्या द्वारां कांहींसा ओंगळ उपरोध केला आहे. या उपरोधाला तात्यासाहेबांनीं आपल्या पत्रांत उपरोधी लेखानेंच उत्तर दिलें; आणि आपल्यालाहि असली लेखनकला साध्य आहे, हें दाखवून दिलें. ते याच्यापुढें मात्र गेले नाहींत. याहि कामीं त्यांनीं खरोखरच मोठा संयम दाखवला. एखाद्यानें चिडून जाऊन भलतेंच लिखाण लिहिलें असतें.

या सभ्यतेच्या आणि शिष्टाचाराच्या पायीं त्यांनीं स्वकीयांचासुद्धां रोष कांहीं कांहीं वेळां आपल्यावर ओढवून घेतला.

याचें उत्तम उदाहरण म्हणजे पुण्यांतील एका पुढारीवजा गृहस्थांनीं गायकवाड वाड्यांतील गणपति-उत्सवांत भाषण करतांना आपल्या खादी-वरील टीकेंत जी ओंगळ शब्दयोजना केली होती, ती दृष्टीस पडतांच तात्या-साहेबांनीं सिमल्याहून दिलगिरी प्रदर्शित केली. अभिजात शिष्टाचार हा त्यांच्या वृत्तींतच बाणलेला होता. कलकत्त्याच्या काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठीं सुरेंद्रादिकांनीं जलदी करून दादाभाई नवरोजी यांना विनंती केली, व अशा रीतीनें टिळक अध्यक्ष होण्याचा संभव दूर केला. हा एक पक्षीय राज-कारणाचा डाव होता. पण टिळकांनीं याचें वर्णन 'लुचेगिरीची घाई' असें केलें. असाच एक योग किंवा कुयोग केळकरांच्या बाबतींतहि घडून आला.

काँग्रेसचे अध्यक्ष होण्याचा मान केळकरांना मिळणें अगदीं नजीक येऊन ठेपलें होतें. परंतु म. गांधींनीं सरोजिनीबाईंचें नांव मोठ्या आग्रहानें पुढें आणलें. अर्थात् त्याच निवडून आल्या. पण या प्रसंगीं तात्यासाहेब यांनीं विलक्षण संयम दाखवला. चिडावयास त्यांना पुरेसें कारणहि होतें. परंतु स्वाभाविक सौजन्यामुळें त्यांनीं या गोष्टीचा फारसा कोठें उल्लेखहि केला नाहीं.

टिळकांशीं वागण्यांत आणि टिळकांच्या प्रत्येक कामांत विधायकत्वानें उपयोगी पडण्यांत केळकरांनीं सभ्यता, संयम, आणि आपल्या बलाबलाची जाणीव ही दर वेळीं इतक्या प्रांजलपणें दाखवली कीं, याच माणसाचा आपल्याला खरा उपयोग आहे, हें टिळकांनीं बरोबर ओळखलें. हेच आपले गुण तात्यासाहेब यांनीं प्रतिपक्षाशीं वागण्यांत अनेकदां दृग्गोचर केले. अगदींच निकरावर आलें तर प्रतिपक्षाला घायाळ करण्याला लागणारा संपादकीय खवचटपणा ते प्रसंगविशेषीं प्रकट करीत. पण हें अगदीं क्वचित् आणि मनाला फारच लागलें म्हणून. एरवीं होत असलेल्या टीकांकडे ते दुर्लक्ष करीत. या त्यांच्या सभ्यतेमुळें त्यांना जवळ जवळ अजातशत्रुत्व लाभलेलें होतें. कडकडीत विरोधकांच्या शिबिरांतसुद्धां त्यांच्यासंबंधानें आदराची भावना वसत असे. आणि हे प्रतिपक्षी त्यांच्याशीं ऋजुतेनें वागत. म्हणूनच असें म्हणावेंसें वाटतें कीं, " He was a card or calender of Maharashtra gentry ! " केळकरांच्या अंगीं कांहीं दोष नव्हते असें मला मुळींच म्हणावयाचें नाहीं. त्यांचें स्वभाव-सौजन्य आणि त्यांची अभिजात सभ्यता एवढ्या दृष्टीनेंच मीं त्यांच्याकडे येथें पाहिलें आहे.

---

७ : : पाठान्तराची पैदास

वाङ्मयाच्या पांडित्यांत पाठान्तराचा अभ्यास हा एक मोठा कटकटीचा विषय बनून राहिला आहे. या विषयाचा अभ्यास केल्यावांचून आणि पाठान्तराच्या गुंत्यांतून बाहेर पडल्याशिवाय पांडित्य पुढेंच सरूं शकत नाहीं. बहुधा असें दिसून येईल कीं, चिकित्सकांनीं पाठान्तराचा डोंगर पोखरावा आणि त्यांतून उंदराचें पिटुकलेंच बाहेर पडावें. पण हा डोंगर पोखरून या पिटुकल्याशिवाय दुसरें कांहीं बाहेर पडत नाहीं हें तरी सिद्ध करावें लागतें; आणि यांतच किती तरी विद्वानांची चिकित्साबुद्धि खर्ची पडत असते. पाठान्तरांचा अभ्यास म्हणजे शुद्ध काथ्याकूट आहे असें अभ्यासकच शेवटीं शेवटीं म्हणूं लागतात. पण अभ्यासाच्या पूर्तीसाठीं हा काथ्या त्यांना कुटावा लागतो हें मात्र खरें. पूर्वी चुकीचे समज कोणते होते आणि लोकांनीं कोणते अपसिद्धान्त पत्करले होते याचीहि माहिती भौतिक शास्त्रांच्या अभ्यासांत करून घ्यावी लागते. वास्तविक पाहतां ते समज आणि ते सिद्धान्त चुकीचे होते हें ठरलेलें असतें, तर मग पुन्हा त्यांची माहिती करून घेण्याचा खटाटोप अभ्यासकांनीं कां करावा ? पण एखाद्या प्रमेयाची वाढ कशी होत आलेली असते, आणि कोणकोणत्या अपसमजुतींच्या कांटेऱ्यांतून संशोधकाला जावें लागलेलें होतें, याचा अभ्यास इतिहास म्हणून, किंवा पुन्हा त्या त्याच चुका होऊं नयेत म्हणून करणें भाग असतें. तोच प्रकार पाठान्तराच्या अभ्यासांतसुद्धां होतो. अभ्यासक हे पाठान्तराला भुललेले असतात असें नव्हे, पण एकदां हीं सगळीं पाठान्तरें चिकित्सेवर घासून पहावीं, आणि कांहीं तरी निर्णय करावा असा तर त्यांचा हेतु असतोच; पण पुढल्या लोकांनीं पुन्हा या पाठान्तरांकडे वळूं नये म्हणून तीं कशीं चुकीचीं आहेत हेंहि त्यांना दाखवून द्यावें लागतें, आणि या प्रयत्नांची नोंद शिल्लक ठेवावी लागते. अर्थातच सामान्य वाचकांच्या दृष्टीनें हा अभ्यास कितीं जरी कंटाळवाणा असला तरी त्यांनाच भलभलत्या भ्रमांतून सोडविण्यासाठीं या अभ्यासाची आवश्यकता असते.

पाठांतर म्हणजे दुसरा पाठ. एका पोथींत एक पाठ असला तर त्याच विषयाच्या दुसऱ्या पोथींत विवाक्षित ठिकाणीं दुसराच पाठ असतो. आणि त्या त्या पोथीचे जे अभिमानी लोक असतात, ते आपला पाठ सोडायला कधीं तयार नसतात. आपला पाठ त्या दुसऱ्या पाठापेक्षां अधिक चांगला आहे, असें त्यांना दाखवून देतां येतें आणि म्हणून तो ते सोडून देत नाहींत असेंहि नव्हे; तो पाठ केवळ त्यांच्या घरच्या पोथींत आहे, एवढीच जाणीव त्यांना पुरेशी असते. गवई लोकांत ज्याप्रमाणें, त्याच-प्रमाणें शास्त्री मंडळींतहि घराणीं असतात आणि आपापल्या घराण्याचें वैशिष्ट्य सांभाळून घरण्याची कसोशी प्रत्येक घराण्यांतील लोक करीत असतात. थोडेंबहुत सत्य प्रत्येकाच्या बाजूला असतें आणि घराण्याच्या अभिमानाला तेवढें पुरेसें ठरतें. खरें म्हटलें म्हणजे प्रांजलपणा पत्करून या मंडळींनीं आपापलीं पाठांतरें तारतम्यानें तपासून पाहिलीं पाहिजेत आणि कोणता तरी एक निकाल मान्य केला पाहिजे; पण घराण्याचा अभिमान आड येतो आणि पाठांतरें टिकून राहतात.

आधुनिक काळांत हा पाठांतराचा अभ्यास बराच चलन पावला आहे. आणि ज्या कोणाला परंपरेच्या अभिमानानें फारसें पछाडलेलें नाहीं तेच पंडित या अभ्यासाला प्रवृत्त होतात. अर्थदृष्ट्या, कालदृष्ट्या ते या पाठांतराचीं परीक्षणें करतात आणि ग्रंथाच्या मूळ हेतूंशीं त्यांतल्या त्यांत सुसंगत भाग कोणता याचा निकाल करतात. पण एवढें मात्र ध्यानांत हवें कीं, विद्वानांनीं जरी इकडे कांहीं निकाल केला तरी ज्या पोथ्या त्यांनीं जमा केलेल्या असतात, त्या पोथ्यांच्या घराण्यांतील लोकांचा अभिमान तसाच गुबारा धरून बसलेला असतो.

एक अगदीं साधा विचार आपल्या मनांत येतो तो हा कीं, पाठांतरें तरी उत्पन्न कां व्हावींत? जो मूळचा लेखक असेल तो आपल्याच मज-कुराचे निरनिराळे पाठ आपल्या ग्रंथांत गोवून ठेवीत असेल असें खचितच म्हणतां येणार नाहीं. त्याला जें कांहीं म्हणावयाचें होतें तें त्यानें एका ठराविक वाक्यानें किंवा शब्दसंहतीनें म्हटलेलें असणार. मग हें निश्चित असतांना हीं पाठांतरें निपजतात तरी कशीं? या प्रश्नाचें उत्तर फार मनोरंजक आहे.

पाठ करणारे लोक, दुसऱ्या स्त्रीकडून शब्द घेणाऱ्या स्त्रिया, पाठ केलेलें गाऊन दाखविणारे लोक, जाणूनबुजून नवा मजकूर घुसडणारे लोक, छापखान्यांतील कच्चीं मुद्रितें तपासणारे लोक, यतिभंगाचें पातक न ओळखणारे लोक, आपली किमया लोकांच्या वाङ्मयांत शिरकाविणारे भोळे भक्त, कीर्तनाच्या सोयीसाठीं अनेक उतारे एकत्र करणारे हरदास, मोडी लिपी नीट न जाणणारे लोक, हे सारे पाठांतराचेच जनक होत. वेदवाङ्मयांत असल्या लोकांना कोणीं शिरूं दिलें नाहीं आणि असले प्रमादहि होऊं दिले नाहींत. जबड्यांतून निरनिराळे उच्चार होऊं शकतात. उच्चारांत विकृति होऊं शकतात, हें त्या मूळच्या लोकांना माहीत झालेलें होतें. म्हणून त्यांनीं वेदवाङ्मय कंठगत करण्याचे ठाम नियम करून टाकलेले होते. एकच शब्द पाठ करावा, मग दोन पाठ करावे, तीन पाठ करावे; मग पहिला आणि दुसरा एकत्र करून म्हणावे; दुसरा आणि तिसरा एकत्र करून म्हणावें; मग सारे एकत्र करून म्हणावें अशासारखी कैची त्यांनीं उत्पन्न केली होती. आणि किती सहस्र वर्षें झालीं कोणास ठाऊक, वेदपठन करणाऱ्या वैदिक ब्राह्मणांनीं ही कैची यत्किंचितहि ढिली होऊं दिलेली नाहीं. पाठांतराची भीति फार प्राचीन काळींच उत्पन्न झाली असली पाहिजे आणि म्हणूनच त्यांनीं पठनाची ही पद्धति भक्कम करून टाकली.

पण वेदवाङ्मयाला जरी हें शक्य झालें तरी सर्वच तऱ्हेच्या वाङ्मयाला हें झेपण्यासारखें नव्हतें. असला जाच सहन करणारे लोक सहसा भेटत नाहींत ! आणि म्हणून पाठांतर उत्पन्न करणाऱ्या जनकांची नामावळी वर सांगितल्याप्रमाणें तयार होत जाते !

जे प्रमाद घडघडीत दिसतात त्यांनासुद्धां पाठांतराचें वैभव प्राप्त होतें. कारण ते प्रमाद आहेत इकडे लक्षच जात नाहीं. तोंडीं बसलेल्या ओळींचा अर्थ दामटून कसा ना कसा करावा, फार झालें तर त्या सोडूनच द्याव्या, असे साधे इलाज पाठ म्हणणारे लोक आणि त्या संहितेचा अर्थ सांगणारे लोक योजीत असतात. " केला मातीचा पशुपति । परि मातिसी काय म्हणती ॥ शिवपूजा शिवासी पावे । माती मातीमधिं सामावे ॥ तैसे

पूजिती आम्हां संत । पूजा घेतो भगवंत ॥ " इत्यादि तुकारामाचा अभंग मोठ्या गंभीर अर्थानें भरलेला आहे. लोक तुकारामबोवांच्या पायां पडूं लागले; त्यांना तें अगदीं नकोसें वाटे; पण लोक आपला हट्ट सोडीनातः शेवटीं यांच्या मनांत नसतांनासुद्धां पायांवर डोई ठेवूं देणें त्यांना प्राप्तच झालें. मनांत तर असें वाटत असे कीं, हें कांहीं बरें होत नाहीं. या मानसिक जाचांतून बाहेर पडावयास तुकाबुवांनीं एक अतिशय सूक्ष्म स्वरूपाचा तात्त्विक विचार सांगितला आणि तोच या अभंगांत ग्रथित केला आहे. बोवा म्हणाले, " पूजेसाठीं मातीचें लिंग करतात, त्याची पूजा करतात पण ती पूजा शिवाला पोंचते आणि माती मातींत जाऊन मिसळते. त्याप्रमाणें संत म्हणजे भक्त आमच्या पाया पडतात खरे, पण ही पूजा आमच्याद्वारां भगवंत घेतो. ती तिकडे पोचती झाल्यावर आमचे मृण्मय देह इतरांच्या देहासारखेच कुचकामी आहेत असें समजावें." " केली काशाची जगदंबा । परि कासे नव्हे अंबा ॥ " काशाची जगदंबेची मूर्ति करून लोक तिच्या पायां पडतात, पण ते काशाच्या पायां पडत नाहींत, जगदंबेच्या पायां पडतात. अर्थात् लिंगाच्या मातीला किंवा मूर्तीच्या काशाला कसलेंहि महत्त्व नाहीं. हा विचार अगतिक बनलेल्या तुकारामबोवांनीं अतिशय विनयानें सांगितला आहे. हा जर नीट लक्षांत घेतला तर आरंभींच्या ओळींतील "म्हणती" शब्दाला कसलाहि अर्थ उरत नाहीं. त्या ठिकाणीं ' महती ' असा पाठ पाहिजे. महती म्हणजे महत्त्व. मातीचा पशुपति म्हणजे मातीचें लिंग केलें खरें, पण त्यांत मातीला काय महती म्हणजे महत्त्व आहे ? ' शिवपूजा शिवासी पावे ' आणि ती झाली म्हणजे टाकून दिलेलें मातीचें लिंग मातींत मिसळतें. ' महती ' असा पाठ घेतला म्हणजे हा सारा अर्थ युक्तीला जमून दिसतो. पण ' म्हणती ' हाहि पाठ चालूच आहे आणि तो तुकारामबुवांच्या चांगल्या अधिकृत व अगदीं आधुनिक आवृत्तींतसुद्धां दिलेला आढळतो. महती, महती असें म्हणतां म्हणतां, त्याचें ' म्हणती ' झाले आणि तो एक नवा पाठ बनला.

छापखानेवाले लोक सुद्धां पाठांतरें उत्पन्न करतात, खिळे जुळविणारे आणि प्रुफें तपासणारे असल्या पाठांतराचे जनक असतात ! एका चांगल्या छापखान्यांत छापलेल्या ग्रंथांत ज्ञानेश्वराचें एक सुप्रसिद्ध पद असें दिलें

आहे : "मोगरा फुलला फुलला। फुलें वेंची तातबा रूक्ळीयांसी आला। मोगरा फुलला फुलला ॥" छापलेल्या पुस्तकांतूनच कोणी झालें तरी आतां पाठ करणार आणि त्याच्या तोंडीं हाच पाठ बसणार. पण अर्थाकडे लक्ष द्यावयाचें म्हटलें तर त्या पाठ करणाराची केवळ फजिती होईल. 'मोगरा फुलला' इथपर्यंत बरोबर आहे. 'फुलें वेंची' यालाहि थोडाबहुत अर्थ आहे. 'तातबा' कोण हें सांगतां येण्यासारखें नाहीं. पण फुलें वेंचायला कोणीतरी हवा म्हणून 'तातबा' चाहि निर्वाह कदाचित् करतां येण्यासारखा आहे. पण पुढें 'रूक्ळीयासी आला' म्हणजे काय? हें मात्र कोणचाहि कोश उघडून पाहिला तरी कळण्यासारखें नाहीं. पण विवेचनाच्या कामीं 'दामट्टन देणें' किंवा 'अल्लाद उडी मारून जाणें' असा कांहीं प्रकार प्रतिपादकांना करावा लागतो. आणि छापखानेवाल्यानें तयार केलेल्या या प्रमादाला पाठांतराचा महिमा प्राप्त होतो. शेंकडों लोकांना मूळ पद काय आहे तें माहीत आहे. तें असें आहे : "मोगरा फुलला फुलला। फुलें वेंचितां अतिबारू कळीयासी आला." म्हणजे, "मोगरा फुलला आहे; हो फुलला आहे. जो जो फुलें वेंचावीं, तोडावीं, तों तो कळ्यांना जास्तच बहर येत आहे." ज्ञानेश्वर हा बालयोगी वेदान्तांतील कैवल्य समजावून सांगूं लागला आणि त्याच्या प्रतिपादनानें मोगरा फुलल्याचा भास लोकांना होऊं लागला. जों जों अर्थ ग्रहण करावा आणि शंका विचारांव्या तों तों ज्ञानेश्वरांच्या प्रतिपादनाच्या कळ्या जास्त-जास्तच बहरूं लागल्या. असा हा उदात्त अर्थ या पदांत सांगितला आहे. पण नवीं पाठांतरें उत्पन्न करण्याचा अधिकार प्राप्त झालेल्या छापखाने-वाल्यांनीं त्यार्चे काय भर्दे करून टाकलें आहे तें पहा !

तुकारामबोवांच्या अभंगांच्या एका अधिकृत प्रतींत एका अभंगाची ओळ अशी दिली आहे : "कस्तुरीचें रूप अति हीनवर। माजी असे सार मोल तया" कस्तुरीचें रूप अतिशय हीन म्हणजे काळें असतें पण तिचें सार 'माजी' म्हणजे आंत असतें आणि त्यालाच खरें मोल आहे. असा या ओळीचा अर्थ आहे. पण ध्यानांत न आल्यामुळें छापणारानें आणि म्हणणारानें 'हीनवर' हा पाठ बनविला आहे. मुळांत 'हीन, पर' असा पाठ असला पाहिजे. आणि खरा अर्थ त्यांतूनच निघतो. "कस्तुरीचें रूप अतिशय हीन म्हणजे काळें असतें, पर–परंतु माजी म्हणजे मध्यें पोटांत तिचें खरें सार

म्हणजे तिचा सुगंध असतो, आणि त्याचेंच खरें मोल असतें.'' पण 'हीन, पर' 'हीन, पर' असें म्हणतां म्हणतां त्याचें 'हीनवर' झालें किंवा छापखानेवाल्यानें केलें. आणि नवा पाठ तयार झाला, व पुस्तक प्रमाण असतें म्हणून पाठ करणारांच्या तोंडीं हाच बसला.

एकनाथांनीं पुष्कळ रूपकें लिहिलेलीं आहेत. 'जोहार' नांवाचें एक रूपक आहे. आपल्याला माहीतच आहे कीं, रूपकाच्या नांवाखालीं एकनाथ वेदान्त सांगत असत. या रूपकांत पुढील पाठ दिलेला आहे : 'हरिपंतानें कौल द्यावा। शिवाजी बाजीनें लुटून न्यावा। यमाजी कोतवाल यांनीं दंड घ्यावा' इ. आतां आपल्याला एकनाथांच्या वेदांताशीं प्रस्तुत कांहीं कर्तव्य नाहीं. पण ते जीव आणि शिव यासंबंधानें बोलत आहेत एवढें मात्र खरें. जीव आणि शिव असा अनुक्रम न ठेवतां, शिव आणि जीव असा क्रम त्यांनीं पत्करला आहे. जी हा प्रत्यय बहुमानार्थी लावतात, हें आपल्याला माहीत आहे. शिवानें आणि जिवानें असें म्हणण्याच्या ऐवजीं शिव व जीव हे दोन्ही शब्द एक करून त्यांच्यापुढें जी हा बहुमानाचा प्रत्यय एकनाथांनीं लावला आणि 'शिवा-जिवाजीनें लुटून नेला' अशी ओळ लिहिली. आतां छापखानेवाल्यांना हा पाठ पसंत पडेना! त्यांनीं लुटून या शब्दाकडे जास्त लक्ष दिलें. 'शिवाजी लुटारू होता आणि त्याचा शिष्य बाजीराव यानेंहि त्याचेंच अनुकरण केलेलें होतें' असें त्यांना शाळामास्तरांनीं सांगितलेलें असलें पाहिजे. या ज्ञानाचा उपयोग करून, "शिवाजिवाजीनें यांतील 'शिवाजि' हीं अक्षरें निराळीं काढून त्यांनीं शिवाजी बनविला आणि लुटीला हें जमून दिसलें. पुसें 'वाजीनें' हें एकटेंच पडलें, दुसरा लुटणारा बाजीराव म्हणून 'व' च्या पोटांत एक रेघ मारून त्यांनीं वाजीचा बाजी बनविला आणि अशा रीतीनें 'शिवाजी बाजीनें लुटून न्यावा' असा नवा पाठ तयार झाला. एकनाथस्वामी शिवाजीच्या आधीं, आणि अर्थातच बाजीरावाच्याहि पुष्कळच आधीं निजधामाला गेलेले होते. ते शिवाजीचा आणि बाजीचा उल्लेख करणार कसे? इकडे या पाठांतराच्या जनकाचें लक्षच गेलें नाहीं! अर्थात् आतां पुस्तकावरून जोहार पाठ करणारे 'शिवाजी बाजीनें' असेंच म्हणत राहणार आणि कदाचित् त्याचाच हट्ट धरणार. अशी ही पाठांतरांची किमया असते.

पाठांतरांची किमया करणारांत आपण गाणारांची गणना केलेलीच आहे. या गाणारांत पवाडे म्हणणारे गोंधळी येतात. आपल्या नांवाला अनुसरून गोंधळ्यांनीं मूळ पोवाड्यांत काय वाटेल तो गोंधळ केलेला आहे आणि त्यांच्या तोंडचे पवाडे जलदीनें उतरवून घेणाऱ्या प्रकाशकांनीं आपली नवी भर या गोंधळांत घातली आहे. पण ही अपुरी आहे असें समजूनच कीं काय, या उतरून घेणारांची मोडी लिपी ज्यांनीं बाळबोध केली त्यांनींहि या कामाला मोठाच हातभार लावलेला आहे. अशा रीतीनें तिघांनीं मिळून मोठीं चित्रविचित्र पाठांतरें निर्माण केलेलीं आहेत.

गोंधळी वादळी हवेचें वर्णन करतांना म्हणतात, 'भुलांप, उलुका भालुरीत, घन, विजवा कडकडती!' या त्यांच्या कवनांचा अर्थ कळणें खरोखर दुरापास्त आहे. श्री. यशवंतराव केळकरांसारख्या चिकित्सकांनीं जेव्हां छडा लावून पाहिलें तेव्हां मूळ पाठ असा ठरला कीं, "भूकंप, उल्का, भालु, रिक्तघन, विजवा कडकडती" म्हणजे भूकंप झाले, उल्का पडल्या, भालू म्हणजे कोल्ह्यांच्या बायका रडल्या, बिनपाण्याचे ढग गरजले आणि विजा कडकडल्या." पण मूळ पाठ किती गमतीदार आहे तो पहा. आणि तो मोडी वाचणारांनीं बनवला असला तरी गोंधळ्यांच्या तोंडीं बसून गेलेला आहे.

"नानाला बंदुखानी तोफा करणारा" या पाठाला कसलाहि अर्थ नाहीं. "जाजाला (जेजाला) बंदुखा नी (आणि) तोफा गरनाळा" असा मूळ पाठ केळकरांनीं दिलेला आहे. पण मूळच्या मोडीचें वाचन प्रकाशकांनीं कसें केलें आहे, तें आधीं दिलेल्या पाठांतरांत पहा.

मूळ गाणाराला म्हणावयाचें आहे कीं, 'पांडुरंगा होशि न जागा.' 'पांडुरंगा, तूं जागा होत नाहींस.' पण प्रकाशकांनीं नवा पाठ बनवून तो गोंधळ्याच्या तोंडीं घातला आहे. तो असा : 'पांडुरंगा होशिल जागा'. 'खंडाळा मोड लिंबाट' ही शब्दसंहति कितीहि आळवून म्हटली तरी तिच्यांतून कांहीं अर्थ निघावयाचा नाहीं. पण 'बंडावा मोडली वाटें' हें तिचें मूळ रूप म्हटलें म्हणजे वाटेनें बंडें मोडलीं हा अर्थ सहजच ध्यानांत येतो.

आणखी एक गोंधळ्यांची चूष पहा : गोंधळी म्हणतात कीं, 'कोण देतो हत्तीकडे तोंड.' मूळ संदर्भात याला कांहीं अर्थ उरत नाहीं. शुद्ध पाठांतर असें आहे कीं, "कोण देतो हो तिकडे तोंड"! पाठांतरांची निपज गाणारे, मोडी उतारा करणारे आणि मोडीचें बालबोध करणारे किती मेहनतीनें हा उद्योग करतात, हें आपल्या चांगलें ध्यानांत भरलें असेल. दुर्लक्षानेंहि अशाच कांहीं कांहीं मौजा घडून पाठांतरें निर्माण होतात. आतां बायकांना वाचतां येतें. पूर्वी शब्द घेण्याची चाल असे. म्हणजे जिला एखादें गाणें येत असे तिच्याकडून दुसरीनें एकेक शब्द विचारून घ्यायचा. एक शब्द पाठ, मग दुसरा विचारून घ्यायचा, एक शब्द पाठ मग दुसरा विचारून घ्यायचा, मग तिसरा, मग चौथा, असें करीत जायचें. अशा रीतीनें सबंध गाणें बायका पाठ करीत असत. आमच्या आत्याबाईंनीं सारें व्यंकटेशस्तोत्र असा 'शब्द घेऊनच' पाठ केलेलें होतें. पण या देण्याघेण्याच्या धांदलींत मूळ गुरूनें किंवा या शिष्यानें एक नवा पाठ तयार करून ठेवला. व्यंकटेश-स्तोत्रांत असा पाठ आहे कीं, 'माझा गळा, तुझें दावें। देवा मला धरून न्यावें॥' म्हणजे 'हे देवा! तूं आपलें दावें माझ्या गळ्याला लाव आणि मला तुझ्याकडे ओढून ने.' पण आमच्या आत्याबाईंना पाठ मिळाला होता तो असा : 'तुझा गळा, माझें दावें। देवा मला धरून न्यावें." म्हणजे देवाचा गळा आणि यांचें दावें, असा उलटा योग जमणार होता! पण हाच पाठ आमच्या आत्याबाई शेवटपर्यंत म्हणत होत्या. देवाला हें कसें काय मानवलें असेल तें असो. भक्तमंडळी मूळची वस्तु अधिक सुरस आणि ठाकठीक करून घेतात असें दिसतें. 'येथें कां तूं उभा रामा' हें रामदास-स्वामींचें मूळ पद लहान म्हणजे चार ओळींचेंच आहे. पण स्वामींची मूळ कल्पना पूर्णपणें वाढवून भक्तमंडळींनीं तें चांगलें घवघवीत बनवलेलें आहे. आणि सर्वांच्या तोंडीं आतां तेंच आहे. जुन्या पाठांतरांच्या अभिमान्यांनीं ही नवीन किमया करणारांशीं खुशाल भांडत बसावें; अस्सल आणि नक्कल यांचा वाद करावा, पण लोकांच्या तोंडीं नक्कलच राहणार हें खास.

गवई मंडळीसुद्धां या पाठांतर-निर्मितीच्या कामांत सामील झालेली असतात! भैरवी रागांतली एक चीज त्यांच्या तोंडीं असते :—

'अयत बिंब उठ जा घर मत छुवे मेरी हाथ' अशी या चिजेची

पहिली ओळ आहे. हिच्यांतील पहिल्या दोन शब्दांचा कांहींहि अर्थ होत नाहीं. 'अयत बिंब' हें संस्कृतासारखें कानांला गोड लागतें इतकेंच. मूळ पाठ असा आहे कीं,—

'अये तबीब (म्हणजे 'अरे तबीबा, अरे वैद्या!') तूं आपल्या घरीं निघून जा. माझ्या हाताला तूं शिवूं नको. माझी नाडी तूं पाहूं नको.'

आतां तबीबानें आपल्या हाताला हात लावून नाडी कां पाहूं नये असें मानिनीला वाटलें असेल, हें रसिकाला सहज समजण्यासारखें आहे. 'अयत बिंब' वाल्यांना मात्र तें मुळींच समजावयाचें नाहीं!

'मुख मोर मोर मुसकाते जाते' म्हणजे 'मुख मुरडून मुरडून माझ्याकडे हंसून पहात जातो' अशासारखा चांगला अर्थ या चिजेंत वर्णिलेला आहे. पण गवय्यांनीं निराळा पाठ बनाविला आहे. "मुख मोड मोड मोसे कहत जात' म्हणजे तोंड वेडेंवांकडें करून म्हणजे मला वेडावून दाखवून तो माझ्याशीं बोलत जात आहे.

एका चिजेंत म्हटलें आहे, कीं 'सा सुंदर बदन के मंदन दीपन मनरंजन जाते छिपेरे। निकसी के सुन्दर ता काहे-लाजत अभ्र हिम, मुखचंद्र छिपेरे" बाकीचा अर्थ कांहींहि असो पण 'अभ्रहीम मुखचंद्र' हे शब्द वाचकांना सहज कळण्यासारखे आहेत. पण 'सैंया, गुया'चें गाणें गाणाऱ्या खांसाहेबांनीं 'निकसा के सुंदरता काहे लाजस इब्राहिम मुखचंद्र छिपेरे' असा पाठ बनविला आहे! एका पदांत संस्कृतवाल्यांनीं तबीबाचें बिंब बनाविलें आहे आणि या दुसऱ्या पदांत उर्दूवाल्यांनीं 'अभ्र हिमाचें' 'इब्राहिम' बनाविलें आहे. सरदार आबासाहेब मुजुमदार यांनीं असलीं गमतीदार पांठांतरें कितीतरी सांठवलीं आहेत. असो.

पाठांतरांचा काथ्याकूट पुष्कळदां वांझा ठरतो, तसा तो सफळहि होतो हें मान्य केलेंच पाहिजे. पण भाषाप्रमादांमुळें किंवा व्याकरणांच्या शुद्धाशुद्धांमुळें जरी तो पुष्कळदां उपयोगाचा ठरला तरी एक गोष्ट शिल्लकच राहते. अज्ञान, दुर्लक्ष, झिजत जाणारी परंपरा इत्यादींनीं नवीं पाठांतरें तयार होत असतात. आणि अनेकदां या पाठांतरांची चर्चा मूळ ग्रंथांच्या तात्पर्यांत कसलाहि फरक घडवून आणीत नाहींत. तथापि त्या विषयाची चर्चा पुन्हा केव्हां तरी करावयास हवी.

---

८ : : एक जुनीपुराणी मास्तरीण

मानवप्राणी हा सृष्टीचाच शिष्य आहे. पण हें सांगितलें तर, त्याला अवमानसुद्धां वाटेल. तो सृष्टीचा शिष्य आहे, असें म्हटलें म्हणजे सृष्टिदेवी हातांत छडी घेऊन बसली आहे आणि ती त्याला निरनिराळीं ज्ञानें पढवीत आहे, असें समजावयाचें नाहीं. तिनें त्याच्या अंगीं दोन शक्ति ठेविल्या आहेत : संस्कारक्षमता आणि अनुकरणशीलता, या शक्तींच्या बळावर आपलें शिक्षणाचें काम सृष्टि उरकते. यांच्या द्वारांच संवयी, नीति, वाणी, संगीत, सौम्यपणा, प्रखरपणा, मनाचें उड्डाण, संघटन, आवेश, असे कितीतरी प्रकार माणसानें सृष्टीपासून उचललेले आहेत. या शक्ति जर त्याच्या ठिकाणीं नसत्या तर माणसानें केलेला आजवरचा संस्कृतीच्या वाटेवरचा प्रवास त्याच्या हातून खचित झाला नसता. माणसाच्या गळ्यांत आवाज होता, पण त्याला शब्दरूप द्यावें, हें तो पशुपक्ष्यांचे शब्द, वस्तुजातांतून उठणारे ध्वनि यांच्या अनुकरणानें शिकला. त्याला गायनाची खुबी बहुधा साळुंकीकडून लाभलेली असावी. डोंगराचें जबरदस्त शिखर पाहून त्याच्या बुद्धींत स्थैर्यानें प्रवेश केला असावा. अश्वत्थवृक्षाच्या बुंध्याकडे पाहून त्याला शाश्वतीची कल्पना आली असावी. वेली आणि वेलांट्या यांनीं त्याला विनय शिकविला असावा. सूर्याचें तेज, सिंहाची गर्जना, वाघाच्या डरकाळ्या यांकडे पाहून प्रखरपणा, गांभीर्य आणि क्रूरपणा हे गुण त्याच्या ठिकाणीं उद्भवले असावे. ऋतुचक्र पुन्हा पुन्हा फिरतांना पाहून आवर्तनाची कल्पना त्याला आली असावी. शशिसूर्यांचीं आगमनें, आणि दिवस-रात्रींची उघडझांप पाहून त्याला कालाची आणि वक्रशीरपणाची कल्पना आली असावी. ही त्याच्या शिक्षणाची तरतूद, त्याचें आगमन पृथ्वीवर होण्याच्या आधींच होऊन राहिलेली होती. त्यानें आपल्याबरोबर फक्त संस्कारक्षमता आणि अनुकरणशीलता या दोनच शक्ति आणलेल्या होत्या. त्यानें उत्तरध्रुवाच्या आकाशांत नाना प्रकारचे रंग पाहिले आणि त्याच्या भावना-कोशांत कांहींशी जागृति झाली. पृथ्वीवर भ्रमन्ती करतांना,

क्षितिजाची रेषा हस्तगत होत नाहींसें पाहून विशालत्व त्याच्या मनांत भरलें. दऱ्याखोऱ्यांतून वहात येणाऱ्या व कड्यांवरून कोसळणाऱ्या प्रचंड नद्यांच्या झोतांनीं अस्थिरता आणि अशाश्वती यांचाहि झोका त्याच्या मनाला दिला. पावसाच्या धारा आणि जमिनींतून भराभर वर येणारे अंकुर यांनीं त्याला उत्पादनाची कल्पना आणून दिली. असें हें शिक्षणाचें काम चालू झालें असावें. सृष्टिदेवी आपल्या ठिकाणीं गप्प बसून होती; संस्कार व अनुकरण यांचें चक्र तिनें त्याच्या ठिकाणीं चालू करून दिलें होतें. आणि तें अत्यंत मंदपणानें गरगरत राहिलेलें होतें.

शास्त्रज्ञ सांगतात कीं, माणूस जन्माला येऊन लाखों वर्षें झालीं. त्याच्या संस्कृतीचा इतिहास पहावा, तर पांच हजार वर्षांच्या मागें जातां येत नाहीं. मग त्याच्या आधींचीं इतकीं वर्षें तो काय करीत होता? अत्यंत गंभीर असें मन आणि अत्यंत चपळ अशी बुद्धि त्याच्या ठिकाणीं पूर्णपणें विकसित होण्यांत हा एवढा दीर्घ काळ खर्ची पडला असावा काय? मनाला आणि बुद्धीला सहस्र पाकळ्या आणि शलाका आहेत; आणि त्या प्रत्येक पाकळीला आणि शलाकेला तितकेच फाटे पुन्हा फुटलेले आहेत. ही वाढ करून घेण्याला माणसाला इतकीं वर्षें लागलीं असावीं. पण ही वाढ चालू असतांना, त्याचा शिक्षक कोण म्हणून विचारलें, तर सृष्टि हें एकच उत्तर द्यावें लागेल. त्याला शिकवायला दुसरा कोण आलेला होता? त्याच्या मनावर दुसऱ्या कोणीं संस्कार केले? त्याला स्वादिष्ट फळें कोणीं खाऊं घातलीं? आणि निर्मळ जळें कोणीं पाजलीं? उष्ण काळीं आम्रवृक्षाची शीतल छाया त्याच्यावर कोणीं धरली? आणि शीतकालीं 'तूं ढोलीच्या आश्रयाला जा' असें त्याला कोणीं सांगितलें? हें सर्व काम सृष्टीनें केलें; आणि हें काम अगदीं संथपणानें चाललेलें होतें. जणूं कांहीं मनाची रचनाच होत होती; त्याच्या शक्तीच वाढीस लागत होत्या; त्याला नवीच चेतना प्राप्त होत होती; आणि आपल्याच ठिकाणीं होणाऱ्या बुद्धिस्फुरणांनीं तो भांबावून किंवा आनंदून जात होता.

पण हा चेतनेचा उबारा आणि ही स्फुरणांची उभारी कणाकणांनीं आणि अंशाअंशांनीं त्याच्या ठिकाणीं वाढत चालली होती; कणाकणांनीं

आणि अंशाअंशांनीं अशासाठीं कीं, त्याच्या मनाची संस्कारक्षमतासुद्धां आतांच्यासारखी तल्लख बनलेली नव्हती. कुंभाराच्या चाकांतून एखादा घडा हळूहळू कसा बनत जातो, हें तुम्हीं पाहिलें आहे काय? बरोबर तसाच प्रकार हा माणसाचा घडा बनतांना चाललेला होता. कुंभाराचा घडा कदाचित् एखाद्या प्रहरांत होत असेल, पण हा माणसाचा घडा बनायला लाखों वर्षें लागलीं असावींत. जशी इतर वस्तुजाताची, तशी त्याची वाढ कणशः आणि अक्षरशः होत होती. शास्त्रज्ञ आपल्याला सांगतात कीं, हा हिमालय पर्वत सारखा झिजत चालला आहे. पण दुसरीकडे याच्या अंगाची झीज सांठत चालली आहे. लाखों वर्षें गेलीं म्हणजे हिमालय सपाट होईल आणि त्याच्या झिजेचे लगदे एकावर एक सांठून दुसरीकडे त्यांचा एक उत्तुंग पर्वत होईल. जिथें पर्वत तिथें सपाटी आणि जिथें सागर तिथें डोंगर, असा सृष्टीचा बनाव चाललेला असतो. तोच अवाधि माणसाच्या बनावाला लागला असला पाहिजे. मानवप्राणी ही जर सृष्टीची सर्वोत्तम निर्मिति असेल, तर त्याच्या बनावाला इतका काळ लागणारच लागणार. एखादें वाळूक बनायला दोन-चार महिने पुरत असतील पण माणसाचा पिंड बनवायला सृष्टीला फार युगें लागलीं असतील. त्याचा देह नऊ महिन्यांत तयार होतो; पण त्याचें मूळ बीज तयार होण्याला लक्षावधि वर्षें लागलीं असतील. वटवृक्षांच्या बीजांतून बुंधा, शाखा, पालवी, फुलें, फळें एवढीं उत्पन्न होतात; पण माणसाच्या बीजांतून एक सुंदर आणि सावयव देह तयार होतो. एवढेंच नव्हे तर त्याच्या देहांतलें मन तयार होतें; आणि त्याच्या मस्तकांतील बुद्धि तयार होते. हें मन आणि बुद्धि तयार करायला सृष्टीनें कित्येक युगें खाल्लीं असलीं पाहिजेत. या अणुमात्र मनाच्या पोटांत नाना प्रकारच्या भावभावना, संकल्प-विकल्प यांची गर्दी उसळलेली असते. गर्दी अवघ्या विश्वाला व्यापून रहाते. पण ती अणुरूप मनाच्या पोटांत सामावून रहाते? त्याची बुद्धि सूर्यमंडलाच्या पलीकडे झेंपावत गेलेली आहे. तिनें अणुरेणूंचीं कपाटें खोलून पाहिलीं आहेत. कोठें तरी गूढांत झोपीं गेलेल्या बिजलीला तिनें चुचकारून आपल्या मंदिरांत आणलेलें आहे. तिनें दूर दिगंतांत असलेल्या सृष्टिसामर्थ्याच्या पेशी उघडून पाहिलेल्या आहेत. असली ही बुद्धि तयार करायला सृष्टीला कित्येक युगेंपर्यंत श्रम करावे

लागले असतील. म्हणून पांच-सहा हजार वर्षांपूर्वीपर्यंत, लक्षावधि वर्षांचा जुना मानवप्राणी काय करीत होता, असें कोणीं विचारूं नये !

हें त्याचें मन आणि ही त्याची बुद्धि त्याच्या बिलोरी डोळ्यांतून बाहेर बघत असते. इतर पशुपक्षी पहातात पण माणसाचें पहाणें समुद्रतळाइतकें खोल आणि सूर्यमंडळाइतकें उंच असतें. ही दृष्टीची शक्ति अपुरी पडतेशी पाहून त्यानें पल्लेदार दुर्बिणी तयार केल्या आणि मग चंद्राचें भूपृष्ठ जणूं कांहीं त्याला हातानेंच चाचपून पाहतां येऊं लागलें. त्याला दूरचें ऐकूं येत होतें, पण तें अपुरें पडूं लागलें. मग त्यानें आकाशाच्या पोकळींत एक यंत्र बसविलें; आणि जगाच्या त्या टोकापाशीं निघालेला ध्वनि त्याला एका क्षणांत ऐकूं येऊं लागला. अशा रीतीनें, मन, बुद्धि आणि इंद्रियें हीं मथून काम करूं लागलीं. सृष्टीच्या इतर कोणच्याहि रचनेनें ही वर्धनशीलता दाखवलेली नाहीं. डोंगर डोंगरच राहिलेले आहेत. नद्या नद्याच राहिलेल्या आहेत. सत्ययुगांत वारा वहात होता तसाच तो कलियुगांत वहात आहे. मानवप्राणी मात्र आपलीं सामर्थ्यें भराभर वाढवीत चाललेला आहे. म्हणून असें वाटतें कीं, ही त्याची तयारी करून घ्यायला सृष्टीला कित्येक युगें लागलीं असलीं पाहिजेत. पण ही त्याची तयारी करवून घ्यायला त्याच्या ठिकाणीं संस्कारक्षमता आणि अनुकरणाची आवड हीं सामर्थ्यें नसतीं, तर यांतलें कांहींहि घडून आलें नसतें.

संस्कारक्षमता आणि अनुकरणशीलता हें माणसाचें मूळ भांडवल होतें. त्यानें आपल्या मनावर सहस्र संस्कार करवून घेतले. त्याच्या मनाची ओली कांच, इंद्रियांच्या द्वारां येत असलेलीं आवरणें आपल्या प्रकृतीशीं झटवून घेत राहिली. आणि स्वतःच्या प्रकृतीशीं एकजीव झालेल्या या आवरणांना किंवा संस्कारांना इंद्रियाच्या द्वारां पुन्हा प्रकट करीत राहिली. पर्वत, अश्वत्थ वृक्ष, वेलवेलांट्या, घोष करीत जाणारे नद्यांचे प्रवाह, सोसाट्याचा वारा, आकाशांतून कोसळणाऱ्या जलधारा, पहांटेच्या वेळीं रंगीबेरंगी झालेली पूर्व दिशा, मागून झळकत येणारें तें सूर्यबिंब, हीं सारीं त्याच्या शिक्षणाचीं साधनेंच बनलीं. गुरूनें जसा एकादा चेला तयार करावा, तसा सृष्टीनें या मानवाला आपला चेला बनाविलें. शाळेंतला गुरु

...ारती ग्रंथ संग्रहालय, ठाणे...
अनुक्रमांक 22cc वि. सि. ८७
क्रमांक 7773 दि. २४/१५

एक जुनीपुराणी मास्तरीण

विद्या देतो तेव्हां त्यांचीं विद्यादानांचीं साधनें म्हणजे काळा फळा, पांढऱ्या खडूचा तुकडा, एखादी शाईची रेघोटी, एखादी दगडाची पाटी, नाहींतर रंगीबेरंगी गोटी; पण सृष्टीनें मात्र सूर्य, चंद्र, तारका, वृक्ष, पाषाण, वेली, ऋतूंचीं आवर्तनें, आकाशाचा विस्तार, त्यावरील इंद्रधनुष्याची कमान, विजांचा गडगडाट, हीं आपलीं साधनें बनाविलीं. अशा शिक्षणानें मानवाचें मन तयार होत गेलें, मानवाची बुद्धि विकसित होत गेली. मानवाच्या इंद्रियांच्या शक्ति सहस्रपट वाढल्या!

त्याला वैखरी प्राप्त झाली. त्याला गायनाची लयकारी सुचली. त्याला फुलांचा सुगंध निवडतां येऊं लागला. त्याला उद्भिज्जाच्या बीजांचें ज्ञान होऊं लागलें. त्याला पशूंच्या सामर्थ्याच्या मर्यादा कळूं लागल्या. पशु हस्तगत करतां येतात, हें त्याच्या ध्यानांत आलें. त्याला विस्तव पेटवतां आला. होलगड कच्चा खाण्याच्याऐवजीं भाजून खाल्ला तर बरा लागतो, हें त्याच्या ध्यानांत आलें. यावरोबरच आकाशाची गंभीर कमान, पर्वतांचीं निमुळतीं होत गेलेलीं शिखरें, लाटा उसळणारे गोल जलाशय, उन्हानें-पावसानें पोकळी उत्पन्न होऊन मोठमोठाल्या पाषाणांच्या अंगांत पडलेल्या विस्तीर्ण कमानी या त्याच्या मनःफलकावर चित्रासारख्या उमटल्या. कोकिळेचा शब्द पुन्हा पुन्हा ऐकावा, असें त्याला वाटूं लागलें. गाईच्या हंबरण्यांत गोडी आहे, असें त्याला दिसूं लागलें. आणि डोंगराडोंगरांतिल प्रतिध्वनींच्या रूपानें नादावत जाणारी सिंहाची मंद्र गर्जना किंचित् भयप्रद वाटली तरी तिच्यांतहि गंभीर माधुर्य आहे, असा प्रत्यय त्याला येऊं लागला. शंभर शंभर पाकळ्यांचीं फुलें त्यानें पाहिलीं. आणि त्या पाकळ्यांचें एकावर एक बसलेले थर पाहून तर तो अगदीं वेडावून गेला. आकाशांतून पडणारे दंवाचे बिंदु षट्कोनी, चौकोनी, अष्टकोनी आकृति करून पडतात, हें पाहून तर तो आनंदून गेला. डोंगरांतून जसा प्रतिध्वनि तशी नद्यांच्या पाण्यांत पडलेली झाडांची पडछाया ही त्याला मूळ झाडापेक्षांसुद्धां जास्त मौजेची वाटूं लागली. साळुंकीचें अनुकरण करून त्यानें आपल्याहि आवाजाची किनारी पुष्कळ वेळ ओढत ठेवली. नदीच्या वाळवंटांत सांपडलेल्या मऊ दगडानें शेजारच्या काळ्या शिळेवर इंद्रधनुष्यासारखी कमान त्यानें काढली. इतकेंच काय, खड्ड्यांत सांपडलेली पिवळी-तांबडी मातीसुद्धां त्यानें त्या

कमानीवर हंथरली. वारा सुटला असतां, वृक्षांची आणि वेलीची पालवी ठेक्याठेक्यावर हादरलेली पाहून तो आपले पायहि तसेंच आपटूं लागला; आणि त्याच्या अनेक कलांचा जन्म झाला. त्याला बोलतां येऊं लागलें, गातां येऊं लागलें; त्याला आकृति काढतां येऊं लागली; त्याला रंगांचें सौंदर्य कळलें; त्याला नाचतां येऊं लागलें. एखाद्या शिळेच्या पृष्ठावर पडत चाललेल्या बारीक बारीक रेषांनीं माणसाचा सुंदर चेहरा उमटलेला आहे, असेंहि त्याला आढळून आलें; आणि मग हातांतल्या अणकुचीदार दगडानें आपण तसेंच कांहीं खोदावें, असें त्याला वाटूं लागलें. आणि यांतून त्याच्या खोदकलेचा जन्म झाला.

आपण समजतों कीं, कला आधुनिक काळांत जन्माला आलेली आहे. पण तें खरें नाहीं. कला फार फार जुन्या काळीं, म्हणजे माणूस जेव्हां केवळ अनगडच होता, तेव्हां अनुकरणबुद्धीनें त्यानें ती जन्मास घातली आणि त्याच्यापुढें अनुकरणासाठीं सृष्टीनें आदर्श धरला होता. विवंचून पहावें म्हणजे दिसून येईल कीं, कलेचे आश्चर्यकारक नमुने अत्यंत प्राचीन काळीं माणसानें उत्पन्न केले. तितक्या प्राचीन काळीं त्याचें ज्ञान मात्र इवलेंसेंच होतें. त्याच्या बुद्धीचा पल्ला कोंबडीच्या उड्डाणापेक्षां जास्त नव्हता. पण त्यानें त्या वेळीं प्रगट केलेली कला मात्र आपल्याला अजूनहि स्तिमित करून सोडते. सध्यांच्या कलावंतांना साध्य असलेलीं जीं उपकरणें आहेत, तीं त्यांच्यापाशीं बिलकूलच नव्हतीं. आपण सध्यां जास्त कलावान् आहों असें आपल्याला वाटतें; पण तो आपला गर्व फुकट आहे. शास्त्र-शोधांनीं प्राप्त करून दिलेल्या साधनांमुळें आपल्या कलेला वैविध्य प्राप्त झालेलें आहे आणि ती घरींदारीं खेळूं लागली आहे. पण शुद्ध कला म्हणून पहायला गेलें तर तिचीं सर्वोत्कृष्ट दर्शनें मानवाच्या अत्यंत प्राचीन काळच्या कृतींतच होतात; आणि यांचें कारण तरी इतकेंच कीं, अनुकरणाची विद्या तेवढ्या प्राचीन काळीं माणसाला साध्य झाली होती. आपण आतां वाटेल तितके नवे नवे शब्द बनवीत आहों; पण सर्व शब्दांच्या आदिस्थानीं असलेले जे मूळ ध्वनि ते अत्यंत प्राचीन काळीं मनुष्यप्राण्यानें अनुकरणानें सिद्ध केले. आपल्या मूळाक्षरांत अथवा Alphabets मध्यें आपल्याला फारशी दुरुस्ती करतां आलेली नाहीं. भाषाशास्त्रज्ञ किंवा वैयाकरण यांनीं तोंडांतून

निघणाऱ्या शेकडों शब्दांत मूळध्वनि कोणचे आहेत, ते चाचपून चाचपून निराळे काढले असतील आणि त्यांची वर्णमाला बनविली असेल; पण चाचपत असतांना त्यांच्या हाताला मूळध्वनि लागले ते त्या प्राचीन मानवांनीं अनुकरणानें आपल्या मुखांतून काढलेले होते. गायनशास्त्र्यांनीं गळ्यांतून निघणाऱ्या निरनिराळ्या तारस्वरांचीं उगमस्थानें शोधून काढलीं असतील; पण हे तारस्वर माणसानें आपल्या गळ्यांतून अनुकरणबुद्धीनें पूर्वी काढलेले होते. रंगांचीं निरनिराळीं मिश्रणें, गडद हात देणें किंवा साफ नाजूक हात देणें, रंग टिकाऊ करणें, ही किमया माणसानें आतां साध्य केली आहे; पण त्या प्राचीन मानवानें आकाशाचें पृष्ठ, इंद्रधनुष्य हिरवळीवर पसरलेले सूर्याचे किरण यांच्या रंगांचें अनुकरण मुळांत काळ्या-निळ्या मातीनें केलेलेंच होतें. तबला, मृदंग इत्यादिकांचा ठेका धरावा, पायांत चाळ आणि घुंगुर बांधावे, कमरेला किंकिणी बांधाव्या, आणि पायांचे तळवे भूमीवर सफाईनें टाकावे, हें कदाचित् आतां माणसांनीं अधिक मादक व अर्थवाहक बनविलें असेल, पण त्यांतून उत्पन्न होणारा आनंद त्या प्राचीन मानवानें नाचणाऱ्या वृक्षवेलींचें अनुकरण करून संपादिलाच होता. म्हणजे कलांच्या खऱ्या खऱ्या उगमस्थानांचा शोध, इतकेंच काय पण त्यांचा मोहक आणि अर्थवाहक विकास प्राचीनांनींच केलेला होता. कलांचे सर्वोत्कृष्ट नमुने अत्यंत प्राचीन काळच्या अस्पष्ट सावल्यांतहि आपल्याला सांपडतात. या कलांच्या बळावर माणसानें आपलें जीवित सुखी करून घेतलें.

त्याला ज्ञान फारसें नव्हतें. उद्भिज्यरूपाचें आणि खनिजरूपाचें धन पृथ्वीच्या पोटांत कुठें आहे, हें त्याला नीटसें कळेना. तारांगणें कोणच्या नियमानें चालतात, याचे फक्त ढोबळ नियम त्याला कळले; बाकी 'आश्चर्यवत् पश्यति' याच भूमिकेवर तो परवांपर्यंत उभा होता. जनावरें धरून आणून तीं रथ नांव पावलेल्या गाड्याला जुंपावीं, आणि त्यांतून प्रवास करावा एवढेंच त्यानें परवांपरवांपर्यंत केलें. मांजरें, कुत्रीं नाना प्रकारचे पाले खाऊन आपल्या रोगाचा परिहार करतात, तीच पद्धति या माणसानें अगदीं अलीकडेपर्यंत चालू ठेवली होती. आतां त्याला हवेंतून उड्डाणें करतां येतात; आणि वस्तूंचे गुणधर्म ओळखल्यानें त्याला औषधांचे

जणूं कांहीं मंत्र साध्य झाले आहेत. तो संतापला, भांडला म्हणजे परवां-परवांपर्यंत लांब सुरीनेंच म्हणजे तलवारीनें तो आपल्या शत्रूची मान कापीत राहिला होता. आतां मात्र त्याला अस्त्रविद्या प्राप्त झाली आहे. हीं दोन-अडीचशें वर्षें सोडलीं तर ज्ञानाच्या बाबतींत मात्र, त्याचें जीवित मागासलेलेंच होतें. पण कलेच्या बाबतींत मात्र, त्याची प्रगति कोणीकडल्या कोणीकडे झाली होती; आणि ती कित्येक सहस्र वर्षांपूर्वी झाली होती.

हा अज्ञानाचा, आपत्तींचा आणि मानसिक आलस्याचा काळ त्यांतल्या त्यांत सुखी करायला फक्त कला त्याच्या उपयोगी पडत राहिली. तो गात राहिला, नाचत राहिला, हातांत बारक्या बारक्या छिन्नी घेऊन पर्वतांचीं विशाल पठारें त्यानें खोदखोदून मोठमोठालीं मंदिरें कोरून काढलीं, अतिशय सुंदर मूर्ति घडवल्या आणि जें शृंगाराचें सुख कदाचित् थोड्याच लोकांना प्रत्यक्ष इतकें चांगलें मिळत असे, तें त्यानें या मंदिरांत चितारून ठेवलें. तो जर कसबी गायक असला, तर हजारों नागर श्रोत्यांना तो पहांटेपर्यंत डुलवीत राही आणि जर तो रानट असला तर ढोलग्याच्या ठेक्यांवर सारी रात्र आपल्या वस्तींतल्या बायका-पुरुषांना मद्याच्या नशेंत नाचत ठेवी. जीवित सुखाचें करायला, शास्त्रयुगाचा आरंभ होईतोंपर्यंत कलेइतके उपकार मानवावर कोणींहि केलेले नाहींत. अगदीं गरीब बायका काळ्या लुगड्यावर शुभ्र सुताच्या चांदण्या काढीत. जमलें तर बारीकबारीक कांचा त्यांत बसवीत. कुठल्याहि रानटी वस्तींत जा; ढोलकी, तुणतुणें आणि चाळ यांचा विलास तुम्हांला सांपडेलच सांपडेल. कारण मागासलेल्या जीवितांतील कठीणपणाचा परिहार या कलेनेंच होत जातो. असा हा कलेचा महिमा आहे.

श्रीमंत लोक कलेचे पोशिंदे बनतात. त्यांच्या नित्याच्या जीविताला कलेच्या सहाय्याची आवश्यकता नसते; पण पोशिंदेपणाचें सुख त्यांना हवें असतें. सामान्य लोकांच्या प्रपंचांत मात्र जर जीवित सुखाचें व्हावयास हवें असेल, तर कलेची आवश्यकता फार आहे. आणि म्हणूनच असें दिसून येईल कीं, चव्हाट्याच्या ठिकाणीं, स्वस्त दराच्या नाटकगृहांत लोकांची गर्दी अतोनात होते; आणि हें अगदीं स्वाभाविक आहे. मनाच्या विरंगुळ्याला

त्यांच्यापाशीं दुसरें कोणतेंहि साधन नसतें. कला जर त्यांच्या साहाय्याला गेली नाहीं तर ते व्यसनी बनतात. रंजन झालें नाहीं तर ते मादक वस्तूंची कांस धरतात, आणि विस्मरणाचा पेला पिऊन दुःखाचा परिहार करवून घेतात.

पण कलेला भुलून मी दूरवर गेलों! या कलेंतसुद्धां भावनांचा तरळपणा आणि बुद्धीचें चापल्य दिसतेंच. हा तरळपणा आणि हें चापल्य मानवी मनांत व बुद्धींत दिसावयाचें तें मन व ती बुद्धि सृष्टीनें कित्येक युगें वाढत ठेवली होती. आणि ही वाढ संस्कारक्षमता व अनुकरणाप्रियता या शक्तींच्या वापरानें त्या पुराण्या मास्तरणीनें घडवून आणिली!

---

९ : : गंडे-दोऱ्यांचें चेटूक

ताईत, गंडे-दोरे इत्यादिकांनीं कोणता गुण येतो हें निश्चयानें सांगतां येत नाहीं. पण पृथ्वीच्या पाठीवर कोठेंहि जा, प्रत्येक धर्माच्या अनुयायांत ताइतांचा आणि मंतरलेल्या दोऱ्यांचा प्रसार सर्वत्र झालेला दिसतो. हे लोक एका चांगल्या धर्माचे अनुयायी बनलेले असतात. त्या त्या धर्माचे जे प्रमाणभूत ग्रंथ असतात त्यांत असल्या चेटकांची शिफारस केलेली नसते. तसेंच ज्यांनीं ते ते धर्म प्रस्थापित केलेले असतात त्यांनीं स्वतःहि चेटकें लोकांच्या गळ्यांत बांधलेलीं नसतात. धर्मसंस्थापकांचे आचार अत्यंत उदात्त स्वरूपाचे होते, आणि परमेश्वराची प्राप्ति कशी करून घ्यावी व जीवितांत सुखाचा लाभ कसा करून घ्यावा यांचेंहि विवेचन त्यांनीं आपल्या ग्रंथांत केलें आहे. पण माणसांना एवढें पुरें पडत नाहीं असें दिसतें. परमेश्वर फार दूर आहे, आणि त्याचा प्रसाद प्राप्त करून घेण्याचा मार्ग फार दूरचा आणि अवघड आहे, असें सामान्य लोकांना वाटतें. त्यांना हा प्रसाद हवा असें मात्र वाटतें. त्यांना सुख हवें असतें. संकटें टळावयास हवीं असतात. दुखणीं बरीं व्हावींशीं वाटतात, आणि अनुकूल नशिबाचा फेरा आपल्याकडे लवकर वळावा असें त्यांना वाटतें. परमेश्वरस्वरूपांत विलीन होऊन जाणें, पूर्वकर्मांचा उच्छेद होऊन मग नशिबाची अनुकूलता प्राप्त होणें, अथवा सायुज्य मुक्ति मिळणें या गोष्टी चांगल्या असतीलहि; आणि परमार्थमार्गाचें क्रमण अमुक इतकें केल्यानंतर या आपल्याला लाभतील असें त्यांना वाटतें. पण त्यांच्या प्रस्तुतच्या गरजा अगदीं निराळ्या आणि लहान असतात. आवाहन केल्यानेंसुद्धां परमेश्वर त्यासाठीं आपल्याकडे धांवून येईल, किंवा त्याला 'ये' म्हणून म्हणावें हेंहि त्यांना योग्य वाटत नाहीं.

त्यांचा असा एक समज असतो कीं, परमेश्वराच्या खालोखाल उतरत्या श्रेणीनें अनेक सामर्थ्यें पृथ्वीवर वागत असलीं पाहिजेत. माणसाचा टापू

सोडला कीं मध्यें मोठी थोरली पोकळी सोडून पुढें एकदम परमेश्वराचेंच राज्य, हा हिशेब त्यांना बरोबर वाटत नाहीं. माणसाहून उत्तरोत्तर श्रेष्ठ, परमेश्वराहून उत्तरोत्तर कनिष्ठ,— पण माणसांच्या इंद्रियाला मात्र गोचर नसलेलीं अशीं अनेक सामर्थ्यें जगांत वावरत असलीं पाहिजेत,—आणि यांची मनधरणी केली किंवा थोडीशी लांच देऊन त्यांना संतुष्ट ठेवलें म्हणजे आपल्याला आवश्यक तीं सुखें लाभतील, आपलीं संकटें टळतील, आपलीं दुखणीं बरीं होतील, आणि नशिबाचे अनुकूल फेरे आपल्याकडे लवकर येतील असें त्यांना वाटतें. या सामर्थ्याच्या मनधरणींतूनच गंडे, ताईत, दोरे इत्यादिकांचा उदय झालेला असतो. म्हणजे एकीकडे धर्माच्या उदात्त तत्त्वांचा आणि थोर संदेशांचा अंमल आपल्या मनावर लोक चालूं देतात; पण दुसरीकडे एका जवळच्या वाटेनें आणि कांहींशा क्षुद्र इलाजानें ते आपले बारीकसारीक प्रश्न सोडवून घेण्याची वांछा धरतात. ही प्रवृत्ति सर्व काळीं सर्व देशांत चालू होती. भौतिक शास्त्रांचा अभ्यास ज्या देशांत जास्त, तेथील लोक या समजुतींतून बाहेर पडलेले आहेत. पण त्यांतसुद्धां वरच्या वरच्या लोकांसंबंधानेंच हें खरें म्हणतां येईल. तसल्या सुधारलेल्या देशांतहि सामान्य जनता अजून गंडे-दोऱ्यांतच वावरत असते. या चेटकांचा अंमल कसकसा चालू होता व अजूनहि आहे,—याची माहिती वाचकांना मनोरंजक वाटेल असा भरंवसा आहे.

बुद्ध-धर्मीय लोकांमध्यें व विशेषतः जेथें मूळ बुद्ध धर्माच्या जागीं 'लामा धर्म'च पसरला आहे त्या देशांत ताईत, गंडे-दोरे, मंत्रतंत्र इत्यादींचें प्रस्थ फारच माजलेलें होतें, व अजूनहि तें तसें आहे. उत्तरेकडील बौद्ध देशांमध्यें जवळजवळ प्रत्येक पुरुषाच्या, स्त्रीच्या आणि मुलाच्या गळ्यांत किंवा छातीवर ताईत किंवा गंडे-दोरे बांधलेले असतात. या ताइतावरील नक्षीकाम मोठें सुबक असून हे ताईत तांब्याचे, लांकडाचे, हाडांचे किंवा पुष्कळदां चांदीचेहि बनविलेले असतात, व त्यांच्यांत एक नीलमणि बसाविलेला असतो. ताइतांचा आकार चौकोनी, गोल, किंवा चिंचोळा असतो. चिंचोळा ताईत अंजिराच्या पानासारखा दिसतो. ताइताच्या डबींत साधु-पुरुषांचे अंगारे, भारलेले दाणे किंवा चिंध्या, एखाद्या देवाचें काढलेलें चित्र, अथवा मंत्र लिहिलेल्या चिठ्ठ्या बसवून ठेविलेल्या असतात. मूल एक वर्षाचें

झालें म्हणजे मोठा धार्मिक समारंभ करतात. त्याचें जीवन सुखाचें व्हावें म्हणून प्रार्थना करतात, आणि भूतपिशाच व रोगराई यांची बाधा बालकाला होऊं नये म्हणून त्याच्या गळ्यांत मंतरलेला ताईत बांधतात. तिबेटमधील विशेष तोलदारीच्या स्त्रिया जो कमरपट्टा घालतात, त्याला एक छोटेखानी मंतरलेली डबी अडकवलेली असते. एखादा तिबेटी पुरुष दूरच्या प्रवासाला किंवा कामधंद्याला निघाला म्हणजे सुखरूप परत यावें व काम फत्ते व्हावें म्हणून तो आपल्या अंगरख्याच्या बाहीला एक मंतरलेला कागद बांधतो. आपल्या घरादाराचें रक्षणसुद्धां हे मंत्रतंत्रयंत्र करूं शकतात असें त्यांचें मत असतें. घराच्या दाराशींच एक प्रार्थनास्तंभ उभा असतो, आणि कौलारावर मंतरलेल्या पताका फडफडत असतात. एखाद्या मध्यांत विशेष प्रकारच्या झाडाच्या फांद्या जळत ठेवल्या म्हणजे त्याच्या वासानें भुतें पळत सुटतात अशी त्याची समजूत असते. रोगराई दाराशींच थबकावी म्हणून उंबऱ्यापुढें चिंध्या, पाचोळा किंवा 'वाकुजी' नांवाच्या झाडोऱ्याच्या काटक्या यांचा ढिगारा घालतात. दारावर कांहीं पवित्र आकृत्या व त्यांच्या-खालीं पांढरीं व निळीं स्वस्तिक चिन्हें काढतात, आणि इतक्यांतूनहि भुतें किंवा रोगराई घरांत शिरलीच तर त्यांना चमकाविण्यासाठीं भिंतीवर मंतरलेल्या कागदांचे पट्टे डकवितात. ब्रह्मदेशांत तर ही तरतूद अगदींच जवळ करून ठेवलेली असते. असल्या पवित्र आकृत्या किंवा हीं चिन्हें तेथील लोक अंगावरच गोंदून घेतात.

सामान्य लोकांइतकेच येथील वृद्ध भिक्षुहि या मंत्रयंत्राच्या कचाट्यांत सांपडलेले असतात. ते एक वज्र जवळ बाळगतात. भूतांना भेडसाविण्यासाठीं गूढ आकृत्या कोरलेली एक मुठीची घंटा जवळ ठेवतात. मंतरलेल्या पताका शेजारीं उभ्या करतात. एक डमरूहि जवळ बाळगतात. आणि भुतांखेतांवर चालवावयास सांपडावें म्हणून 'फ्रम' नांवाचें एक पुढ्याचें किंवा लाकडाचें शस्त्रहि सज्ज ठेवतात. हें शस्त्र लांबट त्रिकोणी असून आठदहा इंच लांब असतें, व त्यावर 'अस्त्राय फट' अशांसारखीं अक्षरें लिहिलेलीं असतात. 'ओम् मणि पद्मेहम्' हा तिबेटी लोकांचा सर्वांत महत्त्वाचा नित्याचा मंत्र असतो. याशिवाय एकदां केलेल्या प्रार्थनेचें फळ अनेकदां मिळावें म्हणून ते रहाटावर कांहीं मंत्र चिकटावितात. हे रहाट जितके जितके

हे रहाट जितके जास्त फिरवावे तितकें त्यांना जास्त पुण्य लाभतें ! देवळाच्या दारांत असे अनेक रहाट असतात, आणि गाभाऱ्याच्या तोंडाशीं तर भला मोठा रूळच असतो. अर्थात् यावर डकवलेले मंत्र प्रत्येक फेऱ्याबरोबर भक्तांचा पुण्यसंचय वृद्धिंगत करीत असतील हें सांगणें नकोच ! पेरणीच्या किंवा कापणीच्या वेळीं तिबेटी बाया धर्मग्रंथांचे भारे शकुन म्हणून डोक्यावर घेतात. मग हे भारे खालीं ठेवून त्या गवताचे किंवा पिकाचे भारे डोक्यावर घेत असले पाहिजेत. बुद्ध धर्मातील तत्त्वें अत्यंत उदात्त आहेत, आणि तत्त्वज्ञानी भिक्षु त्यांचा प्रसारहि फार थोर हेतूंनीं करतात. पण सर्व प्रकारच्या लोकाचें अज्ञान कायमचें जिंकणें आणि या लोकांना सदैव ज्ञानी ठेवणें हें असें इतर कोणत्याहि धर्मगुरूंना साधलें नाहीं, तसें तें बौद्ध गुरूंनाहि साधलेलें नाहीं. दुय्यम दर्जाच्या सामर्थ्यांची पूजा करणें व त्यांचा संतोष राखणें, हें एक निराळेंच कलम आहे !

ज्या कोणा देवाच्या अगर दैत्याच्या गूढ नांवाचें ज्ञान आपण संपादन करूं, त्या देवावर अथवा दैत्यावर आपल्याला सत्ता चालवितां येते, अशी यहुदी लोकांची श्रद्धा होती. या नांवाचा मंत्रोच्चार केला म्हणजे एखादें झपाटलेलें माणूस भुताखेतांच्या तावडींतून मुक्त करतां येतें, असा त्यांचा समज होता आणि असें सांगतात कीं, अशा रीतीनें मुक्त झालेल्या अनेक माणसांच्या कथा यहुदी वाङ्मयांत आढळतात. डेव्हिडनें आपल्या गायनानें सॉल राजाच्या शिविरांत घर करून बसलेल्या पिशाच्चाला बाहेर हुसकलें अशी कथा आहे. एंडार गांवची एक चेटकी फार प्रसिद्ध होती. तिच्या निमंत्रणासरशीं मेलेलीं माणसें स्वर्गातून भूतलावर परत येत असत ! असल्या कल्पना ख्रिस्तशिष्यांच्या काळांतसुद्धां खूपच पसरलेल्या होत्या. इसवी सनाच्या दुसऱ्या शतकांत झालेल्या अशा अनेक कथांचा उल्लेख जस्टिस मार्टर यानें केलेला आहे. एका रोमन बादशहाच्या मुलीला ब्रेनटेमॅलियन नांवाच्या समंधानें पछाडलें होतें; तेव्हां सिमियन बेन योहाई नांवाच्या एका यहुदी मांत्रिकानें रोमला येऊन तिला बरें केलें, असें यहुद्यांच्या इतिहासांत लिहिलेलें आहे. येशूच्या नांवाचा उपयोगहि लोक याच कामासाठीं करीत. पण असल्या कामासाठीं येशूच्या नांवाचा उपयोग करणें अप्रशस्त आहे असेंहि लोक समजत. 'मोझेसची तलवार' या नांवाच्या

एका यहुदी पुस्तकांत अनेक मंत्रांची यादी दिलेली असून या मंत्रांचा उपयोग कोठें कोठें करावा, हेंहि त्यांत सांगितलेलें आहे, असें त्या वाङ्मयाचे अभ्यासक सांगतात.

हे मंत्र प्रथम केवळ तोंडीच जपत असत; पण पुढें भांड्यांकुंड्यांवर, मडक्यांवर किंवा कातड्यांवर लिहिल्यानेंसुद्धां गुण येतो, असें लोकांना वाटूं लागलें. ज्या पिशाच्चानें किंवा सैतानी दूतानें एखाद्याला पछाडलें असेल त्याचें नांव बिनचूक लिहून ताइतांत बंद करून ठेवलें तरीसुद्धां भुताखेतांचा उपद्रव नाहींसा होतो, असा समज होता. मात्र अशा ताइतांचा दुरुपयोग होईल कीं काय अशी भीति त्यांना वाटे. ज्यूडास मॅकेबसच्या शिपायांनीं लढाईत कांहीं मूर्ति आपल्या पैरणीखालीं दडाविल्या. त्यामुळें ते मारले गेले. पण जर त्यांनीं आवश्यक त्या देवदूतांचे ताईत गळ्यांत घातले असते तर हे शिपाई वांचले असते, असें तेव्हांच्या वाङ्मयांत लिहिलेलें आहे. रोग-निवारणासाठीं यहुदी लोक स्तोत्रें म्हणत असत. अमुक रोगावर अमुक स्तोत्र म्हणावें असें नियमहि असत. असें सांगतात कीं, यहुदी लोकांत ही स्तोत्र-गायनाची पद्धत अजूनहि चालू असून एखाद्याला अगदीं जिवावरचें दुखणें आलें असलें तर या स्तोत्रांच्या संबंध पोथीचें पारायण करावें लागतें. हे मंत्रतंत्र आणि हे ताईत तपशिलाच्या जंजाळांत इतके सांपडले कीं, त्यांचा उपयोग करणें कठीण होऊं लागलें. म्हणून यहुदी लोकांनीं मंत्रतंत्रांचा उपयोग अगदीं साध्या रीतीनें सुरू केला. कांहीं विशिष्ट नांवें कोरलेल्या डब्या, पदकें किंवा कातड्यांचे तुकडे गळ्यांत अडकविल्यानें गुण येतो, असें ते समजूं लागले. साध्यासुध्या औषधाच्या जरा पलीकडे रोग गेला कीं, ताइताचा उपयोग सुरू होई. कांहीं मनासारखें घडून यावयास हवें असलें तरीहि हे ताईत उपयोगी पडत. आपलें नशीब उघडावें, आपल्याला स्वास्थ्य आणि संपत्ति लाभावी, परिस्थिति अनुकूल बनून आपलें सामर्थ्य वाढावें, इतकेंच काय, पण अदृश्य संचाराची शक्ति आपल्या अंगीं यावी, शिकारींत किंवा युद्धांत आपल्याला यश मिळावें, प्रेतात्मांसुद्धां संवाद करतां यावा, नेहमीं विजय मिळवून देणारी तलवार प्राप्त व्हावी, अशा अनेक कारणांसाठीं मंत्रतंत्रांनीं भारलेल्या ताइतांचा उपयोग हे लोक करीत असत. आणि असें वाटतें कीं, निरनिराळ्या देशांत जेथें कोठें नव्या ज्ञानाचा

प्रसार पुरता झालेला नाहीं, तेथें या उपायांचा अवलंब आतांसुद्धां होत असावा. धर्मांचीं तत्त्वें कितीहि थोर असोत. या तत्त्वांना सारेच लोक शरण जातात; पण जवळपासचीं अदृश्य सामर्थ्यें वश करून घेणें हेंसुद्धां आवश्यक आहे आणि तीं वश करून घेतां येतात, असा सर्व देशांतील सर्व लोकांचा समज होता. यहुदी स्त्रिया आपल्या अंगावरच्या दागिन्यांतसुद्धां अशा ताइतांचा उपयोग करीत. चंद्रकोरीच्या आकृतीचे ताईत फार शुभ समजले जात. मिडानी राजानें युद्धाच्या वेळीं आपल्या उंटांच्या गळ्यांत सुद्धां चंद्रकोरीचे ताईत अडकविलेले होते. कांहीं कांहीं रत्नेंसुद्धां शुभ मानीत. रक्तप्रवाळ हें रत्न म्हणजे शुभांतलें शुभ होतें. आजहि उत्तर-अरबस्तानांत सामान्यतः प्रत्येक स्त्रीच्या, मुलाच्या, घोडीच्या किंवा उंटिणीच्या गळ्यांत दृष्ट लागूं नये म्हणून असल्या शिंपल्यांच्या माळा घालतात. आपण शहाणे होतों; पण अमक्या-तमक्यांचा सहवास घडल्यामुळें अनेक भ्रांत कल्पना आपल्या समाजांत शिरल्या आहेत, असा अनेक लोकांचा दावा असतो. यहुदी लोक मूळचे शहाणेच होते; पण मिसर, बाबिलोन इत्यादि देशांतील मागासलेल्या लोकांचा आणि यांचा संबंध आल्यापासून असल्या गूढ गोष्टींवर त्यांचा विश्वास बसूं लागला, असें त्यांच्यांतील विद्वान् लोक सांगतात.

परंतु असल्या संबंधांची आवश्यकता असते, असें बिलकुल म्हणतां येत नाहीं. मुंगीपासून माणसापर्यंत प्राणिमात्र अधिक अधिक अधिकारसंपन्न होत गेलेले आपण पाहतों. वरचेवरचे प्राणी खालच्याखालच्या प्राण्यांना वाटेल तसें वळवून आणि राबवून घेतात. आतां प्राणियोनी माणसापाशींच थांबल्या आणि तेथून पुढची ढांग एकदम परमेश्वराच्या राज्यांतच पडते, असें माणसानें कां समजावें? आपल्याहिपेक्षां श्रेष्ठ आणि सूक्ष्म अशा योनी वर वर असूं शकतील; आपल्याला त्या गोचर नाहींत, इतकेंच काय तें. त्यांना मात्र आपण गोचर असूं. आणि आपला अंमल जसा खालच्या खालच्या जीवनसृष्टीवर चालतो, तसा या सूक्ष्म योनींचा अंमल आपल्यावरहि चालत असेल असें कोणाला वाटलें तर तर्कदृष्ट्या त्यांत कांहीं चूक नाहीं. इतकेंच कीं, या योनी आपल्या ओळखीच्या झाल्या आहेत आणि त्यांचे रागलोभ, खिजविणें अमुक एका साधनानें करतां येतें, हा या लोकांचा दावा

कितपत खरा असतो हाच काय तो प्रश्न असतो. आणि हा दावा खोटा आहे, असें सर्व आधुनिकांचें मत होत चाललें आहे. म्हणून चेटूक, मंत्रतंत्र, गंडे, ताईत हे इलाज जलदीनें मागें पडत आहेत.

मंत्रतंत्र इत्यादिकांचा उपयोग करण्याचा खिस्ती धर्मानें निषेध केला आहे. फ्रिजिअन किंवा केल्टिक वंशांतील लोकांत हे समज फार रूढ होते. पुढें पुढें कॅथॉलिक लोकांतहि या कल्पना फैलावल्या, इतकेंच नव्हे तर त्या धर्मपीठांतहि घुसल्या. अगदीं आरंभीं इजिप्तमधील नॉस्टिक लोक जादूटोणा करीत; पण पुढें कॅथॉलिक धर्मपीठांतहि हा जादूटोणा शिरला. कॅथॉलिक धर्मपीठामध्यें प्रेतें ठेवण्याचीं जीं भुयारें म्हणजे 'कॅटॅकोम्स' आहेत, त्यांत खुद्द जीझसच्या हातांतच जादूची कांडी दाखविलेली आहे. जुन्या खिस्ती पंडितानें म्हटलें आहे कीं, "सायमन पीटर हा दैत्य लोकांना जादूनें मारून टाकतो तर सायमन मॅगस हा ख्रिस्तशिष्य त्यांना जादूनें उठवितो. या दोन गोष्टींत विरोध आहे हें खरें; पण हीं परस्परविरुद्ध कार्यें घडवून आणण्यास दोघांनींहि योजिलेला उपाय—म्हणजे जादू—हा एकच आहे. खिस्ती माणसाच्या प्रश्नांना प्रत्येक दैत्यानें जबाब दिलाच पाहिजे व खिस्ती माणसाच्या साध्या श्वासोच्छ्वासासरशी खिस्ती नसलेल्या लोकांचे मंत्रतंत्र निष्फळ ठरतील अशी खिस्ती लोकांची श्रद्धा आहे."

इतिहासकारांचें म्हणणें असें आहे कीं, अनेक धर्मपरिषदांनीं व विचारवंतांनीं आटोकाट यत्न केले तरी इसवी सनाच्या चौथ्या शतकापासून जादूटोण्यावरील खिस्ती लोकांचा विश्वास बळावतच गेला. कोणी आजारी पडलें किंवा कोणी हरवलें कीं ते असल्याच चेटकाचा उपयोग करीत. हुतात्मपूजेच्या प्रसारानंतर आणि कूसाचा महिमा वाढल्यावर धर्मपीठामध्यें अनेक वस्तूंचें पावित्र्य वाढत गेलें. इसवी सनाच्या सहाव्या ते आठव्या शतकांमध्यें जादूटोणा आणि पवित्र वस्तूंची पूजा यांना ऊतच आला! पोप ग्रेगरीनेंसुद्धां त्याचें समर्थन केलें. पुढें फ्रान्समध्यें व रोमन साम्राज्यांतहि या समजुती सर्वत्र पसरल्या. शार्लमेन राजानें मात्र या समजुतींचा बीमोड करण्याचें मनावर घेतलें. पण धर्मगुरूंनींच त्यांचा पाठपुरावा केल्यामुळें शार्लमेनच्या विरोधाचें बळ अगदीं मोडलें. इसवी सनाच्या पंधराव्या व सोळाव्या शतकांमध्यें विद्येचें पुनरुत्थान होऊन नवें

ज्ञान व नवी संस्कृति यांचा प्रसार होऊं लागला, आणि धर्मप्रसारकांनीं धर्मांतील मूळ उदात्त उपदेशाच्या आधारावर भ्रामक समजुतींचा उच्छेद आरंभिला. ल्यूथर, कॅल्व्हिन इत्यादींनीं भ्रमनिरासाला चांगलाच जोर आणला तरी पण असल्या अपसमजुतींचे अवशेष ख्रिस्ती समाजांत अजूनहि शिल्लक आहेत.

सुधारक ख्रिस्ती गुरूंनीं पुष्कळच खटपटी केल्या; पण अपसमजुतींचें बंड मानवी मनांत आपोआपच उत्पन्न होत असल्यामुळें एकीकडे त्याचा बीमोड करावा तों दुसरीकडे तें फोंफावत आहे, असें ख्रिस्तीसमाजांत शतकानुशतकें दिसत आलेलें आहे. रोममधील लोक गळ्यांत शिशाच्या फुंकण्या घालीत किंवा छोट्या छोट्या डब्या अडकवीत. पुढें ख्रिस्ती धर्माचा प्रसार झाला, तेव्हां फरक इतकाच पडला कीं, या नळ्यांच्या किंवा डब्यांच्या जोडीला लोक ख्रिस्ताचा क्रूसहि लावूं लागले. पॅट्रिआर्क निकोफोरस यानें म्हटलें आहे कीं, 'येशूच्या चरित्रांतील चित्रें कोरलेले सोन्याचांदीचे क्रूस गळ्यांत घालण्याची पद्धत ख्रिस्ती लोकांत पूर्वापार चालत आलेली आहे. आणि जे कोणी ही मूर्तिपूजा आहे म्हणून हे क्रूस गळ्यांत घालणार नाहींत, ते खरे ख्रिस्ती नव्हते.' पोप पहिला निकोलस यानें मंत्रतंत्र, जादूटोणा यांवर शस्त्र उचललें; पण जे मंत्रतंत्र आणि जादूटोणे ख्रिस्तीतर समाजांतून ख्रिस्ती लोकांत शिरत असत, त्यांच्यावर त्याचा रोष होत. खुद्द ख्रिस्ती समाजांत ज्या मूळच्याच अपसमजुती होत्या, त्यांच्यावर त्याची मात्रा चालली नाहीं.

आजारीपण हेंहि भूतबाधेमुळेंच येतें, अशी समजूत असल्यामुळें जप करणें, रोग्याच्या अंगाला पवित्र तेलांचें मर्दन करणें, किंवा सालोमनच्या अंगठीसारख्या वस्तू रोग्याच्या हातांत घालणें, असले प्रकार सगळीकडे रूढ होते. एखाद्या मांत्रिकाला किंवा चेटकाला रोग्याचे आईबाप बोलावून आणीत आणि त्याच्याकरवीं रोग्याच्या गळ्याभोंवतीं किंवा अंगाभोंवतीं चिंध्यांच्या गांठी मारीत. गांठी मारल्यावर हे मांत्रिक किंवा या चेटक्या रोग्याला उद्देशून म्हणत, "तूं एखाद्या झाडांत, एखाद्या जनावराच्या अंगांत किंवा कोंबड्याच्या देहांत प्रवेश कर आणि आमच्या या रोग्याला मुक्त कर."

ख्रिस्ती धर्म-प्रसाराच्यापूर्वी जर्मन शेतकऱ्यांत नाना प्रकारच्या अपसमजुती असत. ख्रिस्ती महंतांना वाटे कीं, 'आपला धर्म घेतल्याबरोबर हे लोक या समजुती टाकतील.' पण लोक असे बहाद्दर कीं, त्यांनीं आपल्या या समजुतीच ख्रिस्ती धर्मावर लादल्या. शेवटीं ख्रिस्ती धर्मगुरूंनीं आपल्या कल्पनांचा मुलामा त्यांना दिला आणि मग पूर्वेकडून आणलेल्या ख्रिस्ताच्या रक्ताची मिरवणूक हे जर्मन शेतकरी घोड्यावरून काढूं लागले. दुष्काळ पडला कीं, सेंट रोझॅलीन याच्या अवशेषांची मिरवणूक काढूं लागले आणि सुगीच्या वेळीं हवा चांगली रहावी म्हणून सेंट फ्लोरेंटिया याच्या नांवाचा जयजयकार करूं लागले. पीक भरपूर यावें म्हणून जमिनीवर पवित्र पाणी शिंपण्याची प्रथा पडली. दूधदुभतें चांगलें यावें म्हणून नवे मंत्रतंत्र सुरू झाले. पाऊस पडावा म्हणून दिशांचें प्रोक्षण सुरू झालें. पीक चांगलें यावें म्हणून तर एखाद्या नागव्या मुलीच्या उजव्या पायाला कांहीं वनस्पति बांधून इतर स्त्रिया तिला नदीवर नेत व तिचा देह पाण्यानें प्रोक्षण करीत. पर्वतावरील अमुक एका सरोवरांत धोंडे टाकल्यानें वाईट हवा पडते, या गोष्टीवर १६ व्या शतकांतीलहि ख्रिस्ती लोकांची एवढी श्रद्धा होती कीं, त्या सरोवरांत धोंडे टाकण्याला सरकारनें कायद्यानें बंदी केली. गारांचा पाऊस मॅगोनिया नांवाच्या देशांतून येतो व तेथील लोक आपलीं फळें आकाशमार्गानें पळवितात, असाहि लोकांचा समज होता. नवरीच्या मांडीवर वाटाणे टाकल्यानें, झाडावर धरलेलें पहिलें फळ तिनें खाल्ल्यानें, वर्च झाडाच्या पिठाची लापशी तिनें भुरकल्यानें किंवा मंद्राक्रिस ही वनस्पति जवळ बाळगल्यानें त्या नवरीची कूस चांगली समृद्ध ठरेल, असा समज होता. याच कामासाठीं टरगोना येथील संत मॅगीनस याचा करगोटाहि उपयोगी पडत असे. बाळंतपण सोपें आणि सुरक्षित व्हावें म्हणून बिछायतींतून रांगणें, दारांचीं आणि पेट्यांचीं कुलपें काढणें, चाकूंचीं पातीं उघडणें इत्यादि उपाय ते करीत असत. मूल जन्माला आल्यावर मंत्रोपचार तर होतच असत; पण निरनिराळ्या नांवांच्या मेणबत्त्या लावीत आणि त्यांपैकीं सर्वांत अधिक काळ जळत राहणाऱ्या मेणबत्तीचें नांव मुलाला ठेवीत.

प्रियकर किंवा प्रेयसी दुसऱ्यावर लुब्ध होऊन आपल्याला मिळत

नाहीं, असें दिसूं लागतांच मंत्रसाथ्यांनें त्यांना ठार मारावयास निघालेल्या माणसांचीं उदाहरणेंहि तेव्हांच्या सामाजिक इतिहासांत वाटेल तेवढीं सांपडतात. प्रियकरानें उंबऱ्याखालीं कांहीं इजिप्शियन अक्षरें लिहिलेला कागद पुरल्यामुळें एका कुमारिकेला कसें वेड लागलें, याची हकीकत जेरोम या लेखकानें दिलेली आहे. खिस्ती इतिहासकारांचें म्हणणें असें कीं, खिस्ती नसलेल्या रानटांकडून आम्हीं खिस्ती लोकांनीं असले उपाय उचलले असावेत. जादूचीं औषधें, मंतरलेली पत्रावळ, सुया खोंचलेलीं नारिंगें किंवा मेणबत्त्या, बेडकांच्या हाडांचीं प्रेमालिंगनें, प्रियकर माणसाच्या अंगाला गुप्तपणें लाविलेलीं एका झाडाचीं फळें, या उपायांचा उपयोग प्रीतिसाधनासाठीं करीत. प्रियकर, माणसाच्या देहांतील कोणताहि पदार्थ आपल्या अन्नांत कालविणें हा उपाय सर्वांत प्रियकर ठरलेला होता! प्रियकराचें रेत किंवा प्रियेचें रज अन्नांत कालविण्यापर्यंतहि या लोकांची मजल गेलेली होती. याला सत्‌धर्म तरी काय करणार? आणि येशूचें झालें काय किंवा इतर कोणाचें झालें काय, उदात्त तत्त्वज्ञान किती खोलपर्यंत जाऊं शकणार? माणसाचा मूळ पिंड अज्ञान, भोळेपण, मूर्खपणा यांनीं नेहमींच लडबडलेला असतो.

चेटकासाठीं शिशाच्या पेट्या जवळ बाळगत आणि प्रेताबरोबर या वस्तूहि पुरण्यांत येत. हेतु हा कीं, त्या पेट्यांतील चेटूक, पुरलेल्या माणसांबरोबर स्वर्गांत पोंचावें, आणि आपला जो वैरी तेथें आधींच जाऊन पोंचला असेल त्याला बाधा व्हावी. शर्यतीमध्यें प्रतिस्पर्धी दुबळा ठरावा म्हणून मूठ मारण्याची चाल असे! मध्ययुगांतहि जादूनें माणसांचीं जनावरें मारतां येतात असा लोकांचा समज होता. शत्रूचें काळीज फुटावें म्हणून त्याच्या घरापुढें जनावरांचें काळीज खिळ्यानें ठोकून बसवीत. त्यांच्या दारापुढें मढें पुरीत किंवा लांकडांची होळी करीत. टोलेडो गांवीं एक मोठी धर्मपरिषद् झाली. तिच्या इतिवृत्तावरून दिसतें कीं, पाद्री लोक मृतात्म्यांचीं नांवें घेतांना जिवंत शत्रूंचींहि नांवें त्यांत बळेंच घालीत किंवा जळती मेणबत्ती मुद्दाम जमिनीवर पाडून विझवीत. असें केल्यानें शत्रूचा नाश होतो असा समज होता. स्तोत्रें उलटीं वाचलीं म्हणजे वस्तुजातांतील नैसर्गिक क्रमहि फिरवितां येतो, असा समज होता! हें सारें अपसमजुतींचें

रान खिस्ताच्या उदात्त उपदेशानेंसुद्धां पुरतें नाहींसें झालें नाहीं. अजूनहि, वरकरणीं जे लोक सुधारलेले दिसतात, त्यांच्या आचरणांत या किंवा यांसारख्या दुसऱ्या समजुतींचा मागमूस शिल्लकच असतो. खरें-खोटें कोणास ठाऊक, पण अमेरिकेचे सध्यांचे प्रेसिडेंट आयसेनहॉवर हे दुसऱ्या महायुद्धासाठीं घराबाहेर पडतांना शकुन बघण्यासाठीं दोन नाणीं एकावर एक घांसून बाहेर पडले होते.

जगांतील इतर लोकांच्या अपसमजुतींचा पसारा असाच मोठा होता व आहे. त्याची माहिती पुन्हा केव्हां देऊं.

---

१० : : गिरिजन आणि परिजन

आपण ख्रिस्ती मिशनऱ्यांना नांवें ठेवतों; नाना प्रकारच्या कारवाया करून आणि पुष्कळदां नाना प्रकारचीं आमिषें दाखवून ते हिंदु धर्मांतील लोकांना बाटावितात, याचें आपल्याला स्वाभाविकपणेंच मोठें वैषम्य वाटतें. यावर प्रतिक्रिया सुरू होऊन ख्रिस्ती धर्मांत गेलेलीं माणसें परत आपल्या धर्मांत आणण्याची मोहीम जोरानें चालू झालेली आहे व तिला यशहि चांगलें येत आहे. ठिकठिकाणचे ख्रिस्ती मठ गांगरल्यासारखे झाले आहेत, आणि कांहीं कांहीं ठिकाणचे मठ तर अजीबातच उठले आहेत. या मठवाल्यांना युरोप व अमेरिका येथील श्रीमंतांकडून आणि सुप्रतिष्ठित धर्मसंस्थांकडून चांगल्या प्रकारचा आश्रय असे; परंतु अलीकडे अलीकडे हा आश्रय दोन कारणांनीं तुटूं लागला. आश्रय देणारांच्या कानांवर ही वर्दी गेली कीं, हिंदु समाजांत प्रतिक्रियेला सुरुवात झाली आहे, व वर्ष वर्ष वेगा देऊन जो मठ एखादा मनुष्य ख्रिस्ती बनवितो त्याच्या छत्राखालून बेटेंच्या बेटें परत हिंदु धर्मांत जात असतात. अर्थात् हा असला आंतबट्ट्याचा व्यापार करीत राहणें त्यांना नकोसें झालें असलें पाहिजे. पण याहीपेक्षां बलवत्तर कारण म्हणजे ख्रिस्ती धर्माच्या प्रसारावरची त्यांची श्रद्धाच उडाली आहे. आणि खुद्द ख्रिस्ती धर्माविषयींसुद्धां, आधुनिक काळाला अनुसरून त्यांच्या मनांत साशंकता उद्भवली आहे. अर्थात् कोठें तरी पृथ्वीच्या पाठीवर चार माणसें आपल्या पैशानें ख्रिस्ती झालीं म्हणून त्यांच्या आत्म्याचें तारण होणार आहे, या गोष्टींतला दूरान्वय त्यांना पटेनासा झालेला आहे. आणि म्हणून त्यांनीं आपल्या दातृत्वाचा हात एकदम आंखडता घेतला आहे. अशा प्रकारें हिंदु समाजांतून सुरू झालेली प्रतिक्रिया आणि आश्रयदात्यांचें आटत चाललेलें दातृत्व यांच्या माऱ्यानें जिकीरीस येणारे ख्रिस्ती धर्माचे मठ लटपटूं लागले असावे हें बरोबरच आहे.

परंतु आपलें समाधान एवढ्यानें होतां उपयोगाचें नाहीं. आपण ख्रिस्ती मिशनऱ्यांना हंसतों हें ठीक आहे, पण त्यांच्यापासून एक गोष्ट

मात्र निःसंशय शिकण्यासारखी असते. जनसेवेचें व्रत त्यांना पटलेलें असतें; तें आपल्याला अजून पटावयाचें आहे. सुमारें ४५ वर्षांपूर्वी मी एकदां पाडळीच्या स्टेशनवरून साताऱ्यास तांग्यांतून चाललों होतों. माझ्या शेजारीं एक युरोपियन बाई बसली होती. तिच्या मांडीवर आपल्या इकडल्या कोणा तरी अस्पृश्याची मुलगी होती. टांग्यांत बसल्यावर कांहीं वेळानें अर्थातच आमचें बोलणें सुरू झालें. त्या मुलीला व तिला पाहून मला मोठा विस्मय वाटून मीं तिला विचारलें, आपण कोठून आलां? ती म्हणाली कीं, मी स्वित्सर्लंडमधील आहे; मला अनेक भाषा येतात; येशूच्या धर्माचा प्रसार करण्यासाठीं मी हिंदुस्थानांत आलें आहे. आतां या स्विस् बाईनें स्वित्सर्लंडमधील आपल्या घरांतून उठावें आणि स्वधर्मप्रसारासाठीं गरीबी पत्करून हिंदुस्थानांत रहावें – हीच गोष्ट अगोदर विस्मयकारक आहे. परंतु ती धर्मप्रसारासाठीं जर आली होती तर येशूचा संदेश लोकांपुढें सांगून तिनें संतोष मानला असता कीं झालें असतें. पण येशूच्या धर्माचा प्रसार केवळ तत्त्वांच्या प्रतिपादनानें होत नाहीं. धर्मप्रसारकांना लोकसेवेचें व्रत पत्करावें लागतें. दुःखितांचें दुःख निवारण करणें, रुग्णांची परिचर्या करणें, आणि अडाण्याला शिक्षण देणें हीं कामें करणें त्यांना अवश्यच असतें. तत्त्वप्रतिपादनाला जर या गोष्टींचा पाठिंबा नसला तर आपल्या धर्मातील भूतदयेचा संदेश लटका पडेल असें त्यांना वाटतें. आणि म्हणून या दूरस्थ बाईनें महारवाड्यांतील मुलांना शिकविण्याचें काम पत्करलेलें होतें.

पुष्कळ तरुण लोक विचारतात कीं, काय काम करावें? ज्याच्या त्याच्या कानाशीं राजकारणाचा पडघम वाजतच असतो. समाजाकडे लक्ष द्यावयास फार थोड्यांना फुरसत उरते. हिंदु लोकांच्या अंगीं समाजाकडे बघण्याची वृत्ति जोंपर्यंत उत्पन्न होत नाहीं तोंपर्यंत त्यांचें लोकशाही राजकारणसुद्धां पुढें सरणार नाहीं. लोकांत शिरावें तें त्यांना कांहीं तरी उंच दर्जाचें सांगण्यास शिरावें, त्यांचे रागलोभ जागृत करावे आणि त्यांना कोणत्या ना कोणत्या तरी चळवळींत गोवून द्यावें, एवढ्यावरच हे लोक संतुष्ट असतात. म्हणजे असें कीं, या लोकांचा त्यांना उपयोग करून घ्यावयास हवा असतो. कोणी कोणत्याहि मताचा असो,–त्याच्या विचाराची धाटणी हीच असते. लोक ही ओळखून असतात. हे आपल्याकडे कां आलेले आहेत याचा उमग

त्यांना लवकर पडतो. त्यांच्या मनांत आपला उपयोग सर्पणासारखा करून घ्यावयाचा आहे, हें कळण्याचा चरतुपणा अगदीं अशिक्षित असूनसुद्धां त्यांच्या अंगांत असतोच असतो. आणि मग या आलेल्या पाहुण्यांच्या संबंधानें कांहीं सवद्याची बुद्धि त्यांच्या मनांत उत्पन्न होते. आपल्या समाजांतील अज्ञ लोकांची अपेक्षा खरोखर अशी असते कीं, कोणीं तरी आपल्या बऱ्यासाठीं झटावें, आपलें अज्ञान कोणीं तरी घालवावें, आपल्या अडीअडचणीला त्यांनीं उभें रहावें, व आपल्याला जर कोणी छळणारे असले तर आपली कड घेऊन कोणीं त्यांचा प्रतिकार करावा. काय काम करावें म्हणून विचारणाऱ्या तरुण हिंदु मुलांना मीं ही गोष्ट हजारदां सांगितली आहे कीं, काम पुष्कळ आहे – पण तें तुमच्या चवीचें असेलच असें माझ्यानें म्हणवत नाहीं. कांहीं विशेष प्रकारचा डांगोरा असला, वर्तमानपत्रांत नौबत वाजण्यासारखी असली, किंवा 'तुरुत दान महापुण्य' या पद्धतीचें एखादें काम असलें तर तें तुम्हांला हवें असतें. पण मी जें काम तुम्हांला सांगेन त्यांत कीर्ति नाहीं, जाहिरात नाहीं, अन् चुटपुटतेपणाहि नाहीं. तुम्ही जनसेवेचें व्रत पत्करा. असें म्हटलें म्हणजे या उत्साही तरुणांना ही फार दूरची गोष्ट आहे असें वाटूं लागतें. त्यांना "पी हळद अन् हो गोरी" असें कांहीं तरी घडावयास हवें असतें. अर्थात् माझ्या उत्तरानें त्यांची निराशा होते.

सर्व तरुणांना कळावयास हवें कीं, हिंदु समाजांत आर्त प्रजा फार आहे. त्यांना कोणी तरी वाली हवा असतो. अगदीं निरिच्छ अन् निर्लोभ मनानें या लोकांच्या सेवेला प्रवृत्त होणें हें हिंदु समाजाच्या उद्धाराला आणि त्याच्या भावी सामर्थ्याला अत्यंत अवश्य आहे. खिस्ती मिशनरी त्यांच्यांत शिरतात म्हणून नुसतें जळफळण्यांत कांहींच मतलब नाहीं. ते जनसेवा करतात, पण त्यांना आपल्या धर्माचा प्रसार करावयाचा असतो असा आक्षेप कोणी कोणी घेतात. हा आक्षेप बालिश आहे. धर्मप्रसारासाठीं कां होईना– पण अत्यंत बिकट अशी जनसेवा ते करतात हें शिल्लक उरतेंच. बरें, तुम्हांला तरी तीच गोष्ट व्हावयास हवी आहे. आपला धर्म टिकावा व त्यांच्यामध्यें डोळसपणानें तो आचरणांत यावा अशीच तुमची इच्छा आहे ना? मग ही फलद्रूप होण्याला आपणहि जनसेवेचें व्रत कां पत्करूं नये? खिस्ती मिशनऱ्यांच्या सेवेपेक्षा आपण केलेली सेवा आपल्या लोकांना फार जलद

पटेल अन् ती त्यांच्या अंगींहि लागेल. ज्याची भाषाहि आपल्याला समजत नाहीं, जो आपल्या देशचाहि नव्हे, आणि ज्याचा उपकार घेतल्यामुळें कदाचित् त्याचा धर्महि पत्करावा लागेल;— त्याच्याकडून सेवेचा उपकार घेण्याऐवजीं तो स्वकीयांकडून घेण्यांत आपल्या माणसांना जास्त गोडी वाटेल. आपण त्यांच्यांत जातच नाहीं, आणि दुसरे कोणी गेले कीं तें आपल्याला खपत नाहीं, या आपल्या दुष्टपणाचा काय उपयोग आहे? आपलें बरें करणारा त्यांना कोणी हवा असतो, आणि तुम्ही तर त्यांच्या वाऱ्यालाहि फिरकत नाहीं;— मग अशा परक्याच्या आश्रयाला तो जातो. म्हणून कांहीं तरी करावें असें ज्या तरुणांना वाटतें त्यांनीं हें जनसेवेचें व्रत अवश्य पत्करावें.

आमच्या या तरुण मित्रांनीं सेन्सस रिपोर्टाचा म्हणजे शिरगणतीच्या कोशांचा थोडासा तरी अभ्यास करावा, आणि सरकारनें जें नाना प्रकारचें जातिविषयक वाङ्मय प्रसिद्ध केलें आहे तेंहि डोळ्यांखालून घालावें. म्हणजे ज्यांना आपण आपले आपले म्हणतों त्यांना आपण कोठें राहूं दिलें आहे याचें ज्ञान त्यांना होईल. आणि अशा लोकांसंबंधानें आपण कसल्या अपेक्षा ठेवतों हें पाहून त्यांच्या जिवाला लाज उत्पन्न होईल. तीस कोटी आणि बत्तीस कोटी हे आंकडे मोठे तोंडभर आहेत, पण हे उच्चारतांना आपलीं तोंडें लाजेनें मिटलीं पाहिजेत. समुद्रावर जर एखादें आरमार चालू असलें तर त्या एकंदर आरमाराचा वेग कोण ठरवितें, हें आपल्या या उत्साही लोकांना माहीत असतें काय? या आरमारांत जें सगळ्यांत कमी वेगाचें जहाज असतें तें त्या साऱ्या आरमाराचा वेग ठरवितें! वर्गातील मंद बुद्धीच्या मुलांच्या गतीनेंच एकंदर वर्गाची गति ठरविणें शिक्षकांना भाग पडतें. आपल्या समाजांत कोटयवधि प्रजा अशी आहे कीं, जिच्या वस्तीवर अजून संस्कृतीची पहांट फटफटलीसुद्धां नाहीं. किती शतकें झालीं कोणास ठाऊक! पण अज्ञान, दास्य अन् लाचारी यांच्या तिमिरांत ही प्रजा सारखी पिचत पडली आहे. विठ्ठल जसा अठ्ठावीस युगें विटेवर उभा आहे, तसे हे सारे लोक अठ्ठावीस युगें कर्दमांत उभे आहेत. म्हणून ज्याला कुणाला यांच्या संबंधानें थोडें तरी ममत्व असेल, थोडी तरी स्वत्वाची आपुलकी असेल, त्यानें या लोकांच्या जीवितांत शिरावें. आपला निर्वाह स्वतंत्रपणें करावा, पण

त्यांच्या सेवेचें व्रत मात्र चालवावें आणि आपण आपल्या नेहमींच्या कर्दमांतून या माणसांच्या प्रयत्नानें हळूहळू बाहेर पडत आहों हें त्या माणसांच्या प्रत्ययाला आणून द्यावें. याचेंच नांव स्वदेशभक्ति, याचेंच नांव धर्मश्रद्धा, फार काय सांगावें, याचेंच नांव माणुसकी असें आहे.

सांगितलें तर वाईट वाटेल परंतु सार्धे भूतदयेचें शिक्षणसुद्धां आपल्याला मिळावयास हवें आहे. आचारकांड अन् भूतदया यांचें द्वंद्व जर उत्पन्न झालें तर आपण आचारकांडाला महत्त्व देतों आणि भूतदया वाऱ्यावर सोडतों. एकदां एका आडवळणीं रेल्वेस्टेशनवर कांहीं तरी कामानिमित्तानें वडार म्हणा किंवा दुसरें कोणीतरी म्हणा, अशा लोकांची थोडीशी वस्ती झालेली होती. स्टेशन मास्तरांची वडील बहीण पोक्तशी संभावित बाई होती. तिला लहान मुलांच्या रोगांची कांहीं माहिती असे. एके दिवशीं त्या वडारांपैकीं एक बाई आपल्या लहान मुलाला घेऊन मास्तरांच्या घरीं आली. तोंड उघडें ठेवून पोर धापा टाकीत होतें. आणि त्याच्या पोटाचा कोथळा वर-खालीं होत होता. या वैद्यीणबाई पुढें आल्या अन् त्यांनीं बोटानें दाखवून त्या मुलाच्या आईलाच त्याचें पोट चापचावयास लावलें. इथें पोट दाठर लागत आहे का, तिथें मऊ लागत आहेत का, अशा अनेक पृच्छा या सोवळ्यांत असलेल्या बाईनें केल्या, आणि पोराच्या दुखण्याचा अंदाज केला. त्या माउलीला स्वाभाविकच वाटत होतें कीं आपल्या लेकराला वैद्यीणबाईनीं जवळ घेऊन पहावें. परंतु तिला माहीत नव्हतें कीं, आचारकांड आणि भूतदया यांचा जर लढा उत्पन्न झाला तर हे लोक आचारकांडाचा महिमा जास्त मानतात ! खरोखर ही बाई जर जलद पुढें आली असती, तिनें मुलाला जवळ घेतलें असतें आणि साक्षेपानें त्या मुलाची तिनें परीक्षा केली असती, तर ती जास्त धर्मशील ठरली असती; पण आचारधर्माचा पगडा आपल्या बुद्धीवर इतका बसलेला आहे कीं, साध्या भूतदयेचें आवाहनसुद्धां

आपल्या मनाला लवकर पोचत नाहीं. मी हें स्वकीयांना हिणविण्यासाठीं लिहीत नाहीं; स्वतःच्या समाजाचें यथारूप दर्शन तरुणांना व्हावें यासाठीं लिहीत आहें. ते जर या कचाट्यांतून बाहेर पडले अन् निर्मळ मनानें या सर्व मागासलेल्या समाजांत शिरले तर ते आर्त लोक त्यांचें दोनहि हातांनीं स्वागत करतील.

धर्मश्रद्धा, भूतदयान्वित आणि सर्वोच्याहीवर म्हणजे दुसऱ्याच्या अंगांतील मानवता ओळखण्याची माणुसकी ज्यांच्या अंगीं आहे अशा तरुण लोकांच्या दहा-दहा, पंधरा-पंधरा, टोळ्या जर रामोशी, मांग, वारली, ठाकूर, नागली, भील, गोंड, खोंड अशा नाना प्रकारच्या जातींत जाऊन जनसेवेचे मठ करून राहिल्या तर त्यांच्या हातून खरीखरी देशसेवा झाली असें म्हणतां येईल. देश म्हणजे देशांतले दगड किंवा माती नव्हे; देश म्हणजे देशांतील माणसें. हीं केवळ आकारानें असलेलीं माणसें खऱ्या खऱ्या माणुसकींत आणून सोडणें आणि आज जीं हिंदुधर्माच्या केवळ वळचणीखालीं उभीं आहेत तेथून, घासूनपुसून, धुऊन पुसून, शिक्षण देऊन, संस्कार करून त्यांचा हिंदुधर्माच्या चतुःसीमेच्या आंत घसघशीतपणें प्रवेश करून देणें याचें नांव धर्माची आणि देशाची सेवा होय. म्हणून एवढेंच सांगावयाचें कीं, ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या प्रयत्नांकडे थोड्या उंच अर्थानें आपण पाहावयास शिकलें पाहिजे; जनसेवेचें व्रत आपण पत्करलें पाहिजे. हिंदुसमाजाच्या उद्धाराची ही खरी खरी किल्ली आहे. आपल्या अंगीं अलिप्तपणा फार असतो; आपण अतिशय तुसडेपणानें वागतों. आपल्या अंगचें ममत्व सग्यासोयऱ्यांपर्यंतच पसरतें. लोकांना दूर ठेवण्यानें धर्माची जपणूक होते, असें आपल्याला वाटतें. हें सारें बदललें पाहिजे. बदललें तरच आपला तरणोपाय आहे एवढेंच निकरानें सांगावयाचें आहे. पण आतां लोकशाही आलेली व प्रस्थापित झालेलें राष्ट्रीय सरकार जर सुदैवानें सध्यां सारखेच

गोखले ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ज्ञानप्रबोधिनी
अनुक्रमांक 2212 दिनांक 9/9/14
क्रमांक 9993 नोंद दि. 23/9/14

काम करून राहिलें तर त्याच्यापुढें जें वाढून ठेवलेलें काम आहे, त्यांत या अर्धसंस्कृत आणि रानटी लोकांच्या सुधारणेचें कलम फारच अगत्याचें आहे. पूर्वीच्या काळच्या राजसत्तेच्या जबाबदाऱ्या आणि सध्यांच्या काळीं राजसत्तेनें कोणतीं कामें करावीं यासंबंधींच्या कल्पना यांत फारच मोठी तफावत पडलेली आहे, लोकांत स्वास्थ उत्पन्न करावें, शेतीभाती सुखानें चालू द्यावी, चोरा-चिलटांचा उपद्रव कमी करावा, विद्याभिवृद्धीस सहाय्य करावें एवढ्या जबाबदाऱ्या राजानें पार पाडल्या म्हणजे त्यानें आपलें कर्तव्य केलें, असें लोक समजत असत. आणि आपलें राज्य चांगलें चाललेलें आहे असें राजालाहि वाटत असे. प्रजांना जीं बाकीचीं दुःखें असत त्यांचा परिहार धर्मानें करावा अशी अपेक्षा असे. राजा जर आपल्या कर्तव्यांत चुकूं लागला आणि लोकांवर आपत्ति येऊं लागली तरीहि धर्मानेंच पुढें व्हावें आणि लोकांना त्या आपत्तीं-तून वांचवावें असेंच सर्वांना वाटत असे. आतां या युगांत हें सारें बदललेलें आहे. राजसत्ता जाऊन जों जों लोकसत्ता प्रस्थापित होऊं लागली तों तों देशांतल्या सरकारचीं कामें कोणचीं याच्या कल्पना विस्तृत बनूं लागल्या. लोक आपले धनी होऊं लागले तर आपल्या जीविताच्या सर्व शाखांचा विचार आपणच करावयास हवा, असें त्यांना वाटूं लागावें हें क्रमप्राप्तच होय. राजा आणि प्रजा हे निराळे होते, आपल्याला हें राज्य देवानें दिलेलें आहे असा राजांचा समज होता, तोंपर्यंत राज्यसंस्थेचीं कर्तव्यें संकुचित स्वरूपाचीं राहिलेलीं असावीं यांत कांहीं नवल नाहीं. पण आतां लोक म्हणजेच राजा झाले आहेत. आपल्या घराचे ते स्वतःच धनी झाले आहेत; अर्थात् लौकिक जीवनांत जेवढे प्रश्न उत्पन्न होण्यासारखे असतात तेवढ्यांचा निकाल आपणच लावावयास हवा असें लोकसत्ता मानूं लागली आहे. धर्माकडे सोंपविलेलीं कामें वास्तविक पहातां आपल्या कक्षेंतील आहेत, हें लोकसत्तेनें खासच ओळखलेलें आहे. आणि ती जबाबदारी आपल्या शिरावर घेण्यास ती खुषीनें तयार झाली आहे. किंबहुना परमार्थविचार एवढाच आपला टापू

आहे, असें धर्मपुरुषानें मानावें आणि आमच्या ऐहिक व लौकिक जीवनांत त्यानें कसलीहि लुडबुड करूं नये, असें आग्रहाचें प्रतिपादन लोकशाहीची सत्ता करीत असते. अर्थात् त्या त्या मानानें आपल्या लौकिक जीवनाविषयीं धर्महि उदासीन बनत चालला आहे! आणि म्हणून देशांतील प्रजांच्या सुखसंवर्धनाच्या कामीं धर्मानें आपल्या सहाय्याला यावें अशी गूढस्थ अपेक्षा एखाद्या लोकशाही सरकारनें बाळगली तरी ती सफल होण्याचा संभव आतां फारसा उरलेला नाहीं; माणुसकीच्या प्रसाराला मात्र अवसर आहे!

वर जें एक महत्त्वाचें कलम म्हणून सांगितलें आहे, त्याचा याच दृष्टीनें विचार करावयास हवा. हिंदुस्थानांतील अरण्यमय प्रदेशांत, पर्वतांच्या उतरणीवर, दऱ्याखोऱ्यांत आणि कदाचित् डोंगराच्या पठारावरहि अजून अशा शेंकडों जमाती राहिलेल्या दिसतील कीं, ज्यांच्या घरावर सुधारणेची प्रभात अजून उजाडलेलीच नाहीं. हे गिरिजन लोक आपापल्या ठिकाणीं किती युगें रहात आलेले आहेत, याचा हिशेब जुन्या ग्रंथांवरून थोडा तरी ध्यानांत येतो. महाभारत आणि रामायण या ऐतिहासिक ग्रंथांत ज्या रानटांचे उल्लेख आहेत ते रानट त्या त्या ठिकाणीं सांगितलेल्या जागींच अजूनहि रहात आहेत, असें दिसून येईल. आपल्या स्वामित्वाच्या कक्षेपलीकडे असलेले हे लोक आहेत असें सर्व राजेलोक आजपर्यंत मानीत आलेले होते. आणि जर केव्हां या लोकांनीं आपापलीं ठिकाणें सोडून या राजेलोकांच्या प्रजांचे दळणवळणाचे मार्ग रुद्ध केले तर हे राजेलोक त्यांना कडक शासन करीत. अनेक राज्यें आलीं आणि अनेक राज्यें गेलीं परंतु रानटी अथवा अर्धसंस्कृत लोक आपापल्या वस्तीच्या जागेला बिलगून राहिले आहेत आणि सुसंस्कृत झालेल्या लोकांच्या जीवितांत प्रवेश करण्याचें त्यांनीं आजवर नाकारलें आहे. सुधारणेची कल्पना ही नेहमीं बाहेरूनच आली पाहिजे आणि सुज्ञ लोकांनीं अज्ञ लोकांच्या सुधारणेला प्रवृत्त झालें पाहिजे, असें आपण एकमेकांना आग्रहानें सांगतों. सुज्ञांनीं ही

मराठी वा. कक. ८८५८ प्रत

गोष्ट करावी हें खरें, पण अशा माणसांच्यांतहि मानसिक अस्वास्थ्य उत्पन्न व्हावें लागतें, असंतोष उत्पन्न व्हावा लागतो. आपलें हें जिणें अगदीं वाईट आहे असें त्यांना वाटूं लागावें लागतें. आणि त्यांतून बाहेर पडण्याचे मार्ग शोधण्यासाठीं ते इकडेतिकडे बघत आहेत असेंहि ठरावें लागतें. या दोन प्रवाहांची जर गांठ पडली तर सुधारणेचें काम जलदीनें सुरू होतें. आणि लौकर यशस्वी होतें. सध्यांच्या काळीं असें दिसत आहे कीं, आधुनिक काळांतील सुधारणेचा डंका या लोकांच्या कडेपठारावर आणि दऱ्या-खोऱ्यांतसुद्धां थोडाबहुत तरी जाऊन पोंचला आहे; त्यांची झोपमोड झालेली आहे; आणि देशांत चाललेल्या प्रचंड घडामोडींकडे थोड्या कुतूहलानें आणि थोड्या अस्वास्थ्यानें ते पाहूं लागले आहेत. त्यांना प्राप्त झालेल्या या जागृतीचा आदर कसा करावयाचा, याकडे लक्ष देणें राज्यसंस्थेला आतां प्राप्तच आहे.

जेवढ्या प्रजा आपल्या शासनक्षेत्रांत येत असतील तेवढ्या साऱ्या अमुक एका दर्जापर्यंत तरी सुसंस्कृत झाल्याच पाहिजेत, असा आधुनिक कालांतील लोकशाही सरकारांचा बाणा आहे. हा बाणा लोकहितबुद्धीमुळेंच केवळ उत्पन्न झालेला असतो असें नव्हे. एकंदर प्रजांची तोलदारी अमुक इतकी वाढलेली असल्याशिवाय राज्ययंत्रच पुरेसें बळकट बनत नाहीं आणि टिकून रहात नाहीं. आणि म्हणून आपल्या शासनक्षेत्रांतील कोणीहि माणसें अतिशय मागासलेलीं राहूं देणें या सत्तेच्या हिताचें नसतें. आधुनिक राज्यसंस्थेच्या या यथार्थ समजुतीनें मागासलेल्या लोकांचें काम आपोआपच होतें व चालू काळांत हेंच घडून यावयास हवें. रानटी व अर्धसंस्कृत म्हणजे सुधारणेच्या भोवतीं भोवतीं हिंडणाऱ्या लोकांत जागृति आलेली आहे, हें जरी कोणाला अमान्य असलें तरी त्या त्या लोकांना अज्ञानांत व दुरवस्थेंत राहूं देणें हें आपल्याच हिताचें नाहीं, हें लक्षांत घेऊन आपल्या सरकारनें आतां त्यांच्या सुधारणेचा उपक्रम केला पाहिजे. सत्ता आणि

साधनें हीं हाताशीं असल्यानंतर लोक-सुधारणेच्या कामांतील पूर्वीच्या काळचा चेंगटपणा आतां शिल्लक रहाणार नाहीं.

पूर्वीं लोकसुधारणेचें काम धर्मपुरुष करीत असे. हा पुरुष फार धीमा, संथ, केवळ भीजपाऊस पाडून सुपिकता आणणारा, केव्हां जागा होणारा, तर केव्हां झोपीं जाणारा, पुष्कळदां बैल गेल्यानंतर झोपा लावणारा आणि जेथें दिवसभर काबाडकष्ट करावयास हवेत त्या शेतांत केवळ संध्याकाळच्या वेळीं घटका अर्धघटका नांगर धरणारा असा लहरी स्वभावाचा असतो. आतांपर्यंत हिंदुधर्मानें या लोकांच्या जीवितांत अल्पसर प्रवेश केलेला आहे, ही गोष्ट नाकारणें कृतघ्नपणाचें होईल. अनेक युरोपियन लोकांनीं म्हटलें आहे कीं हिंदुधर्म म्हणजे वळवाचा पाऊस नव्हे किंवा उन्हाळी वावटळ नव्हे. हिंदुधर्म म्हणजे भीजपाऊस आहे. राखेच्या ढेपशावर पाण्याचा एक थेंब पडला तर तो पहिल्यानें थोड्याशा जागेलाच ओलेपणा आणतो; परंतु हळूहळू आणि कोणाच्या लक्षांत न येतां तो सबंध ढेपसा ओला झालेला दिसतो. हें अत्यंत सौम्य कार्य केशाकर्षण-न्यायानें घडून येतें. हिंदुसंस्कृतीच्या प्रसाराचें काम आजपर्यंत याच न्यायानें घडून आलेलें आहे. जर कोणाला या कामीं शंका असेल तर त्यांनीं ख्रिस्ती मिशनऱ्यांना जाऊन विचारावें. ते त्यांना सांगतील कीं, ज्यांना आम्ही अगदीं रानटी समजत होतों त्या लोकांच्यांतहि हिंदुसंस्कृति जाऊन पोंचलेली आहे. इंग्रजी राज्य सुरू झाल्याबरोबर इकडे येऊन दाखल झालेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांना आभाळ ठेंगणें झालें होतें. ते उघड उघड म्हणत असत कीं, हा सारा हिंदुस्थान देश आम्ही शेंपन्नास वर्षांत ख्रिस्ती करून टाकूं. आमच्या या समाजांतील जेवढीं म्हणून वैगुण्यें त्यांना जमा करतां येण्यासारखीं होतीं तेवढीं त्यांनीं जमा केलीं आणि युरोपांतील अनेक देशच्या लोकांत आणि ख्रिस्ती धर्माच्या पंथोपपंथांत तीं प्रसिद्ध केलीं. अर्थात् या साऱ्या ठिकाणांहून ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या झुंडीच्या झुंडी

हिंदुस्थानांत येऊन दाखल झाल्या. पण काम सुरू झाल्यानंतर त्यांच्या ध्यानांत येऊं लागलें कीं, येथील अत्यंत अज्ञान जातींची मनोभूमिसुद्धां वाटलें होतें तितकी कोपरानें खणण्यासारखी नाहीं. अगदीं अडाणी जातींनासुद्धां हिंदुत्वाची ओळख झालेली आहे आणि त्या बाबतींत तिची मनोभूमि टणक बनलेली आहे. परंतु हिंदुधर्मानें केलेलें हें काम फार अल्प आहे. आणि या कामांत योजना हें नांव पावण्यासारखा प्रयत्न फारसा झालेला नाहीं, ही गोष्ट मान्यच करावयास हवी. आतां प्रस्थापित झालेल्या लोकशाहीनें सत्ता आणि साधनें यांचा उपयोग जर मुबलकपणानें केला तर हिंदुधर्मानें आरंभिलेलें हें काम झपाट्यानें चालीस लागेल.

आपल्या ऐहिक आणि लौकिक जीवनांतून धर्माला अलग काढणें याचा अर्थ धर्मशून्य बनणें असा नव्हे. आजपर्यंत जीं कामें धर्म करीत होता तीं राज्यसंस्थेनेंच प्रत्यक्ष करणें ही आपली खरी उन्नति आहे. यालाच सध्या civic virtues म्हणजेच नागर गुण म्हणून म्हणतात. त्यांची शिकवण पूर्वीच्या काळीं धर्माच्या द्वारांच थोडीशी होत असे. पण, सध्यां या गुणांसाठीं आतां कोणी धर्माकडे बघत नाहीं. आपल्या जीवितांत पडत चाललेला हा फरक असंस्कृत आणि रानटी लोकांच्या सुधारणेच्या कामालाहि लागू केला पाहिजे. तें एक लौकिक व्यवहारांतलें आणि आपल्या सार्वजनिक जीवितांतलें काम आहे, असेंच आपण मानलें पाहिजे. याचा अर्थ असा कीं, हें काम राज्यसंस्थेच्या द्वारांहि झालें पाहिजे. तरीहि धर्माला तेथें अजूनहि जागा राहील हें तरुणांनीं ओळखावें.

ज्या जातींची चर्चा आपण करीत आहों, त्यांच्यापैकीं कांहीं लोक असे आहेत कीं, जे आमच्या सुसंस्कृत समाजापासून फटकून रहाण्यांतच थोडा अभिमान बाळगतात. पूर्वीच्या काळीं त्यांची म्हणून एक संस्कृति होती, तिचें विसर्जन पूर्णतया करून तुम्हांला शरण यावें, आणि तुमच्या समाजाचें एक अंग बनावें, ही कल्पना या लोकांना दुःसह वाटत आलेली

आहे. आपला पराभव झाला आहे तर आपण यांच्यापासून दूर कोठें तरी जाऊन राहूं आणि आम्ही तुमचे कोणी नव्हे, असें त्यांना दाखवून देऊं अशी तुसडेपणाची वृत्ति अनेक जातींच्या मनांत आजहि शिल्लक आहे. रात्रीच्या वेळीं आपल्या रहात्या ठिकाणांतून बाहेर पडून ते तुमच्या वाटसरूंवर चाल करून येतील, ते तुमची लुटालूट करतील आणि घरीं परत गेल्यावर देवानें आपल्याला यश दिलें म्हणून देवीची पूजाहि करतील, किंवा सत्यनारायणहि करतील. आपण केलेलें कृत्य म्हणजे एक पाप आहे, असें त्यांना मुळींच वाटत नाहीं. आपण एक स्वतंत्र लोक आहोंत आणि पूर्वी जसे एक लोक दुसऱ्यावर स्वारी करीत तशी ही आपण यांच्यावर स्वारी केली होती असेंच ते मानतात. आपण या त्यांच्या कृत्याला दरवडा हें नांव देतों. पण ते स्वतः याच कृत्याला कदाचित् स्वारी हें नांव देतात. अशा प्रकारें कांहींशा फटिंगपणानें राहिलेल्या ज्या अर्धसंस्कृत परिजन जाती आहेत, त्यांना आतां सरकारनें दाखवून दिलें पाहिजे कीं, आतां हें तुमचें बुजरेपण तुम्हीं सोडलें पाहिजे; पूर्वी केव्हां तुम्ही एक स्वतंत्र लोक असालहि. पण ज्याअर्थी आतां तुम्ही आमच्या शासनसंस्थेच्या कक्षेंत येत आहां, त्याअर्थी तुम्हांला आतां आमच्यापासून दूर रहातां येण्यासारखें नाहीं, आणि राहूं म्हणालांत तरी आम्ही तुम्हांला दूर राहूं देणार नाहीं; आतां संस्कृतीच्या कल्पना सर्व समान होत चाललेल्या आहेत आणि त्यांत तुम्हांला दाखल व्हावयास पाहिजे. राज्यसंस्थेनें हें त्यांना एकदां बजाविलें आणि त्याहींपेक्षां म्हणजे स्वतंत्रपणें धनोत्पादन करण्याची संधि त्यांना दिली आणि अभिमान संभाळून जगतां येतें असें त्यांना दाखवून दिलें तर सारें ऐश्वर्य आपसुखेंच प्राप्त होतें असें त्यांना दिसूं लागेल.

कांहीं जाती अशा आहेत कीं, त्यांच्या अंगीं हा स्वतंत्रपणाचा हट्ट मुळींच नाहीं. आपण फटिंगपणानें वागणार असा हट्ट त्या मुळींच धरीत नाहींत. इतकेंच कीं, भित्रेपणानें त्या दूर राहिलेल्या आहेत. सुसंस्कृत

लोकांकडे पहातांना त्यांचे डोळे दिपतात आणि या नागरजीवनांत पाऊल टाकतांना त्यांचा थरकांप होतो. त्यांच्या मनांत विश्वास उत्पन्न करणें, आणि आपण इतर चार चौघांप्रमाणेंच आहों असें त्यांस वाटावयास लावणें, हें सरकारचें त्यांच्या बाबतींतील पहिलें कर्तव्य आहे. ज्या प्रदेशांत ते रहातात त्या प्रदेशांतील खनिजसंपत्ति किंवा वनसंपत्ति ही बाहेर कशी काढावी याच्या कांहीं योजना जर सरकारनें त्या त्या ठिकाणींच केल्या तर त्यांचा प्रादेशिक अभिमान संभाळल्यासारखा होईल आणि नव्या धनाच्या बळावर आपले प्रपंच जागच्या जागीं सुखाचे करतां येण्यासारखे आहेत, असें त्यांना वाटूं लागेल. जेथें कोळसा असेल तेथें कारखाने काढावे हा न्याय जर बरोबर आहे, तर जेथें माणसें आहेत तेथेंच आसपासची दौलत जागृत करावी आणि त्यांना प्रपंचाचीं साधनें उपलब्ध करून द्यावीं, हा न्याय कितीतरी पटीनें जास्त बरोबर आहे. पोटाला मिळालें खरें, पण तेवढ्यासाठीं आपल्याला आपली भूमि सोडावी लागली असें जर दिसलें, तर माणसाला उपरेपणाची जाणीव उत्पन्न होते, आपण भणंग आहों असें त्याला वाटूं लागतें आणि कंगाल बनल्यानें आपण कोठेंतरी पोटापाठिमागें वणवण करीत चाललों आहों, अशी ओशाळगत त्याच्या मनाला येतें. हें सारें सहज चुकवित येण्यासारखें आहे. ज्या ठिकाणीं ते ते लोक असतील त्या ठिकाणच्या आसपासच्या मुलखांत चालू करतां येण्यासारखे धंदे सरकारानें सुरू करावे, म्हणजे या लोकांना वर सांगितलेलीं दुःखें होणार नाहींत. हे धंदे सुरू झाले म्हणजे त्यांचीं नवीं गांवें वसतील आणि याच्यामागोमाग शाळा, दवाखाने, कचेऱ्या, लोकलबोर्डें, नगरपालिका व मागोमाग धर्मोपदेशक हें आधुनिक काळांतील सारें ऐश्वर्य तेथें प्राप्त होईल.

यांच्यापैकीं कांहीं जातींना इंग्रज सरकारनें गुन्हेगार हें नांव दिलेलें आहे. महाराष्ट्रांत अशा अनेक जाती आहेत. खरी गोष्ट अशी आहे कीं, गुन्हे केल्याशिवाय सरकारनें त्यांना गत्यंतरच उरूं दिलेलें नव्हतें आणि मग

त्या त्या जातींना त्यांनीं गुन्हेगार हें नांव दिलें. पूर्वीच्या काळीं किल्ल्यांच्या रक्षणाचें काम रामोशांच्याकडे असे, पण किल्ल्यांचा महिमा संपल्याबरोबर रामोशांचा धंदाहि बुडाला. त्यांच्या अंगांत रग होती आणि ते भीक मागावयास तर कधींच तयार झाले नसते. मग त्यांनीं वाटमारीस सुरुवात केली आणि सरकार म्हणूं लागलें कीं, तुमची जात गुन्हेगारांची आहे. गुन्हा केलेला माणूस रामोशी असतो याचा विपर्यास होतां होतां रामोशांची जातच गुन्हेगारांची असते, असा सिद्धान्त प्रस्थापित व्हावयास आतांच सांगितलेला इतिहास कारण झाला. समाजाची काळजी बाळगून जर इंग्रजांनीं या लोकांना पोट भरण्याचें एक निराळें साधन उपलब्ध करून दिलें असतें, तर गुन्हेगार हें वाईट नांव त्यांना प्राप्त झालें नसतें. मराठ्यांचें आरमार बुडालें आणि त्यावरचे लोक कांहीं धंदा न उरल्यामुळें समुद्रावर वाटमारी करूं लागले. इंग्रजांनीं त्यांना ताबडतोब गुन्हेगार हें नांव दिलें. पण जर त्यांनीं या लोकांना उपजीविकेचें नवें साधन वेळेवरच प्राप्त करून दिलें असतें, तर याहि जातीवर गुन्हेगार हा शिक्का बसला नसता. आतां आमच्या स्वदेशी सरकारनें या चुका भराभर दुरुस्त कराव्या.

सांगण्याचें तात्पर्य असें कीं, ज्या जाती सर्व तऱ्हेच्या संस्कृतीपासून अगदीं दूर राहिल्या आहेत आणि बिभिस्तपणानें अंग चोरून बसलेल्या आहेत; ज्या अर्धसंस्कृत, पण फटिंगपणानें वागण्याची इच्छा बाळगून आहेत आणि ज्या गुन्हेगार या नांवाला पात्र होऊन बसलेल्या आहेत, त्या सर्वांवर आपल्या सुधारणेच्या जळाचें पवित्र प्रोक्षण सरकारनें केलें पाहिजे आणि हें करतांना त्यांच्या जीवितांत ज्या धर्मानें थोडाफार प्रवेश केलेला असेल त्या धर्माचें ऋण मान्य करून दशवार्षिक परिगणना करतांना त्यांची मोजणी त्यांनीं हिंदुधर्मांतच केली पाहिजे. सरकारनें एवढें कर्तव्य बजावलें म्हणजे मग अजूनहि धर्मसंस्थेंत ज्या उपयुक्त गोष्टी शिल्लक राहिल्या आहेत आणि ज्यांची शिकवण राज्यसंस्थेला देतां येण्यासारखी नाहीं, त्या वरील लोकांच्या घरीं पोंचविण्यास हिंदुसमाजांतील तरुण सुधारकांनीं जलदीनें सिद्ध व्हावें.

११: : भारत-स्वातंत्र्याचा पहिला उद्‌गाता

दरम्यान १८९७ सालची प्लेगच्या दिवसांतील सोजीर लोकांची दांडगाई, रँडचा खून, लो. टिळकांचा खटला व कारागृहवास यांनीं पुणें शहर हलून गेलें होतें. सरकारची बेफाम वृत्ति व लोकांचा संताप हीं परमावधीस पोंचलीं होतीं. अशा या चळवळीच्या काळांतच शिवरामपंत रिकामे होऊन बसले होते. टिळकांना शिक्षा झाल्यामुळें स्वदेशभक्तांचें व्रत असिधारेप्रमाणें कडक आहे, हें होतकरू पुढाऱ्यांना कळून चुकलें. ज्यांनीं हंगामी पुढारीपणाची बतावणी करण्याचें धाडस केलें होतें, त्यांच्या ध्यानांत हें चरचरून भरलें कीं, देशभक्ति ही सवंग लोकप्रियता नसून सुळावरची पोळी आहे. हौसेमुळें ज्यांनीं आपले आवांके न ओळखतां लोकरंजनार्थ धिटाई पत्करली त्यांची घाबरगुंडी उडाली. विद्वान् असतो तो पुढारी बनतोच, हा भ्रम पार मावळून गेला. आणि बहुभाष वक्तृत्व केव्हां अंगावर उलटेल याचा नेम नाहीं, याचें ज्ञान सभाधीटांना प्राप्त झालें. 'आपण एके ठिकाणचेच, आपण सारखेसारखेच, आपण बरोबरीचेच' असल्या भोळ्या भ्रमानें ज्यांनीं खरोखरीच्या कर्म-निष्ठांशीं साहचर्याचें धाडस केलें त्यांना आपापली खरी योग्यता किती, याची जहर जाणीव मुकाट्यानें गिळावी लागली. सरकारी रोष म्हणजे काय याची ओळख लोकांनाहि पुरी झाली. जिकडे तिकडे सामसूम आणि चिडीचिप होऊन गेलें. अशा या भयाकुल कालांत शिवरामपंतांच्या मनांत सारखी चलबिचल चालू होती. इतकी विद्या ही केवळ मनांत घुमविण्यासाठीं आणि एवढा देशाभिमान हा केवळ जळफळण्यासाठीं नको आहे, हें त्यांना दिसतच होतें. पण विद्या कौतुकाची ठरली तरी स्वदेशाभिमान अंगाचीं सालें काढील, हें त्यांना स्पष्ट झालें होतें. वाड्मयाच्या दारांतून स्वदेशभक्तीच्या आणि पुढारीपणाच्या मुलुखांत कित्येक लोक उतरलेले असतात. त्यांतल्या कित्येकांना पुढें काय वाढून ठेवलें आहे, हें घाटांतून उतरतांना दिसत नाहीं. पण खालीं मैदानांत येऊन दाखल व्हावें तों तरवारीच्या टिपरघाईत सामील व्हावें लागतें. मग चुळबुळ होते, मग जीव कासावीस होतो, मग अपयश पत्करून, धैर्याचा डौल राखीतच पण मागल्या पायानें पीछेहाट करावी लागते. हें सर्व

त्यांच्या डोळ्यापुढें खडें उभें होतें. अशा डगमगीच्या काळांत बुद्धिनिश्चय करणें सोपें नाहीं. पण पूर्ण विचारान्तीं शिवरामपंतांनीं ठरविलें कीं, आपण वर्तमानपत्र काढायचें. घरचीं माणसें व इतर मित्र काय म्हणाले असतील, हें सहज ओळखतां येण्यासारखें आहे. पण आपलें मनोगत काय आहे, हें त्यांचें त्यांना उत्तम कळलेलें होतें. आणि म्हणून 'काळ' पत्र सुरू करण्याचें कायम झालें. गांवांतहि हळूहळू ही बातमी पसरूं लागली. कॉलेजांत उत्तम अध्यापक म्हणून व श्रोतृवर्गांत उत्तम वक्ते म्हणून त्यांचा लौकिक आधीं फैलावतच होता. अर्थात् लोकहि या 'काळ'ची मोठ्या उत्सुकतेनें वाट पाहूं लागले.

महाराष्ट्राची तेव्हांची स्थिति वर वर्णिलेलीच आहे. पण प्लेगची व्यवस्था म्हणजे गैरव्यवस्था. रँडचा खून आणि त्यावर सरकारची दडपशाही यांनीं चीड येण्यासारख्या मनोवृत्तीचीं जीं माणसें अगदीं चिडून गेलीं होतीं, त्यांपैकींच शिवरामपंत होत. म्हणून सुखासमाधानाचें चालून आलेलें लेणें टाकून देऊन, धडधडीत दिसणाऱ्या सरकारी रोषाच्या खाईकडे दुर्लक्ष करून, वर्तमानपत्राच्या धंद्यांत ते उतरले. शिवरामपंतांनीं तें जाणून बुजून केलें, यांतच त्यांच्या देशभक्तीची खरी पारख होते. वर्तमानपत्र काढणें हा तेव्हां धंदा नव्हता. उठावें त्यानें वर्तमानपत्र काढावें, लोकांची खुषमस्करी करावी, चार लोकांचीं नांवें इकडे तिकडे झळकवावीं, कांहीं चावटपणा माजवून, खोट्या बाता प्रसिद्ध करून, आपली पोळी पिकवावी, हा प्रघात तेव्हां पडला नव्हता. वर्तमानपत्र नवें निघे तें कांहीं हेतूनें निघे व काढणारा भावी संकटाची कल्पना करून घेऊनच जागचा हले. खुद्द टिळकांना आणि परांजप्यांना 'सवंग लोकप्रियतेसाठीं हपापलेले' अशीं दुरुत्तरें करण्याचा कित्येक विरोधकांनीं परिपाठ पाडला होता. पण लोकपक्षाचें वर्तमानपत्र काढणें म्हणजे सुखाचें नव्हतें. तें काम झेपत नव्हतें, म्हणून विरोधकांनीं त्यांना अपशब्द लावून त्यांची किंमत कमी करण्याची पद्धति घातली होती. जे नेमस्त पुढारी अंतर्बाह्य नेमस्त राहून मनानेंहि इंग्रजी राज्याचें अस्तित्व हिताचें मानीत त्यांच्यावरसुद्धां ज्या सरकारनें आपले तक्षक पहाऱ्यासाठीं ठेवलेले असत, तें सरकार, इंग्रजांचें राज्य ही आपत्ति आहे असे मानून चळवळ करणारांवर कोणची दृष्टि ठेवीत असेल याची कोणासहि कल्पना येईल. असें माहीत असूनसुद्धां परांजपे यांनीं या चळवळींत बेलाशक पाऊल ठेवलें.

दे. भ. परांजपे यांचें राजकीय धोरण याप्रमाणें कायम झालें. त्यांच्या लिहिण्यांत स्वातंत्र्याचा ध्येयवाद दृग्गोचर होऊं लागला. चालू राजकीय चळवळी, विशेषतः काँग्रेसच्या बैठकी वगैरे यासंबंधानें तर त्यांस केवळ उपहासबुद्धि होती. असल्या चळवळींनीं कांहीं एक व्हावयाचें नाहीं, असा त्यांचा विश्वास होता, समाजकारणासंबंधानें तर त्यांचीं मतें अगदीं जुन्या चालीचीं असत. समाजसुधारणेच्या कामाकडे आपण मुळींच वळूं नये, असें त्यांचें स्पष्ट मत असे. त्यास अनुसरून समाजसुधारकांची व त्यांच्या प्रयत्नांची ते मधूनमधून टर उडवीत व त्यांवरुन राजकीय प्रयत्नांकडे वाचकांचें मन ओढून घेण्याची शिकस्त करीन. एकदां लहानसहान गोष्टींत व चालू चळवळींत विशेष कांहीं नाहीं असें ठरविल्यानंतर राष्ट्रीय सभेपासून तों गांवच्या म्युनिसिपालिटीपर्यंत सर्व कारभारावर ते व्याजोक्तीनें, उपहासानें, अर्धवट विनोदानें मनमुराद लिहीत. इंग्रजी वाङ्मयांतील 'उपहासविजल्पितां'-चे सर्व नमुने दृष्टिपथांतून गेलेले असल्यामुळें, पण त्याहीपेक्षां स्वभावाची घडण या रसाला अनुकूल बनलेली असल्यामुळें या त्यांच्या उपहासाला कांहीं विलक्षण खुमारी येत असे. लहान मुलांना सुद्धां त्यांत चटका लागे. पण मधून मधून वाङ्मयादि विषयांवरहि स्वतंत्र विचाराचें व सोपपत्तिक असें लिहिणें ते लिहीत. त्यामुळें त्यांच्या प्रतिभेची व विद्वत्तेची साक्ष सर्वांस एकदम पटे व 'काळ' पत्र म्हणजे उगाच फिदीफिदी हंसावयास लावणारें व वाचकांची खुषमस्करी करणारें असे शेरे जे आडून आडून मारीत त्यांना सुद्धां त्यांच्या लिहिण्याचें कौतुक वाटे व बाहेरून 'काळ' पत्राविषयीं त्यांनीं कितीहि तिटकारा दाखविला तरी परांजप्यांचें लिहिणें वाचल्याशिवाय त्यांस चैन पडत नसे. इंग्रजी वाङ्मयांत साध्या विषयांवरहि सुंदर निबंध-रचना करणारे कित्येक लेखक झालेले आहेत. आपल्याकडेहि कै. आगर-करांनीं अशा प्रकारचे निबंध लिहिलेले आहेत. तीच तऱ्हा शिवराम-पंतांनीं उचलली होती. पण त्या तऱ्हेंत सुद्धां स्वदेशी बाणा होता! कोठल्या-तरी दोन कल्पित व्यक्तींचें भाषण, कोणा एखाद्यास पडलेलें स्वप्न, कोणा ऐतिहासिक माणसाचें आत्मगत भाषण, असले प्रसंग कल्पून त्यांच्या द्वारां आपली देशाभिमानाची शिकवण ते वाचकांस देत असत. ही नाट्यपद्धति, हा देशी बाणा व हा उपहास हीं कोरडींच असतीं तर वाचक इतके वेडावले

नसते. पण हीं सर्व काव्यकल्पनांत चिंब भिजविलेलीं असत, यामुळें नाट्य-पद्धति, विनोद, काव्य व निखालस देशाभिमान यांच्या मिश्रणानें वाचकाला नुसता मोह पडे, इतकेंच नव्हे तर त्याला नशाच चढे ! या लिहिण्यांत 'कल्पना' असे असें म्हटलें म्हणजे माणसांना वाटतें कीं, उगाच कांहीं तरी मनचें कल्पून लेखक भरारत असे. पण तसें नाहीं. इंग्रजींत ज्याला आपण Sympathy म्हणजे समभावना म्हणतों तिचा प्रकर्ष या लिहिण्यांत दिसून येई. सुखांत डुंबणाराचे, आपत्तींत तळमळणाराचे, मत्सरानें विचारभ्रष्ट झालेल्यांचे, देशद्रोह्यांचे, सतीचे, स्वराज्य गमावलेल्यांचे मनोव्यापार काय असतील हें ओळखण्यासाठीं त्या त्या स्थितींत स्वतःला कल्पून त्याच्यासारखें विचार व विकार आपल्या मनांत आणणें याला जी शक्ति लागते तिचेंच नांव Sympathy. ही त्यांची समभावनशक्ति कित्येक प्रसंगीं केवळ अव्वल दर्जाची अशी दिसत असे. यामुळें 'काळ' पत्राचें वाचन लहानापासून थोरापर्यंत सर्वांना आवडीचें वाटूं लागलें. भावनाप्रधान तरुणांची तर या लिहिण्यावर उडी पडत असे. त्यांच्या मनांतील स्वदेशाभिमान प्रफुल्लित करण्यासाठीं त्यांचे रागलोभ खिजवण्याची शिवरामपंत पराकाष्ठा करीत. हें साधण्यासाठीं इतिहासांतील, पुराणांतील, किंबहुना जेथें जेथें सांपडतील तेथील विविध प्रसग उचलून घेऊन, त्यांत जरूर तेथें व इष्ट ते फेरफार करून, उपमालंकारांची वेलबुट्टी काढून, मूळ प्रसंग खूप उठावानें दिसेल अशी विरोधी पार्श्वभूमि निर्माण करून त्यांची देशाभिमानाच्या कम-जास्त उजेडांत ते अशी खुबीदार मांडणी करीत कीं, त्या त्या प्रसंगाचे निराळे व खरे अर्थ आपल्याला आतां प्रतीत झाले असें वाचकांना वाटे व त्यांचे रागलोभ पराकाष्ठेचे भडकत असत. देशाभिमान ही केव्हांतरी मनांतून येऊन जाणारी लकेर नव्हे, तर सदासर्वकाळ आपल्या मनावर गच्च पकड बसवणारी शक्ति आहे, याचा अनुभव प्रत्येक वाचकाला येत असे. हें लिखाण नुसत्या देशाभिमान्याचें होतें असें नाहीं, तें एका जाड्या पंडिताचें व रसिक-शिरोमणीचें होतें. यामुळें त्यांत देशाभिमान, पांडित्य, रसिकता इत्यादींचें मनोज्ञ मिश्रण होऊन वाचकांच्या हृदयाला व मेंदूला सारखेंच आवाहन पोंचत असे. कायद्याची कैची टिळकांच्या खटल्यानंतर सरकारनें आणखी आवळून घेतल्यामुळें सडेतोड लिहिणें अधिकच धोक्याचें झालें होतें. पण

आपलें मनोगत सांगण्याची सडेतोड बोलणें ही एकच पद्धति नाहीं, हें सरकारच्या ध्यानांत आलें नाहीं ! समोरून हल्ला करतां येईना तर, ज्याला करावयाचाच आहे तो, बगलेकडून हल्ला चढवतो. शिवरामपंतांनीं हेंच केलें. भर तोंडावर जाऊन पडण्याच्या कामीं त्यांनीं कित्येकदां साहस केलेंच होतें व तें पाहून वाचकांनासुद्धां दहशत बसावी असें होई. पण त्यांनीं जेव्हां बगलेकडून मारा सुरू केला तेव्हां मात्र त्यांनीं सरकारची पुरी फजिती उडविली. तोंडावर तुम्ही गाढव आहांत असें म्हणणाराला शिक्षा करतां येते. पण जो 'आपण खरोखरच फार शहाणे आहां' असें तोंडानें म्हणतो पण पोकळ आवाजानें व डोळा मिचकावून 'गाढव आहांत' असें सुचवतो, त्याला कोण काय करणार ? या उपरोधपद्धतीचा अवलंब शिवरामपंतांना उत्तम मानवला. ही कला त्यांनीं इतकी वाढवली व खुबीनें वापरली कीं, सबंध अंकभर या टोकापासून त्या टोकापर्यंत उपरोधाची सारखी उतरणूक ते करीत. कधीं एखादें रूपकच घेत आणि मग ज्या विषयाला उद्देशून तें घेतलेलें असेल त्याला बालाग्राही स्पर्श न करतां रूपकाचा बारीक सारीक तपशीलसुद्धां मूळ तपशीलाला इतका अचूक लावून दाखवीत कीं, लेखकाच्या कौशल्याचें वाचकाला आश्चर्य वाटे व अशा रीतीनें परोक्षपणानें सरकारला चपेटे बसल्याचें सुखहि त्याला चाखावयास सांपडे. ही त्यांची शक्ति विलक्षण पोसली होती. रूपकाच्या आड राहून त्यांना वाटेल त्याच्यावर शस्त्र चालवतां येई. पण या शस्त्रानें ज्याचें अंग रक्तबंबाळ होई तो जर रसिक असला तर वेदना होत असतांनाहि तें शस्त्र चालवणाऱ्याच्या कसबाचें आश्चर्य वाटावें, अशी स्थिति असे. हा रूपकाचा अवलंब आपलें काव्यचातुर्य दाखवण्यासाठीं ते करीत होते असें नव्हे ; तर उपरोध साधावा म्हणून एखादे वेळीं कांहीं भलताच समज आरंभाला व्हावा असा मथळा ते अग्रलेखाला देत, पण वाचक वाचूं लागला म्हणजे हें प्रकरण काय आहे हें त्याला उपरोधाच्या तपशीलानें दिसूं लागे. त्यांची लकब कळल्यामुळें वाचकवर्गहि मोठा तल्लख बनला होता. परांजप्यांचें धोरण आणि सुकाणू कोणीकडे वळत आहे, हें वाचक तडातड ओळखीत.

हा गनिमी कावा आजपर्यंत इतक्या कावेबाजपणानें कोणींहि चाललिवा नव्हता. मराठी वाङ्मयांत हा रस अगदीं नवा होता. पण नवा म्हणून

अल्प दिसणारा होता, असें मात्र नव्हे. वाचकाला त्यांत मनसोक्त डुंबतां येत असे. उपरोधाचें खमंग लिहिणें हा कांहीं शिवरामपंतांच्या लिहिण्याचा केवळ विशेष नसला तरी कायद्याच्या या मगरमिठीच्या काळांत या वक्रोक्ती-वरच त्यांना मुख्य भिस्त ठेवावी लागे. प्रत्यक्ष चालूं असलेल्या कोणत्याहि चळवळींत ते ममत्वानें पडले नसल्यामुळें त्या चळवळींतील बारीक सारीक ब्यंगें कीं जीं देशाभिमानीच पण कष्टाळू माणसानें सहानुभूतीनें वजा केलीं असतीं, तीं सुद्धां त्यांच्या वक्रोक्तीच्या झपाट्यांत सांपडूं लागलीं.

पण केवळ ही वक्रोक्ति म्हणजेच 'काळ' पत्राचें सौंदर्यसर्वस्व आणि शिवरामपंतांची मुख्य कामगिरी असें जर कोणी समजेल तर तें मात्र चूक आहे. वक्रोक्ति हा एक पद्धतिविशेष होता, इतकाच त्याचा अर्थ आहे. त्यांचें खरें काम वाचकाला देशाभिमानी बनवणें अथवा त्यांच्या गूढस्थ देशा-भिमानाला फुंकर घालणें आणि त्यांच्यापुढें शुद्ध स्वातंत्र्यकल्पना मांडणें हें होय. हें त्यांनीं १८९८ पासून तों १९०८ पर्यंतच्या दहा वर्षांत इतक्या उत्कटतेनें केलें कीं, इकडील वर्तमानपत्राच्या इतिहासांत त्याला तुलना सांपडणें कठीण आहे. स्वदेशभक्ति आणि स्वदेशाभिमान तेव्हां लहान मुलांच्यासुद्धां तोंडीं खिळून गेला तो या 'काळ' पत्राच्या सतत धारेमुळें. केसरी लोकांना स्वदेशाभिमान शिकवीत होता. किंबहुना हरतऱ्हेचे धक्केचपेटे आणि देहदंड सोसून शिकवीत होता. केसरीचा व्याप-उद्योग मोठा, पण चालूं चळवळी सर्वथा टाकाऊ असें त्यानें मानलें नव्हतें. शुद्ध स्वातंत्र्य हें टिळकांना नको असेल असें म्हणण्याची कोणाची छाती आहे? पण व्यवहारांत उतरलेल्या माणसास आपल्या उंच तंद्रींतून खालीं यावेंच लागतें. पण शिवरामपंतांनीं व्यवहारांचा बोजा शिरावर केव्हांच घेतला नाहीं. तो त्यांनीं आपल्या गुरूच्या शिरावर दिला व आपल्या ध्येयवादासाठीं ते जणूं काय मोकळे राहिले. कार्यवाहाची व ध्येयवादाची फारकत झाली. पण हा श्रमविभाग बैठक बसवून ठरवून घेतला होता, असें थोडेंच आहे? मनःप्रकृतीस अनु-सरून तो ठरतां ठरतां ठरला. पण हें एकदां ठरविल्यावर त्यांनीं आपलें काम विलक्षण तडफेनें केलें. रोम, ग्रीस, स्वित्सर्लंड, रशिया, अमेरिका इत्यादि देशांचे इतिहास त्यांनीं या एकाच विचारानें धुंडाळले कीं, देश-भक्तीचीं उदाहरणें त्यांत कोठें गवसत आहेत. आपल्या इतिहासाचें परि-

शीलन त्यांनीं याच विचारानें केलें. पुराणांतील कथा त्यांनीं थापटून थोपटून इकडे वळवून घेतल्या. फ्रान्सच्या राज्यक्रान्तीचा इतिहास, रूसो–व्हॉल्टेअर यांचीं तत्त्वज्ञानें यांतून स्वातंत्र्यविचारास लागू असलेले भाग इकडल्या परिस्थितीस जमवून घेतले. प्रथम प्रथम ही शिकवण त्यांनीं गोष्टीच्या रूपानें चालू केली. गोष्ट हेंच तेव्हांच्या 'काळ' पत्राचें वैशिष्ट्य होतें. पण या गोष्टी जरी लोकांत खपल्या तरी सरकारला मुळींच खपेनात. शिवरामपंतांना आंतून इषारा देण्यांत आला कीं, हें चालावयाचें नाहीं. याच वेळीं त्यांच्या लिहिण्यांत सोशॅलिस्ट मताचें कांहीं प्रतिपादन होत असे. तेंहि सरकारास व इकडील श्रीमंतांस खपण्यासारखें नव्हतें. पुढें बोअर युद्ध व रूसो–जपानी युद्ध हें खाद्य वर्तमानपत्रांना सांपडलें. बोअर युद्ध म्हणजे एका स्वातंत्र्यप्रिय राष्ट्रावर इंग्रजांनीं उचललेलें हत्यार, आणि रूसो–जपान युद्ध म्हणजे एका नवीन लहान व विशेषतः आशियांतील राष्ट्रावर रशियासारख्या प्रचंड राष्ट्रानें उगारलेलें शस्त्र! मग त्याचा उपयोग कसा करून घ्यावा, व स्वदेशांत स्वातंत्र्याची ऊर्मि कशी बलिष्ठ करावी, हें शिवरामपंतांना कोणीं शिकवावयास हवें होतें होय! सह्याद्रीच्या मूक पाषाणांतूनसुद्धां स्वातंत्र्याच्या गर्जना ज्याच्या कानाला ऐकूं येत, त्याला बोअर लोकांनीं प्रत्यक्ष ठोकलेल्या आरोळ्यांतून काय काय ऐकूं आलें असेल हें कोणीं सांगावें! प्रत्यक्ष डोळ्यादेखत होत असलेला हा स्वातंत्र्यनाश पाहून पूर्वी हाच नाश येथें कसकसा झाला असेल याविषयींच्या त्यांच्या कल्पना स्पष्ट झाल्या. इतकें असल्यावर परमाणूचा परमेश्वर करण्यासारखी ज्याची मूळची कल्पनाशक्ति, त्याला इतकें साहित्य मिळाल्यानंतर त्याचा पसारा कसा करावा, हें कळावयास कांहीं उशीर लागणार होता काय? जपानच्या अभ्युदयाचा, आणि त्यानें रशियाशीं चालविलेल्या प्राणान्तक संगराचा हिंदुस्थानवर अत्यंत खोल परिणाम होत होता. हीं सर्व प्रकरणें परांजप्यांनीं इंधनासारखीं उपयोजिलीं, व त्यांच्या आंचेवर तरुण वाचकांचीं मनें नुसतीं उबविलींच नाहींत,–तर चडफडावयास लाविलीं. 'तरवारीचा हक्क' आणि 'राज्यापहार आणि न्याय' अशांसारख्या लेखांत त्यांनीं दाखविलेली प्रतिपादनाची नवी तऱ्हा वाचकांना उल्हसित करी. 'दिल्लीचें तख्त व

भाऊसाहेबांचा घण', 'कानपूरची विहीर', 'ब्लॅक होल' अशांसारख्या लेखांनीं – मेलेल्या लोकांचा इतिहास किती जिवंत आहे याची खात्री नसानसांतून अंगांत भिने. 'पिकाच्या पाहणी'नें स्वातंत्र्याचा अपहार आणि स्वातंत्र्यासाठीं कष्ट कसे होत असतात, याची जाणीव तरवारीच्या धारेप्रमाणें वाचकांच्या मनांत शिरत असे. ते ते लेख आतां विसरून गेले. त्यांचीं नांवें आतां आठवतात, आणि तेव्हां त्यांच्या वाचनानें मनावर झालेले संस्कार हेच मात्र शिल्लक आहेत. आतां 'सोमयज्ञाची हकीकत' वर्तमानपत्रांत पुन्हा कोठें भेटेल काय? 'वुल्फटोन' इतर कोठें भेटण्यासारखा आहे काय? गिरणीच्या मजुरानें स्वतःच्या शेतावर पाहिलेला – तो आधीं वठलेला व पश्चात् प्रफुल्लित झालेला 'आम्रवृक्ष' कोणाच्या वाङ्मयांत डोलतांना आतां कोठें दिसेल काय? 'परमेश्वरी लीला अगाध आहे' हें उदात्त तत्त्व एवढ्या करुणवाणीनें सांगण्याचें सामर्थ्य कोणा भगवद्भक्ताला तरी आहे काय? 'रुमाल्या भिल्ला'च्या पोरांनीं केलेल्या विश्वासघातानें प्रत्यक्ष पवाडे करणाराला किंवा गाणाराला तरी इतकी हळहळ वाटलेली कोठें दिसेल काय? 'सगळ्यावर उपाय आहे, पण—' गुलामगिरीवर उपाय नाहीं, म्हणून उत्पन्न झालेली नैराश्याची तळमळ कोणा स्वातंत्र्यभक्तानें कागदावर तशा प्रकारें वठविलेली दुसरीकडे कोठें पाहावयास सांपडेल काय? 'आयांकरतां कोयत्याचें गाणें' कोणा राष्ट्रीय कवीला रचतां येत आहे काय? गोरक्षक लोकांची छावणी कोठें आहे याची बातमी देणाऱ्या ब्राह्मणांची 'फितुरी' स्पष्ट सांगून त्यांची निर्भर्त्सना करण्याचा जात्यतीत देशाभिमान या जातिविचारानें बुजबुजलेल्या काळांत कोणी दाखवील काय? प्रदर्शन आणि पदार्थसंग्रहालयें पाहण्याच्या या दिवसांत 'ऐतिहासिक प्रदर्शनां'तील म्हैसूर देखाव्याची कल्पना केवळ चर्मचक्षूवाल्या प्रेक्षकांना आहे काय? 'देहूहून परत येतांना' टाळ कुटण्याचें सोडून आसपासच्या रणमैदानांच्या भयाण शान्ततेंत दिवसेंदिवस अस्पष्ट होत चाललेले शूर शिपयांच्या गर्जनांचे प्रतिध्वनि कधीं कोणास ऐकावेसे वाटतात काय? सर्वांच्याहि वर, सह्याद्रीच्या उत्तुंग शिखरावर सर्व स्थानदेवतांनीं, जलदेवतांनीं, आकाशदेवतांनीं, सर्व मरुद्गणांनीं, सर्व थोर पुरुषांच्या आत्म्यांनीं – त्या प्रशान्त प्रभातीं जमून जें 'श्रीशिवाजीचें पुण्याहवाचन' घडविलें तें पाहण्याची कल्पनेची भरारी

एका तरी कादंबरीकाराला अगर कवीला आहे काय? ती वाङ्मयांत दाखल झालेली देशाभिमानाची तळमळ, ती फितुरीची चीड, ती चिल्हर सुधारणांची तिरस्कृति, ती स्वातंत्र्याची उपासना, ती वैदिक संस्कृतीची अभिमानवृत्ति, आतां वाङ्मयांत तरी इतक्या गांभीर्यानें, लीलेनें व आवेशानें चित्रित झालेली दिसणार नाहीं. हें वाङ्मय लिहून शिवरामपंतांनीं महाराष्ट्र देशांत शुद्ध स्वातंत्र्यवाद सुरू केला. हा मान केवळ त्यांचा म्हणून राखून ठेवावयास हवा. व्यवहाराच्या उपाधींत सांपडण्यासारखी त्यांची मनःप्रवृत्तीच नव्हती. त्या उपाधींत सांपडण्यानें ज्या अनेक उपाधि मागें लागतात त्यांच्या झिंज्या मुठींत धरून ठेवण्यास टिळकांसारखा स्वातंत्र्याच्या ध्रुवावर दृष्टि ठेवून पण पायाखालच्या भूमीवर मात्र ठाशीव पावलें टाकणारा गडीच हवा होता. तें काम परांजप्यांना झेपण्यासारखें नव्हतें. त्यांनीं आपली प्रवृत्ति व आवांका उत्तम ओळखला होता. यामुळें उभयतांचें हितच झालें. टिळकांच्या प्रगमनशील राजकारणाला अनुकूल भूमि बनविण्याचें काम शिवरामपंतांच्या या स्वातंत्र्यवादानें निःसंशय केलें. हें टिळकांनीं ओळखलें होतें, आणि म्हणून शिवरामपंतांस त्यांनीं आपल्या परिवारांतच वागविलें, निराळें मानिलें नाहीं; आणि नित्याच्या धबडग्यांत त्यांस ओढिलेंहि नाहीं. कारण कीं, ध्येयवादाचा गंभीर व सुस्वर उद्‌गार त्यांना महाराष्ट्रांत हवाच होता. या ठिकाणीं दुसऱ्या एका गोष्टीचा उल्लेख केला पाहिजे.

बंगालच्या फाळणीनंतर बंगाल्यांत जबरदस्त मतान्तर झालें, आणि परांजप्यांना काँग्रेसमधून बहिष्कृत करावें, असें आपल्या कमिट्यांतून ५-७ वर्षांपूर्वीच सुचविणारे लोक बंडखोरीची भाषा बोलूं लागले! मवाळांचे जहाल झाले, व जे पूर्वीच जहाल होते ते स्वातंत्र्यवादी बनले. अशांनीं आपल्या नवमतार्चे प्रतिपादक म्हणून 'वंदे मातरम्' पत्र सुरू केलें व स्वतंत्रतेचीं अत्यंत रसरशीत, तेजस्वी व गंभीर प्रतिपादनें त्यांत येऊं लागलीं. तीं ज्यांनीं वाचलीं त्यांना वाटलें कीं, हें सर्व मराठी भाषेंत व महाराष्ट्रांत एका स्वातंत्र्योपासकानें पूर्वीच केलेलें आहे. तेंच विचारवैभव, तीच प्रतिभा, तीच गंभीर धर्मबुद्धि, तोच धाडसी बेफिकीरपणा, तेंच भविष्यत्कालाला कवटाळूं पाहणारें चैतन्य खुद्द आपल्या घरीं शिवरामपंतांनीं आधींच दाखविलें आहे, हें पाहून

वाचकांना अभिमान वाटला. बंगाल्यांत जे विचार केवळ इंग्रजी जाणणारांनाच वाचतां आले ते येथें खास देशी भाषेंत हजारों लोकांस आधींच वाचतां आले होते. म्हणून महाराष्ट्रानें शुद्ध स्वातंत्र्योपासना ही बंगालपासून घेतली हा जो ध्वनि कोठें कोठें उठविला जातो, तो साफ खोटा आहे. महाराष्ट्रांत शुद्ध स्वातंत्र्याची आवड, आणि तिच्या जोपासनेस लागणारा तद्विषयक विचारांचा अखंड पुरवठा आधींच सुरू होता; आणि तो कै. शिवरामपंत परांजपे यांनींच केला, हें निर्विवाद आहे. केवळ याच स्फूर्तिदायक मंत्रांचा मूळ मान्त्रिक कोण म्हणून शोधूं जातां असें दिसून येईल कीं, कै. शिवरामपंत हेच त्या मंत्राचे मान्त्रिक होते. या स्वातंत्र्याच्या शिकवणीस योग्य वेळीं फळ आलें. पण याचा मूळ पाठ महाराष्ट्रांत कोणीं दिला म्हणून जर पुढील शोधक इतिहासांत उरफाटा प्रवास करील तर त्यास 'काळा'च्या फायलींतच शिरावें लागेल. बंगाल्यांतील स्वातंत्र्यवादी लोकांचें मुखपत्र 'वंदे मातरम्' हें होय. त्याचे मुख्य लेखक जे श्री. अरविंदबाबू त्यांची या बाबतींतील कामगिरी फार मोठी आहे. त्यांच्या विचारांत ओज आणि लेखनांत प्रचंड खळखळाट होता. त्यांनीं कित्येक दिवस स्वातंत्र्यविचाराचा बेसुमार पाऊस पाडला. चालू रटमट जी असेल ती झिडकारून देऊन केवळ शुद्ध स्वातंत्र्य-बुद्धीच्या वातावरणांत फिरत राहण्याची त्यांची हौस, तदनुसार धीरोदात्त विचार आणि सर्वोच्याहि वर त्यांची ती सिंधूच्या ओघाप्रमाणें खळबळ करीत आणि घोंघावत रकानेच्या रकाने भरभरून वाहणारी डौलदार व काव्यमय इंग्रजी भाषा पाहून तरुण पिढींतील लोक केवळ बेहोष होऊन जात असत! पण ज्यांनीं कै. शिवरामपंतांच्या स्वातंत्र्यपोषक वाङ्मयाची त्या वाङ्मयाशीं तुलना केली असेल, त्यांस दिसून आलें असेल कीं, एक इंग्रजी भाषा सोडली तर शिवरामपंतांच्या प्रतिपादनांतील विविधता, तात्त्विक गांभीर्य, गुलामगिरीच्या अवमानाची खणती, ऐतिहासिक देशाभिमानाची उत्कटता, काव्याची मनमुराद पेरणी,– ही अरविंदांच्या लिहिण्यापेक्षां निःसंशय श्रेष्ठ होती. हेंच शिवरामपंतांचें लिहिणें जर इंग्रजी भाषेंत असतें तर त्यांची प्रसिद्धि आणि लोकप्रियता महाराष्ट्राच्या चतुःसीमा ओलांडून अखिल भारतावर पसरली असती. पण तें झालें नाहीं. त्यांच्या उदात्त कल्पना महाराष्ट्राच्या चतुःसीमेंतच गुंगत राहिल्या, आणि यामुळें इतर बाजूंच्या राजकारणांतील

व समाजकारणांतील पुढारीपणाचा मान जसा महाराष्ट्रास आपल्याकडे ओढतां आला तसा स्वातंत्र्योपासनेच्या गुरुत्वाचा मान शक्य असून त्याला इकडे आणतां आला नाहीं. पण हा मान जरी महाराष्ट्रास मिळाला नाहीं, तरी स्वातंत्र्य-कल्पना लोकांकडून शिकण्याचा प्रसंग मात्र त्याजवर आला नाहीं. आणि या गोष्टीचें सर्व श्रेय कै. शिवरामपंत परांजपे यांसच आहे. म्हणून त्यांचें नांव महाराष्ट्राच्या इतिहासांत 'शुद्ध स्वातंत्र्याचा महाराष्ट्रांतील पहिला प्रतिपादक' असेंच लिहिलें जाईल. शिवरामपंतांचा हाच खरा गौरव होय.

पण कै. शिवरामपंतांनीं स्वातंत्र्यपुरस्कारासाठीं केवळ लेखणीच चालविली असें नाहीं. त्यांनीं आपली रसाळ व आवेशपूर्ण वाणीहि तदर्थ शिणवली. किंबहुना ते लेखनामुळें समाजाच्या पुढें येण्याच्या आधीं आपल्या वक्तृत्वानेंच आले. ते आरंभीं आरंभीं पुराणें सांगत व प्रवचनें करीत. एवढा आंग्लविद्याविभूषित पंडित पुराण सांगणार आहे, असें कळतांच लोकांच्या झुंडीच्या झुंडी श्रवणास जमा होऊं लागल्या. दरम्यान एकदां त्यांस बोलावून नेऊन डॉ. भांडारकर म्हणाले कीं, "हें तुम्ही काय करीत आहां? गळ्यांत तंबोरा अडकवून बोवा का होणार आहां? आपली विद्वत्ता अशी वायां दवडूं नका." शिवरामपंत त्यांच्यापुढें फारसें बोलत नसत. गुरु-शिष्यांच्या भेटी पुष्कळदां होत असत; पण शिवरामपंत राजकारणांत कायमचे प्रविष्ट झाल्यानंतर डॉक्टरसाहेबांनीं त्यांना पुन्हा कधीं बोलावून नेलें नाहीं. पुराणावरून प्रवचनावर व प्रवचनावरून व्याखानावर येणें त्यांना प्राप्तच झालें. कारण, पुराण म्हटलें काय किंवा प्रवचन म्हटलें काय, तें होत असे व्याख्यानच! शिवरामपंतांचा आवाज पहाडी आणि मांसल असे. बोलतांना त्यांना श्रम होत नसत. आवाजांत अर्थानुरूप चढउतार करण्याची ढब त्यांना उत्तमच साधली होती. भाषण खरें,–पण तें वर्तमानपत्रांतील मजकुरासारखें व्याकरणशुद्ध असे.

दहा-दहा ओळींचें एक एक वाक्य तें सहज पेलीत. कर्ता, कर्म, क्रियापद हीं आपआपल्या लव्याजम्यासह आपापल्या ठिकाणीं नेमकीं येऊन बसत. कर्ता कोठें जर दूर मागें राहिला, तर पुष्कळ वक्ते त्याला तसाच तेथें

लोंबत ठेवतात, व नवेंच कर्तृपद घालून विधानाची योजना करतात. शिवरामपंत असें कधींहि करीत नसत. कितीहि व केवढालीं कां विशेषणवाक्यें किंवा क्रियाविशेषणवाक्यें मध्यें येईनात, त्यांना साफ ओलांडून तो दूरस्थ कर्ता आपल्या क्रियापदार्शी अचूक अनुसंधान राखीत असे. वाक्यविस्तार फार होत आहे, असें त्यांचें त्यांस वाटूं लागल्याचें निदर्शन म्हणजे ते 'हें' या सर्व नामावर जोर देत व मग उजवा हात उभारून बोटांनीं त्या 'हें' ला थोपवून धरून मधला शब्दसंभार येऊन गेल्यावर त्याची त्याच्या क्रियापदार्शी गांठ घालून देत. बोलतांनासुद्धां विरामचिन्हें अगदीं यथास्थल करण्याची त्यांची पद्धति त्यांच्या लांब लांब वाक्यांना सुगमता आणून देत असे. 'हें' व 'कीं' या अक्षरांवर थांबून पुढील संकेतवाचक शब्दांची जुळणी करण्यासाठीं ते वक्तृत्वाचा ओघ अडवून धरीत; तेव्हां आतां पुढें काय येणार आहे हें ऐकावयास श्रोते फार उत्सुक बनत. प्रतिपक्षाला उत्तरें देतांना ते स्वार्थी वाक्यांनीं विधानें करीत नसत, तर प्रश्नार्थी वाक्यांनीं उलट शत्रूसच पेचांत धरून त्याजकडून आपण अपेक्षित उत्तर वदवीत आहों, असें दाखवीत. व्याख्यानाचा आरंभ मध्यम आवाजानें करीत, व मग तात्पर्याच्या किंमतीबरोबर तो उत्तरोत्तर तापत जाई. व्याख्यानाचा उपसंहार चालू झाला हें ते आपला चढलेला आवाज पाडून व्यक्त करीत, व पुढील मजकूर खूप झपाट्यानें बोलत. रसानुरूप आविर्भाव, हातवारे करणें किंवा सबंध मोहोरा वळविणें हें ते अगदीं सहजगत्या करीत. अर्थानुसार चेहऱ्याची छबी ते एखादे वेळीं बदलीत. त्यांचा मुख्य भर आवाजाच्या चढउतारावर असे. पण हीं सर्व उपांगें झालीं. त्यांच्या व्याख्यानांतील रस त्यांच्या आवेशावर, देशाभिमानानें स्फुरलेल्या प्रतिभेवर, आणि उपरोधावर अवलंबून असे.

पण त्यांच्या नवरसांचा नायक शृंगार नसून वीर हा होता, आणि एकदां तो वीररस सुरू झाला म्हणजे श्रोतृसमाज २॥–३ तास चित्रासारखा स्तब्ध बसत असे ! हा वीररस रंगभूमीवरच्यासारखा आवाजखेच करणारा किंवा हातपाय आपटणारा नसे. निव्वळ भावना असली तरी ती त्यांच्या बुद्धीच्या तावडींत असे ! त्यामुळें आपण एका देशाभिमानी अशा डौली पंडिताचें भाषण ऐकत आहों याचा प्रत्यय येई. दाखले इत्यादि जरी ते देत

असत, तरी त्यांची मुख्य मदार कारंज्याप्रमाणें भराभर वर उडणाऱ्या त्यांच्या जिवंत प्रतिभेवर असे. त्यांचीं प्रसंगस्फूर्त भाषणेंसुद्धां या कारणानें मोठीं मिष्ट बनत. दर शुक्रवारीं सकाळीं हातांत पडणाऱ्या 'काळा'च्या वाचनानें तरुण लोकांचीं डोकीं जशीं भणाणून जात तशींच त्यांच्या आवेशयुक्त व्याख्यानांनींहि जात. एकदां प्रो. कै. महादेव मल्हार जोशी म्हणाले : "विषय ऐतिहासिक असावा व शिवरामपंतांसारखा वक्ता असावा,–म्हणजे श्रोत्यांना असें वाटूं लागतें कीं, तरवार हातीं घेऊन आतां कापाकाप करीत सुटावें" प्रो. जोशांचे हे उद्गार अगदीं खरे आहेत. ही जर उतारवयाच्या माणसाची स्थिति तर भावनाप्रधान उमेदवार लोकांची काय होत असेल हें सहज ध्यानांत येईल. कर्नल वेजवुड इ. लोक एकदां इकडे आले होते, तेव्हां शनवारवाड्यापुढें टोलेजंग सभा भरली होती. कांहीं वेळ शिवरामपंत इंग्रजींत बोलले; पुढें मराठींत सुरुवात करतांच शनवारवाड्याच्या भिंतींचा उल्लेख करून त्यांनीं जो वीररस खडा केला त्याबरोबर जसा विजेचा गडगडाट व्हावा तसा टाळ्यांचा गजर झाला. एकदां टिळकांच्या अध्यक्षतेखालीं बोलत असतां ते अतिशय आवेशांत आले आणि आपलें राष्ट्रदेवतेचें रूपक वाढवीत वाढवीत गर्जून म्हणाले, "अशा प्रकारची ही सहस्रभुजा राष्ट्रदेवता आपण केव्हां उत्पन्न करणार?" आतां अतिरेक होणार हें ओळखून टिळकांनीं त्यांचा अंगरखा मागें खेचला. रामचंद्रापुढें जसा मारुति तसा शिवरामपंतांपुढें वीररस हात जोडून उभा असे.

विनोदहि त्यांस तितकाच वश असे. पण त्यांचा विनोद उपरोधजन्य असे. सर्व व्याख्यानचें व्याख्यान एखाद्या रूपकाखालींच संपे, व श्रोत्यांची हंसतां हंसतां मुरकुंडी वळे. वक्ता मात्र स्तब्ध असे. पण त्यांच्या कृत्रिमाचें हंसें त्यांनाच अनावर झाल्याचे कांहीं प्रसंग आठवतात. व्याख्यानास सुरुवात होऊन अर्धा तास लोटला तरी कित्येकदां जम बसत नाहींसें दिसे. पण प्रतिभेस पुरेशी डिचवली म्हणजे ती उसळून बाहेर येई, आणि मग वक्ता व श्रोते तासच्या तास आनंदांत डुलत रहात. सुदैवानें त्यांची शरीरयष्टि उंच व भव्य असून, गर्दनेपासून वरचा भागहि तिला अनुरूप असे. सृष्टीनें आपले सर्व अलंकार त्यांना दिले होते. त्यांची चेहरेपट्टी प्रमाणशील

असून ज्ञानशीलत्वाचें तेजहि तिजवर झळकत असे. अशा गुणांनीं मंडित झालेल्या या वक्त्यानें सुमारें दहा वर्षें पुणें शहर हस्तगत करून टाकलें होतें. टिळकांची थोरवी ही कीं, असल्या तेजस्वी माणसालाहि त्यांनीं मागें टाकलें! टिळक-परांजपे ही जोडी उल्लेखिली जाई,-व ती जेथें उभी तेथें सर्व श्रोते लोटावयाचे.

ठाणे ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्र
अनुक्रमांक ..... दि: .....
मानांक ..... नोंद दि: .....

१२ : : आजच्या संतांचें खरें कार्य

आर्य लोकांनीं विविध प्रकारची संस्कृति उत्पन्न केली, आणि तिच्या पोटांत अनेक लहानमोठे व्यवसाय उत्पन्न झाल्यामुळें भारतांत सर्वत्र वसत असलेले लोकपुंज धनोत्पादनासाठीं हे व्यवसाय करूं लागले. अर्थातच या वरिष्ठ समाजाच्या आसपास वागणारे शेंकडों प्रकारचे लोक यांच्या संस्कृतीच्या पाशांत कायमचे गुंतले. आपल्या पोटासाठीं शुद्ध रानटी तऱ्हेचे कांहीं व्यवसाय ते आधीं करीतच असतील, परंतु या नव्या संस्कृतींतील व्यवसाय केल्यानें त्यांचें पोट चांगलें भरूं लागलें, आणि त्यांच्या मिळकतीला निश्चितपणा आला. व्यवसायरूप जातिसंस्थेचें हें आदिस्थान लक्षांत घेण्यासारखें आहे. कोणीं कोणावर सक्ति केली होती,–किंवा कोणीं कोणाला श्रेष्ठ–कनिष्ठ मानण्यासाठीं तयार होऊन बसले होते, असें समजणें अगदीं चूक आहे. व्यवसायाची निश्चिति झाल्यानंतर मग श्रेष्ठ–कनिष्ठ भाव उत्पन्न झाले. अधिक कौशल्याचे, अधिक मानाचे, अधिक शाश्वतीचे व लाभाचे व्यवसाय आर्योनीं आपल्याकडे ठेवले; आणि त्यांच्या पोटांतील जे कनिष्ठ प्रकारचे व्यवसाय ते त्यांनीं ह्या असंस्कृतांच्या हवालीं केले व ते त्यांनीं पत्करले.

तथापि या नव्या लोकांच्या संस्कृतीलासुद्धां कांहीं एक मर्यादा होती. तिच्या पोटांत किती व्यवसाय निघूं शकतील हें उत्तरोत्तर ठरत गेलें; आणि फार फार तर दोन–अडीचशें व्यवसायांहून जास्त धंद्यांची कल्पना त्यांना करतां आली नाहीं. आपण आर्य संस्कृतीची स्तुति करतों; परंतु आधुनिक युरोपियन संस्कृतीला जितकीं विविधांगें आहेत तितकीं या प्राचीन संस्कृतीला खचित नव्हतीं. राज्य स्थापणें व तें चालवणें, अन्नवस्त्रासाठीं सृष्टीचें आवाहन करणें, समाजाची रचना शाश्वत स्वरूपाची व्हावी म्हणून कांहीं आडाखे बसविणें, आणि परमेश्वराच्या स्वरूपाविषयीं विशेष प्रकारचीं अनुमानें बांधणें,–याच्या पलीकडे ही संस्कृति जाऊं शकली नाहीं. अर्थातच या देशांतील निरनिराळे लोकपुंज आपल्या पाशांत गुंतवण्याची कुवतच या संस्कृतींत कमी होती. लोकपुंज फार, आणि कुवत मात्र बेताची – असा प्रकार होता.

त्या त्या संस्कृतीचा मगदूर आपल्या भजनीं किती लोकांना लावून घेतां येतें यावर अवलंबून असतो. गेल्या कांहीं शतकांतील युरोपियन संस्कृतीचा मगदूर या दृष्टीनें फार वाढलेला होता. भौतिक शास्त्रांच्या बळावर त्यांनीं तो इतका वाढविला कीं, आपापल्या लहानशा देशांतून बाहेर पडून त्यांनीं पृथ्वीवरील किती तरी लोक आपल्या दिमतीला लावून घेतले. कोणी शंभर वर्षें, कोणी दोनशें वर्षें, कोणी चारशें वर्षें ही किमया यशस्वी करीत राहिले. इतकीं वर्षें गेलीं, आणि युरोपियन संस्कृतीचीं बौद्धिक सामर्थ्यें त्या त्या लोकांच्या परिचयाचीं झालीं; व मग या युरोपियन संस्कृतीच्या आक्रमक स्वरूपाला उतरती कळा लागली. त्यांचीं साम्राज्यें ढासळूं लागलीं, आणि आतां तर जर का भौतिक शास्त्रांतील त्यांची प्रगति येथेंच थबकली, किंवा ती चालू राहून त्यांनीं ती जगांतील सर्व लोकांच्या मालकीची केली तर युरोपियन संस्कृतीचा बडिवार संपला म्हणून समजावें. प्राचीन आर्य संस्कृतींत अन्न, वस्त्र, निवारा, राज्यशासन, समाजबंधन, व परमार्थाचें अनुमान यांची झालेली वाढ अशीच पूर्वी एकदां कुठें तरी खुंटून बसली; आणि स्वतः आर्य लोक व त्यांनीं दिमतीस लावून घेतलेले इतर लोकपुंज हेहि जेथल्या तेथें खुंटून बसले. जीविताला ठराविकपणा प्राप्त झाला; आणि तेवढ्यावर कसें तरी चालतें असें दिसूं लागलें. आर्य लोकांपैकीं अथवा जे कोणी या संस्कृतीचे पोशिंदे होते त्यांच्यापैकीं कांहीं थोड्या वर्गांची राहणी उच्च प्रकारची राहिली; आणि बाकीचे सारे लोकपुंज म्हणजे जाती व जमाती प्रपंचांत थोडीबहुत शाश्वती लाभल्यामुळें आपापल्या ठिकाणीं निकृष्ट राहणींतच कायमचे बसून राहिले.

याच्या पलीकडे ज्या जाती आणि जमाती होत्या त्यांचा समावेश आर्य संस्कृतीला आपल्या पोटांत करतां आला नाहीं; किंवा कदाचित् त्यांनींहि जाव दिला नाहीं. त्या सरहद्दीच्या पलीकडेच राहिल्या. त्यांना आर्य संस्कृतीच्या पाशांत येतां आलें नाहीं. कारण तिचा मगदूर बेताचाच होता. त्यांना स्वतःहि कांहीं नवीन उत्पन्न करतां आलें नाहीं. त्या स्थितींत त्या अजूनहि आहेत.

संख्येनें बलिष्ठ असलेले लोक संख्येनें अगदीं कमी असलेल्या दुसऱ्या लोकांच्या दिमतीला राहतात याचें पुष्कळांना आश्चर्य वाटतें. पण हें आश्चर्य

डोळस नाहीं. हिंदुस्थानावर राज्य करणारे इंग्रज लोक इतके थोडे होते कीं, एवढ्याशा लोकांच्या तावडींत इतके कोटी लोक वागतात तरी कसे असें पृथ्वीवरील इतर अनेक लोक एकमेकांना विचारीत असत. पण त्यांचें त्यांना आश्चर्य वाटत असलें तरी थोड्याशा इंग्रज लोकांनीं भारतांतील कोट्यवधि प्रजेवर दीडशें वर्षेपर्यंत खुशाल राज्य केलें, ही गोष्ट आतां नाकारून चालावयाचें नाहीं ! ज्या कारणानें इंग्रजांना हें राज्य करतां आलें, त्याच कारणानें पूर्वीच्या आर्य अथवा श्रेष्ठ लोकांनीं बाकीच्या लोकांवर शतकानुशतकें सर्व प्रकारचें वर्चस्व गाजवलें. मनगटाला अर्थ असतो; पण मेन्दूला त्याहिपेक्षां जास्त अर्थ असतो. इंग्रजांच्या ठिकाणीं तर मेन्दूहि होता, आणि मनगटहि होतें. फक्त ते संख्येनें फार कमी होते. पण ही संख्येची म्हणजेच बाहुबलाची विषमता त्यांनीं बुद्धिबलानें भरून काढलेली होती. पूर्वीच्या आर्य लोकांनीं बरोबर हेंच केलें होतें. त्यांच्या ठिकाणीं बुद्धिबलहि होतें आणि बाहुबलहि होतें. इंग्रजांचें बाहुबल जितकें कमी होतें तितकें मात्र त्यांचें नव्हतें, आणि जें कांहीं कमी असेल त्याची भरपाई ते बुद्धिबलानें करीत. बरें, ज्या अनार्यांवर आर्यांचा अंमल चालू होता त्यांना प्रपंचाची शाश्वती आणि धर्मांची मूळच्यापेक्षां उदात्त कल्पना एवढीं लाभल्यामुळें ते आपापल्या ठिकाणीं सतुष्टच होते. त्यांची मूळची स्थिति इतकी निकृष्ट आणि इतकी अनिश्चित होती कीं, ही नवी लाभलेली प्रापंचिक शाश्वती त्यांना निश्चितपणें सुखकर वाटूं लागली. असंतोष उत्पन्न झाला, नव्या आकांक्षा उद्भवूं लागल्या, श्रेष्ठांचें पाहून आपल्याला असें कां असूं नये असें वाटूं लागलें,—म्हणजे मग ह्या परिस्थितीला लोक निराळीं नांवें देऊं लागतात. ते तिला विषमता म्हणतात; जुलूमजबरदस्ती असें म्हणतात. वास्तविक पाहतां अगदीं मुळांत यांतलें कांहीं एक झालेलें नसतें. अमेरिकेंतील निग्रो लोकांवर झालेली जबरदस्ती ही मात्र अगदीं शुद्ध स्वरूपाची जबरदस्ती होती. आफ्रिकेंतील नायगर नदीच्या खोऱ्यांतून त्यांना जुलुमानें धरून आणलें होतें; आणि अमेरिकेंत जुलुमानेंच डांबून ठेवलें होतें. हिला गुलामगिरी हें नांव यथार्थ होय. पाश्चिम आशियांत आणि दक्षिण युरोपांत अशाच प्रकारची गुलामगिरी पूर्वी एके काळीं नांदत होती. पण भारतांत पूर्वी उत्पन्न झालेली सामाजिक विषमता आणि बुद्धिदृष्ट्या वरिष्ठ असलेल्या कांहीं युरोपियन राष्ट्रांनीं पृथ्वीवरील इतर देशांत

प्रस्थापित केलेली विषमता ही वर सांगितलेल्या गुलामगिरीच्या जातीची खचितच नव्हती. विषमता होती हें खरें; पण गुलामगिरी मात्र खास नव्हती.

बुद्धिवर्चस्वाचा हा गुणच आहे कीं, बुद्धीनें कमी असलेले लोक तिच्यापुढें आपोआपच नरम पडतात. क्षणभर अशी कल्पना करून चालूं कीं, चाळीसपन्नास लक्ष इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानांत कायमची वस्ती केली आहे; आपली वरिष्ठ प्रकारचीं ज्ञानें त्यांनीं आपल्याच हातांत ठेवलीं आहेत; आणि आपल्याच लोकांच्या अवश्य तेवढ्या फौजा बाळगल्या आहेत. असें झालें असतें तर काय झालें असतें? मला तर असें वाटतें कीं, त्या इंग्रजांचें राज्य हिंदुस्थानांतून इतक्या लवकर कधींहि गेलें नसतें; येथील लोकांत फाटाफूट करण्यांत त्यांना अधिक यश मिळालें असतें; आणि येथल्या वसतीच्या बळावर मातृभूमित्वाचा हक्कहि त्यांना सांगतां आला असता. प्रत्येक प्रान्तांतील, प्रत्येक खात्यांतील सर्व नाक्याचीं ठिकाणें त्यांनीं आपल्या हातीं ठेवलीं असतीं. परंतु अशी वस्ती केल्यानें आपलें वरिष्ठ प्रकारचें वांशिक पृथक्पण नष्ट होईल, आणि भारतांतील प्रचंड लोकसंख्येंत आपण लुप्त होऊन जाऊं; आपल्या लोकशाहीच्या कल्पना आपल्याच अंगलट येतील, आणि आपली उच्च संस्कृति शेवटीं नष्ट होईल, या जाणीवेनें त्यांनीं ही वस्तीची कल्पना मनांत आणलीच नाहीं. काश्मीरांत इंग्रज लोकांनीं वस्ती करावी, अशी कल्पना लॉर्ड कर्झन याच्या डोक्यांत एकदां आली होती; पण या कल्पनेला चलन मिळालें नाहीं, आणि तिचा गंभीर वृत्तीनें कोणीं विचारहि केला नाहीं.

भारतांत जें झालें तें हें कीं, आर्य लोकांनीं येथेंच वसति केली. अर्थात् अत्रस्थ लोकांहून आपण निराळे आहोंत, ही जाणीव त्यांना होतीच होती. ह्या निराळेपणाच्या जपणुकीसाठीं व आपला वांशिक पृथक्पणा टिकवून धरण्यासाठीं त्यांनीं रक्तसंबंधांत आलिप्तता ठेवली. त्यांच्या संस्कृतीच्या पाशांत प्रपंचसाधनासाठीं अनेक जाती आणि जमाती खुशीनें गुंतलेल्या होत्या. त्या फारशा हावभरू झाल्याच नाहींत. आणि ज्या झाल्या त्या काल-गतीनें जातिसंस्थेंतील अभिसरण न्यायाला अनुसरून वर सरकत गेल्या. मात्र ही अभिसरणाची गति अगदीं मंद राहिली; आणि हें अभिसरण फार थोड्या ठिकाणीं घडून आलें.

इकडे समाजाची ही रचना चालू असतांना दुसरीकडे एक निराळाच प्रकार घडून येत होता; अथवा निराळा कांहींच प्रकार घडून येत नव्हता, असें म्हणणें जास्त सयुक्तिक ठरेल. वरिष्ठ संस्कृतीला किती लोक स्वतःच्या पोटांत समाविष्ट करून घेतां येतात हें कळून चुकलें; आणि मग भारतांतील किती तरी लोकपुंज या मुख्य समाजापासून दूर राहिले. हे दूर राहणारे लोक संख्येनें फार थोडे होते असें नाहीं. त्यांची वस्तीहि निरनिराळ्या ठिकाणीं होती. मोठाल्या पर्वतांच्या उतरणी, त्यांच्या दऱ्या, त्यांच्या अंगावर वाढलेलीं जंगलें हींच त्यांच्या वस्तीचीं मुख्य ठिकाणें होतीं. रामायण–महाभारतांत अशा वस्त्यांचे उल्लेख अनेक ठिकाणीं आलेले दिसतात. या लोकांनीं हीं ठिकाणें अजूनहि सोडलेलीं नाहींत. डोंगर आणि दऱ्या-खोरीं त्यांना जें काय पुरवतात त्यावरच ते आपलें भागवीत राहिले आहेत. प्रसंगविशेषीं, प्रस्थापित समाजावर चाल करून जाऊन उपजीविकेचीं साधनें हस्तगत करण्याचा प्रयत्नहि ह्या जाती अधूनमधून करीत असतात. हिमालय, विंध्य, सातपुडा, सह्याद्रि अशांसारखे मोठमोठे पर्वत त्यांचीं आश्रयस्थानें बनलीं आहेत, आणि अजूनहि या आश्रयस्थानांत ते टिकून आहेत.

ह्या जातींत आणि जमातींत दिवसानुदिवस भर पडत चालली आहे. भारताचें दुर्दैव असें कीं, येथें बाहेरून येणाऱ्या लोकांची आवक शतकानुशतकें चालू राहिली. कोणी कोणाला नाहीं म्हणण्याची सोयच नव्हती; कारण कोणीं कोणाचें ऐकलें नसतें. प्रस्थापित संकेताप्रमाणें आपलें कांहीं चुकत आहे असें येणाऱ्यांनाहि वाटलें नाहीं, आणि अत्रस्थांनाहि यांत कांहीं चूक आहे असें वाटलें नाहीं. या नवागतांना कोणीं जवळ केलें नाहीं, आणि लोकांच्या जवळ जाण्याची किंवा त्यांच्याशीं मिळतें घेण्याची लायकीहि त्यांनीं दाखविली नाहीं. पण भूपृष्ठ इतकें विशाल होतें कीं, कोठें तरी वस्ती करून राहणें आणि सृष्टीला दुशा देऊन पोटाला मिळविणें त्या नवागतांना शक्य झालें. ज्यांना हें शक्य झालें नाहीं त्या जमाती भटकतच राहिल्या, आणि प्रस्थापित समाजाच्या सरहद्दीवर डल्ले घालून किंवा त्या समाजाला हरतऱ्हेचा उपद्रव देऊन त्यांनीं पोट भरण्याचा धंदा चालू ठेवला.

यांतच आणखी एका निराळ्या तऱ्हेची भर पडली. सुप्रतिष्ठित झालेल्या समाजांत ज्या जातींनीं किंवा जमातींनीं आपापलें स्थान नीट ओळखलें नाहीं,

अधिकाची वांछा धरली, आणि तें हस्तगत करण्यासाठीं जबरदस्तीचा उपयोग केला, त्या जाती आणि जमाती मुख्य समाजाच्या नजीक येऊनहि संस्कृति-कक्षेच्या बाहेरच राहिल्या. तसेंच ज्यांनीं मुख्य संस्कृतीशीं, आंत वागूनहि, द्रोह मांडला, त्याहि बहिष्कृत झाल्यामुळें या उपऱ्या जीवनांत जाऊन दाखल झाल्या. अशा या तऱ्हेच्या जाती आणि जमाती सर्व भारतभर पसरलेल्या आहेत.

येथें एक गोष्ट नीट ध्यानांत ठेवली पाहिजे ती ही कीं, ज्यांना आजवर अस्पृष्ट मानलें जात होतें ते मात्र हे लोक नव्हत. या पूर्वास्पृश्य जाती उपजीविकेची अत्यंत निष्कृष्ट कां होईना, पण साधनें मिळाल्यामुळें मुख्य समाजाच्या आश्रयालाच येऊन राहिल्या; किंवा त्या तेथें मूळच्याच असून अन्य कारणास्तव अस्पृश्य बनल्या. पण प्रस्तुत त्यांचा विचार चालू नाहीं. प्रस्तुतचा विचार हा आहे कीं, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र आणि अतिशूद्र हे पांच प्रकारचे लोक सोडले, व मुसलमान, पारशी, यहुदी, खिस्ती इत्यादि अन्यधर्मीय सोडले तर भारतांत ठिकठिकाणीं विखरून राहिलेल्या ज्या अन्य जाती व जमाती आहेत, आपलें काय व्हावयाचें हें ज्यांना कळलेलें नाहीं, आणि ज्यांचें काय करावें हें समाजाला कळलेलें नाहीं, त्यांचा विचार आपण सध्यां करीत आहों. प्राचीन संस्कृतीच्या ठिकाणीं या लोकांचा अंतर्भाव करून घेण्याची शक्ति खचितच नव्हती; या लोकांच्या ठिकाणीहि त्या संस्कृतीच्या पाशांत शिरण्याची शक्ति नव्हती. माणसें आत्मसात् करून घेणें ही आर्य संस्कृतीची प्रसरणशीलता संपून गेलेली होती; आणि म्हणूनच आज कित्येक सहस्र वर्षें ह्या जाती आणि जमाती लांबच राहिल्या आहेत.

सध्यांचा मनु असा आहे कीं, जुन्या संस्कृतीचें व समाजरचनेचें कवच फोडावें, प्रस्थापित श्रेष्ठ-कनिष्ठ भाव गौण समजून टाकून द्यावे, आणि जन्मावरून माणसाचें सामाजिक स्थान ठरत जावें. सर्व देश आपल्या मालकीचा आहे, आणि गुणांच्या बळावर आपलें नशीब काढावयास येथें कोणाचाहि सामाजिक किंवा धार्मिक प्रतिबंध नाहीं; इतकेंच नव्हे तर आपल्या पिंडगत सामर्थ्यांचा विकास करावयास येथें पूर्ण संधि मिळते अशी ग्वाही सर्व लोकांना मिळावी, ही समाजाची नवीन रचना होय.

ही नवी रचना जर चालू झाली आहे, तर या समाजापासून फटकून दूर राहिलेले जे लोक आहेत त्यांचें काय करावयाचें, असा प्रश्न विचारवंतांच्या पुढें उभा आहे; आणि त्यांनीं असें ठरविलेलें दिसतें कीं, नव्या शास्त्रशोधामुळें जर आपला समावेशकपणा वाढलेला आहे, निर्वाहाचीं साधनें आणि व्यवसाय जर अधिकाधिक उपलब्ध करून घेतां येण्यासारखे आहेत, तर आतांच सांगितलेल्या या लोकांवर नवे नवे संस्कार करावे; त्यांना आधुनिक कल्पना द्याव्या; त्यांच्या जीविताला स्थिरपणा आणावा; सामाजिक संभावितपणा त्यांच्या ठिकाणीं उत्पन्न करावा; आणि मुख्य समाजाचे अवयव म्हणूनच त्यांचा संग्रह व्हावा.—नवी समाजरचना करणाऱ्यांच्या बुद्धीचा हा आवांका आहे; निदान ही त्यांची इच्छा आहे. हा प्रयत्न किती काळ चालू राहतो आणि किती यशस्वी होतो, हें नव्या संस्कृतीच्या प्रसरणशीलतेवर आणि या उपऱ्या फाटिंग किंवा तटस्थ लोकांच्या ग्रहणशक्तीवर अवलंबून आहे.

सध्यांच्या मनूचा दुसरा असा एक विशेष दिसतो कीं, धर्माचें नांव सहसा काढूं नये. ती बाब ज्याच्या त्याच्या मर्जीवर ठेवावी; आणि शासनसंस्थेनें एवढेंच करावें कीं, अन्न, वस्त्र आणि निवारा यांचा लाभ ह्या लोकांना करून द्यावा; आणि तो व्हावा म्हणून अवश्य असलेलें आधुनिक तऱ्हेचें शिक्षण त्यांना द्यावें. पूर्वीच्या काळीं या लोकांच्या अंगावर हिन्दु संस्कृतीचें झिरझिरीत कां होईना, पण आवरण पडलेलें होतें. त्यांच्या चालीरीती, देवदेवता, समजुती, अपसमजुती आणि आचारविचार हीं पाहिलीं म्हणजे या आवरणाची बरोबर कल्पना येते. हेंच आवरण दृढ करण्याच्या दृष्टीनें हिन्दुधर्म-प्रसारकांनीं अजूनहि यत्न केला तर चालण्यासारखें आहे, पण ही बुद्धि या प्रसारकांना सहजासहजीं होईल असें दिसत नाहीं. पारशी आणि यहुदी यांना आपल्या धर्माचा प्रसार करावयाचा नाहीं. ज्यांच्यांत हा प्रसार करावयाचा, ते एकधर्मत्वाच्या मुद्द्यावर आपल्या जातींत शिरतील असें भय त्यांना वाटतें. मुसलमानी धर्माची प्रसाराची कल्पना आधुनिक जीविताला पटेल अशी नाहीं. रानटी जीवन आक्रमक बनविण्याकडे ह्या संस्कृतीचा कल जास्त असतो. म्हणून ह्याहि धर्माचा प्रसार इतरांशीं विद्वेष न करतां करणें अवघड आहे. त्यांनीं विद्वेष वाढविला तर सरकारला प्रतिबंध करावा लागेल. शेवटीं ख्रिस्ती धर्म हा एकच असा राहिला आहे कीं,— ज्याचें आवाहन या लोकांच्या मनाला त्वरेनें पोहोंचेल.

दया, माया, परोपकार, राहणीची सुधारणा, विद्येचें वितरण इत्यादि आधुनिक पद्धतीला शोभेशा आणि आकर्षक असलेल्या किती तरी बाबी परदेशी खिस्ती मिशनरी देत असत. पण आतां तर या परदेशी खिस्ती मिशनऱ्यांच्या या प्रयत्नांची आवश्यकताच उरलेली नाहीं. आतां देशी मिशनऱ्यांना आचार्य पदवीचे अधिकार खिस्ती धर्मपीठाकडून देण्यांत आलेले आहेत. ह्या नव्या बढतीमुळें देशी मिशनऱ्यांचें आसन स्थिर आणि उंच झालेलें आहे. आणि धर्मप्रसाराची नवी ऊर्मि त्यांना प्राप्त होण्यासारखी आहे. सुमार असा दिसतो कीं, ज्या जाती आणि जमातींविषयीं आपण सध्यां बोलत आहोंत, त्यांना खिस्ती धर्माची कल्पना व दीक्षा देण्यासाठीं हे नवे खिस्ती मिशनरी सरसावतील. त्यांच्या कामाच्या पद्धति आणि त्यांचे ध्येयवाद हे आक्षेपार्ह नसल्यामुळें सरकारला त्यांच्या कामांत हात घालतां येणार नाहीं; कारण धर्माच्या बाबीकडे सरकारनें आपण होऊन पाठ फिरवलेली आहे. वास्तविक पाहतां, महाराष्ट्रांतील वारकरी संप्रदायाच्या पुढाऱ्यांनीं, तसेंच इतर प्रान्तांतील वैष्णव पंथीयांनीं प्रसाराची ईर्षा धरून जर या लोकांमध्यें आपल्या तत्त्वांचा आणि समजुतींचा प्रसार केला तर हे सारे लोक हिंदु धर्माच्या कक्षेंत कायम होतील. हें काम केवळ ब्राह्मणवर्गानें करावें अशी अपेक्षा ठेवणें चुकीचें आहे. या पंथांच्या आजवरच्या प्रसारावरून ध्यानांत येईल कीं, ब्राह्मण समाजांतून ह्या पंथांना जरी वैचारिक बळ प्राप्त झालेलें असलें तरी प्रसाराचें प्रचंड काम या ब्राह्मणेतर जातींनीं केलेलें आहे. तीच ईर्षा त्यांनीं याहि कामीं दाखविली पाहिजे.

नाइलाजानें असें म्हणावें लागतें कीं, गाडगेमहाराज, कैकाडीमहाराज, तुकडोजीमहाराज यांच्या कामाची दिशा अजून पुरेशी व्यापक झालेली नाहीं. हिंदु धर्माच्या कक्षेंत सहस्रावधि वर्षें वागत असलेल्या लोकांतच त्यांच्या प्रसाराचें काम चालू आहे. त्यांच्या धर्मसमजुतींत शुद्धपणा कसा उत्पन्न होईल, औदार्य कसें येईल, आणि ब्राह्मणादिक तथाकथित श्रेष्ठ लोकांचें वर्चस्व मानण्याची आवश्यकता त्यांना कशी राहणार नाहीं, एवढेंच ही मंडळी सांगत आहेत. 'मानवता' या शब्दाचा उच्चार ते करतात, पण ती त्यांची मानवता या लोकांपुरतीच आहे. खरें पाहतां भक्तिमार्गानें ब्राह्मणांचें वर्चस्व झुगारून दिलेलें आहे; आणि या पंथांत जर कोणी ब्राह्मण

तर ते ब्राह्मण म्हणून नव्हेत तर या पंथाच्या तत्त्वाचे अधिकारी म्हणून होत. हा अधिकार कोणालाहि प्राप्त करून घेतां येतो, हें तुकडोजीमहाराज, कैकाडीमहाराज, गाडगेमहाराज, गयाजीमहाराज यांच्या उदाहरणांवरून सिद्ध होतें. तेव्हां या थोर व्यक्तींनीं आपला मोर्चा वर सांगितलेल्या जातींकडे आणि जमातींकडे त्वरेनें वळवला पाहिजे. या ठिकाणीं त्यांना असें दिसून येईल कीं, मुसलमान फकिरांना किंवा खिस्ती मिशनऱ्यांना ह्या लोकांच्या जीवनांत धर्मप्रसाराला जेवढी अनुकूल भूमि सांपडण्यासारखी आहे, तिच्या दसपट अनुकूल भूमि आपल्याला सांपडेल. एका अंगाला नवीन ज्ञान देण्याचें काम सरकारनें हातीं घेतलेलेंच आहे. म्हणजे या बाबतींत तरी खिस्ती धर्माची मातब्बरी आतां उरलेली नाहीं. विद्याप्रसार, औषधपाण्याची तरतूद, या गोष्टी आतां सरकारांतूनच प्राप्त होणार आहेत. त्यासाठीं आतां खिस्ती मिशनऱ्यांच्या तोंडाकडे पाहण्याची या जातींना व उपजातींना आवश्यकता उरलेली नाहीं. आवश्यकता आहे ती धार्मिक ज्ञानाची आहे. तें ज्ञान 'हिंदु मिशनरी' म्हणून वरील संतमंडळींनीं या जातींना आणि जमातींना लवकर पोंचतें करावें.

या संतमंडळीकडे पाहिलें म्हणजे हिंदु समाजाची कूस चांगली कसदार आणि समृद्ध आहे, असें स्वच्छ दिसूं लागतें. मागल्या काळांत हेंच झालेलें होतें. महाराष्ट्रांतील जुन्या संतांचीं नांवें पहावीं, म्हणजे हें खरें वाटूं लागेल. जें मागें झालें तें आतांहि होईल. फरक इतकाच कीं, मागीलांनीं आपला धर्म महारवाड्यापर्यंतच पोंचवला; आतांच्या संतांनीं तो दऱ्याखोऱ्यांत, पर्वताच्या पठारांवर, आणि जंगलाच्या झाडींत नेऊन पोहोंचविला पाहिजे.

सध्यां होत आहे तें हें कीं, भक्तिमार्गपंथांतील बुद्धिमान् प्रवक्ते ज्ञानेश्वर, तुकाराम इत्यादिकांच्या ग्रंथांची खुलावट करण्यांत गुंतलेले आहेत; त्यांच्यावर काव्यें लिहीत आहेत; सामान्य जनांना नेहमींचेंच पारमार्थिक तत्त्वज्ञान ऐकवीत आहेत; इतर मागासलेल्या जातींतून जे संत-महंत उत्पन्न झाले आहेत ते या जागृतीचा झुरका प्राप्त झाल्याचें समाधान मानीत आहेत; आणि संतवचनांचा मधूनमधून आश्रय घेऊन आधुनिक राजकारणांतहि थोडीबहुत ढवळाढवळ करीत आहेत. ब्राह्मणांतील काहीं कीर्तनकारांनीं तर कीर्तनसंस्थेचा उपयोग उघडउघड राजकारणासाठीं केलेला आहे. वास्तविक

पाहतां, समाजाचीं जीं शाश्वतचीं नैतिक सामर्थ्यें असतात तीं वाढविण्याच्या कामीं कीर्तनसंस्थेचा उपयोग अवतारी पुरुष अथवा तत्सम लोक यांचीं उदाहरणें देऊन या कीर्तनकारांनीं करावयास हवा. अर्थात् हीं सामर्थ्यें वाढलीं म्हणजे त्यांचा उपयोग कोणत्या क्षेत्रांत करावा, हें ठरविण्याचें काम त्यांनीं समाजावर सोंपवावयास हवें. पण घडतें तें हें कीं, शाश्वतासाठीं संकल्पिलेली संस्था हंगामी कारणासाठीं उपयोगांत आणली जात आहे. वारकरी सांप्रदायाचेंहि असेंच होत आहे; आणि उत्तरोत्तर तें जास्त होत जाईल अशी भीति वाटते. ज्या त्या संस्थेनें आपापलें काम करीत राहणें हेंच योग्य असतें. जें काम कीर्तनसंस्थेनें केलें तेंच नामसंकीर्तन संस्थेनें पूर्वी केलें आणि समाजाचा नैतिक दर्जा निःसंशय वाढविला. हिंदुसमाज एवढा उदार आणि सुबुद्ध झालेला दिसतो, याचें खरें कारण हें आहे कीं, या कीर्तनसंस्थेनें आणि नाम-संकीर्तनसंस्थेनें त्याच्या मनाचा पिंडच उदार आणि समंजस करून सोडला आहे. आधुनिक लोकशाहीचें यश या त्यांच्या कर्तबगारींतून उद्भवलेलें आहे. म्हणून असें वाटतें कीं, त्यांनीं उदात्त दर्जाचा हा आपला टापू सांभाळून रहावें.

राजकारणी लोक,—म्हणजे चळवळे लोक, व प्रत्यक्ष राज्यकारभार हांकणारे लोक हे दोघेहि या संस्थेचा उपयोग आपापलें काम करून घ्यावयास टपलेले दिसतात. जर का ह्या संस्था त्यांच्या आहारीं गेल्या तर आजवर लोकोत्तर कार्य केलेल्या या संस्था भलत्याच कामाच्या दिमतीला लावून घेऊन आपण त्या बिघडविल्या असें होईल. म्हणून त्यांना त्यांच्या नव्या कार्यक्षेत्राचें दर्शन घडविलें पाहिजे. कीर्तनकार आफळेस्वामी, कोल्हटकरबुवा, सोनोपंत दांडेकर, मसूरकरबुवा, चौंडेबुवा, तुकडोजीमहाराज, कैकाडीमहाराज, गाडगेमहाराज, गयाजीमहाराज इत्यादि मंडळींनीं आपल्या कार्यक्षेत्रांत आतां बदल केला पाहिजे. उदार कल्पना, उदात्त भावना, परमार्थाचे प्रिय वाटणारे विचार यांचा प्रसार त्यांनीं हिंदु समाजाच्या सरहद्दीवर ज्या जाती व जमाती आहेत त्यांच्यांत केला पाहिजे. सध्यां ते जेथें काम करतात तेथें हा प्रसार केवळ करमणुकीचें रूप पावत आहे, हें त्यांनीं ध्यानांत आणावें. हा क्षेत्रबदल जर झाला तर खिस्ती धर्मप्रसाराची कसलीहि भीति बाळगावयास नको. तुमचेच लोक हाताशीं करून ज्याप्रमाणें पूर्वी इंग्रजांनीं तुम्हांला दास करून सोडलें, त्याप्रमाणें तुमच्याच धर्मान्तरितांचा उपयोग करून घेऊन तुमच्या

देशांत खिस्ती धर्माचा प्रसार जोरानें करण्याचें काम परदेशी मिशनरी परोक्षरीत्या करणार आहेत. या देशांत खिस्तीस्तानाची प्रस्थापना होईल ही सावरकरांनीं व्यक्त केलेली भीति अगदीं बरोबर आहे. तुकडोजीमहाराज इत्यादिकांना ब्राह्मणांचें वर्चस्व कदाचित् नकोहि असल; तें आधींच गेलेलें आहे. उरलेंसुरलें त्यांनीं घालवावयास हरकत नाहीं. पण या जाती आणि जमाती हिंदु धर्माच्या कक्षेंतून बाहेर पडाव्या,–आणि येथें खिस्ती धर्माची स्थापना व्हावी ही गोष्ट त्यांनाहि पसंत असेल असें वाटत नाहीं. असें जर आहे तर त्यांनीं आपला बलिष्ठ आणि आक्रमक मोर्चा या जातींकडे वळविला पाहिजे. जर का या आधुनिक संतांनींसुद्धां चालू राजकारणांतच मचमच करावयाचें ठरविलें तर आतांच सांगितलेल्या जाती आणि जमाती हळूहळू खिस्ती बनत जातील, आणि हा देश म्हणजे विविध लोकांच्या मतांची 'धर्मशाळा'–हा राजकारणी लोकांनीं उत्पन्न केलेला समज दृढ होत जाईल.

या कामीं पढिक ब्राह्मणांना कांहींच करता येण्यासारखें नाहीं काय, असा प्रश्न अनेकांच्या मनांत उत्पन्न होईल. त्यांचेंहि उत्तर दिलें पाहिजे. एतद्देशीय खिस्ती मिशनऱ्यांतून मोठाले प्रचारक उत्पन्न व्हावे, एवढीच इच्छा युरोपमधील खिस्ती धर्मपीठ आतां धारण करीत नाहीं; तर भारतांतील बुद्धिमान् धर्मान्तरितांना आचार्य-श्रेणींतील श्रेष्ठ स्थानें अर्पण करून भारतांत खिस्ती धर्माच्या उपपीठांची स्थापना करावी, अशी त्यांची इच्छा आहे,–व तसे त्यांचे प्रयत्नहि चालू आहेत. याचा अर्थ असा कीं, खिस्ती धर्माची जी तात्त्विक बैठक आहे, तिचें शिक्षण आणि तिचा प्रसार उपपीठवाल्यांना करावा लागेल. आर्त लोकांना नुसती दया दाखविणें, औषधपाणी देणें, नोकऱ्या लावून देणें, एवढीं कामें करूनच–म्हणजे आर्तजनसमाजाची सेवा करूनच–अद्यापपर्यंत त्यांनीं आपल्या धर्माचा प्रसार केला होता. पण आतां ह्या नव्या उपपीठवाल्या आचार्यांना नवे अधिकार प्राप्त झालेले आहेत, आणि म्हणून इतर धर्मापेक्षां खिस्ती धर्माचें तत्त्वज्ञान कसें श्रेष्ठ आहे हें त्यांना प्रथमतः दाखवावें लागेल,–आणि इथेंच पढीक ब्राह्मणांच्या विद्वत्तेचा उपयोग आहे. म्हणजे असें कीं, या भूमीवर पढीक खिस्ती पंडितांची आणि पढीक ब्राह्मण पंडितांची गांठ पडेल; तत्त्वज्ञानांची झटापट चालू होईल. अर्थात् असल्या झटापटींत विद्वान् आणि वादकुशल ब्राह्मण

पंडित कधींहि हार जाणार नाहींत. आर्यावर्तांतील धार्मिक इतिहासांत हें अनेकदां सिद्ध झालेलें आहे. हिंदु समाजांतील उच्च-नीचत्वावर इतर धर्मांना व पंथीयांना आघात करतां आले, हिंदु समाजांतील उपेक्षित लोकांना सेवाधर्माच्या बळावर स्वतःकडे वळवून घेतां आलें, पण धर्मतत्त्वांच्या पांडित्याचा प्रसंग येऊन ठेपल्याबरोबर वैदिक पंडितांपुढें या लोकांचे पाय लटपटूं लागले. भारतांत इतर धर्मीयांचे किंवा पंथीयांचे पाये भक्कम झाले नाहींत याचें कारण हेंच आहे. वैदिक धर्मीयांच्या बुद्धिबलावर इतरांना मात करतां आली नाहीं. मुसलमानी धर्माची वाढ ही शुद्ध जबरदस्तीमुळें झालेली आहे. वैदिकांचा तत्त्वज्ञानांत पराभव करणें हें त्यांनीं कधीं मनांतच आणलें नाहीं; आणि आणलें असतें तरी तें त्यांना कधींहि शक्य झालें नसतें. बुद्ध धर्माचा पाडाव आणि हिंदु धर्मांतच उत्पन्न झालेल्या कांहीं पंथांना गिळावें लागलेलें मर्यादित यश— म्हणजेच अपयश— हीं या गोष्टींचींच निदर्शकें होत. राजाश्रयामुळें, जबरदस्तीमुळें, हिंदु समाजरचनेंतील वैषम्य-बोधामुळें, किंवा आर्त समाजाच्या सेवाबळावर ह्या सर्व धर्मीयांना आणि पंथीयांना कांहीं कालपर्यंत यश मिळालें; पण तत्त्वज्ञानाची झुंज सुरू झाल्या-बरोबर या पंथांचा साफ पाडाव झाला, आणि हें पाडावाचें काम वैदिक पंडितांनीं केलेलें आहे.

ख्रिस्ती धर्माचे एतद्देशीय आचार्य जेव्हां ह्या रणांगणांत प्राप्त होतील, तेव्हां वैदिक पंडितांच्या कामाची वेळ येईल; आणि मग सुरू होणाऱ्या संगरांत ह्या तथाकथित ख्रिस्ती आचार्यांना आपल्या पदवीचा बोध व तिची लायकी बरोबर ध्यानांत येईल. आतां त्यांना राजाश्रयहि मिळणार नाहीं, आणि सेवेच्या बळावर लोकाश्रय प्राप्त करून घेण्याचें त्यांचें व्रत शासनसंस्थेनें आपल्याकडेच घेतलेलें असल्यामुळें त्यांना केवळ तात्त्विक झुंज करावी लागेल; आणि या झुंजींत ख्रिस्ती धर्माच्या या उपपीठवाल्यांना पराभव खावा लागेल.

वरील लिहिण्यावरून दिसून येईल कीं, जर हिंदु समाजाचें व धर्माचें रक्षण करावयाचें असेल तर ज्या त्या लोकांनीं आपापलीं कामें आपापल्या करावयाच्या पद्धतीनेंच केलीं पाहिजेत. जी ज्याची उपयुक्तता असेल ती त्यानें बजावली पाहिजे. मागल्या युगांत अब्राह्मण संतांनीं जी कामगिरी बजाविली तीच ह्या युगमानांत सध्यांच्या अब्राह्मण संतांनीं बजाविली पाहिजे. जे ब्राह्मण संत या भक्तिमार्गांत आज प्रभावी बनलेले आहेत त्यांनींसुद्धां हेंच काम

केलें पाहिजे. ज्या जातींचा व जमातींचा आपण विचार करीत आहोंत त्या हिंदु समाजाच्या कक्षेंत आपण पुरतेपणें आणून सोडल्या पाहिजेत; आणि या ठिकाणीं महाराष्ट्रांतील वारकरी संप्रदायाचा व भारतांत इतर ठिकाणीं वैष्णव संप्रदायाचा उपयोग फार मोठा होणार आहे, हें मागें सांगितलेंच आहे.

या कामीं एक दक्षता ठेवली पाहिजे : परमेश्वराच्या दारांत आपण उच-नीच भाव मानीत नाहीं; त्याची प्राप्ति करून घ्यावयास कोणी श्रेष्ठ नाहीं आणि कनिष्ठ नाहीं, या जुन्या सूत्राचा उपयोग अजूनहि फार होण्यासारखा आहे. मात्र असें म्हणतांना या प्रचारकांनीं या जातींच्या आणि जमातींच्या पृथक्पणावर म्हणजेच त्यांच्या जातिसंस्थेवर हल्ला करूं नये. हा हल्ला धर्म-प्रसाराला आड येतो, हें मागील संतांनीं ओळखलें होतें. ज्या महानुभावांनीं हें ओळखलें नाहीं त्यांचा पंथ केवळ सांदींत जाऊन पडला. खिस्ती धर्म-प्रसारकांनींसुद्धां जेव्हां हें मर्म ओळखलें तेव्हांच त्यांना त्यांच्या धर्माचा प्रसार यशस्वी रीतीनें करतां आला. ह्या ऐतिहासिक अनुभवाचा उपयोग हिन्दु साधुसंतांनीं आणि प्रचारकांनीं अवश्य करून घेतला पाहिजे. त्यांनीं जर का राजकारणी लोकांशीं संगनमत केलें, तर हा मुद्दाच विचारांत घेऊं नये असें त्यांना वाटूं लागेल, आणि मग या प्रचाराच्या कामांत त्यांना यश येणार नाहीं. आज ज्या कार्यक्षेत्रांत ते काम करीत आहेत, तेथेंसुद्धां त्यांनीं जर हा हल्ला चढविला तर आपल्या पुढारीपणाचे पाये डळमळूं लागले आहेत असें त्यांना दिसूं लागेल. म्हणून ज्या जाती व जमाती आज पृथक्-पणाच्या बळावर जगून आहेत, त्यांच्या या बलस्थानावर आघात न करतां केवळ पारमार्थिक धर्माचा प्रसार त्यांनीं करावा. बाकीच्या हिन्दु समाजांत जो काय जातिसंस्थेचा निकाल लागावयाचा असेल व जेव्हां केव्हां लागावयाचा असेल, तेव्हां याहि लोकांच्या बाबतींत तो लागेल.

मुसलमानी धर्माच्या जबरदस्तीच्या प्रयोगाला किंवा हिंस्र आक्रमक शिकवणुकीला आतां येथें अवसर नाहीं; बुद्ध धर्माच्या प्रसाराची गोष्ट कोणी कोणी लोक येथें बोलत आहेत, पण ते कितीसे तत्पर आहेत याचा निकाल अजून लागलेला नाहीं. म्हणून या बाबीचाहि विचार करण्याची आवश्यकता नाहीं. फक्त खिस्ती धर्माच्या प्रसाराची शक्यता फार दिसत आहे.—त्याचा प्रतिकार कसा करावा यासंबंधींची योजना वर सुचवलेली आहे.

१३ : : अनुवाद अथवा भाषान्तर

अनुवाद आणि भाषान्तर हे दोन शब्द अलीकडे समानार्थक म्हणून वापरण्यांत येऊं लागले आहेत. कांहीं वर्षांपूर्वीं या दोहोंत थोडासा फरक करीत असत; आणि तो फरक योग्य होता असें माझें मत आहे. भाषान्तर हें मूळ शब्दाला धरून असावें; म्हणजे त्याचा अर्थ तर अन्य भाषेंत यावाच पण शिवाय मूळच्या भाषेची ढब, अवघडपणा किंवा सोपेपणा, मूळची वाक्यरचना आणि तिचे अंगभूत ढंग – हें भाषान्तरांत उमटलेलें दिसावें. पण अनुवादांत मात्र मूळ लेखकाचा अभिप्राय पूर्णपणें व्यक्त झाला म्हणजे पुरे; बाकीची सारी किमया आपली असावी, असा एक स्थूल समज असे. परंतु, अलीकडे हा भेद मावळलेला आहे. सध्यां भाषान्तरालाच अनुवाद म्हणतात आणि अनुवादालाच भाषान्तर समजतात. अर्थांचा हा स्थूलपणा कायम ठेवून मीं पुढील विवेचन केलेलें आहे.

१९०७ सालीं कै. शिवराम महादेव परांजपे यांच्या 'काळ' पत्रांत 'रशियांतील राज्यक्रान्ति', 'अमेरिकेंतील राज्यक्रान्ति' इ. विषयांवर मीं कांहीं लेख, 'ब्रह्मयुवा' या नांवानें लिहिले होते. तेव्हांची रशियन राज्यक्रान्ति अर्थातच झारकालीन झटापट एवढ्याच अर्थाची होती. या लेखांत त्या त्या ग्रंथांतील कांहीं भागांचा अनुवाद मीं केल्याचें मला स्मरतें. पण तें भाषान्तर मात्र नव्हतें. १९०९-१० सालीं मेकॉलेच्या कांहीं कांहीं निबंधांचीं भाषान्तरें केवळ करमणूक म्हणून मीं केलेलीं होतीं. या वेळींच अनुवाद आणि भाषान्तर यांतील अंतर माझ्या मनांत दृढ झालेलें होतें. १९१४-१५ सालीं पहिल्या महायुद्धाचा एक वर्षाचा विस्तृत इतिहास मीं लिहिला होता. तो लिहितांना मला मूळ इंग्रजी इतिहासाचा अनेक ठिकाणीं अनुवाद करावा लागला. याच काळांत मराठीचें इंग्रजी भाषान्तर शिकविण्याचें कामहि मला करावें लागत असे. तें करतांना भाषान्तराच्या कामांतील खाचाखोचा कशा असतात याचीं अटकळ मला येऊं लागली.

भाषान्तराचें कसब मेहनतीनें व मूळ ग्रंथांतील मजकुराशीं स्नेहपूर्वक तादात्म्य पावल्यानेंच साध्य होण्यासारखें असतें. कै. घारपुरे यांनीं कार्ला-

इलच्या 'सार्टर रिसार्टस' या ग्रंथाचें केलेलें 'स्यूत-सौतिक' हें भाषान्तर मीं अनेक ठिकाणीं मूळ ग्रंथाशीं ताडून पाहिलें. तेव्हां भाषान्तराच्या कार्यांतील कसोशी आणि सचोटी म्हणजे काय याचा प्रत्यय मला आला. कै. घारपुरे यांनीं केलेलें हें भाषान्तर अतिशय अवघड आहे; पण कार्लाइलचा मूळ ग्रंथहि असाच अवघड आहे. त्याची भाषा त्रोटक, हिसकेदार, पौराणिक संदर्भानें लादलेली, आणि क्लिष्ट अशी आहे; पण तिच्यांतील सौरस्य, ठसकेदारपणा, आणि गोडी हीं कोणालाहि मोहित करतील अशीं आहेत. हें सर्व वैभव आपल्या भाषान्तरांत आणण्याची कै. घारपुरे यांनीं पराकाष्ठा केली आहे. पण कानामात्रेसुद्धां मूळाशीं जमतें घेण्यावर त्यांनीं विलक्षण कटाक्ष ठेवल्यामुळें मूळ पुस्तक ज्यांनीं वाचलें नाहीं त्यांना हें भाषान्तर कळणें कठीण झालें आहे. केवळ भाषान्तर म्हणून पहावयाचें झालें तर 'स्यूत-सौतिक' हा एक भाषान्तराचा चोखट नमुना म्हणावा लागेल. तथापि या ग्रंथाच्या वाचनानें मला असें वाटूं लागलें कीं, भाषान्तर या शब्दाची ही कल्पना असावी तितकी व्यवहार्य नाहीं.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनीं भाषान्तराला एक सुंदर उपमा दिली जाहे. त्यांच्या मतानें भाषान्तर म्हणजे एका कुपींतील अत्तर दुसऱ्या कुपींत ओतणें होय. अर्थात् हें ओतण्याचें काम चालू असतां अत्तराचा कांहीं वास बाहेर निघून जाईल हें धरूनच चालावयास हवें. पण त्यांचा अभिप्राय असा कीं, भाषान्तरित वस्तूचे मूळचे सारे गुण भाषान्तरांत अवतरावयास हवे. आतां शास्त्रीबुवांचा हा दाखला आणि घारपुरे यांनीं केलेला यत्न यांचा विचार करतां असें वाटूं लागतें कीं, एका कुपींतलें अत्तर दुसऱ्या कुपींत आलें आहे कीं नाहीं एवढेंच भाषान्तरांच्या कामीं पहावें. दोन्ही बाटल्यांची काच सारख्याच वाणाची आणिआकाराची असली पाहिजे, असा आग्रह धरण्यांत कांहीं मतलब नाहीं. असें केल्यानें ओताओत निरपवाद केल्याचें श्रेय जरी मिळालें तरी मूळचा अभिप्राय,-भाषान्तर वाचणाऱ्याला समाधान होईसा,-कळेलच कळेल अशी शाश्वती देतां येत नाहीं. म्हणून भर एवढ्यावरच ठेवावा कीं, मूळ वस्तु अन्य भाषेंत,-आपल्या सर्व अर्थविषयक परिवारासह आली आहे कीं नाहीं. ती जर आली असली तर चिकित्सकानें इतर बाबींविषयीं घासाघीस करूं नये. भाषान्तर करणारानें समानार्थक असे आपल्याकडील

संदर्भ दिले, अर्थाच्या खुलावटीसाठीं आपल्या म्हणी घातल्या तर मूळ वस्तूचें कसलेंहि नुकसान होत नाहीं; उलट ती अन्य भाषेंत फार सोपेपणानें उतरली आहे असेंच वाचकाला वाटूं लागेल.

आतां एका भाषेंतील संदर्भ दुसऱ्या भाषेंच्या वाचकांना पुष्कळदां कळण्यासारखेसुद्धां नसतात. मूळ लेखक एखाद्या रूपकानें किंवा लहानशा शब्दसंहतीनें एक संदर्भ देऊन टाकतो, आणि तो मूळच्या वाक्यरचनेंत मोठ्या सफाईनें बसलेला असतो. भाषान्तर करतांना हे संदर्भ जसेच्या तसे द्यावयाचे म्हटलें तर वाचकाला ते कळण्यासारखेहि नसतात. म्हणजे भाषान्तर वायां गेलें असें होतें. समानार्थक संदर्भ द्यावे तर तसे संदर्भ अगोदर सांपडत नाहींत. आणि जवळपास त्या अर्थाचे कांहीं दिले तर ते मूळच्या वस्तूंत चपखल बसत नाहींत. बरें, यासाठीं ते सोडून द्यावेत तर मूळ वस्तूच्या सौंदर्याची हानि होते. भाषान्तराच्या कामांत ही एक मोठी अडचण असते. It was a Herculean job that she undertook. या वाक्यांतील 'हर्क्युलीन' शब्दांतील स्वारस्य 'भगीरथ' शब्दानें व्यक्त केलें तर चालण्यासारखें आहे; परंतु "It was the case of Naboth's vineyard" यांचें भाषान्तर करतांना मराठींत 'नॅबोथ' याच्या द्राक्षाच्या मळ्याला समानार्थक दाखला कुठला आणायचा? दुसऱ्याचा लुबाडलेला मळा किंवा दुसऱ्याचें कापून आणलेलें शेत अशासारखें विवरणात्मक भाषान्तर करणें प्राप्त बनतें. तिकडल्या 'नॅबोथ'सारखा एखादा लुटारू आपल्या इतिहासांत होऊन गेला असता तर त्यानें डोळा ठेवलेला शेजाऱ्याचा द्राक्षाचा मळा आपल्याला त्याच्या नांवानें वर्णितां आला असता. परंतु तशी सोय नसल्यामुळें कांहींसें विवरणात्मक भाषान्तर करणें प्राप्त आहे. अर्थात् तिकडचा अर्थ इकडे व्यक्त झाला तरी मूळ वस्तूला नॅबोथच्या कथेनें प्राप्त झालेली गोडी भाषान्तरांत कधींच उतरणार नाहीं. 'सज्जन आणि दुर्जन यांपैकीं कोणाला ठेवून द्यावें असा प्रश्न पडला असतां, वेड्या लोकांनीं दुर्जनालाच ठेवून घेतलें' हा भाव व्यक्त करतांना इंग्रजी लेखक सफाईनें लिहून जाईल कीं, "They preferred Barabbas to Jesus." ख्रिस्ती वाचकांना या अलंकाराचें मर्म एकदमच कळेल. पण भाषान्तर करतांना जर का हा अलंकार जशाचा तसा ठेवला, आणि 'त्यांनीं येशूच्याऐवजीं बॅरावसलाच पसंत केलें' असें म्हटलें

तर वाचकाला कसलाहि बोध होणार नाहीं. मग गोडी प्राप्त होणें तर लांबच राहिलें. त्याच्याऐवजीं 'त्यांनीं तुकारामाला बाजूला सारून मंबाजीस पसंत केलें' असा प्रयोग केला तर वाचकाला मूळ रसाच्या जवळपास तरी आणून सोडल्याचें श्रेय भाषान्तरकाराला लाभेल.

'I am the Alpha and the omega of this universe' या वाक्याचें भाषान्तर शब्दशः करावयाचें झालें तर "मी या विश्वाचा 'अ' आहें आणि 'ज्ञ'हि आहें" असें म्हणावें लागेल. परंतु यानें अपेक्षित बोध लवकर होणार नाहीं; आणि कष्टानें झाला तरी त्यांतील स्वारस्य आधींच निघून गेलेलें असेल. "मी या विश्वाचा 'अथ' आहें आणि त्याची 'इति'हि आहें" असें भाषान्तर केलें तर थोडेंबहुत स्वभाषेकडे आल्यासारखें वाटेल. पण यापेक्षां "मी या विश्वाचा 'आदि' आहें आणि 'अंत'हि आहें" असें केलें तर मात्र भाषा नेहमींच्या परिचयाची वाटते व बोध उत्तम होतो. पण मूळच्या वाक्यांत लिपींतील मूळाक्षरांचें जें रूपक केलें आहे त्याचें स्वारस्य मात्र निघून जातें. आणखी एकच उदाहरण देतों : "I was between scylla and charybdis" म्हणजे 'मला इकडे आड आणि तिकडे विहीर असें झालें.' पण या भाषान्तरानें अगतिकत्वाचा बोध झाला तरी परिस्थितीचा भयंकरपणा प्रत्ययास येत नाहीं. एका अंगाला प्रचंड सुळका आणि दुसऱ्या बाजूला समुद्राचा गंभीर भोंवरा ही मूळची परिस्थिति आड आणि विहीर यांनीं भासमान होत नाहीं. नारायण वामन टिळक यांची 'इकडे पर्वत, इकडे दरी' ही शब्दसंहति योजली तर मूळांत ती सौंदर्यदर्शनासाठीं योजलेली असल्यानें तिच्यांत भयानकत्व येत नाहीं. तात्पर्य, मूळ भाषेंतील प्रकट किंवा प्रच्छन्न अर्थ स्वभाषेंत आणणें, व मूळ रस जशाचा तसा उतरवणें हें पुष्कळ वेळां कठीण बनतें. कांहीं कांहीं लोक मूळचा अलंकार जशाचा तसा ठेवून त्याचा पौराणिक, ऐतिहासिक अथवा भौगोलिक संदर्भ पायागतच्या टिपणींत विवरून सांगतात. असें केल्यानें मूळ वस्तूशीं निष्ठा ठेवल्याचें श्रेय मिळेल. पण मूळांतला रस भाषान्तरांत उतरतो असें मात्र मानतां येत नाहीं. तुमचा अनुवाद असो किंवा तुमचें भाषान्तर असो, आतां सांगितलेली अडचण दुर्निवार्य आहे.

भाषान्तर किंवा अनुवाद यांच्या जोडीला आणखीहि एक प्रकार सांगतां येण्याजोगा आहे. 'महाराष्ट्र सांवत्सरिक' तयार करतांना अनेक ठिकाणचा

मजकूर घेणें अवश्य होतें. तो घेतांना लेखक लोक शब्दशः भाषान्तर करूं लागत, आणि मग कित्येकदां तें अगदीं बेंगरूळ होऊन जाई. मी त्यांना सांगें कीं, "हा सहा ओळींचा परिच्छेद आहे. यांत कांहीं विधानें केलीं आहेत, यांत कांहीं माहिती दिली आहे, ती आपल्याला हवी आहे; तर परिच्छेद दोनतीनदां वाचा, आणि पुस्तक बाजूला सारून परिच्छेदांत जें कांहीं म्हटलें आहे तें आपल्या शब्दांनीं जसें सांगतां येईल तसें सांगा." एकदां मजकुराचा तपशील ध्यानांत भरला म्हणजे तो सांगावयास आपले शब्द सहज योजतां येतात, आणि हे शब्द स्वाभाविकपणेंच परिचयाचे असल्यामुळें आपला परिच्छेद सुबोध बनतो. या पद्धतीला भाषान्तरहि म्हणतां येत नाहीं आणि अनुवादहि म्हणतां येत नाहीं. पण मूळची वस्तु अन्य भाषेंत सांगितल्याचें श्रेय मात्र मिळतें. हिला सारांश काढण्याची पद्धति असेंहि म्हणतां येणार नाहीं. कारण ही केवळ सारभूत अंश अथवा तात्पर्य सांगते असें नाहीं.

पुष्कळदां मूळ लेखकाची वाक्यरचना फार गुंतागुंतीची असते. एखाद्या लेखकाला साधीं म्हणजे Simple वाक्यें लिहिण्याची, पण वाटेल तसला गुंतागुंतीचा अर्थ याच वाक्यांनीं व्यक्त करण्याची कला साधलेली असते. दुसरा कोणी साधा अर्थसुद्धां गुंतागुंतीच्या म्हणजे Gomplex वाक्यांनीं व्यक्त करतो. बरेचसे लोक असे असतात कीं, अनेक बारीकसारीक कल्पना एकत्र गोवून घेतल्याशिवाय त्यांना समाधानच वाटत नाहीं. दहा ओळींच्या परिच्छेदांत एक कोणतें तरी विधान स्पष्ट केलेलें असतें. आरंभीं एक सामान्य विधान करावें, आणि बाकीच्या ओळींत बारीकसारीक उदाहरणांचा किंवा मुद्द्यांचा तपशील भरून आरंभींचें विधान सिद्ध करावें, किंवा आरंभींच्या पांचसात ओळींत अशा प्रकारचा तपशील द्यावा व त्यावरून उत्पन्न होणारें विधान करावें. परिच्छेदाच्या अशा या दोन पद्धति आहेत. परिच्छेदाची बांधणीच मुळीं या तत्त्वावर केलेली असते. एखादा लेखक सामान्य विधान करतो, व पुढील उदाहरणें किंवा तपशील एका एका स्वतंत्र वाक्यानें सांगतो. यानें कांहीं बिघडत नाहीं. वाचकाला सहज कळतें कीं, आरंभींच्या वाक्यांत केलेलें विधान सिद्ध करण्यासाठीं पुढील उदाहरणें किंवा तपशील स्वतंत्र वाक्यांत सांगितला आहे. पण दुसऱ्या एखाद्या लेखकाला असें वाटतें कीं, जर मूळ विधान व उपोद्बलक मजकूर

मिळून एकच वस्तु आहे तर ती सारी एकाच वाक्यांत सांगितली पाहिजे; आणि म्हणून त्या उपोद्बलक मजकुराचीं तो विशेषणवाक्यें किंवा क्रिया-विशेषणवाक्यें तयार करतो, आणि मूळच्या प्रधानवाक्यांतील कर्ता, कर्म आणि क्रियापद यांच्या सान्निध्यांत त्यांना त्या ठिकाणीं नेऊन बसवतो.

हें सारें तर्कदृष्ट्या अगदीं बरोबर असतें. पण या अट्टाहासानें लेखनांत अवश्य असलेला जो प्रसाद नांवाचा गुण तो मात्र उत्पन्न होत नाहीं. जॉन स्टुअर्ट मिल याच्या आत्मचरित्रांतील कांहीं परिच्छेदांचें भाषान्तर मला एकदां करावें लागलें. हा लेखक दहादहा बाराबारा ओळींचीं वाक्यें लिहितो. वाचक सावधान असला, आणि मनानें चिवट असला तरच त्याला या वाक्यांच्या शेवटाला जातां येतें आणि त्यांचा अर्थहि समजतो. पण केवळ अर्थ समजविण्यापेक्षां भाषान्तराचें काम अर्थातच जास्त बिकट असतें. मिलची वाक्यरचना जशीच्या तशी मराठींत आणावयाची म्हटलें तर पहिली गोष्ट म्हणजे हें काम सहसा नीट साधावयाचें नाहीं; आणि दुसरी गोष्ट म्हणजे, ती साधलीशी वाटली तरी त्या वाक्यांत सुबोधपणा बिलकुल राहणार नाहीं. म्हणून मिलच्या प्रदीर्घ वाक्यांचें भाषान्तर करतांना मी मनांत त्यांचे तुकडे करून घेतले, पोटकल्पना अलग अलग केल्या, प्रत्येकीला एक एक स्वतंत्र वाक्य दिलें, आणि योग्य त्या ठिकाणीं या वाक्यांचे संबंध उभयान्वयी अव्ययांनीं जोडून दिले. 'प्रेमिकांना अहेर' या माझ्या नव्या पुस्तकांत मिलचें एक प्रकरण आहे, तें जिज्ञासूंनीं अवश्य वाचून पहावें. लोकहितवादींनीं लिहिलेला कोणताहि निबंध वाचा; अर्थ समजण्यास कधींहि त्रास पडायचा नाहीं. कारण त्यांची वाक्यरचना अगदीं साधी असते. दीर्घ स्वरूपाची वाक्यरचना करणें हें कसब अजून मराठी लेखकांना हस्तगतच व्हावयाचें होतें. उलट विष्णुशास्त्री चिपळूणकर हे इंग्रजीच्या अनुकरणानें प्रदीर्घ वाक्यरचना करूं लागले; परंतु त्यांचें कोणतेंहि वाक्य सहज कळावयास अवघड जाईलसें वाटत नाहीं. भाषान्तराला या दोघांहि लेखकांचें लिखाण सहज वश होतें.

भाषान्तराच्या कामीं एक मोठा मोह आवरावा लागतो. आपलेंच मनोगत त्यांत कोठें तरी घुसडण्याची वासना भाषान्तरकाराला कित्येकदां होते. वास्तविक पाहतां त्याला ही वासना होऊं नये. चिपळूणकर संपादित महाभारताच्या भाषान्तरांत हा भाग कोठें कोठें दृग्गोचर होतो. म्हणून त्या

भाषान्तरावर सर्वथा विसंबून राहूं नये, असें मीं ठरविलें आहे; मूळ श्लोकच मी अवश्य तेथें पाहतों. विष्णुशास्त्री बापट यांनीं केलेलीं भाषान्तरें पुष्कळदां गोळाबेरजेच्या स्वरूपाचीं असतात. त्यामुळें ज्याला आधाराचा अस्सलपणा हवा आहे त्यानें मूळ संहिताच पहावयास हवी. विष्णुबुवा जोग यांनीं तुकारामाच्या अभंगांचा अर्थ गद्यरूपानें सांगितला आहे. पण या साध्या कामांतसुद्धां भाषेचा शिथिलपणा कित्येक ठिकाणीं दिसून येतो, व त्यामुळें आपल्याला दुर्बोध वाटणारा मूळ अभंग बुवांचे गद्य वाचूनहि शेलक्या ठिकाणीं कित्येकदां दुर्बोधच राहतो. मूळ वस्तूंतील सर्वच्या सर्व अभिप्राय प्रसादयुक्त वाणीनें अन्य भाषेंत सांगणें हें भाषान्तराचें मुख्य लक्षण आहे, याची जाणीव ठेवावी तितक्या निकरानें लेखकानें ठेवलेली नाहीं. अस्सलपणा व उपयुक्तता या दोनहि दृष्टींनीं वाचकाला फार सावध रहावें लागतें.

शब्दशः भाषान्तर करावें हें धोरण बरोबर आहे. परंतु पुष्कळदां या धोरणानें भागत नाहीं. खरें धोरण मूळचा सर्वच्या सर्व अर्थ आपल्या भाषान्तरांत उतरविणें, हें असलें पाहिजे. मूळांत स्पष्ट सांगितलेला अर्थ व गर्भित राहिलेला अथवा सूचित केलेला अर्थ हेहि उतरावयास हवेत. बाजीराव सहा फूट उंच होता याचें भाषान्तर 'Bajirao was six feet high' असें केल्यानें भागण्यासारखें नाहीं. काळे यांनीं सांगितलें आहे कीं, 'Bajirao was full six feet high' असें म्हणावयास हवें. 'full' हा शब्द पदरचा घालावयास हवा. कारण बाजीराव सहा फूट उंच होता असें म्हणतांना मूळ लेखकानें सहा या शब्दावर मनांत जोर दिलेला असतो, परंतु त्यानें तो निराळ्या शब्दानें व्यक्त केलेला नसतो. बाजीराव पुरा सहा फूट उंच होता, असें त्याला म्हणावयाचें आहे, हें लक्षांत घेऊन 'full' हा पदरचा शब्द भाषान्तरांत घालणें अवश्य आहे.

अनुवाद असो कीं भाषान्तर असो, तें करणारास दोनहि भाषा चांगल्या अवगत असावयास हव्या; इतक्या कीं, अन्य भाषेतील अर्थ स्वभाषेत आणण्यासाठीं त्याला श्रम पडतां उपयोगाचे नाहींत, आणि तो अर्थ भाषान्तरित असला तरी मूळ आपल्या भाषेतच लिहिलेला आहे असें वाटावें. परभाषेतील अर्थ स्वभाषेत पूर्णपणें आला म्हणजे भाषान्तराचें काम पूर्ण झालें असें मी स्वतः मानीत नाहीं. तो भाषेत आणलेला अर्थ मूळचा आपल्याच

भाषेंत लिहिलेला आहे असें दिसावयास लावणें, हें भाषान्तरकाराच्या यशाचें खरें लक्षण आहे. जर तो मूळांतच स्वभाषेंत लिहीत आहे असें दाखवावयाचें तर परभाषेंतील शब्द, शब्दसंहति व वाक्यरचना यांना शोभेसे आपल्या भाषेंतील शब्द कोणते, शब्दसंहति व वाक्यरचना कोणत्या, हें भाषान्तर करणाराला भराभर सुचलें पाहिजे. म्हणून स्वभाषेचें ज्ञान फारच चांगलें असावयास हवें.

बरींच वर्षें झालीं; टिळक स्मारक मंदिराच्या पटांगणांत अस्पृश्यतानिवारणाच्या प्रश्नाचा खल करण्यासाठीं आम्हीं एक प्रान्तिक परिषद् भरविली होती. सभेचे अध्यक्ष बॅ. जमनादास मेहता हे होते. ते म्हणाले, मला मराठींत भाषण चांगलें करतां येणार नाहीं. मी तें इंग्रजींतच करीन. देवालयांच्या प्रश्नाची चर्चा करावयाची असल्यानें इंग्रजी न समजणारे असे किती तरी लोक सभेला आलेले होते. शेवटीं असें ठरलें कीं, जमनादास मेहता यांनीं इंग्रजींत भाषण करावें व तें होत जाईल तसतसें त्याचें मराठींत भाषान्तर मीं सांगत रहावें. मीं जमनादासांना एवढीच विनंती केली कीं, भाषणाचा वेग वेताचा ठेवा. तास-सव्वा तास चाललेल्या त्यांच्या भाषणाचें भाषान्तर, एक बारीकसा प्रसंग सोडून मीं अगदीं सफाईनें करून टाकलें. मुलांना शाळेंत भाषान्तर शिकवीत असल्याचा उपयोग मला या प्रसंगीं मोठाच झाला. संतुष्ट झालेल्या किती तरी श्रोत्यांनीं मला शाबासकी दिली. यांत कांहीं विशेष विद्या आहे असें नाहीं; सरावानें हें कोणालाहि करतां येईल; पण माझें प्रस्तुतचें विधान एवढेंच आहे कीं, मीं एवढ्या जलदीनें केलेलें भाषान्तर मूळ मराठींत केलेल्या भाषणाप्रमाणें वठलें.

कै. तात्यासाहेब केळकर यांनीं अर्जुना नांवाच्या खेडुताचा पक्ष घेऊन केसरींत कडक लेख लिहिला. यावर खटला झाला आणि तो हायकोर्टांत चालला. तात्यासाहेब यांनीं आत्मसमर्थनार्थ भाषण केलें. पुढें लगेच केसरीचा अंक निघावयाचा होता. कसलीहि विश्रान्ति न घेतां लघुलेखकानें टंकलिखित केलेलें आपलें मूळ इंग्रजी भाषण हातांत घेऊन त्यांनीं भाषान्तर सांगावयास सुरुवात केली, आणि कित्येक तासपर्यंत अव्याहत सांगून त्यांनीं तें काम पुरें केलें. तात्यासाहेब यांच्या वाङ्मयांत हें भाषान्तर जिज्ञासूंना वाचावयास सांपडेल. जणूं कांहीं त्यांनीं तें मराठींतच केलें असलें पाहिजे, असें सजीव

व सुंदर मराठी त्यांत वाचकाला दिसेल. मुख्य म्हणजे आपल्याकडील परिचित शब्द भराभर आठवले पाहिजेत. पुण्यांतील एका दैनिकानें 'Cat-eyed' याचें भाषान्तर 'मार्जारनेत्री' असें केलें, पण केसरीनें 'बिडालाक्ष' असें केलें. यांत खरें मधुर आणि जवळचें कोणतें हें कोणीहि सांगेल. अमुक तमुक गृहस्थ 'Sun-stroke'नें मेले हा विचार एका दैनिकानें – तो गृहस्थ 'सूर्यावातानें मेला' असा सांगितला; पण एका शिक्षकानें तोच विचार हा गृहस्थ उन्हाची झळ किंवा तिरीप लागून मेला असा सांगितला.

मूळ इंग्रजी हातांत घेऊन अनुवाद किंवा भाषान्तर भराभर करण्याचें कसब सरावानें साध्य होतें असें मला वाटतें. मागें एका ठिकाणी सांगितल्याप्रमाणें परभाषेतला सर्व अर्थ मनांत भरल्यावर आपण तो आपल्या भाषेंत मूळांतच कसा सांगितला असता, हें लेखकास कळावयास हवें. पुष्कळदां अनुवादकाचे अथवा भाषान्तर करणाराचे शब्द मराठी असतात, पण एकंदर अनुवाद किंवा भाषांन्तर इंग्रजीसारखें भासतें. सध्यां काय पद्धत आहे तें मला माहीत नाहीं; पण मॅट्रिक्युलेशनच्या परीक्षेला मराठी, कानडी, गुजराथी या भाषा बोलणारे विद्यार्थी बसावयाचे तर त्यांना भाषान्तराला द्यावयाचा परिच्छेद एकच असावयास हवा असे. आतां त्या त्या भाषेंतील तीन मूळचे परिच्छेद द्यावे तर ते सारखेच अवघड किंवा सोपे असतील हें सांगतां येण्यासारखें नसे. म्हणून इंग्रजींतील एक मूळ परिच्छेद घेऊन त्याचीं तीनहि भाषेंत भाषान्तरें देत, व या परिच्छेदाचें त्या त्या भाषिकांनीं इंग्रजींत भाषान्तर करावें असें सांगत. मात्र मूळ इंग्रजी परिच्छेदाचें भाषान्तर त्या त्या भाषेंत करतांना मूळच्या इंग्रजी भाषेचें स्मरण विद्यार्थ्याला होईल अशा तऱ्हेची शब्दरचना व वाक्ययोजना करीत. अर्थात् परत भाषान्तर करतांना विद्यार्थ्याचें काम सोपें होई. पण हे दिलेले परिच्छेद मूळ मराठी किंवा गुजराथी लिहिलेले आहेत असें कोणालाहि वाटलें नसतें. वर्तमानपत्रांतील अनेक लेखक इंग्रजीचें भाषान्तर याच पद्धतीनें करतात. ते परिच्छेद मराठींत लिहिले आहेत असें वाटतच नाहीं. असो. तात्पर्य, परभाषा व स्वभाव यांचा दृढ परिचय असल्याशिवाय आणि आपल्याकडील खास समानार्थक शब्द भराभर सुचल्याशिवाय हें काम कधींहि यशस्वी व्हावयाचें नाहीं.

अनुवाद करण्यांत मीं कधींहि कमीपणा मानलेला नाहीं. परभाषेंतील चांगला विचार स्वभाषेंत आणून ती समृद्ध करणें यांत वावगें काय आहे ? एखादा मनुष्य जन्मभर अशा प्रकारचे अनुवादच करीत राहिला तरी तो स्वभाषेचा उपकारकर्ताच होय. पण मीं स्वतः दोनहि गोष्टी केल्या आहेत. स्वतंत्रहि पुष्कळ लिहिलें आहे आणि अनुवादहि पुष्कळ केला आहे. 'आपापलें हितगूज', 'मधूला सांगितलेल्या गोष्टी', 'दोन दुर्दैवी नायक', 'प्रेमिकांना अहेर' हीं माझीं पुस्तकें अनुवादरूप आहेत. हा अनुवाद कितपत चांगला वठला आहे याचा निर्णय जाणत्या वाचकांनीं करावयाचा आहे. ते जर म्हणाले कीं, हीं पुस्तकें मूळ मराठींत लिहिल्यासारखीं वाटतात तर मी माझें काम यशस्वी झालें आहे असें समजेन. पण इंग्रजीसारखीं वाटतात असें जर ते म्हणाले तर मग मला यश आलें नाहीं असें म्हणावें लागेल !

---

१४ : : घोषणांचा जाच

प्रतापी माणसें जशीं, तशीं आकर्षक तत्त्वें माणसांचा अतोनात छळ करतात; आणि हा तत्त्वांचा छळ इतका सूक्ष्म असतो कीं, वस्त्राला लागलेलें कांटेरें जसें लवकर बाहेर काढतां येत नाहीं, तसा हा छळसुद्धां आपल्या मनांतून आणि जीवितांतून दूर करतां येत नाहीं. प्रत्येक क्रान्तीला कांहीं एक सूत्र असतें; पण या सूत्राचा प्रभाव कोठपर्यंत पोंचूं द्यावा, याचा विवेक क्रान्तिकारकांना राहतोच असें नाहीं; आणि मग हा घरबंध सुटला म्हणजे या सूत्राच्या तावडींत सांपडलेले लोक अगदीं जिकीरीला येतात. स्वातंत्र्य, समता, बंधुभाव या शब्दांचे अर्थ सर्वांना कळतात; पण हे अर्थ एकदां व्यवहारांत उतरूं लागले, आणि खालीं खालीं चरत जाऊं लागले म्हणजे प्रतिपादक लोक अतिशयोक्ति करीत आहेत, आणि आतां यांना परत टोला मारलाच पाहिजे, असें संबंधित माणसांना वाटूं लागतें. सर्व माणसें सारखीं आहेत, या उदार सूत्राचा प्रभाव इतका खोलपर्यंत चालू झाला आहे कीं, प्रतिक्रिया न होईल तरच आश्चर्य!

सर्व माणसें सारखीं असतीलहि; पण तीं कोणत्या बाबीपुरतीं, याचा विचार करणें अवश्य बनतें. सर्व माणसें जर सर्व बाबतींत सारखींच असतीं तर तसें प्रत्यक्षांत दिसून आलें असतें. पण बुद्धि, भावना, प्रतिभा, कुशलता, कर्तृत्व, तितिक्षा, आक्रमकता – असे किती तरी गुण आहेत कीं, ज्यांमुळें आणि ज्यांच्यांतील अंशभेदानें सर्व माणसें सारखीं नाहींत, हेंच सिद्ध होतें. "सर्व माणसें सारखीं आहेत" या मानवप्रणीत सूत्रापेक्षां, "सर्व माणसें सारखीं नाहींत" हें सृष्टिप्रणीत सूत्र जास्त खरें आहे. सर्व माणसें जर सारखीं असतीं, तर त्यांच्या प्रती ठरविण्याची दगदग आपण कधींच केली नसती; परीक्षा घेतल्या नसत्या; मार्क दिले नसते, – आपण असलें कांहीं केलें नसतें. पण तीं सारखीं नसतात, हें आपल्याला उपजत बुद्धीनें माहीत असल्यामुळें आपण त्यांची पतवारी लावतों, जगाच्या व्यवहारांत एकाला कमी यश

मिळतें, दुसऱ्याला जास्त मिळतें; एक दुबळेपणानें गप्प बसतो, आणि दुसरा साहसानें आक्रमक बनतो; एवढ्या भरलेल्या पृथ्वींत खायला मिळत नाहीं म्हणून एक पोटावर थापट्या मारीत बसतो, आणि दुसरा असा गल्ला जमा करतो कीं, तो भुकिस्तांना सहस्रभोजनें घालतो. हा फरक धडधडीत दिसत असतांना, सगळीं माणसें सारखीं आहेत या सूत्रांतील मानसिक निशा प्राप्त करून घेण्याची उत्सुकता बहुधा सर्वच माणसें दाखवीत असतात. मग या सूत्राला कांहीं अर्थ आहे कीं नाहीं, असा प्रश्न मनाशीं उत्पन्न होईल. त्याचें उत्तर असें आहे कीं, सर्व माणसें कोणत्या बाबतींत सारखीं आहेत हें आपण अनुभवानें ओळखलें पाहिजे. आतांपर्यंतचा जो इतिहास झाला आहे त्यावरून इतकेंच सिद्ध होतें कीं, अन्न, वस्त्र, निवारा हीं सर्व मानव-प्राण्यांना मिळावीं, व जीवितांत पुढें सरण्याची संधि सगळ्यांना मिळावी. माणसांचें सारखेपण एवढ्यापुरतेंच आपण अवश्य मानलेलें आहे.

यांतहि एक पोटाविचार आहेच. अडचणीची परिस्थिति प्राप्त झाली तर ही संधि कोणाला द्यावी, आणि अन्न-वस्त्र-निवारा कोणाला पोंचवावा याचाहि विचार करावा लागतो. आपल्याला माहीत आहे कीं, स्पार्टा शहरांत दुबळीं पोरें मारून टाकण्याची चाल होती. वास्तविक पाहतां मानवप्राणी म्हणून केवळ जगून राहण्याचा हक्क तरी या पोरांना मिळूं द्यावयास हवा होता. परंतु सृष्टीनें समर्थ बनविलेलीं माणसेंच जगूं देणें परिस्थितीनें प्राप्त बनल्यामुळें लोकांनीं दुर्बलांचा नष्टांश केला. समाजांतलीं रोगग्रस्त माणसें खची करून टाकण्याची हिटलरची आज्ञा याच तत्त्वाला धरून होती. हातीं असलेल्या पुरवठ्याकडे लक्ष देऊन, एखाद्या वेढ्यांत सांपडलेल्या माणसांपैकीं कोणाला भरपूर शिधा द्यावा आणि कोणाला देऊं नये, याचा विवेक करणें जर प्राप्त झालें तर, जे त्यांतल्या त्यांत समर्थ आहेत त्यांना तो द्यावा, असेंच अधिकारी ठरवतात. भूतदया खरी, पण ही त्यांतल्या त्यांत कुणाच्या बाबतींत दाखवायची, हा प्रश्न पडला म्हणजे तारतम्यानें, समर्थांना सांभाळणें हें न्यायानेंच प्राप्त होतें. पूर्वीच्या काळीं जगण्याचीं साधनें कमी म्हणून हा विवेक माणसें जास्त करीत असत; पण भौतिक शास्त्रांनीं समृद्धि आणून पोंचविल्यामुळें आपल्या भूतदयेचा अंमलहि आपण अधिक विस्तृतपणें करूं

लागलों आहों. आणि अन्न-वस्त्र-निवाऱ्यापर्यंतच नव्हे तर संधिसमानत्वापर्यंत आपण येऊन पोंचलों आहों. पण एवढ्यावरून सगळीं माणसें सारखीं आहेत, हें मात्र सिद्ध झालें असें नाहीं. तीं केव्हां-आणि कोठपर्यंत सारखीं आहेत, याची चालना आपण सारखी करीत असतों, एवढेंच सिद्ध होतें !

सध्यांचा मनु असा आहे कीं, हा समानत्वाचा घोष ज्याच्या त्याच्या तोंडीं चालू रहावा. असें झाल्यामुळें अनेक विकट प्रश्न उत्पन्न होत आहेत. मागासलेलें असणें, दुबळें असणें, कर्तृत्वशून्य असणें हा हक्क (Privilege) बनूं पहात आहे. आपल्या अंगांतील सामर्थ्याची वाढ करून घेण्याला संधि पाहिजे, हा घोष तारतम्यानें न्याय्य ठरतो, पण आपण कसेहि असलों तरी समत्वाच्या मुद्द्यावर इतरांच्या बरोबरीनें जीवितांतील सर्व सुखसोयी व अधिकार आपल्याला लाभले पाहिजेत, असा हक्क जगांतील लोक सांगूं लागले आहेत. म्हणजे कर्तृत्व एकाचें; शहाणपण, क्लृप्ति, प्रतिभा हीं एकाचीं; आणि ज्याच्या अंगीं या गोष्टींचा मागमूसहि उत्पन्न व्हावयास अजून बराच अवधि आहे तो या समर्थांच्या कर्तृत्वांतून निष्पन्न होणारे सर्व लाभ आणि भोग त्याच्या बरोबरीनें भोगूं इच्छितो. समत्वाचा हा अर्थ जगांत रूढ होऊं पहात आहे; आणि त्यांतूनच जगांत अनेक वाद सध्यां चालू होत आहेत.

अमेरिका, आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि कांहीं अंशीं आशिया येथील निरानिराळ्या वादांकडे थोडें बारकाईनें पाहावें, म्हणजे भौतिक शास्त्रांनीं सक्रिय बनवलेली भूतदया मनाशीं बाळगून, समर्थ लोकांनीं आपण होऊन केलेल्या घोषणा त्यांच्या अंगलट येत आहेत असें दिसून येईल. निग्रो लोकांची गुलामगिरीची स्थिति पाहून लिंकनला त्वेष उत्पन्न व्हावा, आणि गुलामगिरीच्या शृंखला तोडून टाकण्यासाठीं त्यानें स्वकीयांशींसुद्धां जोराचा लढा करावा, हें पाहून मन अगदीं प्रसन्न होतें. लक्षावधि लोक पशुकोटींतून आपल्या मूळ मानवकोटींत येऊन बसलेले पाहून आपल्या अंगांतील मानवता खरोखर आनंदित होते. पण सध्यां अमेरिकेंत चाललेला लढा पाहिला म्हणजे, 'गुलामगिरी नष्ट झाली पाहिजे' या घोषणेला 'समत्व आणि बंधुभाव' या घोषणेचें वैभव प्राप्त झालें पाहिजे असा दावा निग्रो लोक सांगत

आहेत असें दिसेल. आणि या दाव्यांतूनच अमेरिकन जीविताला कुरतडणारे अनेक जटिल प्रश्न उत्पन्न होत आहेत.

दोन-अडीचशें वर्षांपूर्वीच्या गोऱ्या अमेरिकनांना वाटलें होतें कीं, आफ्रिकेतल्या निग्रो लोकांना धरून आणून आपल्या गिरण्यांत आणि आपल्या शेतवाडीवर कामाला लावलें म्हणजे आपले संसार सुखानें चालतील. त्यांनीं निग्रो लोकांना धरून आणलें आणि कामाला लावलें. पुढें त्यांच्या गुलामगिरीची दया येऊन लिंकननें त्यांना बंधमुक्त केलें. पण हे निग्रो लोक बंधमुक्त होण्यावरच संतुष्ट राहिले नाहींत; त्यांना अमेरिकन समाजांत आणि अमेरिकन राष्ट्रांत प्रवेश हवासा वाटूं लागला. वास्तविक पाहतां अमेरिकनांच्या मानानें वर्ण, रूप, कर्तृत्व या तीनहि बाबतींत निग्रो लोक अगदीं निराळे आहेत. रूप आणि वर्ण या बाबतींत तर या दोघांत जमीन-अस्मानाची तफावत आहे. त्यामुळें त्यांच्या अंगच्या कर्तृत्वाचा उपयोग करून घेण्यालासुद्धां अमेरिकन लोक तयार होत नाहींत. आणि त्यांना पुढें असें वाटूं लागलें कीं, या काळ्या आणि अत्यंत कुरूप लोकांच्या पूर्वजांना, आपल्या पूर्वजांनीं अमेरिकेंत आणून सोडलें ही फार वाईट गोष्ट झाली. स्वातंत्र्य, बंधुभाव, समता ह्या घोषणा अमेरिकन राष्ट्रानें केलेल्याच आहेत; तर आपल्या बाबतींतहि त्या लागू पडल्या पाहिजेत, असा निग्रो लोकांचा दावा.

तिऱ्हाईत बुद्धीनें पाहिलें तर अमेरिकनांच्या सामाजिक जीवनांत आणि रक्तसंबंधांत शिरण्याला निग्रो लोक पात्र नाहींत, हें मान्य करावें लागेल. पण समता आणि बंधुभाव यांचा झडत असलेला डांगोरा आपल्या उद्दिष्टाच्या कामीं उपयोगी पडला पाहिजे, असें निग्रो लोकांना वाटत आहे. आणि राष्ट्रीय जीवनांत तर ते समानत्वाचा हक्क सांगतच आहेत. अमेरिकन लोक जगाच्या व्यवहारांत कितीहि बाता मारीत असले तरी घरांतला हा प्रश्न त्यांना डोईजड झालेला आहे. त्यांच्यांतील कांहीं शास्त्रज्ञांनीं अशीहि सूचना केली होती कीं, अमेरिकेंतला एक उष्ण मुलुखाचा पट्टा या निग्रो लोकांना द्यावा, आणि त्यांचें एक निराळें राष्ट्र बनवावें; किंवा त्यांना आफ्रिकेंत परत धाडावें. पण निग्रो म्हणत आहेत कीं, आम्हीहि आतां अमेरिकन्सच झालों आहों, म्हणून आम्ही निराळे निघणार नाहीं. या तिढ्यांतून अमेरिकन राष्ट्राला कसें

बाहेर पडतां येईल हें कळत नाहीं. समत्व, बंधुभाव, आणि स्वातंत्र्य ह्या घोषणा आपण केल्या खऱ्या, पण त्या आपआपसांत लागू व्हाव्या असें अमेरिकनांचें मत होतें! निग्रो लोकांनासुद्धां ह्या घोषणा लागू व्हाव्या, पण त्या त्यांनीं आपआपसांत लागू करून घ्याव्या; व म्हणून हे निराळे निघाले तर बरें, अशी चांगल्या चांगल्या अमेरिकनांची इच्छा आहे. सृष्टीनें तुम्हांला दिलेलीं आणि तुम्हीं स्वतः कमविलेलीं सामर्थ्यें कितीहि असोत, तीं ज्यांच्या वांट्याला आलीं नाहींत ते आम्ही तुमच्या बरोबरीचे आहों असें सांगूं लागले आहेत! सूत्रांचा जाच हा असा होत असतो. म्हणून समाजाचा विचार करणाऱ्यांनीं सूत्रांचा डांगोरा करणारांवर नेहमीं पाळत ठेवली पाहिजे.

आफ्रिकेंत तर या वादाला एक निराळेंच रूप आलेलें आहे. आपल्याला हें माहीत आहेत कीं, या विशाल भूमींत अगदीं परवांपरवांपर्यंत अनेक मागासलेले लोक नांदत होते. त्यांचीं रूपें वाईट, त्यांचे वर्ण वाईट, त्यांची संस्कृति अगदीं वाईट; संस्कृतीच्या अगदीं प्राथमिक गोष्टीसुद्धां त्यांना माहीत झालेल्या नव्हत्या. हे लोक जमातरूपानें रहात, आणि एकमेकांशीं त्यांचें हाडवैर असे. अशा त्या भूमींत कांहीं युरोपियन लोक येऊन राहूं लागले. मूळच्या लोकांच्या मानानें हे अगदीं निराळे आणि फार पुढारलेले होते. हळूहळू आपल्या कर्तृत्वानें आफ्रिका खंडाचा एकेक टापू त्यांनीं अगदीं बदलून टाकला. आपलें शास्त्रज्ञान त्यांनीं या भूमींत चालविलें; आणि विद्या, कलाकौशल्य, शेती, कारखाने इत्यादींचा मोठा सुंदर संसार तेथें उभा केला. त्यांनीं खाणीहि खणल्या आणि सोन्याच्या लगडीच्या लगडी बाहेर काढल्या, आणि हिऱ्यांच्या ठिक्या लावून ठेवल्या. आसपासच्या अत्यंत मागासलेल्या लोकांना त्यांनीं कामावर लावलें, आणि काम केलें असतां हातीं दमडा येतो आणि सुखानें खायला मिळतें, हा नवा शोध त्या रानवटांना लागला. केव्हां कदाचित् जबरदस्तीनें आणि बहुधा स्वखुषीनें ते काम करूं लागले; आणि हळूहळू त्यांची समाजस्थिति पालटूं लागली. युरोपियन लोकांचें पाहून ते बदलूं लागले. मग स्वातंत्र्य, समता, आणि बंधुभाव या युरोपियनांच्या घोषणा त्यांच्याहि कानीं गेल्या, आणि ह्या घोषणा आपल्यालाहि लागू पडल्या पाहिजेत असा त्यांनीं दावा मांडला.

नागरिकत्वाचे समान हक्क ते मागूं लागले, आणि लोकशाहीच्या गर्जनाहि त्यांनीं चालू केल्या. यांतूनच डॉ. मालनचें भांडण निघालें आहे.

तो म्हणतो, "आम्ही गोरे लोक निराळे आहों, आणि तुम्ही अत्रस्थ लोक निराळे आहां. तुमच्यांत आणि आमच्यांत फार मोठी तफावत आहे. बहुधा तुम्ही आमच्या बरोबरीचे नसतां, म्हणून आम्ही तुम्हांला आमच्यांत येऊं देणार नाहीं." या उद्गारामुळें मालनवर चोहोंकडून टीकेचा भडिमार होत राहिला. पण अगदीं मुळांत पहावयास गेलें तर मालनचें कांहीं चूक नव्हतें. मालन जर असें म्हणत असता कीं, तुम्हां लोकांना आम्ही वेठीस धरूं, आमचीं कामें तुमच्याकडून करवून घेऊं, आणि तुम्ही हक्काविषयीं बोलूं लागलां म्हणजे मात्र तुम्हांला लाथ मारूं;— तर मालनवर ठपका ठेवतां आला असता. पण परवां एकदां त्यानें चक्क सांगून टाकलें कीं, "या भूमीची आपण वांटणीच करून घेऊं. तुम्ही निराळे निघा, आम्ही निराळे निघूं." या त्याच्या बोलण्यांत आक्षेप्य असें कांहीं नाहीं. दोघे निरनिराळे राहिले, आणि आपापल्या कुवतीप्रमाणें ज्यानें त्यानें आपली संस्कृति व आपलें राष्ट्र वाढविलें तर दोघेहि सुखी होतील. पण समत्व, बंधुभाव इत्यादि गोऱ्या लोकांनीं केलेल्या घोषणा आपल्याला लागू पडल्या पाहिजेत असा आफ्रिकेंतल्या मागासलेल्या लोकांचा दावा आहे. घोषणांचा जाच होतो तो असा होतो !

खरें पाहूं जातां आफ्रिकेच्या भूमीला उच्च संस्कृतीचा स्पर्श झाला तो या युरोपियन लोकांच्या प्रयत्नामुळें होय. त्यांनीं श्रम-साहस केलें; त्यांनीं संकटें सोसलीं; त्यांनीं पैसा ओतला; सृष्टीचीं धनें त्यांनीं जागृत केलीं; नगरें-गांवें त्यांनीं वसविलीं;—असें असतांना केवळ त्यांच्या शहरच्या रस्त्यावर जिरेभिरे विकावयास बसणाऱ्यांनीं समत्वाचे हक्क सांगूं लागावें हें चमत्कारिकच आहे. पण वर म्हटल्याप्रमाणें हे लोक कांहीं घोषणांचा फायदा करून घेऊं इच्छितात;—यांतून हें भांडण निघालें आहे. आणि या घोषणांचा जाच इतका आहे कीं, खरें बोलण्याची कोणाची छातीच होत नाहीं. यामुळें बहुवंश राष्ट्र निर्माण करावें असा सल्ला कोणी देत आहेत. बहुवंश राष्ट्रांच्या नशिबीं काय लिहिलेलें असतें याचा प्रत्यय हा सल्ला

देणारांना स्वतःच्या घरांत येतच आहे ! तरीहि समत्व आणि बंधुभाव या घोषणांची नशा मुत्सद्द्यांना इतकी चढली आहे कीं, नव्या भांडणाची तयारी आपण आपल्या सल्ल्यानें करून देत आहों, हें त्यांच्या ध्यानांतच येत नाहीं.

ऑस्ट्रेलियन राष्ट्र या बाबतींत फार सावधपणानें वागत आहे. ऑस्ट्रेलिया बेटांतील फार मागासलेल्या आणि रानटी जमाती आतां बहुधा नष्ट झाल्या आहेत; आणि तेथें गोऱ्या लोकांचें राष्ट्र तयार होत आहे. प्रस्तुतचा विषय लक्षांत घेतां, तेथील सरकारनें केलेली एक घोषणा लक्षांत घेण्यासारखी आहे. त्यानें चक्क सांगून टाकलें आहे कीं, " आम्हांला ऑस्ट्रेलिया हा देश श्वेतवर्णीयांसाठींच ठेवावयाचा आहे; येथें जागा रगड आहे. म्हणून युरोपांतून आणि अमेरिकेंतून ज्या कोणा गोऱ्या लोकांना येथें यावयाचें असेल त्यांनीं खुशाल यावें. आमच्या घराचा दरवाजा त्यांना नेहमींच उघडा राहील. कोण कोणत्या देशाचा आहे हें बघण्याचें आम्हांला कारण नाहीं. तो श्वेतवर्णीय असला म्हणजे पुरे." नवलाची गोष्ट ही कीं, इंग्लंडांतून दरसाल सव्वा लक्ष लोक ऑस्ट्रेलियांत वसतीला जात आहेत; आणि गोऱ्या लोकांचें एक भलें मोठें थोरलें राष्ट्र ऑस्ट्रेलियांत जन्माला येत आहे. आतां त्यांच्या या घोषणेमुळें तथाकथित उदार आणि बहुवंश-राष्ट्रवादी अगदीं चिडून जातात. पण ही त्यांची भावना अगदीं चुकीची आहे. खिचडी केल्यानें भांडणें सुरू होतात, आणि कोणालाच सुख लागत नाहीं, हें धडधडीत दिसत असतांना ऑस्ट्रेलियाच्या या धोरणाला दोष देणें हें हास्यास्पद आहे.

आतां हदुस्थानांत होऊं घातलेल्या लोकशाहीविषयीं कांहीं विचार आपल्या मनांत येणें हें अटळ आहे. सुदैवानें अमेरिकेंत किंवा आफ्रिकेंत रूपाची आणि वर्णाची जी विलक्षण तफावत आहे ती भारतांत तितक्या अंशानें नाहीं; आणि जी थोडीशी आहे ती सामावून घेण्याची तत्परता लोक दाखवतील असें दिसतें. पण संस्कृतीच्या बाबतींत फार मोठाले फरक आहेत. येथें लोकशाही प्रस्थापित होतच आहे; आणि तिला कोणीहि आक्षेप घेतलेला नाहीं. पण याच्यापुढें एक नवा प्रश्न उपस्थित होणार आहे. आज-

पर्यंत भटक्या जाती, रानटी जाती, इत्यादि नांवांनीं ओळखले जाणारे लोकहि आपल्या लोकशाहींत आतां समाविष्ट व्हावयाचे आहेत. किती सहस्र वर्षें झालीं कोणास ठाऊक,– हे लोक जमातींच्या रूपानें जंगलांत, दऱ्याखोऱ्यांत, पर्वताच्या माथ्यावर रहात आलेले आहेत. आधुनिक जीविताचाच नव्हे तर सामाजिक जीविताचा कसलाहि संस्कार त्यांच्यावर झालेला नाहीं. पण त्यांच्या कानींसुद्धां स्वातंत्र्य, समता, आणि बंधुभाव या घोषणा जाऊन पडत आहेत, किंवा लवकरच पडूं लागतील. संस्कृतीच्या प्रदेशांत पुष्कळ वर्षें वापरल्यानेंच या घोषणांच्या व्यवहाराला लोक पात्र बनतात, हा न्याय हयगयींत सांपडेल असें वाटतें.

सामाजिक मनाची मशागत झालेली असावीच लागते; तरच या उदार तत्त्वांच्या मर्यादा कोणत्या, आणि याचा आग्रह किती धरावा, हें त्या त्या लोकांना कळूं लागतें. पण एका नव्या राष्ट्राच्या बांधणींत उत्पन्न होणारा अत्युत्साह या घोषणा करीत राहील, आणि मशागतीसंबंधानें हवी तेवढी काळजी घेणार नाहीं. याचा परिणाम वाईट होईल. पूर्वास्पृश्य लोकांसकट सर्व लोकांच्या मनाची मशागत वेदांपासून तों संतवाङ्मयापर्यंत प्रकट झालेल्या विचारांनीं केलेली होती; म्हणून सारासारविवेक आणि न्यायबुद्धि यांची ललकारणी काळानें केल्याबरोबर या सर्व लोकांची लोकशाही प्रस्थापित व्हावयास कोणी कसलीहि हरकत घेतली नाहीं. तरीहि अज्ञानामुळें आणि पृथक्भावामुळें ही लोकशाही कमी दर्जाची होईल कीं काय, अशी शंका विचारवंतांना येतेच येते. पण ज्यांच्यावर कसलेच संस्कार झालेले नाहींत त्या रानटी जमाती जर का या लोकशाहींत दाखल झाल्या, तर उदित होणारी ही नवी लोकशाही अगदीं कनिष्ठ दर्जाची होऊन बसेल; आणि रानटी लोकांनीं ज्याप्रमाणें पैगंबराचें प्रतिपादन आपल्याकडे ओढून घेतलें, आणि हिंदुस्थानांतल्या अनार्य जमातींनीं ज्याप्रमाणें आपल्या चालीरीति आणि समजुती आर्य लोकांच्या घरांत घातल्या, आणि अशा रीतींनें एक धर्म आणि एक समाज निकृष्ट बनविला, त्याप्रमाणेंच या देशांतल्या लोकशाहीचेंहि होईल. म्हणून ठराविक घोषणांचा मुलाहिजा कितपत ठेवावा याचा विवेक सर्व लोकांनीं वेळींच करावयास हवा. या थोर तत्त्वांची किंमत कोणीहि कमी

करूं इच्छीत नाहीं; किंवहुना भावी जीविताला विशेष प्रकारची नरमाई त्यांनींच प्राप्त होईल, हेंसुद्धां खरें आहे. पण यांची अंमलवजावणी करतांना तारतम्य आणि विवेकबुद्धि सुटतां कामा नये, एवढेंच येथें सुचवावयाचें आहे.

---

१५ : : नीतीची बदलती प्रकृति

नीति-अनीतीच्या कल्पनांचा विचार करतांना एक घोटाळा होण्याचा संभव असतो. समाजाची रचना किंवा बांधणी कांहीं तत्त्वांना अनुसरून केलेली किंवा झालेली असते. या तत्त्वांना नीति हेंच नांव मिळतें. तसेंच प्रत्येक समाजाच्या जीवनक्रमांत कांहीं आचार रूढ झालेले असतात. या आचारांनासुद्धां नीति हेंच नांव मिळतें. परंतु सामान्यत्वेंकरून लोकांच्या मनांत या दोहोंचें मिश्रण होतें. प्राचीन काळच्या आर्य लोकांनीं समाजांत चातुर्वर्ण्याची व्यवस्था केली, आणि या व्यवस्थेच्या पोटीं श्रेष्ठ-कनिष्ठभाव जन्माला आला. तथापि ही एक समाजाची बांधणी होती. युरोपांत रोमन साम्राज्याच्या काळीं पॅट्रिशिअन्स आणि प्लिबिअन्स असे समाजाचे दोन वर्ग होते. पराक्रम करणारे, राज्य करणारे, श्रेष्ठवंशीय हे पॅट्रिशिअन्स होत, आणि युद्धांत धरून आणलेले म्हणा किंवा कनिष्ठ जातींचे म्हणा – जे कोणी होते ते प्लिबिअन्स होत. रोमन लोकांची ही समाजव्यवस्था होती. गुलाम ही संस्था युरोपांत फार प्राचीन काळापासून मान्यता पावलेली होती; आणि ही संस्था आपल्या समाजांत आहे याचें कोणाला कांहीं वाटतहि नसे. दक्षिण भारतांतील पश्चिम किनाऱ्याच्या खालच्या टोकाला पुरुषायत्त समाजव्यवस्था नव्हती; तिथें स्त्रिया वंशधर असत. हीहि एक समाजव्यवस्थाच होती. पश्चिम किनाऱ्यावर आणखी एके ठिकाणीं प्रजाभिवृद्धि होत असली तरी लग्नसंस्था नव्हती; अशाच तऱ्हेचा समाज तेथें नांदत असे. हीहि एक समाजव्यवस्था होती.

आतांच सांगितलेले हे व्यवस्थेचे प्रकार सहस्रावधि वर्षें टिकून राहिलेले होते; व त्यांचे अवशेष अजूनहि शिल्लक आहेत. या व्यवस्था ज्या नियमांनीं अंकित ठेवल्या होत्या, त्या नियमांनासुद्धां नीति हेंच नांव प्राप्त झालेलें असे. दुसरा प्रकार म्हणजे आचारासंबंधींचा होय. कोणा लोकांत मांसाशनाचा निषेध आहे; कोणांत मांसाशन हें अवश्य मानलेलें आहे; कोणीं मद्यसेवन हें निषिद्ध मानलेलें आहे; तर कोणी तें धार्मिक आचारांत आवश्यक मानलेलें आहे. आचाराआचारांत पुन्हा तरतमभाव असतोच. आतांच सांगितलेले हे समाजाच्या जीविताशीं विशेष निबद्ध झालेले आचार होत. पण दुसरे कांहीं

समाजांत रूढ असले तरी त्यांचीं रूपें नेहमीं बदलत राहतात. डोक्यावरचे केस कसे ठेवावे,—म्हणजे ते मागें लोंबत ठेवावे का कपाळाकडे लोंबत आणावे, त्यांचें एक वेटोळें करून तें डोक्यावर घ्यावें का त्याचे पेड करून ते पाठीवर सोडावे, गालफडावर व हनुवटीवर उगवलेले केस आणि ओठावरचे केस हे मधून मधून काढावे का खुशाल वाढूं द्यावे,—हे सारे एक तऱ्हेचे बदलते आचार होत. आज हा आचार रूढ असतो तर कांहीं दिवसांनीं त्या ठिकाणीं दुसरा रूढ होतो. पण यांनासुद्धां अखेर नीति हेंच नांव प्राप्त होतें.

पहिल्या प्रकारची नीति समाजाच्या बांधणींत गुंतलेली असल्यामुळें ती जास्त टिकाऊ झालेली असते, आणि समाजाच्या धारण-पोषणाचा प्रश्न तेथें असल्यामुळें लोक या नीतीसंबंधानें विशेष कटाक्ष बाळगतात. पण दुसऱ्या प्रकारांतील नीति ही वरवरची असते; ती समाजाच्या प्रकृतींत शिरलेली नसते. तिलाहि शाश्वत रूप द्यावें, असा अनेकांचा हट्ट असतो. पण हा हट्ट बदलत्या पिढ्या मानीत नाहींत. समाजाच्या बांधणीविषयक ज्या नीतिकल्पना रूढ असतात, त्यासुद्धां बदलण्याची वांछा ते ते समाज कालगतींत धरूं शकतात, आणि समाजाच्या धारणपोषणासाठींच बांधणीचे नियम समाज आपण होऊन बदलतात. परंतु या दोन्ही प्रकारांचा एकंकार माणसांच्या मनांत झालेला असतो, आणि त्यालाच सामान्यत्वेंकरून नीति हें नांव मिळालेलें असतें.

आपल्या समाजविषयक आणि आचारविषयक कल्पना कसकशा बदलत गेल्या आहेत हें पाहणें फारच मनोरंजक ठरतें. ज्या कल्पनांचा उच्चारहि आज आपल्याला तोंडानें करणें नकोसें वाटेल त्या पृथ्वीवरील सर्व समाजांच्या अतिप्राचीन पूर्वजांत मान्य म्हणून चालू होत्या, हें पुष्कळांना माहीत नसतें. आपल्याच समाजांतील नियोगाची कल्पना घ्या. अतिप्राचीन कालीं आर्यावर्तात प्रदेशविस्ताराच्या मानानें प्रजांची संख्या अगदींच थोडी होती. या प्रजांना संरक्षणहि हवें असे; कारण मानवी जीविताला घातक अशी परिस्थिति त्यांना सदैव भेडसावीत असे. म्हणून प्रजांची वाढ हें तेव्हांच्या समाजांत एक अगत्याचें कलम होतें. 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' या आशीर्वादाचें मर्म हेंच आहे. प्रत्येक स्त्रीला आठ आठ मुलगे व्हावे, अशी इच्छा वडील माणसें प्रकट करीत. इच्छेवरून आवश्यकता दिसून येते.

जर प्रजा पुष्कळ हवी होती तर क्षेत्र वायां जाऊं न देणें हेंहि आवश्यक होतें. तसेंच स्त्रियांना संरक्षणाची आवश्यकता सध्यांपेक्षांहि जास्त होती, आणि म्हणूनहि स्त्रीरूप क्षेत्र वाया जाऊं देणें माणसांना चुकीचें वाटे. लग्नसंस्थेप्रमाणें ज्या त्या स्त्रीला आपला नवरा असला तर प्रजाभिवृद्धि ही सहजच होत असे; पण जर पति नसला, किंवा असूनहि त्याला प्रजोत्पत्ति करतां येत नसली तर स्त्रीचें क्षेत्र वायां घालविणें हें चूक आहे, असेंच त्या काळीं लोक समजत असत. प्रजा त्याच घराण्यांतील, किंवा त्याच समाजांतील असावी असें वाटणेंहि स्वाभाविक होतें, आणि म्हणूनच दिरापासून तों समाजांतील इतर कोणत्याहि योग्य पुरुषापर्यंत कोणाकडून तरी प्रजोत्पादन करून घेणें हा मान्य आचार होता, आणि यालाच नियोग असें म्हणत असत.

पंडुराजाला मृगया करतांना कांहीं तरी शारीरिक बाधा झाली किंवा व्यथा जडली, आणि प्रजा होणें त्याला अशक्य दिसूं लागलें, तेव्हां त्यानें आपल्या स्त्रीला नियोगाची शिफारस केली, असें महाभारतांत स्वच्छ सांगितलें आहे. या कल्पनेंतून समाज बराचसा बाहेर पडलेला होता, आणि या आचाराची मान्यता लोपत चालली होती. म्हणून कुंतीनें प्रथम पंडूचा निषेधच केला. पण पंडूनें तिला या सामाजिक चालीचा इतिहास सांगितला, आणि मग ती त्या आचाराला प्रवृत्त झाली.

आपलें म्हणणें पटवून देतांना राजा पंडु म्हणाला, "प्राचीन काळीं मोठमोठे धर्मज्ञ मुनि ज्या अनादि धर्मतत्त्वांनीं वागत असत, तीं मी तुला सांगतों. फार प्राचीन काळीं स्त्रिया अनियंत्रित असत. त्या इच्छेप्रमाणें आचरण व विहार करीत असून त्यांस कोणीहि अडथळा करीत नसे. त्या कौमार्यावस्थेपासूनहि पतिमर्यादेचा अतिक्रम करीत असतांहि त्यांत अधर्म घडत नसे. कारण त्या वेळीं तोच धर्म समजला जाई. तोच जुना धर्म तिर्यग्योनींतील प्राणी अद्यापपर्यंत पाळीत असून त्यामुळें त्यांचे कामक्रोध खवळलेले नाहींत. हा धर्म सप्रमाण असून त्यास मोठमोठ्या ऋषींचीहि संमति आहे. त्याचप्रमाणें हें धर्मतत्त्व सनातन असून स्त्रियांस सुखप्रद असल्यामुळें उत्तर कुरुदेशांत सांप्रत याच धर्मानें लोकव्यवहार चालला आहे. सारांश, आपल्याकडे प्रचारांत असलेली ही मर्यादा फार प्राचीन नाहीं. ती

कोणीं स्थापन केली व तसें करण्यास कोणतें कारण घडलें तें तुला सांगतों." एवढें बोलून उद्दालकासमक्ष श्वेतकेतु मुनीच्या मातेचा हात ब्राह्मणानें कसा धरला, तें पाहून श्वेतकेतूचा कोप कसा अनावर झाला, वगैरे कथाभाग पंडुराजानें सांगितला, व तो पुढें म्हणाला, "श्वेतकेतूचा राग अनावर झालेला पाहून उद्दालक त्याला म्हणाला, 'बाळ, कोप करण्याचें काय प्रयोजन बरें? अरे, हा अशा प्रकारचा अनादिसिद्ध धर्मच आहे. सर्व वर्णांच्या स्त्रिया अशाच अनियंत्रित असून सर्व लोक गाईप्रमाणें आपापल्या वर्णांत स्वैरवर्तन करीत आहेत.' पण तो सनातन धर्म असूनहि श्वेतकेतूस सहन झाला नाहीं; या भूलोकीं स्त्री-पुरुषांचें वर्तन कसें असावें याविषयींची ही मर्यादा त्यानें घालून दिली; आणि ही इतर प्राण्यांत दृष्टीस न पडणारी मर्यादा मनुष्य-प्राण्यांत त्या वेळेपासून सुरू झाली, असें आम्हीं ऐकलें आहे."

या विचाराला मनूनें आपल्या स्मृतींत शिफारशीचें अथवा नियमाचें रूप दिलेलें आहे. मात्र असें रूप देतांनाहि त्यानें हा नियोगाचा आचार गरजेपुरता व शास्त्रपूत कसा राहील याचीहि काळजी घेतली आहे. मनुस्मृतीच्या नवव्या अध्यायांतील ५८ ते ६८ हे श्लोक यासंबंधीं निर्णायक आहेत. मनु म्हणतो, "संतानाचा अभाव झाला असतां, या एका प्रसंगा-वाचून दुसऱ्या कोणत्याहि प्रसंगीं माता, पिता इत्यादिकांनीं जरी प्रेरणा केली तरी ज्येष्ठ व कनिष्ठ भ्राते एकमेकांच्या भार्येशीं गमन करून पतित होतात. संतानाचा अभाव झाला असतां पति, श्वशुर इत्यादि गुरूंनीं जिला आज्ञा केली आहे अशा स्त्रीनें दीर किंवा दुसरा कोणी सपिंडांतील पुरुष याच्यापासून इष्ट प्रजा प्राप्त करून घ्यावी." याच ठिकाणीं 'एका पुत्रास उत्पन्न करावें; द्वितीय पुत्रास कधींहि उत्पन्न करूं नये.....विधवा इत्यादि स्त्रियांच्या ठायीं यथाशास्त्र गर्भधारणा झाली असतां (मग) उभयतांनीं परस्पर गुरूप्रमाणें किंवा स्नुषेप्रमाणें वागावें' असेहि नियम सांगितले आहेत. याच अध्यायांत मनु पुढें म्हणतो : "(सांगितलेल्या) विधानास सोडून यथेच्छ वर्तन करूं लागतात ते स्नुषागामी किंवा गुरुस्त्रीगामी मूर्ख पतित होतात." नियोगपद्धति ही केवळ गरजेतून उत्पन्न झाली होती, व तो स्वैराचार नव्हता, हें यावरून स्पष्ट होतें. मनू याच अध्यायांत म्हणतो, "द्विजादींनीं विधवा स्त्रीस पतीवांचून देवरादि इतर पुरुषांशीं नियुक्त करूं नये; कारण परपुरुषांशीं

समागम करण्यास सांगणारे ते स्त्रियांच्या एकपतित्वरूप सनातन धर्माचा नाश करतील. विवाहासंबंधींचे जे मंत्र आहेत त्यांत कोठेंहि हा नियोग सांगितलेला नाहीं."

आतां जिच्या मुलाच्या नांवानें या देशाला भरतखंड किंवा भारत हें नांव मिळालें आहे, तिचा विवाह दुष्यंताशीं होतांना खुद्द दुष्यंताच्या तोंडून व त्याहिपेक्षां म्हणजे कण्वमुनीच्या तोंडून विवाहसंस्थेविषयीं निघालेले उद्‌गार या प्रकरणीं ध्यानांत ठेवण्यासारखे आहेत.—

महाभारताच्या आदि-पर्वांतील त्र्याहत्तराव्या अध्यायांत दुष्यंत-शकुंतला-विवाहाचें वर्णन आलेलें आहे. दुष्यंताची व शकुंतलेची आश्रमांत एकान्तीं गांठ पडल्यावर दुष्यंत शकुंतलेला मागणी घालतो व विवाहाचा आग्रह करतो. "माझे बाबा बाहेर गेले आहेत, ते आले म्हणजे मला अर्पण करतील, तोंपर्यंत थांबा." असें शकुंतलेनें सांगतांच दुष्यंत तिला आठ प्रकारचे विवाह-विधि सांगतो, व त्यांतील 'गांधर्व-विवाह' वधूवरांनीं परस्परांच्या संमतीनें उरकावयाचा असतो, व क्षत्रियांस तोच उचित आहे' असें सांगतो, व अखेर त्याचा कण्वमुनींच्या पश्चात् विवाहहि होतो. कण्वमुनि आश्रमांत परत आल्यावर त्यांचा व शकुंतलेचा संवाद होतो. त्यांत तिची समजूत घालतांना ते म्हणतात, "हे कल्याणी, मला न विचारतां व माझी वाट न पाहतां तूं आज एकान्तांत जो विवाहविधि पूर्ण केलास, तो कांहीं धर्मनिषिद्ध नाहीं. कारण, क्षत्रियांस गांधर्वविधीच श्रेष्ठ आहे. परस्परांवर प्रीति जडलेल्या स्त्रीपुरुषांनीं एकान्तांत ऐकमत्य करून घेऊन जो मंत्रशून्य विवाहविधि केला त्यासच गांधर्व-विवाह म्हणतात, व तो क्षत्रियास उचितच आहे."

वरील उदाहरणांवरून दिसून येईल कीं, जी आज नीति आहे ती उद्यां अनीति बनते. आणि हें समाजरचनेच्या किंवा बांधणीच्या बाबतींत-सुद्धां दिसून येतें. मग रूढ असलेल्या केवळ आचार-विचारांत असे फरक पडत गेले असतील त्यांत काय आश्चर्य आहे! त्या त्या वेळच्या गरजा काय तर राजकीय उलाढाली आपल्याला माहीत झालेल्या असतात. राजकीय उलाढालींनीं समाजावर कोणते परिणाम केले, समाजाचे पाये निखळण्याचे कोणकोणते प्रसंग उत्पन्न झाले, आणि मग समाजाच्या रक्षणासाठीं व धारण

पोषणासाठीं माणसांनीं कोणतीं नियमनें पत्करलीं, हें समजावयास सामाजिक इतिहास आपल्या काय किंवा इतरांच्या काय वाङ्मयांत असावयास हवे होते; पण ते नसल्यामुळें आपल्या सामाजिक नीति-अनीतीच्या कल्पना केवळ धार्मिक अज्ञानांतून, पुरोहितवर्गाच्या लबाडींतून, किंवा जातीजातीच्या श्रेष्ठ-कनिष्ठ भावांतून उत्पन्न झाल्या आहेत, असें आपण समजतों. दुसराहि एक विचार या ठिकाणीं ध्यानांत ठेवावयास हवा. पुष्कळ लेखक या विषयाच्या संबंधानें लिहितांना, "आमच्या हिंदुसमाजाचें असें आहे, आमच्या हिंदु समाजाचें तसें आहे—" असें म्हणून पाठीवर आसूड मारून घेत असतात. हा त्यांचा कहार पाहिला म्हणजे मोठी करमणूक होते. आपल्याला इतर समाजांचें ज्ञान जणूं कांहीं आहेच, ते इतर समाज फार समंजस, न्यायी, उदार होते किंवा आहेत, आणि आपला समाज मात्र असमंजस, अन्यायी, मनानें चिक्कू आहे, असें सांगण्याचा त्यांच्या लिहिण्यांतील डौल असतो. पण समकालीन परकी समाजांचें त्यांना ज्ञान झालेलें असतें असें बिलकुल म्हणवत नाहीं.

पश्चिम आशियांतील एकस्तनी स्त्रियांच्या साम्राज्याची राणी ॲलेक्झँडरकडे येऊन, "मला तुझ्याकडून अपत्यप्राप्ति व्हावयास हवी आहे" असें उघडपणें म्हणाली. आणि या राणीच्या राज्यांतील स्त्रिया, अपत्याची वांछा झाली म्हणजे फेरिस्त्या पुरुषांना आपल्या घरीं बोलावून नेत असत. या हकीकती आपल्या या लेखकांना माहीत झाल्या असत्या तर बरें झालें असतें ! पैगंबर जन्माला येण्याच्या आधीं कांहीं शतकें अरबस्तानांतील बाप आपल्या पोरी आपल्या हातानेंच जिवंतपणींच गाडून टाकीत असत. आणि मग सुधारणा झाली ती ही कीं, स्वतःचीं अपत्यें वाघाप्रमाणें आपलीं आपण खाऊं नयेत ! पृथ्वीवरचे सगळे समाज नीतिदृष्ट्या बदलत आजच्या अवस्थेला येऊन पोंचलेले आहेत. त्या एकस्तनी राणीचा आचार हासुद्धां तेव्हां नीतींतच मोडत होता; आणि स्वतःच्या मुली मारून टाकणें हाहि अरबस्तानांतला मान्य आचार होता. पुढें कित्येक वर्षांनीं तेथें नवी नीति होत्या याचें यथोचित सामाजिक ज्ञान आपल्याला पुरेसें नसतें. फार झालें उत्पन्न झाली. तैग्रिस आणि युफ्रेटिस या नद्यांच्या दुआबांत म्हणजे सध्यांच्या मेसोपोटेमियांत पांच-सहा हजार वर्षांपूर्वी एक अतिशय उच्च संस्कृति वाढीस

लागली होती. पण या संस्कृतींत एक मान्य आचार असा होता कीं, धनी आपोआप मेला तर स्वर्गांत त्याच्या सेवाचाकरीची व्यवस्था व्हावी म्हणून त्याच्या नोकरमाणसांना ठार मारावें ! ही चाल वाईट आहे हें कळावयास या लोकांना पांचशें वर्षें लागलीं. हें करणें वाईट आहे, अशी नवी नीति त्यांच्यांत रूढ झाली. पूर्वीचाहि आचार मान्यच होता, आणि हाहि आचार आतां मान्यच ठरला !

अटकेच्या पलीकडे जाऊं नये हा हिंदु लोकांनीं पत्करलेला न्याय पाहून आपली सुधारणाबुद्धि केवळ हैराण होऊन जाते. पण तेव्हां ही प्रादेशिक नीति होती असें दिसतें. इराणच्या म्हणजे आर्याणाच्या जुन्या इतिहासांत सांगितलें आहे कीं, या देशाची मर्यादा ओलांडून बाहेर जाणें म्हणजे देशद्रोह समजावा; आणि आपल्या चीन देशांतून कोणीं बाहेर जाऊं नये म्हणून पहारा करण्यासाठीं चिनी सम्राटांनीं आपल्या सरहद्दीवर ठिकठिकाणीं बुरूज बांधलेले होते ! ह्यू एन् सँग याला पहारेकऱ्यांचा डोळा चुकवून चोरटेपणानें देशांतून बाहेर पडावें लागलें तें यासाठींच ! ही तेव्हांची प्रादेशिक नीतिच होती; हा तेव्हांचा मान्य आचारच होता. आतांचा आचार उलट असा आहे कीं, जितके लोक देशांतून बाहेर जातील तितकें चांगलें ! हजारोंच्या हजारों हिंदी आणि चिनी विद्यार्थी विद्या शिकण्यासाठीं बाहेर जात आहेत. आतां नवी नीति रूढ झाली आहे.

रोमन साम्राज्य मोठें सुधारलेलें आणि बलिष्ठ होतें खरें; पण एकीकडे लोकशाहीचा डंका वाजत असतांना दुसरीकडे प्रत्यक्ष नरमेध रूढ होता, हें वाचलें म्हणजे आपल्याला आश्चर्याचा धक्काच बसतो. पण तेव्हां तो मान्य आचार होता. प्लिबिअन घराण्यांतील मुलगी सीझरनें केली तेव्हां सीझर पाखंडवादी ठरला, आणि सुला नांवाचा जो एक खवीस तेव्हां रोमन साम्राज्याचा अधिपति होता त्यानें या लग्नाबद्दल सीझरची निर्भर्त्सना केली. कारण तेव्हां ती मान्य नीति नव्हती. त्या काळांत स्त्रियांची किंमतहि किती होती, आणि लोक कशाला नीति आणि अनीति समजत असत, हें सीझरच्या तोंडच्या पुढील एका वाक्यावरून चांगलें दिसून येतें.

'Ceasar's wife must be above suspicion' या वाक्यांतील above suspicion या शब्दांवर जोर देण्याची चाल पडलेली आहे. सीझरच्या

बायकोसंबंधानें कोणीं शंका घेतां कामा नये, असा या वाक्याचा अर्थ धरतात. पण मूळ वाक्याचें मर्म निराळेंच होतें. सीझर हा वर्तणुकीनें ढिलाच होता; तेव्हां त्याला कोणीं सुनावलें कीं, "तुम्ही अशा रीतीनें वागतां, तर तुमच्या पत्नीनें कसें वरें वागावें?" तेव्हां सीझरनें 'वाइफ' शब्दावर जोर देऊन सांगितलें कीं, "Ceasar's 'wife' must be above suspicion!" म्हणजे आपण कसेहि वागलों तरी हरकत नाहीं, पण आपली 'बायको' मात्र पातिव्रत्यानेंच वागली पाहिजे;— असा अभिप्राय सीझरनें दिला. तेव्हां थोरामोठ्यांच्या मनांत स्त्रीपुरुषांच्या नीतीविषयीं कोणत्या कल्पना वागत होत्या हें यावरून चांगलें दिसून येतें.

Platonic love या शब्दसंहतीचें उगमस्थान ग्रीक लोकांच्या कोणत्या आचारांत होतें, हें इतिहासांत पाहिलें म्हणजे त्या शहाण्यासुरत्या लोकांत रूढ असलेल्या त्या ओंगळ पण मान्य आचाराची खरोखर कींव च येते. त्या आचाराचें वर्णन करावयाससुद्धां आपली लेखणी धजत नाहीं. सोदम आणि गोमोरा हीं शहरें परमेश्वरानें आकाशांतून आगीचे लोळ पाठवून कां जाळून टाकलीं याचें ख्रिस्ती पुराणांतील वर्णन तेव्हांच्या नीतिकल्पनांच्या दृष्टीनें फारच बोधप्रद ठरेल. या शहरांतून तेव्हां मान्य असलेल्या आचारांचा उच्चारहि आपल्याला करवणार नाहीं. चिनी नवऱ्यामुलीचें तोंडहि नवऱ्या-मुलाला कधीं पाहावयास मिळत नसे. लग्न झाल्यावर पॅकबंद होऊन नवरी नवऱ्याच्या घरीं मेण्यांतून जाई. मग नवऱ्यानें एक किल्ली घेऊन मेण्याचें दार उघडावयाचें आणि आंतून जें ध्यान बाहेर पडेल तें बायको म्हणून पत्करायचें! हाहि तेव्हां समंजसपणाच होता. ही नीतिच होती. आतां पहावें तों सुधारणायुगांत आपल्याला माहीत झालेली लग्नविषयक नीति तेथें रूढ झालेली आहे.

लोकहितवादी जेव्हां आपल्याइकडील मटाभिक्षुकांना शिव्या देत होते, आणि इंग्रज लोकांचे गुणानुवाद करीत होते, तेव्हां इंग्लंडांत कोणती नीति होती तें पहा. एका शिलिंगापेक्षां जास्त किंमतीची मालमत्ता जर कोणी चोरली तर ती चोरणारी व्यक्ति,—मूल असो, स्त्री असो, पुरुष असो,—तिला प्रत्यक्ष फांशीं देत असत. स्कॉटलंडमध्यें तर खाणींत काम करणारे लोक हे

वंशपरंपरेनें गुलाम बनलेले होते; म्हणजे खाणकाम करणाराच्या मुलानें, त्या मुलाच्या मुलानें आणि त्याच्याहि मुलानें खाणींतच काम केलें पाहिजे, अशी सक्ती होती. आणि तेव्हां ही मान्य नीति होती. याच काळांत फ्रान्स देशामध्यें गुन्हेगारांना छळून छळून ठार मारण्याचा कायदा मान्य आचार म्हणून चालू होता. केमालपाशा येण्याच्या आधीं पडदा ही तुर्कस्तानांतील नीति होती. आतां त्याच देशांत पडदा ही अनीति झालेली आहे. निग्रो लोकांना पंगतीला घेणें ही सुधारलेल्या अमेरिकन राष्ट्रांतसुद्धां अनीतीच समजत असत आणि जेव्हां एका अमेरिकन प्रेसिडेंटनें एकाच टेबलावर बसून एका निग्रो-बरोबर चहा घेतला तेव्हां देशांतील सर्व नीतिविशारदांनीं अवमानानें माना खालीं घातल्या. इंग्लंडच्या राजानें जेव्हां एक ज्यू जातीचा व्हाइसरॉय हिंदुस्थानांत धाडला तेव्हां इंग्लंडांतील राजनीतिविशारद मनांत एकदम चमकले, आणि हें कृत्य गैर आहे असें म्हणाले. स्कॅण्डिनेव्हियांत मुलामुलींचें शिक्षण स्वच्छपणें निरनिराळ्या ठिकाणीं झालें पाहिजे, ही शैक्षणिक नीति परवांपरवांपर्यंत रूढ होती आणि स्त्रीपुरुषांना एकच शिक्षण दिलें पाहिजे हा ऐन क्रान्तीच्या मोसमांतील आग्रह रशियानें आतां सोडून दिला असून स्त्रीपुरुषांना निरनिराळीं शिक्षणें दिलीं पाहिजेत, हा नवा आचार आतां रूढ केला आहे. ही सारी नीतीच आहे.

मद्रासेकडे चांगले चांगले श्रेष्ठ लोकसुद्धां अनवाणीच चालत असत. कोणाचें नांव सुब्रह्मण्यम् अय्यर, कोणाचें नांव मंगलाचारी, कोणाच्या अंगांतील कपडे आणि डोक्यावरचें मंदिल मोठें भारी किंमतीचें दिसावें, पण पायांत मात्र पायताणसुद्धां नसावें! ही सुद्धां तेव्हां आचारनीतीच होती. आणि इतरांचें पाहून जेव्हां लोक जोडा घालूं लागले तेव्हां त्यांच्या सनातनी मित्रांनीं त्यांचा उपहास केला; कारण अनवाणी चालण्याची नीति त्यांनीं सोडलेली होती. बहिर्दिशेला गांवाबाहेर जावें आणि तसेंच धोतर वर धरून घरीं येऊन पाणी घाल म्हणून आईला किंवा बायकोला सांगावें, हीहि तिकडच्या मुलखांत मान्य नीतीच होती. आणि इतरांचें पाहून तेथल्या सुधारकांनीं (!) जेव्हां बदल केला, तेव्हां तेथले नीति-विशारद त्यांना हंसले असतील.

अशी बदलत्या नीतीचीं उदाहरणें शेंकड्यावारी देतां येतील. समाजरचने-संबंधींची नीतीहि पुष्कळदां बदलत जाते. धारण-पोषणासाठीं न्याय-अन्यायाच्या कल्पना रूढ झाल्या म्हणून व शास्त्रांनीं उत्पन्न केलेल्या समृद्धी-मुळें शक्य झालें म्हणून ही रचनाविषयक नीति आपण जलदीनें बदलत आहों. चालीरीतींची नीति तर दर दहा वर्षांनीं बदलत असल्याचें आपल्याला स्वच्छ दिसून येतें. पण असें असलें तरी त्या त्या काळांत जो मान्य आचार असेल तो सरसकट लोकांना पत्करावा लागतो. आणि जे कोणी या कामांत थोडे कमीजास्त करतात, त्यांना लोक दुराचारी किंवा फटिंग म्हणतात.

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक 2222 वि. विवेकांक -
वर्गांक 9993 नों. दि. 22/7/96





REFBK-0008858